म. ग्रं. सं. ठाणें

सन्

लेखक सि. आ. गुर्जर

क्रमांक पुस्तकाचें नांव मो

224

२६

नाटक

TO

# GANGADHARRAO YASHVAN

*alias*

# BAPPA SAHEB MAIRAL, ESQ.

The fit representative of that illustrious house
the name of whose Founder so justly awakens
a feeling of pride akin to veneration in
the breast of every true BRAHMAN

no less

r his devotion to and his scrupulous and pious observan
of those great and catholic principles of our religiou
which are embodied in that noble legacy bequeath-
ed to us from a long and glorious antiquity
and known far and wide as the BHAG-
WADGEETA and which so intense-
ly pervaded the whole life and
character of the Subject of
these pages

than

FOR THE ILLUSTRIOUS POSITION HE HELD IN THE
BARODA STATE.

## THIS WORK

IS

MOST RESPECTFULLY DEDICATED

BY

THE AUTHOR.

श्रीमंत सकलगुणालंकरण राजमान्य राजश्री

गंगाधरराव यशवन्त

ऊर्फ

# बाप्पासाहेब मैराळ.

यांस

पूर्वजांचे औदार्यभूतदयादि व ह्यांचेठायीं विद्याभिरुचि,

परगुणग्राहकता इत्यादि गुण ऐकून

**ग्रंथकर्त्यानें**

हें पुस्तक

संमानपुरःसर, मोठ्या कृतज्ञतेनें व औत्सुक्यानें

समर्पण केलें असे.

# प्रस्तावना.

"दामाजीपंताचा फार्स" !! म्हणून जो प्रयोग अलीकडील नाटकमंडळ्या वारंवार तास दीड तासांत करून दाखवितात, तो सर्वतोपरि दोषयुक्त होतो असें मला वाटतें. एका प्रसंगीं तर तो पहात असतां माझ्या मनांत असें आलें कीं, ही करुणापर कथा नाटकरूपानें लोकांपुढें आली असता त्यांचें चित्तरंजन करील. ह्याच मनोदयानुरूप हा मीं यत्न आरंभिला, व तो आज लौकरच ईशकृपेनें शेवटास गेला आहे.

ह्या कथेला आधार मुख्यत: भक्तिविजयांतील दामाजीपंताचें चरित्र आहे, तसेंच अमृतरायकृत 'दामाजीपंताची रसीद' व लोकांकडून मिळालेली कांहीं माहिती ह्यांचाही आधार घेतला आहे.

माझे परममित्र रा० रा० रामचंद्र व्यंकटेश हैदराबादकर ह्यांचें, ह्या नाटकांतील उर्दू भाषेच्या संबंधानें मला सर्वैव साहाय्य झालें आहे त्याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहें.

उर्दू भाषा न समजणाऱ्या वाचकांचा मध्यें रसभंग ह नये म्हणून ह्या पुस्तकांतील उर्दू भाषणांचें मराठी [illegible] दलें आहे.

सीताराम [illegible]रि [illegible],

मुंबई, आश्विन कृष्ण १२ }
शके १८०२.

# उदारदामोदर नाटक.

## अंक १.

### प्रवेश १. स्थळ, रंगभूमि.

#### श्लोक.

कल्पान्तावधि शोधिला तरिहि जो अण्वंश ना सांपडे,
भक्तांच्या परि पालनार्थ सहसा ज्या रूप घेणें पडे.
“ यज्ञाभार्थ मनुष्यजन्मचि ” असें ज्ञानी सदा सांगती.
तो विश्वंभर आमुचें शिव करो देवो अम्हां सद्गती.

#### आर्या.

भूगोलादिक लीलें चाळवि जो देउनी विचित्रगती,
ब्रह्माण्डसूत्रधारा नमितों आम्ही हितार्थ मंदमती.

तसेंच आणखी:—

[illegible]

देतांच जन्म जीवा मातृ[illegible]र पयोमृतें [illegible]रि जो,
त्याच्या कृपामृतानें [illegible]तत [illegible] [illegible]

( असें मंगलाचरण झाल्यावर )

धार— ( पडद्याकडे पाहून ) आर्ये, वस्त्रालंकारादिकांनीं सजून तयार असलीस तर जरा इकडे बाहेर ये बरें. ( नटी प्रवेश करिते. )

ी— आर्यपुत्र, मी आपल्या बोलावण्याची वाट पहात आंत तयारच होतें. आपली आज्ञा आतां काय आहे ती सांगावी.

०— प्रिये, आज्ञा कशाची ! शरदृतूंत सरोवरामध्यें स्वच्छ चांदण्यांत कमलें जशीं प्रफुल्लित दिसतात, त्याप्रमाणें ह्या अनेक प्रकारच्या दीपप्रकाशामध्यें सभासदांचीं मुखें, पहा कशीं उल्हसित दिसत आहेत तीं ! त्याचप्रमाणें ह्या हिंकडच्या अंगास केवळ चंद्रमण्डळाचा भास उत्पन्न करणारें हें स्त्रीमण्डळ वसलें आहे !! तर आतां ह्यांचें मनोरंजन करणें हा आपला धर्म नव्हे काय ?

ी— प्राणप्रिया, नाहीं कोण बरें ह्मणेल ? आपली आज्ञा मला शिरसा वंद्य आहे. काय आहे ती मात्र कळावी.

त्र०— हे प्रिये, सच्छीले, तुझ्या ह्या वचनानें, मी स्वर्गांतलि अमृतच पान करीत आहे कीं काय ? असें वाटतें ! प्राणप्रिये, आजपर्यंत अनेक वर्षांच्या नानाविधवाग्विलासांनीं प्रेक्षकजनास आपण संतुष्ट केलें आहे. आज ह्या नवीन "उदारदामोदर" नाटकानें ह्यांचें चित्तरंजन कर्तव्य आहे. समजलीस.

टी— [illegible] अहो, खरेंच नवीन नाटक [illegible] कधीं असें नांव आपल्या तोंडांतून पूर्वीं ऐकिलें. काय ! ह्यां [illegible] श्रीकृष्णाच्या लहानपणच्या लीला आहेत ?

**सूत्र०**– आर्ये, तूं ' दामोदर ' ह्या शब्दावरून असा तर्क केलास वाटतें ! तर तसें नव्हे. ह्या आपल्या देशांत अनेक पुण्यात्मे होऊन गेले त्यांत सुमारें दोनतीनशें वर्षांपूर्वी यवनी राज्यांत कोणी एक दामाजी पंत नामें मोठा प्रेमळ भगवद्भक्त होऊन गेला. त्याचें चरित्र ह्या नाटकद्वारा लोकांस दाखवावें असा पूर्ण मानस आहे.

**नटी**– अहाहा ! आजपर्यन्त साधूंच्या चरित्राचें नाटक कोणीही पाहिलें नाहीं. तेव्हां हें अपूर्व आहे, ह्यांत संशय नाहीं.

**सूत्र०**– पहा, सांप्रत आपल्या देशांत कोठें नाहीं कोठें तरी वरचेवर दुष्काळ पडतोच ! अशा वेळीं दुष्काळपीडितांची काय अवस्था होते! व दयाळु पुरुष ह्याप्रसंगीं कसे वागतात हें ह्या नाटकावलोकनानें लोकांस समजणार आहे. ( प्रेक्षकांकडे पाहून ) प्रिये, हे लोक, पहा, हें अभिनव नाटक पहाण्याविषयीं कसे अत्युत्सुक दिसत आहेत ते ! तेव्हां प्रथमतः मनुष्यमात्रासच काय तर हरिणादिपशुजातींस सुद्धां मोहून टाकणारें जें गायन तेणें करून ह्या प्रेक्षकांचें मन हरण करावें,

**नटी**– आपले आज्ञेप्रमाणें मी तत्पर आहें. परंतु संगीत कशा प्रकारचें असावें, व तें कोणत्या संबंधाचें असावें, ? हें कृपा करून सांगावें.

**सूत्र०**– अग, हें काय विचारतेस ? हें सकलसृष्टिवैभव ज्याचें आहे ज्याचे परोपकारादि गुणांचें वर्णन केल्यानें, साधुलोकांलाच काय पण कठोरहृदय नास्तिक लोकांही क्षणभर द्रवतील अशा परमेश्वराच्या कीर्तीशिवाय आणखी कशाला उद्देशून गाणार ?

नटी— अहो, हें सर्व ब्रह्माण्डच त्याच्या कृतीनें भरलें आहे ! त्याचे कृतीचें वर्णन करण्यास समर्थ कोण होणार आहे ?

सूत्र०— प्रिये, तें खरें. सध्या हा शरदृतु आहे, तर ह्यासच उद्देशून गावें, त्याची कृति सर्वत्र आहे.

नटी— बरें तर ( गाऊं लागते. )

पद.

( राग यमनकल्याण, ताल त्रिवट. )

शरदृतुनृपति सवैभव, आला तोषद होउनि अभिनव. ध्रु०
वर्षाकाळें सजला उर्वी, पूर्वीं केलें अशास्तव. १
दिसे चंद्रिकारूपवस्त्र हें, स्वच्छ पसरलें अतीव. २
धूळ नव्हे ही गुलाल उधळी, वायुसचिव हा सोत्सव. ३
ज्याच्या शीतकृपेनें रात्रौ, आलिंगिति युवती धव. ४
तंदुलधान्यादिक प्रजांतें, देत असे हा दयार्णव. ५
मान द्यावया कृतज्ञतेनें, लोक करिति दीपोत्सव. ६
दातृगृहीं द्विज तेवीं षट्पद, कमलवनीं करिती रव. ७

सूत्र०— काय प्रिये, तुझ्या कंठामध्यें माधुर्य हें ! ( प्रेक्षकांकडे पाहून ) तुझ्या ह्या गायनामृतवर्षावानें ह्यांच्या मुखांवर पहा कशी टवटवी दिसत आहे ती ! एकूण संगीत[illegible]चें मुळचें माहेरघर [illegible] च कंठ होय !

नटी— [illegible] आठवण झाली. [illegible]रवांपासून चा[illegible] आनंदकार[illegible] [illegible]ळीच्या [illegible]णाचे [illegible] [illegible]पि- त्यानें तुला [illegible]हवर्तमान [illegible] [illegible]हेरीं बलावण्याकरितां कालच [illegible] उपाध्याय पाठविला होता. उद्यां सकाळीं तिक-

डे जाण्याकरितां निघावयाचें, तेव्हां मी जातें, आपण आतां फार उशीर करूं नये. ( जाते. )

सूत्र०— अहा हा ! स्त्रियांचा माहेरीं केवढा ओ असतो ! आह्माला बोलावण्याकरितां ज्यांना पाठविलें हे ते आमच्या श्वशुरांचे उपाध्यय काय.! यजमान व उपध्याय असावे तर हे, दामाजीपंत येत आहेत ह्यांसार यजमान व ते अंगावर शालजोडी घेतलेले ह्यांसार उपाध्याय असावे. ( जातो. )

---

## प्र० २. स्थळ–मंगळवेढें, दामाजीपंताचा वाडा.

( दामाजीपंत व उपाध्याय येतात. )

उपा०— कां पंत, आतांशी चार पांच दिवस आपली चित्तवृत्ति उदासीन दिसते ? आपल्यास मी विचारणार विचारणार ह्मणून दोन दिवस ह्मणत आहें. परंतु आज तर विशेष औदासिन्य वाटल्यामुळें, आज तसा योग आणावाच लागला. आपला समागम मला सरासरी वीस एकवीस वर्षें आहे, इतक्या कालांत आपली अशी वृत्ति माझ्या अवलोकनांत पूर्वीं कधींच आली नव्हती. आपली मनोवृत्ति सदासर्वकाळ शांत व आनंदी असावयाची, तेव्हां एका एकी अशा वृत्तीचें अवलंबन करण्याचें कारण काय असावें ह्याविषयीं म्या पुष्कळ तर्क केले. परंतु कांहींच मति चालेना, ह्मणून ऐकल्यानें जाणावयास हा आश्रित अति फार उत्सुक आहे.

दामाजीपंत— हे कुलगुरो, असें ह्मणतां काय बोलतां ? मी

आपला आश्रित आहें. आपली योग्यता काय सांगावी ! आपल्यासारखे विद्वान् ह्या प्रांतीं तर राहूं द्या, पण विद्यापीठ जें काशीक्षेत्र त्यांत देखील मिळणें कठीण ! वेदान्तशास्त्रामध्यें आपली केवढी प्रवीणता ! तसेंच पुराण सांगणें तरी किती सरळ, मधुर व हृदयभेदक !! कित्येक श्रोते तर अगदीं तल्लीन होऊन केवळ आपल्याच उपदेशामृतानें हा प्रपंच मिथ्या मानून पुण्यक्षेत्रीं जाऊन " राम राम"-" विठ्ठल विठ्ठल " ह्मणत बसले आहेत ! अहा हा ! जन्मास आल्याचें सार्थक तेच करितात कीं जे सर्वसंगत्याग करून रात्रंदिवस त्या सच्चिदानंदाच्या भजनीं तत्पर होतात! तसेंच आपलें आचरण किती शुद्ध. तेव्हां मी मात्र आपल्या आश्रिताचाही आश्रित आहें.

उपा०— (मनांत) हा मोठा वैराग्यशाली पुरुष खरा. (उघड) पंत, आपले गुण काय वर्णावे! परोपकार करण्याविषयीं दक्षता, परदुःखानें अत्यंत दुःखित होणें, कितीही दुर्धर प्रसंग आला तरी आपलें शुद्ध शील न सोडणें, परमेश्वराचे ठिकाणीं अनतिम प्रेम व त्याचें दररोज मोठ्या श्रद्धेनें भजनपूजन करणें इत्यादि सत्पुरुषांचीं जीं लक्षणें ग्रंथांतरीं अवलोकनांत येतात तीं आपल्या ठिकाणीं पूर्णपणें दृष्टीस पडतात. अशा सत्पुरुषाचा समागम मला सतत आहे; तेव्हां ह्यापेक्षां ह्या पृथ्वीतलावर दुसरें सौख्य तें कोणतें असावें! अहाहा! सत्संगतीविषयीं जें ह्मटलें आहे कीं, "सत्संगतिर्भवति मोक्षप्रदाय, राजन्" तें सर्वथैव सत्य आहे. (मनांत) [illegible] बोलतां बोलतां काय [illegible] उदासीन वृत्तीचें कारण समजेल.

[illegible] आपण उपमा देता हीं

मजसारख्या पातकी मनुष्यास कशी शोभेल ? जन्मापा
. माझ्या हातून कांहीं परोपकार घडला नाहीं. कोणाचें दु
निवारणें झालें नाहीं, किंवा या विठ्ठलाचें स्वस्थपणें एक
ग्रचित्तानें भजन करण्यास मला फावलें नाहीं. सर्व अ
युष्य त्या यवनाची चाकरी करण्यांत गेलें. हेंच सर्व ज
सर्वत्र भांडाचा जो धनी त्याचे सेवेंत जातें तर जन्मा
आल्याचें सार्थक झालें असतें. असो; आतां शेषजीविता
तरी– ( इतकें बोलून स्तब्ध राहतो. )

उ०– ( मनांत ) आतांच्या शेवटच्या तुटक दोन तीन श
ब्दांवरून ह्याच्या चित्तवृत्तीविषयीं अनुमान किंचित् होतें, त
असेंच कांहीं संभाषण चालविलें पाहिजे. (उघडपणें) कां? म
आपणास सत्पुरुष ह्मणतों तें अगदीं सत्य आहे. पहा, पृ
थ्वीवर सत्पुरुष सत्पुरुष ह्मणतात ते ह्मणजे अमक्याच का
ळांत होतात, ते अमुकच ज्ञातींत होतात किंवा अमुकच
देशांत होतात, त्यांचें अमुकच रूप असतें असें कांहीं नाहीं
तर स्वभावतःच जे दयाळू, निष्कपटी, आपलें जीवित पा
ण्यावरच्या बुडबुड्याप्रमाणें अगदीं अल्प आहे असें स
मजून जे परमात्म्यास एकक्षणही विसरत नाहींत, ज्यांचीं
आचरणें शुद्ध, मनुष्यदेहांतच काय ती ईश्वरप्राप्ति हो-
णार असें जे समजतात, ज्यांच्या संगतीनें लोक कुकर्मा-
चा त्याग करून ईश्वराकडे वळतात, सतत आपल्या
दृष्टिगोचर असणारी जी ही सृष्टि हींतील नानाप्रका-
रे चमत्कार पाहून व त्यांविषयीं सूक्ष्म विचार करून,
जे सृष्टिकर्त्यानें अपार कौशल्याची थोरवी गातात.
व ही सर्व सृष्टि प्राणिमात्रांच्या सुखार्थ उत्पन्न के-
ली आहे, असें पाहून ज्यांचे नेत्रांवाटे प्रेमाश्रू ये.

लोट वहातात, येथील सर्व वैभव जे तुच्छ व क्षणिक मानितात, ज्यांचें संसारांत राहून सर्व लक्ष्य परमार्थाकडे, ज्यांनीं इंद्रियें स्वाधीन केलीं आहेत. इत्यादि बहुत लक्षणें सत्पुरुषांचीं आहेत तीं येथें कोठवर सांगावीं? तेव्हां हीं लक्षणें जर आपल्याठायीं पूर्ण दिसत असतील तर आपल्यास सत्पुरुष कां ह्मणूं नये?

उ०—उपाध्ये बावा, तुह्मी कांहीं ह्मणा परंतु मी ह्या संसारसमुद्रांत अगदीं सर्वस्वी बुडत आहें, ह्यांतून सुखरूप तारून नेणारी जी धर्मनौका ती मिळविण्याविषयीं मीं अद्याप किंचित् ही यत्न केला नाहीं. आपल्या सारख्याचे सर्व काळ संगति असून त्या ब्रह्मपदाची ओळख करून घेतली नाहीं. हा सर्व देह सर्व काळ यवनाच्या सेवेंत घालविला. मनुष्यदेहाची योग्यता केवढी आहे हो मला अजून कळत नाहीं. ह्या जन्मांत साधावयाचें तें कांहींच साधलें नाहीं. तेव्हां, शास्त्रीबावा, आतां माझ्या मनांत जें आलें आहे तें आपल्याजवळ बोलल्यावांचून रहावतनाहीं. व तुह्मींही मला माझ्या उदासीनवृत्तीचें कारण विचारिलें आहां.

उ०—मग हा माझ्यावर मोठा अनुग्रहच समजला पाहिजे.

दा०—पहा, माझ्या वयास सरासरीस पंचेचाळीस वर्षे होत आलीं, गंगाखेड सोडल्यापासून बेदर मुक्कामीं सहा वर्षे नोकरीवर [illegible], नंतर हा अधिकार प्राप्त झाला. ह्या अधिकारावर [illegible] एकतीस वर्षे होत आलीं; अधिकार लहान असो की मोठा असो ती नोकरीच की नाहीं? नोकरी ह्मणजे आपलें हें बहुमोलाचें आयुष्य ह्या अल्प व अति तुच्छ द्रव्यासाठीं दुसऱ्याला विकावयाचें; तेव्हां ही गुलाम

गिरी होय. ह्या गुलामगिरींत दोन सवादोन तपें गेलीं परंतु शेवटीं लभ्यांश काय ? तर कांहीं नाहीं. बादशाहाच्या हुकुमाप्रमाणें प्रजांपासून वसूल करण्याच्या कामांत मजकडून त्यांस बहुत त्रास झाला असेल. कधीं कधीं तर त्यांस खाण्यासही नसून माझ्या जाचणुकीमुळें त्यांस सरकारांत दाणा भरावा लागला असेल. कोठें कोठें व कधीं कधीं न्याय करितांना मजकडून निरपराधी मनुष्यांसही शिक्षा मिळाल्या असतील. उगाच क्रोधादिकांस वश होऊन पुष्कळ लोकांवर रागें भरलों असेन, असे अनेक अपराध मजकडून घडले असतील. आतां ह्या उपरांत तरी ते न घडावे अशी माझी इच्छा आहे.

उ०— ( मनांत ) कितीहो कोमल अंतःकरण तरी ह्या पुरुषाचें ( उघडपणें ) लोकांस उगाच त्रास होत असल्यास आपणास झालेली इच्छा, ठीकच आहे. आपल्या बोलण्याचा रोख बराच माझ्या लक्षांत येत चालला. परंतु आपलें बोलणें पूर्ण झाल्यावर आपल्या विचारावर चार शब्द यथाशक्ति मलाही आज बोलणें आहेत.

दा०— आजपर्यंत हरएक संकटसमयीं मला आपणच हिताच्या गोष्टी सांगितल्यात, अनेक प्रसंगीं नीति व उपदेशही आपणच केलात. तेव्हां अशा समयींही आपणच होऊन कृपा करण्याचें मनांत आणिलें हा मजवर आपला मोठा उपकार होय. व अशा उपकारास मी पात्र आहे. काय तें बोलावें.

उ०-- पूर्वी आपला सर्व हेतु लक्षांत आल्याशिवाय बोलणें इष्ट नाहीं

दा०— बरें तर बोलतों, हें जीवित केवढें अल्प आहे, न

जाणों पुढील क्षणास ह्या देहाची काय अवस्था होईल ह्या लोकीं आपलें रहाणें तर केवळ पाहुण्याप्रमाणें अल्प आहे. येथें हें आमचें जन्म फक्त परलोक साधण्याकरितां च आहे. विषयवासना, नाना प्रकारच्या मोह उत्पन्न करणाऱ्या वस्तु ह्यांच्याचसाठीं हा देह उत्पन्न झाला आहे असें अज्ञ मनुष्यावांचून कोण ह्मणणार आहे ? द्रव्यासाठीं मनुष्यें अंध होऊन अनेकप्रकारचीं कुकर्में करितात; पारलौकिक सुखदुःखाची कांहींच काळजी करीत नाहींत. मनुष्य सकाळीं उठल्यापासून तों निजेपर्यंत नानाप्रकारचे क्लेश भोगून पोटासाठीं खटपट करितो. परंतु परमेश्वरास स्वस्थपणें एक घटिकाभरही आठवीत नाहीं. पहा ! ह्याच मंगळवेढ्यांत नुकताच चार पांच दिवसांपूर्वीं धनशेट सावकार मृत्यु पावला हें तुह्मांस ठाऊकच आहे, त्यानें अनेक प्रकारें मरेपर्यंत लोकांस त्रास देऊन सर्व द्रव्य मिळविलें ! जन्मांत एकही पैसा धर्म केला नसेल! त्यास कधीं ईश्वराचें स्मरण सुद्धां झालें नसेल ! पुढें त्यास संतति नाहीं. बिचारी त्याची बायको मात्र येथें एकटी आहे तीही फार दुखणाईत आहे. एवढें द्रव्य येथें पाठीमागें टाकून फक्त आपल्या बरोबर परलोकीं पापाची मात्र पुंजी घेऊन गेला. प्राणोत्क्रमणाच्यावेळीं तरी कांहीं बोलेल तर दोन दिवस त्याची वाचाच कींहो धरली! हेंच एक उदाहरण घडलें असें नाहीं. अशीं हजारों उदाहरणें आपण प्रत्यक्ष पहात असून आपणही त्याच मार्गानें जाणें हें केवढें मूर्खत्व होय ! ह्मणून तर त्या दिवसापासून असा निश्चय झाला आहे कीं सांप्रतच्या स्थितीचा त्याग करून पंढरपुरास जाऊन सर्वकाळ श्री विठ्ठलाच्या चरणीं तत्पर असावें

उ० – आपल्या ह्या बोलण्यानें मनोवृत्ति कशी अगदीं शांत होऊन गेली आहे. आपण आलों कोठून ? आपणांस जावयाचें कोठें ? येथें आपलें कर्तव्य काय ? मरण हें काय आहे ? मरणोत्तर होणार काय ? जें दृश्य तें सर्व नष्ट कां होतें ? प्रेमबंधन हें कशाकरितां आहे ? काम क्रोधादिकांची उत्पत्ति किमर्थ आहे ? इत्यादि अनेक सूक्ष्म गोष्टींचा स्वस्थ मानसें करून जो क्षणभर विचार करितो, त्यास आपले हे ज्ञानमय विचार अगदीं तल्लीन करतील. पशुपक्षिकीटकादि अगण्य प्राण्यांपेक्षां मानवप्राण्यास ज्ञान ज्यापेक्षां अधिक दिलें आहे त्यापेक्षां विश्वकर्त्याचा असा सहज हेतु दिसतो कीं आपल्याविषयीं यत्किंचित् तरी मनुष्यास ज्ञान व्हावें. मनुष्यानें चित्रविचित्र सृष्टींतील चमत्कार पाहून त्याजविषयीं अनेक तर्क करावे. तेव्हां मनुष्यदेहाचें सार्थक झटलें ह्मणजे त्या परमेश्वरासच ओळखिलें पाहिजे. तो ओळखण्याचा मार्ग भक्ति होय. ईश्वरस्वरूपाविषयीं, त्याचे शक्तीविषयीं त्याचे दयालुत्वाविषयीं, त्याचे न्यायदृष्टीविषयीं इत्यादि अनेक गोष्टींविषयीं अनेक शास्त्रांत सांगितलेलें आहे. त्यांतच भक्ति ह्मणजे काय ती करावी कशी ? तिजपासून फलप्राप्ति काय ? अशा अनेक सांगितलेल्या गोष्टींचा येथें किती पाल्हाळ सांगावा. जगदुत्पत्तीपासून आजपर्यंत मनुष्य होऊन किती मेले असतील. परंतु ज्यांनीं परमेश्वरास ओळखण्यास आपला कांहीं तरी आयुष्यांश खर्चिला तेच धन्य होत. इतरांस पशूंचीच उपमा देणें योग्य होय. पहा, ह्या विश्वरूपनाटकालयांत ह्या जगद्रंगभूमीवर ज्याच्या आज्ञेनें मनुष्यादिकपात्रें जन्ममृत्युरूप पडद्यांनीं

यथानुक्रमें प्रवेश करितात व जातात, त्या सूत्रधाराचें यद्यपि कामक्रोधादिकांनीं वेष्टित जें हें मनुष्यरूपिसोंग त्यास पातकांधकारानें दर्शन होत नाहीं, ह्मणून हा नाटकप्रयोग करणारा कोणीच नाहीं. असें ह्मणणें किती मूर्खत्वाचें आहे? घुबडास दिवसास दिसत नाहीं ह्मणून त्यानें सूर्यच नाहीं ह्मटल्यास कसें चालेल? तर सदाचरणप्रदीपाचा पुण्यरूपी उजेड जिकडे तिकडे पडला ह्मणजे भक्तिमार्गानें त्याचें दर्शन सहज होणार आहे. परमेश्वराचें वैभव, स्वरूप-कर्तृत्व इत्यादिकांविषयीं वर्णन करण्यास कोणी ही आजपर्यंत समर्थ झाला नाहीं, तेथें ह्या अल्पमतीनें ह्याक्षणीं काय बोलावें? त्याचें महत्व व आपली योग्यता याविषयीं भागवतांत दशमस्कंधीं ब्रह्मस्तुतींत ब्रह्मदेवानें ह्मटलें आहे,

क्वाहं तमोमहदहंखचराग्निवार्भू—
संवेष्टितांडघटसप्तवितास्तिकाय :
क्वेदृग्विधाविगणितांडपराणुचर्या—
वाताध्वरोमविवरस्य च ते महित्वम्.

ह्मणजे,— माया. महत्तत्व, अहंकार व पंचमहाभूतें यांनीं वेष्टित जें हें अवाढव्य ब्रह्माण्ड यामध्यें हा माझा सात विती देह कोणीकडे? व, हे परमेश्वरा, अशाप्रकारच्या असंख्य ब्रह्माण्डरूप परमाणूंचें भ्रमण होण्याकरितां गवाक्षासारखीं आहेत रोमरंध्रें ज्याचीं असा जो तूं त्या तुझा श्रेष्ठपणा कोणीकडे? तेव्हां मनुष्यप्राण्याचें परमात्म्यापुढें किती अल्पत्व आहे? अस्तु; तेच भगवद्भक्त धन्य होत, ज्यांला परमेश्वरानें प्रत्यक्ष दर्शन दिलें. परंतु, आपण मनांत आणलेला उद्देश हा सर्वथैव स्तु-

त्यच आहे, परंतु ह्या जगतामध्यें चांगले पदार्थ थोडे असतात. हजारों अरण्यें आहेत पण ज्यांत चंदनवृक्ष आहेत अशीं किती मिळतील! सर्व पृथ्वीच मुळीं पाषाणमय आहे. पण तींत हिरे किती निघतात! त्याच प्रमाणें ह्या अगणित मानवप्राण्यांमध्यें सदाचरणानें वागणारे फारच थोडे! सत्पुरुष हें नाम थोड्यांसच मिळेल. तप आचरण करण्याकरितां सर्वसंगपरित्याग करून जे वनाचा आश्रय करितात त्यांचा आशयही हाच असावा कीं, ह्या पातकप्रचुर जगताचा जेवढा संबंध तुटेल तेवढा बरा. कारण, संसारांत असल्यानें अनेक बुद्धिवाद सांगणारे लोक त्यांचें मन चंचल करितात व सदाचरणापासून भ्रष्ट करितात. परंतु हे वनांत जाणारे केवळ स्वार्थसाधकच असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. लोकांचा हितकर्ता तोच ह्मणावा कीं, जो लोकांत रहून आपल्या चरितानें लोकांस सन्मार्ग दाखवितो. आतां आपण प्रत्यक्ष वनांत जरी जात नाहीं तरी संसार सोडून जाणें हें तेथेंच जाण्या सारखें आहे. तर आपल्या सारख्यांनीं ही नोकरी सोडून जाणें हें मला प्रशस्त दिसत नाहीं. सच्चिदानंदास न विसरतां प्रपंचांत नीतीनें कसें रहावें हें, आपण गेलां तर लोकांनीं कोठून शिकावें? आपल्या आश्रयाखालीं आज एवढे लोक आहेत यांनीं कोणाच्या तोंडाकडे पहावें? आपल्या सारखे दयाशील, ह्या कामावर असल्यामुळें येथील सर्व प्रजा सुखी आहे. तेव्हां सर्वलोकांस असंतुष्ट ठेवून आपण इष्ट मार्गाचें अवलंबन करावें असें माझें तर मत नाहीं. तशांतही राजा ह्मटला ह्मणजे " ना विष्णुः पृथिवीपतिः " तेव्हां बादशाहाची इमानानें नोकरी

करणें ह्मणजे परमेश्वराची कांहीं अंशीं निर्मल भक्ति करणें नव्हे काय ? आपल्यासारखे ज्ञानसंपन्न पुरुष कोठेंही असले तरी सारखेच.

दा०— माझ्या ठिकाणीं ज्ञानाचा लवही नसून मला ज्ञानसंपन्न ह्मणून दूषित कां करितां ?

उ०— अहो, ज्ञान हें कांहीं कोणत्याहि पुरुषाच्या ठिकाणीं प्रत्यक्ष एकाद्या वस्तूप्रमाणें दिसत नाहीं हें खरें. पण त्या पुरुषाचे कृतीवरून त्याचे ठिकाणीं ज्ञान आहे हें समजावयाचें. पहा, वसंतऋतु हा जरी प्रत्यक्ष दृश्यमान नाहीं तरी तो कशावरून समजतो, तर ज्या वेळेस वृक्षांस पालवी फुटतें, नानाविध पुष्पांनीं व फलांनीं उद्यानें व वनें शोभूं लागतात. मंद व सुगंध वायु वहातो. कोकिलांचे पंचम स्वर कानीं पडतात. व वनश्री अशी कांहीं रम्य दिसते कीं तिचें मार्मिक कवींसही वर्णन करतां येऊं नये. सारांश, ह्याप्रमाणें ज्ञानवान् पुरुषास त्याच्या सदाचरणावरून लोक ओळखतात.

दा०— ( मनांत ) उपाध्येबुवांचें तर आपणास अनुमोदन मिळत नाहीं. तेव्हां आपल्या इच्छेप्रमाणें होत नाहीं. ( उघडपणें ) आपलें ह्मणणें सर्वथैव सत्य आहेच. परंतु पहा, उपाध्येबुवा, नेत्रांनीं दिसत आहे तोंपर्यंतच त्याची सगुण मूर्ति पहातां येईल, ऐकूं येत आहे तोंपावेतों त्याचे भजनकीर्तनानें हे कर्ण तृप्त होतील. वाणी यथास्थित आहे तावत्पर्यंत त्याचे गुण गातां येतील व साधुजनांशीं सनम्र भाषण होईल. इत्यादि परमेश्वराच्या प्राप्तीस्तव ज्या ज्या इंद्रियांची आवश्यकता त्या सर्वांचा या वयांत अजून बराच उपयोग होईल. अनेक रोगरूपी शत्रूंनीं वेष्टित जो हा

देहगड यावर कधीं ते घाला घालून विजयी होतील याचा नेम नाहीं. आपण होऊन विषयांस सोडलें तर त्यांत आपला मान आहे, आपण त्यांस न सोडिलें तरी ते आपणांस सोडणारच. मग त्यांत काय मजा ? वृद्धत्व आल्यावर इंद्रियें सोडून जातीलच. नंतर ह्या नोकरीस तर अंतरलोंच, परंतु अखिल विश्वाला इच्छामात्रें उत्पन्न करणारा, त्याचें रक्षण व नाश करणारा जो परम समर्थ विभु त्यासही अंतरलों. आतां आपलेंही ह्मणणें अयोग्य आहे असें नाहीं. आपलीच इच्छा मला सप्रमाण.

उ०– पंत; ह्या काळीं जिकडे तिकडे यवनी राजांचा अम्मल आहे. अर्थात त्यांचे धर्माची प्रबलता आहे. आपले लोकांस व गायत्रीला अत्यंत त्रास होत आहे. स्वधर्म सोडून कित्येकांस यवनधर्म स्वीकारावा लागला आहे. कित्येक तर आपली भाषा विसरून त्या म्लेच्छभाषेनेंच सर्व व्यवहार करूं लागले आहेत. कित्येक लोभानें तर यवनाच्या येथें खाना खाऊं लागले आहेत. होमहवनादिकृत्यें त्यांचे भीतीस्तव मुळींच होत नाहींत. स्वधर्मी राजा नसल्यामुळें शासन होण्याची कांहींच भीति नाहीं, ह्मणून आपले लोकांत धर्मबाह्य कृत्यें एकेक अशीं होऊं लागलीं आहेत कीं, तीं ऐकून अत्यंत खेद होतो. पण उपाय काय ? अशा आपल्या सनातन धर्माचा दिवसें दिवस ऱ्हास होत चालला आहे. “ राजा कालस्य कारणम् ” ह्या प्रमाणें सर्व म्लेच्छमय होऊं पहात आहे. सर्वद्रष्टा, न्यायान्याय जाणणारा त्याचे मनांत येऊन आपल्या ह्या धर्माची त्याचेच वचनाप्रमाणें पुनः संस्थापना केव्हां होईल ती होओ. अशा कालीं तर आपण मनांत आणलेला हेतु तृप्त करणें हें त्या विठ्ठलासही

आवडणार नाहीं असें मला वाटतें. वरें पुनः एकाद्यावेळीं सावकाश बोलूं. आपली सायंसंध्येची वेळ झाली तर मी आतां जातों. ( जातो. )

०—( आपल्याशींच ) काय करावें मन तर द्विधा झालें आहे. ईश्वरप्रीत्यर्थ कोणतेंही एखादें कृत्य करावयाचें असून मध्यें जरि आई, बाप किंवा गुरु विघ्न आणतील तर त्यांस शत्रु मानून त्यांचा त्याग करावा असें साधूंचें ह्मणणें आहे. ध्रुव लहान बाळ असून, त्यास आईबापां- नीं वनाला न जाण्याविषयीं किती आर्जविलें? प्रल्हादास भगवत्प्रीतीस्तव पित्याचें वचन रुचलें नाहीं. भरतानें रामचंद्राच्या वियोगास्तव वसिष्ठगुरूचीही अवज्ञा केली. माझ्या जाण्यानें पुष्कळांस असंतोष होईल इत्यादि गुरुजीं- चें ह्मणणें आहे. " संतोषं जनयेत्प्राज्ञस्तदेवेश्वरपूजनम् " तेव्हां लोकांस दुःख देणें तरीं व्यर्थ आहे. असो; इतकें आयुष्य गेलें तसेंच पुढें जाणार ! विठ्ठलाच्याच मनांत जर मला आपल्या पायांजवळ न्यावयाचें असेल तर तो कोणत्याही तऱ्हेनें नेईल. हे पंढरपुरनिवासिभक्तकल्प- द्रुम, हे रुक्मिणीकांता, तूं सर्वांचें हृद्गत जाणतच आहेस. सर्वांचे मनोरथ पूर्ण करणारा तुजवांचून कोण आहे ! माझा हा सद्विचार तुलाच आवडला नाहीं काय? काय- तुझ्या पुण्यनगरींत इतके लोक रहात असून मीच एक- अधिक होईन ? मनुष्याचें मन स्वभावतःच मोठें चंचल. इंद्रि- यादिकांस स्वाधीन ठेवण्याचें निग्रहबळ मजमध्यें मुळीं- च नाहीं, त्यामुळें मजकडून असंख्य पातकें घडलीं अ- सतील, ह्मणूनच हे पतितपावना ! मी तुझ्या जवळ येत होतों. तुझें निराकार स्वरूप मजसारख्या अज्ञजनास कळणें

कठीण ह्मणून तूं सगुणरूप धारण केलेंस, पण त्या चें ही सदा सर्वकाळ दर्शन होण्यास हा जन अभाग्य आहे काय? तुझ्या अचिंत्यकथा मजसारख्याला समजावयाच्या नाहींत हें खरें तरी तेथें साधुजनांच्या मुखांतून तुझे गुणानुवाद ऐकण्यास हे माझे दोन्ही कान अपवित्र आहेत काय? हे हात तुझ्या मूर्तीसही माझ्या पातकाग्नीनें दाह उत्पन्न करतील काय? देवा, या शुष्कभवारण्यांत तुझ्या कथारसाविषयीं अत्यंत तृषित झाल्यामुळें मी अगदीं थकून गेलों आहें. पुढें पाऊलसुद्धां आतां टाकावयास मला शक्ति नाहीं. हा देहमात्र येथें उभा आहे. पण, विठ्ठला, हें मन तुजकडे लागलें आहे. कंठ दाटून आला आतां एक शब्दसुद्धां बोलवत नाहीं. हे विठ्ठला, (डोळे पुसावयास लागतो) असो; आज भजन झाल्यावर तिचें ह्याविषयीं काय ह्मणणें आहे तें ऐकावें. सूर्य तर मघांच मावळला! स्नानाची वेळ झाली. (जातो.)

---

## प्र० ३. स्थळ—पंतांच्या वाड्यांतील खोली.

( दामाजीपंतांची स्त्री सावित्री बाई, येते. )

**सावित्री०**— ( आपल्याशींच ) काय करावें सुखास पडत नाहीं. आज चार दिवस झाले, तिकडे अगदीं खिन्न होऊन बसायाचें. अन्नावर सुद्धां रुचि नाहीं, आज दुपारीं तर नांवाला मात्र पानावर बसायाचें झालें. का प्रकृति बिघडली आहे ह्मणावी तर तसें कांहीं दिसत नाहीं. काल ह्याविषयीं तिकडे विचारलें परंतु घाईंत असणार ह्मणून कांहीं बोलायाचें झालें नाहीं. तिकडे दुए

तर मला सुख. मजकडून अपराध कांहीं घडला ह्मणावा तर त्यांचे चरणाची ही दासी झाल्यापासून त्यांचे मर्जी बाहेर वागल्याचें मला तर आठवत नाहीं. कोणत्याहि वेळीं अतिथि येवो, याचक येवो त्यास मीं कधीं दुखविलें नाहीं. मोठ्या संतोषानें जेवायास वाढिलें. भजनास आरंभ झालाकीं मी टाळ घेऊन तेव्हांचं तयार. मग काय बरें झालें असेल? कांहींच तर्क चालत नाहीं. कीं बेदराहून बादशाहाकडून कांहीं गैरमर्जीचें पत्र आलें? पण असें कसें होईल! बादशाहाची तर इकडे पूर्णकृपा. कामांत किती काळजी, विश्वासूपणा व दक्षता असते. सर्व दिवस तरी काय सारखे असतात! आलें असेल कांहीं त्याचे मनांत विपरीत! अथवा कोणीं कांहीं उगाचं त्याला लिहून तर कळविलें नसेलना? आमचा एवढा परोपकारी असा वैरी कोणी दिसत नाहीं. उपाध्येबावा, कित्येक कारकून व त्यांच्या बायका यांचे तोंडांतून पुष्कळ वेळां ऐकिलें होतें कीं, तो कानडा वैष्णव मुजुमदार तिकडचा जेव्हां तेव्हां फारच दुष्टपणा करीत असतो. ( इतक्यांत दामाजीपंत येतात. )

दा०— ( आपल्याशींच, ) ही तर इकडे चिंताक्रांत बसली आहे. व कांहीं आपल्याशींच बोलत आहे. तें येथूनच ऐकावें, मग संध्याभजनादिकरूं. ( तेथें राहतो. )

स्त्री०— पण तिकडून कधीं असें ऐकिलें नाहीं. अहाहा! तिकडचा काय शांत स्वभाव. होतें मागचे जन्मीचें माझें पुण्य ह्मणून ह्यांचे पदरीं पडलें. कशाला बाबा ह्मणावें दुष्टपणा पाहिजे. जर तिकडचा अधिकार तुला हवा असेल तर तसें सांग. आली मोठ्या आनंदानें ही ख-

टपट सोडून स्वस्थपणें पंढरपुरास जाऊन भिक्षा मागू राहूं. आतां भेट झाली ह्मणजे मी तसेंच सांगणार. पुष्कळ झाली चाकरी. पतिव्रतास्त्रियांचा मुख्यधर्म ह्मटला ह्मणजे पतींला संतुष्ट ठेवणें. ह्मणजे पतींच्या इच्छेप्रमाणें वागणें. मजकडून काय आज्ञाभंग झाला असेल तो समजत नाहीं. मला पहिल्यासारखें आनंदी मुख केंव्हां पाहीनसें झालें आहे. ( इतक्यांत पुढें येतो. )

दा०— अगे, मला दुःख कसलें ? मी सदा आनंदचि आहे

सा०— ( मनांत ) माझें बोलणें ऐकिलें वाटतें ! ( उघड काांहीं बोलत नाहीं )

दा०— ( कांहीं बोलत नाहींसें पाहून ) अग, आज हें मौनव्रत कशासाठीं आचरिलें आहेस? ह्या व्रतापासून कोणत्या फलप्राप्तीची इच्छा करितेस. आजपर्यंत कोणतेंही व्रत माझे आज्ञेवांचून केलें नाहींस, आणि हेंच कसें मला विचारिल्यावांचून आचारितेस ?

सा०— जसें एखाद्या आईनें आपल्या भुकेलेल्या तान्ह्या मुलास विचारावें "बाळा, काय झालें? कां रडतेस?" ह्मणजे आपणच कारण असून आपणच कारण काय ह्मणून विचारते.

दा०— एकूण तुझ्या ह्या मौनाला मीच कारण तर.

सा०— तें मीं कसें ह्मणावें ?

दा०— मग हा आईचा दाखला दिलास तो. परंतु माझ्या लक्षांत अद्याप कारण कसें येत नाहीं ! हे पतिव्रते, तुझ्यानेत्रांतील अश्रु, गालांच्या ज्या भागांवरून खालीं पडले आहेत ते भाग कसे स्वच्छ, ह्यावेळेसही मला दिसत आहेत ! नदीला पूर येऊन कांहीं वेळानें तिचे

उदक स्वच्छ होऊन तिचे तट जसे मळीण होतात, त्याप्रमाणे तुझ्या गालांवरील इतर भाग मळीण दिसत आहेत. आणखी डोळे ही अगदीं भरून आले आहेत, पाय कांपत आहेत, घामही पुष्कळ आला आहे. असें एका ऐकीं झालें तरी. काय?

सा०— आज चार दिवस झाले; आपलें अंतःकरण. अगदीं खिन्न दिसतें; ह्याविषयीं काल आपल्यास विचारिलें परंतु आपणास कोठें जाण्याची घाई होती ह्मणून कांहीं बोलावयाचें झालें नाहीं, ह्मणून उगाच आपली बसल्यें इकडे.

दा०— हेंच काय कारण! आणि ह्याच साठीं का इकडे एकटी दुःख करीत होतीस! अगे काल मला विचारिलेंस खरें पण सहजवृत्या नसेन बोललों. त्यामुळें तुला इतकें दुःख सोसावें लागलेना! तुजसारखी पतिव्रता, धर्माला अनुकुळ, जें जें ज्या वेळेस ह्मणेन तें तें त्यावेळस करणारी, अशी चांगली सुशील स्त्री मला पांडुरंगाच्या कृपेनें ह्या भवनदीच्या पैलतीरास नेणारी प्राप्त झाली असतां, मी तुझ्या जवळ कोणती तरी गोष्ट मुद्दाम बोलणार नाहीं असें कधीं तरी होईल काय?

सा०— अजून देखिल सांगायाचें नाहींना?

दा०— उपाध्ये बावांजवळ अजून पर्यंत बोलत बसलों होतों; जरा वेळानें तुझ्याकडे येणारच होतों; तों तुला ह्या ठिकाणीं चिंताक्रांत बसलेली पाहिली. ह्मणून अगोदर येथें आलों. जरा अंतःकरण उदासीन झालें होतें ह्मणतेस तें खरें; त्याचें कारण ह्मणजे

विशेष होतें असें नाहीं. फार दिवस चाकरी झाली आतां वृद्धावस्थेंत तरी पंढरपुरास जाऊन विठ्ठल विठ्ठल ह्मणत आनंदांत काळ घालवावा, असें मनांत आलें होतें. तुझी कशी काय मर्जी ?

सा०— माझी मर्जी ? आपले पाठीमागून मी. पण एका एकीं असें मनांत येण्यास कारण काय झालें ?

दा०— कारण कसलें ? देहाचा काय नेम आहे? अंतकाळ तरी पुण्यक्षेत्रांत घालवावा हीच इच्छा.

सा०— मग मीही तयार आहे. पण उपाध्येबावांचें काय ह्मणणें ? आपलें बोलणें ह्याविषयीं त्यांजवळ झालेंच असेल.

दा०— ईश्वरप्राप्ति येथें राहून होत नाहीं असें नाहीं. मग तिकडे जाण्यांत विशेष काय ? असें त्यांचें ह्मणणें. ह्मणजे मीं नजावें असें आहे.

सा०— ते आह्मांस सर्वप्रकारें वडिलांच्या ठिकाणीं आहेत, तेव्हां त्यांचे ह्मणण्यास मान द्यावा हें ठीकच आहे. पंढरपुर येथून लांब आहे असें नाहीं. एक वेळचा रस्ता. दरबारीस आपण तर जातच असतां. मनांत आलें मध्येंच दर्शन घ्यावें, कीं निघालें.

दा०— बरें तर, कांहीं महिने तर येथें काढावे, पुनः एखाद्या वेळेस गुरूंपाशीं ह्याविषयीं बोलून त्यांची आज्ञा मिळेल असें करूं.

( इतक्यांत ' दामाजी पंतांचें हेंच घर कायहो ? आज रात्रौ, येथेंच उतरून उदयिक आपला पुढचा मार्ग धरावा ' असें ऐकूं येतें. )

दा०— अगे , बाहेर कोणी पांथस्थ आला आहे. तर

ह्याचा सत्कार करणें हें उचित आहे. चला जाऊं. ( जातात. )

---

## प्रवेश ४. स्थळ—कचेरी.

( दोघे कारकून येतात. )

नारोपंत— नमस्कार रामभाऊ, कशी काय तब्येत ठीक आहेना? मध्यांवर आपणास थोडा ज्वर येत होता म्हणून विचारिलें.

रा०— आतां बरी आहे. मागचें लिहिणें फारच तुंबलें होतें व हिशेबामध्यें कांहीं गोंधळ पडला होता, त्यामुळें आढावाही काढणें राहिला होता. सबब मी व कृष्णाजीपंत रात्रंदिवस झटून एक सारखे चार महिने काम करीत होतों. तेव्हां आह्मांस फारच श्रम झाले. ह्मणून तो ताप भागवट्याचा असावा, तरी त्यानें पंधरा दिवस मला रडविलें.

चि०— आपल्या दादासाहेबांना काम कसें वेळच्या वेळेस स्वच्छ पाहिजे. कृष्णाजीपंत नाहीं हो आले अद्याप ?

रा०—येतील आतां. मला 'पुढें चला' ह्मणाले. हे आले हे काय. ( कृष्णाजीपंत येतो. )

कृष्णाजी०— दादासाहेबांच्या सांगण्याप्रमाणें सर्व मंडळी अद्याप आली नाहीं हीं?

चि०—सर्व ती कोण आतां ?

कृष्णा०—मुजुमदार व त्यांचे अनुयायी गणपतराव ?

चि०— त्यांचें कांहीं प्रमाण नाहीं. आज तर ते बहुधा-

नाहींच यावयाचें.

कृ०—दादासाहेब केव्हां येणार तर ? आह्मांला तर त्यांनीं सु
योंदयावरावर बलाविलें.

चिं०—अद्याप त्यानां चांगल्या दोन तीन घटिका पाहिजेत. स्नान
संध्या, पूजा, स्तोत्रपाठ व गीतापाठ. इतकीं उरकलीं तर
पाहिजेत.

रा०— अहा हा ! दादासाहेबांसारखा पृथ्वीच्या पाठीव
विरळाच गृहस्थ. काय त्याची कर्मावर श्रद्धा, धर्माच्य
ठिकाणीं आसक्ति भूतमात्रावर दया, विठ्ठलाच्या चरणं
भक्ति. त्याचप्रमाणें बादशाहाच्या चाकरींत विश्वासूपणा व
दक्षता.

कृ०— आहेत बाबा असे सत्पुरुष पृथ्वीवर ह्मणून ह
पृथ्वी चालली आहे. आह्मी ह्यांच्या हाताखालीं इतकं
वर्षें आहों. पण त्या गृहस्थानें एक शब्द तरी कधीं चु
कीनें वाईट बोलावयाचा होता. आह्मी खरोखर मोठे दै
वाचे. ह्मणून यांचा समागम आह्मांस सर्वकाळ घडल
आहे.

चिं०—पण असे लोकही, मूर्खांच्या निंदेस पात्र होतात.

कृ०—अहो, प्रत्यक्ष परमेश्वरासही शिव्या देणारे लोक आहेत
मग मनुष्याची निंदा करणारे लोक असल्यास काय आश्चर्य

रा०—चिंतोपंत, आपल्या बोलण्याचा रोख मला समजला.

चिं०—समजेल तर काय झालें; आह्मांस त्याची संगतीच आ
दररोज.

कृ०—तें असो; आज, बरी आठवण झाली! दादासाहेब हें स
सोडून पंढरपुरास जाऊन रहाणार ह्मणून ऐकिलें होतें
खरें काय ? त्या दिवसापासून आपल्यास अगदीं चैन नाहं

रा०— मीं देखील ऐकिलें होतें. मग आपले नवीन कारभारी मुजुमदार होणार ! गणपतरावास तर वाटलें कीं त्यांना अधिकार मिळाला सुद्धां. त्यास कारभारी नेमल्यावर दोघे-जण मिळून सर्व प्रजांस पिळून काढतील.

चिं०—आपण ऐकलेली गोष्ट कांहीं खोटी नव्हती. अशी सद्वासना त्या पुरुषाला होणें हें साहजिकच आहे. परंतु त्यांचे सुज्ञ उपाध्ये यांनीं त्यांचा बेत रहित करविला असें ऐकितों.

कृ०—दादासाहेब जाते कीं आह्मीं सुद्धां स्वस्थ घरीं राम राम म्हणत बसलों असतों.

रा०— आणि ह्या कानड्याचे हाताखालीं कोण रहाता. तो कसा बाहेरून काळा तसा आंतूनही काळा आहे.

चिं०—उगाच येऊं नेऊं लागेल त्यांत काय अर्थ आहे.

कृ०— रामभाऊ, आपली पुण्यई अद्याप संपली नाहीं.

(इतक्यांत दामाजीपंत येतात. सर्व उभे राहून नमस्कार करतात.)

दा०— ( नमस्कार करून ) मुजुमदार व गणपतराव नाहीं हे आले ? कां चिंतोपंत, तुह्मीं स्वतः काल रात्रीं गेले होतेतना त्यांजकडे सांगायला कीं उद्यां कांहीं महत्वाचें काम. आहे तेव्हां सकाळीं अवश्य कचेरींत आलें पाहिजे.

चिं०— आपले हुकुमाप्रमाणें मी तेव्हांच त्यांस वर्दी दिली.

दा०—त्यांना विस्मृति पडली असावी तर मग. कोणी शिपाई त्यांला बोलावयाला पाठवा.

चिं०—कोण आहे रे बाहेर दरवाज्यावर ? लक्ष्मणा, मुजुमदार व गणपतराव ह्यांस ह्मणावें कीं कचेरींत सर्व मंडळी आली आहे. तर आपण जलदी यावें.

ल०—जी आपला हुकूम. ( जातो, पुनः कांहीं वेळानें येऊन ) दोघेवी आलेना.

( मुजुमदार व गणपराव येतात. )

दा०— मुजुमदारसाहेब, आपल्याला व गणपतराव यांस किंचित् उशीर लागला, नाहीं बरें ? प्रकृति वगैरे ठीक आहेतना ?

मु०— निघालों होतों. तों आपल्याकडून लक्ष्मण शीपाई आला.

दा०— गणपतराव, असे पुढें या पाठीमागें कां ?

ग०— कोठें बसलों ह्मणून काय झालें आपल्या जवळच आहें.

दा०— मुजुमदार, चिंतोपंत, रामभाऊ, कृष्णाजीपंत, गणपतराव, आज आपणांस सर्वांस येथें एकत्र बोलविण्याचें कारण बहुधा लक्षांत आलेंच असेल. तीन महिन्यांपूर्वीं येथील धनशेट सावकार मरण पावला. त्याची बायकोही बरेच दिवस आजारी होती तीही काल दुपारीं मरण पावली. अरेरे ! तिला पुढें संतानही नाहीं; व भाऊबंधही त्याचे कोण नाहींत. तेव्हां त्याची सर्व जिनगी राजाकडे जाणें हें धर्मशास्त्रानें योग्यच आहे. त्याचे वाड्यावर शिबंदी लोक ठेवून पहारा तर तेव्हांच ठेविला आहे. आतां त्याचें कोणाकडे येणें किती, त्यानें देणें किती वगैरे सर्वांच्या यादी त्वरीत करून त्या सावकाराची जेवढी जिनगी असेल तेवढी बादशाहाकडे पाठविली पाहिजे. पण त्याचेपूर्वीं, कोणी वारस निघतो किंवा कसें ह्याचा आपण शोध केला पाहिजे. धनशेट जीवंत असतां माझा वारस कोणी नाहीं माझी सर्व जिनगी बादशाहाकडे जाणार, ह्मणून तोच ह्मणत असे. असें समजत असूनही एक पैसा त्यानें धर्मार्थ खर्च केला नाहीं ! काय मनुष्याच्या लोभाचा सपाटा आहे ! हें त्याचें तरी

पूर्वजन्मार्जितच ह्मणायाचें. हें एक झालें. दुसरें —बा॰ दशाहाकडून एक हुकुम आला आहे. आज आठ दिवस झाले कोणापाशीं बोललें नाहीं. त्यांतील सारांश हाच कीं, परचक्राचा संभव दिसत आहे तर तयारी करण्यास कोणत्याही द्वारें पंधरा दिवसांचे आंत एक लाख रुपये तरी आले पाहिजेत. ह्याच प्रमाणें दुसरीकडे मोठमोठ्या कारभाऱ्यांकडे असेच हुकुम गेले आहेत. खजिन्यांत शिल्लक कांहींच नाहीं. मी पहा, मोठ्या विवेकपाशांत पडलें होतों. एवढी जब्बर रकम कोठली पाठवावी! काय दरोडा घालून पाठवावयाचीआहे, कीं काय येथें खाण आहे. काय करूं अगदीं सुचेनासें झालें होतें. परंतु पंढरीनाथानें संकट तर अशा प्रकारें दूर केलें. काय मंडळी, लाखाची असामी होती काय ती?

रा॰ व कृ॰— लाखानें काय होणार! पांच लाखांत तर कमी नाहीं.

चिं॰—आपला कैवारी पांडुरंग आहे. संकट मोठें आलें होतें परंतु त्याचेच कृपेनें तें दूर झालें.

कृ॰— त्याचे ठिकाणीं भक्तीच तशी आहे.

दा॰— तेव्हां आज दोनप्रहरीं त्या यादी करावयास लागा. मुजुमदार, आतां आळस करतां कामा नये. बादशाहास आज याविषयीं सर्व हकीगत लिहून नंतर आठ दिवसांत तरी तिकडे सर्व द्रव्य गेलें पाहिजे.

मुजुम॰— आपले ते चिंतोपंत, रामभाऊ, कृष्णाजीपंत आहेतच, ते करतील सर्व ठीक व्यवस्था. माझे प्रकृतीस आतांसें समाधान नाहीं मी जातों आतां. ( गणपतरा

वास ) येणार होता कोण ? परंतु बलावणेंच आलें ह्मणून आलों. कसची चांगली संधी आली होती. पण ह्या मूर्खानें—चला गणपतराव. ( दोघे जातात. )

कृ०— स्वारी रागावली वाटते.

चिं०— कोणीं केलेलें त्याचे मनास कधीं आलें आहे काय ? त्याचा स्वभाव फारच तऱ्हेवाईक.

रा०— असलें सत्कृत्य त्यास कसें बरें आवडेल ?

दा०— तें असो; आज जेवल्यानंतर तिकडच्या कामास लागलें पाहिजे. तुह्मी अगोदर तेथें जमा. मी मागाहून येईन. चला तर. ( सर्व जातात. )

---

## प्र० ९. मुजुमदारांचा वाडा.

( मुजुमदार व गणपतराव येतात. )

मुजु०— काय विलक्षण पुरुष दामाजीपंत हा ! शेवटीं एवढें द्रव्य त्यानें त्या बादशाहाच्या उरावर घातलें ना ? गणपतराव, काय अशांच्या हाताखालीं नोकरी करून फळ ! जन्मभर खर्डीं घासलीं तरी कांहीं एक उपयोग नाहीं ! आपण इतकीं वर्षें येथें आहों पण एक पैसा तरी आपल्याजवळ आहे काय ? ( मनांत ) तरी मींच वस्ताद ह्मणून सुमारें पन्नासएक हजारांची आपल्याजवळ माया करून ठेविली आहे ! ( उघड ) दुसरे एकेक तालुकदार जिल्हेदार मामलेदार केवढे धनाढ्य होऊन बसले आहेत. दामाजीसारखे भित्रे भागुबाई नाहींत ! पैसा कधींही साहस केल्या शिवाय मिळावयाचा नाहीं.

पूर्वजन्मार्जितच ह्मणायाचें. हें एक झालें. दुसरें —बा-दशाहाकडून एक हुकुम आला आहे. आज आठ दिवस झाले कोणापाशीं बोललों नाहीं. त्यांतील सारांश हाच कीं, परचक्राचा संभव दिसत आहे तर तयारी करण्यास कोणत्याही द्वारें पंधरा दिवसांचे आंत एक लाख रुपये तरी आले पाहिजेत. ह्याच प्रमाणें दुसरीकडे मोठमोठया कारभाऱ्यांकडे असेच हुकुम गेले आहेत. खजिन्यांत शिलक कांहींच नाहीं. मी पहा, मोठया विवेकपाशांत पडलों होतों. एवढी जब्बर रकम कोठली पाठवावी! काय दरोडा घालून पाठवावयाचीआहे, कीं काय येथें खाण आहे. काय करूं अगदीं सुचेनासें झालें होतें. परंतु पंढरीनाथानें संकट तर अशा प्रकारें दूर केलें. काय मंडळी, लाखाची असामी होती काय ती?

रा० व कृ०— लाखानें काय होणार! पांच लाखांत तर कमी नाहीं.

चिं०—आपला कैवारी पांडुरंग आहे. संकट मोठें आलें होतें परंतु त्याचेच कृपेनें तें दूर झालें.

कृ०— त्याचे ठिकाणीं भक्तीच तशी आहे.

दा०— तेव्हां आज दोनप्रहरीं त्या यादी करावयास लागा. मुजुमदार, आतां आळस करतां कामा नये. बादशाहास आज याविषयीं सर्व हकीगत लिहून नंतर आठ दिवसांत तरी तिकडे सर्व द्रव्य गेलें पाहिजे.

मुजुम०— आपले ते चिंतोपंत, रामभाऊ, कृष्णाजीपंत आहेतच, ते करतील सर्व ठीक व्यवस्था. माझे प्रकृतीस आतांसें समाधान नाहीं मी जातों आतां. ( गणपतरा

ग०— बेदराहून आणखी कांहीं रस्त्यांत संरक्षणाकरितां त्याणें शिपाई मागवले होते. येथून आज सकाळीं तीन उंटे रवाना झालीं! ह्यावरून तुह्मींच द्रव्याचा अदमास करा. आणखी त्या सावकाराचें जें लोकांकडे येणें निघालें तेंही जस जसें येईल तस तसें पाठविलें जाईल, म्हणून ह्या कारभाऱ्याचें पत्र गेलें आहे.

मु०— त्याची गोष्ट आतां माझेजवळ बोलूं नका. माझ्या अंगाचा अगदीं तिळपापड होऊन गेला आहे. त्याचे जागेवर मी असतों तर आपलेंचसें काय तुमचेंही सर्वांचें कल्याण केलें असतें.

ग०— त्याविषयीं माझी पक्की खात्री आहे! तो कसा अगदीं पण साधूचा डौल आणतो! हें काय नाशवंत, तें काय क्षणिक व मिथ्या आहे. अमकें असें आहे, तमकें तसें आहे. अशा मोठ मोठ्या गोष्टी सांगतो पण दुसऱ्याचें सुद्धां बरें होतां कामा नये अशी इच्छा! एकदां तर त्यानें सर्व सोडून पंढरपुरास जाण्याचा डौल घातला होता. दिसते कशी मूर्ती गायवर्णी बावळट! पण कांति कशी आहे!

मु०- मला अगदीं सुचत नाहींसें झालें आहे. माझा क्रोधाग्नि इतके दिवस धुमसत होता. परंतु आतां तो अगदीं भडकला. हे दामाजीपंता, आतां मात्र तुला तो स्वाहा केल्या शिवाय कधींही शांत व्हावयाचा नाहीं. गणपतराव, हा जातीचा कानडा आहे बरें! मनांत आलेलें तडीस नेल्याशिवाय कधीं सोडावयाचा नाहीं. हे क्रोधा, तुला लोक साहाशत्रूंपैकीं एक समजतात, परंतु मी तर तुला माझा प्रियकर मित्र मानतों. तुजवांचून मनुष्याच्या हातून कांहींहि मोठें काम व्हावयाचें नाहीं. रणांगणांत वीराला क्रोध नसेल

तर कसें चालेल ? कोणीं आपल्या थोत्राडांत मारली असतां दुसरा गाल पुढें करणारे लोकांस मी कधींही पुरुष म्हणणार नाहीं. ते षंढच होत. हे कोपाग्ने, तूं मला आपल्या ईर्ष्यारूप वायुमित्रास घेऊन सर्व प्रकारें आतां साहाय्य कर. बरें गणपतराव ! आतां याला काय युक्ति योजावी ! ! ती सुचल्याशिवाय मला जेवण गोड लागणार नाहीं व झोंपही येणार नाहीं ! फार तर काय पण घरच्या मनुष्यांबराबरही बोलणें सुचणार नाहीं.

ग०— मला वाटतें कीं, धनशेट सावकारचें फारच द्रव्य होतें, त्याचा अर्धा हिसाही दामाजीनें पाठविला नाहीं; असें बादशाहास कळवावें.

मु०— परंतु यादी केल्या तेव्हां गांवचे मोठ मोठे संभावित व अब्रुदार लोक जमले होते ना ?

ग०— होय खरें, मला आठवणच नाहीं.

मु०—युक्ति एकशी काय ! हजारों काढून त्या दामाजीस खाड्यांत घालीन. चला. तर ह्याच उद्योगास आतां लागलें पाहिजे. ( जातात. )

## अंक २.

### प्र० १. मंगळवेढें, काशीविश्वेश्वराचें देवालय.

( कित्येक भिक्षुक येतात. )

रामभट–कृष्णंभटाचा आतांसा चतुर्मास लागलापासून लाट

चालला आहे ! क्षणभर बसायाला देखील त्याला फुरसत नाहीं. अरे, देवदर्शन केल्यावर देवद्वारीं जरा तरी बसावेंसें आहे. तर इकडे ये. घाईही आम्हां भिक्षुकांच्या पाठीमागें लागलीच आहे. इकडे ही आपली एवढी मंडळी बसली आहे आणि तूंच रे कोठें चाललास ?

**गोपाळभट**—लाट म्हणतां आणि कोठें चाललास हें काय ?जाऊं-द्या त्याला. यजमानीण रागें बिगें भरूं लागेल. कृष्णंभटास फावत नसेल तर आपण दुसऱ्या एका गरीब ब्राम्हणाला सांगूं. कृष्णंभटाचेंच काय आम्हीं ऋण घेतलें आहे ?

**कृष्णंभट**— हा मी बसलों. मला मंडळीपेक्षां यजमान जास्त नाहीं. परवां त्या गणपतरावाकडे कांहीं हव्यकव्य आहे, म्हणून म्हटलें त्यास भेटावें

**राम**०— अरे भेटावें असें धर्माधर्मी कां बाबा ! तुझे यजमानच आहेत ते.

**कृ**०-यजमान कसचे. ते येथले कांय स्थायिक राहाणारे आहेत ? झाडावरचे पक्षी. चाकरीच्या संबंधानें आलेले.

**पिलंभट**—आणि स्थायिक कोण आहेत येथें ! सर्वच बाहेरचे आहेत ! अरे, ही हजामतशी फार वाढविलीस !

**कृ**०—फार कशाची, दिवसच मुळीं चांगला मिळत नाहीं.

**पिलं**०— मग आम्हीं नाहीं ह्या हजामती वाढविल्या. वाहवा ! आम्हांला वाटतें दिनशुद्धि लागतच नाहीं.

**गोपाळभट** — ते नाहींत ही सांगावयांचे कारण.

**कृ**०— कारण जर वास्तविक नसेल तर उगाच कांहीं तरी ह्मणून सांगावयाचें ?

**गो**०—तर बायको गरोदर आहे वाटतें.

**कृ**० —छे.

राम०— आमच्याजवळ काय रे लपवितोस कृष्णंभट? तुझ्या मतें इकडे अगदीं कोणाला ठाऊकच नाहीं वाटतें. पण हा गोपाळभट, पिलंभट, एकेक असे वस्ताद आहेत कीं, नाहीं तेथली ह्यांना गुप्त बातमी ठाऊक.

कृ०— ( मनांत ) एकूण ह्यांना ठाऊक आहे तर! तिणें वाटतें ह्यांच्यापैकीं कोणाच्या बायकांजवळ सांगितलें. बायकांच्या तोंडांत सांगितलेलें नाहींच रहावयाचें. तरी बजाऊन सांगितलें होतें तिला कीं कोणाशीं बोलूं नको ह्मणून. ( उघड ) मग काय तुह्मांस समजलें असेल तें खरें.

पिलं०— मुजुमदाराकडे सप्तशतीचें अनुष्ठान करीत नसतां काय तुह्मीं?

कृ०— हेंचना. तें नुकतेंच करायाला लागलें.

रा०— नुकतें कां चांगला महिना होत आला. त्याचें एवढें काम तरी काय आहे. वरचेवर अनुष्ठानें करवून तो कोणाचा गळा कापणार आहे नकळे!

कृ०— कांहीं कां काम असेना! आपल्याला काय सांगितल्या कामाचे धनी. दक्षणा मिळाली ह्मणजे झालें!

राम०— असल्या दुष्टांकडे कसलीं अनुष्ठानें करतां नकळे.

राम०— कृष्णंभट, जा जा बाबा आतां. तुला एवढ्यासाठीं हाक मारली, उद्यां दामाजीपंताकडे मंत्रजागर आहे, तेव्हां आपल्यास आमंत्रण सांगावें ह्मणून मला त्यांचे उपाध्ये बोवांनीं सांगितलें. आमंत्रण पोंचलेंना? नाहीं तर ना म्हणाल.

कृ०— मी जातों तर आतां. ( इतक्यांत दिवाकर भट व नारायण भट येतात )

दिवाकरभट }
नारायणभट } नमस्कार मंडळी, देवदर्शन घेऊन येतों.

राम०— कसें काय वर्तमान आहे? ठीक आहेना?

दि०— ठीक तर काय झालें, मानण्यावर आहे.

राम०— दिवाकरभट, असें कां बाबा?

दिवा०—आमचें जें बाबा प्रारब्ध आहे, तें कांहीं सांगतां येत नाहीं.

गोपा०—नारायणभट, तपकीरीची डबी आहे काय कनवटीस?

नाराय०—घ्या. पण कडक आहेहो, तुम्हांला नाहीं सवई. मी जातों. सकाळीं एका वाण्याकडे त्याचे पितर आणले, दक्षणा बिक्षणा त्यानें दिली. शिधा संध्याकाळीं देईन म्हणाला होता. सोडा कां उगाच.

गोपा०— बैसरे नारायणभट, आपण सर्व एकदमच जाऊं आतां.

पिलं०— दिवाकर कायरे झालें प्रारब्धास! आतांशी काय मजा आहे. एकटा आहेस. बायको मेली गेल्यावर्षी. एक लहान पोर दोन वर्षांचें होतें तें देखील मेलें. आतां पाठीमागें कांहीं पाश उरला नाहीं. कफल्लक गोसावी आपले.

दि०— काय रामभटजी, अशालाच जर हा पिलंभट चांगलें म्हणत असेल तर मग जगांत दुःखच नाहीं. असें म्हणणें भाग आहे. करा दुःखिताचीसुद्धां थट्टा! तुमचे दिवस आहेत बाबांनो.

रा०— सुख दुःख काय कोणाच्या स्वाधीन आहे. बोलण्यावर काय आहे?

दि०— सहज ओघास आलें म्हणून माझे नशीबाची एक हाली

परवांचीच गोष्ट सांगतों. आमचा बाळपणचा एक स्नेही पंढरपुरास आहे. तो आज किती वर्षे मला दोन दिवस स्वथ रहावयास बोलावीत होता. हाताने करून करून कंटाळलों होतों, म्हणून म्हटलें जावें तिकडे. इकडे कांहीं भिक्षुकीही नव्हती. त्याचे घरीं पाऊल टाकलें एवढें तों त्याची बायको बसली विटाळशी. तो तर सात आठ दिवस आंथुरणावर तापानें पडला होता. घरांत दोन लहान मुली. मला म्हणाला "बरें झालें. तूं आलास म्हणून आतां आम्हांला अन्न तरी मिळेल. शहरांतली वस्ती कोणाला बलावता ? महर्घता तर अशी येथें झाली आहे कीं बोलण्याची सोय नाहीं. एकवेळ जेवून काढतों." काय करता ? काढले तसेच चार दिवसनी आलों.

पि०—अः, ह्यांत रे कसलें नशीब ? बरें गोपाळ भट, त्या विष्णु पंताला त्या—कारणामुळें वाळींत टाकलें होतें त्याचें कायरे झालें मग ?

गोपा०— कसले तुमचे भट लोभी ! ते तेव्हांच त्याच्याकडे धडा धड जेऊं लागले. श्रीमंत मतलबी आहे तो. जर हात सईल सोडला त्याणें, तों हीं भटें लागलीं नाचायाला ! आपलेच ओंठ आणि आपलेच दांत. बोलता कोणाला ?

( इतक्यांत तीन गृहस्थ येतात. )

पाहिला— भिक्षुकमंडळी आज फारशी जमून करते काय ?

दुसरा— फुकट कांहीं गप्पा मारीत बसले असतील झालें ; चतुर्मास आतां; कोठें दुसरीकडे आमंत्रण नसलें कीं ते धर्मात्मा दामाजीपंत आहेच. त्याचेकडे जेवावें आणि देवळांत गप्पा माराव्या ! ह्यांना दुसरा उद्योग काय ?

सरा— पाऊस पडत नाहीं महागाई फार झाली आहे, हें ह्यांचे लक्षांत देखील नसेल !

म०— पाऊस पडत नाहीं महागाई झाली, तर आह्मीं हो काय करावें ! ईश्वराधीन गोष्टी त्या. तुम्हीं पाडाना तर मग पाऊस !

त०— रागाऊं नका हो. मग ईश्वराला कोणत्याही प्रकारानें आळवायाला नको काय ?

म०— पाहिजे तर!

०—अहो आज श्रावण महीना लागलाना ? अजून पावसाचा एक थेंब नाहीं ! लोकांनीं जमिनीकडे अजून ढुंकून देखील पाहिलें नाहीं ! धान्य पावसाशिवाय पेरतील कशाला ?

०— मी कालच पंढरपुराहून आलें. तिकडे सांगतात कीं, ह्या शंभर दीडशें कोशांत पाऊस मुळींच नाहीं. काय आतांसें कडकऊन पडेंत ! बाहेर ह्यावेळेस बाजरीचीं शेतें कशीं लुसलुशीत असावयाचीं. पंढरपुरास भिक्षासुद्धां मिळेनाशी झाली !

०— तर मग यंदाचें वर्ष मोठें कठीण दिसतें.

पे०— विनायकजोशी, तुमचे गणितांत कसें काय येतें ?

व०— ह्या वर्षारंभींच मीं संवत्सरफल पाहून तुह्मांस सांगितलें होतें कीं शनि व मंगळ हे दोन ग्रह कुंभराशीस आलेले आहेत! व ह्याचें फळ अनावृष्टि होऊन लोक भयंकर दुर्भिक्षानें व नानाव्याधींनीं अत्यंत पीडित होतील, हेंही सांगितलें होतें.

०— आपल्या ह्मणण्याप्रमाणें कहर होण्याचा संभव तर सर्व प्रकारें दिसतो आहे.

दि०— मृग आर्द्रादि पहिलीं पांच नक्षत्रें तर अगदींच कोरडीं गेलीं; पुन्हां पासूनच श्राध्देंसुद्धां लोकांनीं करण्याचीं

सोडलीं. मग पक्ष कसचे होणार ? ह्या मघा तरी का करतात तें पहावें

ति०पहाता काय ? पावसासाठीं-वसा सर्व अनुष्ठानें करीत. कांहि च का ईश्वरास दया येणार नाहीं ?

रा०— आमचे मनांत हें केव्हांच आलें होतें, पण तुमचें गृहस्थलोकांचें साहाय्य पाहिजेना आह्मांस.

ति० मग आह्मी काय नाहीं ह्मणालों होतों ?

रा०मग गांवची सर्व मंडळी जमवून, कोणतें अनुष्ठान करावयाचें ? केव्हां पासून ? कोठें ? हें सर्व ठरविलें पाहिजे.

पहि० -ठरावितां काय ? " शुभस्य शीघ्रं " आतां वेळ लावता कामा नये. लागा उद्यां किंवा परवांपासून अनुष्ठानास ह्मणजे झालें.

पि०गृहस्थांच्या साहाय्यावांचून भिक्षुकांचें कांहींच काम व्हावयाचे नाहीं म्हणतात तें हें.

रा०चला तर आतां, बसूं नका उद्यांचे तयारीस लागा

सर्व- चला. ( जातात )

---

## प्र० २ स्थळ — मागील-

( सुस्नात ब्राम्हण हातांत पळी

पंचपात्र्या घेऊन इतस्ततः फिरताहेत. )

त्यांतील एक विद्वान् ब्राह्मण— अहाहा ! ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, हे सनातन चार वर्ण पृथ्वीवर असून त्यांस इहलोकीं व परलोकीं हितकारक असे धर्मही योजून दिलेले होते. ह्मणजे ब्राह्मणांनीं मोठमोठ्या गहन, शास्त्रांच

अभ्यास करून विद्वान् व्हावें, जगत्कल्याणार्थ अनेक विषयांवर ग्रंथ करावे, तपआचरण करून जगतीतलावर पुण्यसंचय करावा. क्षत्रियांनीं शौर्यानें राज्य करून ब्राह्मणादि त्रिवर्णांचें रक्षण करावें, राजकीय शक्तीला अवश्य ज्या विद्या त्या पढाव्या; मोठें संकट आलें असतां अनेक विद्यासंपन्न ब्राह्मणांचे अनुमतानें वागावें. वैश्यांनीं सत्यानें व्यापार करून द्रव्य संपादावें, कृषिकर्म करावें. शूद्रांनीं, आपल्या ज्येष्ठबंधुतुल्य त्रिवर्णांस त्यांचे त्यांचे कृत्यांस नम्रतेनें साहाय्य करून ह्मणजे त्यांची सेवा करून खुशाल आपली जीवनवृत्ति चालवावी. असे जोंपर्यंत लोक वागत होते, तोंपपर्यंत ह्या भरतभूमीचें भाग्य काय असेल बरें ? परंतु कालचक्रानें ही सर्व पद्धति बुडाली. ! आमचे रक्षणकर्ते क्षत्रिय राजे नष्ट झाले ! अर्थात इतर वर्णांस साहाय्य नसल्या मुळें, उदरार्थ पाहिजे त्या वृत्तीचें ते अवलंबन करिते झाले. मर्यादा कांहींच नाहींशी झाली. त्यामुळें, अनेकविध पातकें होऊं लागलीं. ह्या पातकरूप त्रिळांनीं, बहुत दिवसांच्याहि ह्या दृढतर धर्मरूपी प्रासादाला नष्ट दशा येऊन, तो अगदीं धुळीस मिळून जात आहे ! यवनी राज्यामुळें आमचा धर्म बुडाला ! विद्या बुडाल्या ! ते आपल्या धर्माचा, त्यांच्या धर्मशास्त्रा प्रमाणें प्राणहरणासारख्या बलात्कारांनीं प्रसार करीत आहेत ! आमचा द्वेष करितात. प्रत्येक मुसलमानव्यक्ति आपण जसा काय राज्यकर्ताच आहे असें समजून ते लोक आह्मांस नाना प्रकारें गांजीत आहेत ! हिंदु लोकांस कांहींच किंमत नाहीं ! आमची बुद्धि, कौशल्य, युक्ति सर्व व्यर्थ !

आमचे प्राण जनावरांचेही प्राणांपेक्षां कमी लेखतात. का न लेखतील! जनावरांचा त्यांस उपयोग होतो! "कुतो मांसाशिनो दया ?" आह्मांला मान नाहीं, अन्न नाहीं. अशी आमची स्थिति, परमेश्वरा, किती बोलावी! परंतु हे मदांध असें समजत नाहींत, कीं काळाचा सपाटा मोठा विलक्षण आहे! कालांतरानें उंच पर्वत आहेत, त्यांचीं सपाट मैदानें होतील! विस्तीर्ण मैदानांचे कदाचित् पर्वत बनतील.! जेथें समुद्र महा गर्जना करीत आहे तेथें धान्य पेरण्याचा समय येऊन ठेपेल.! जेथें सदा हिम पडत आहे तेथें सर्व अग्निमय होणार नाहीं कशा वरून! पहा, " बुभुजुर्ये महीं कृत्स्नां राजानो रावणादयः ॥ तेप्यनीत्या गता नाशमितरेषां तु का कथा ? " तेव्हां रावणासारख्यांची ही दशा, मग ह्या बिचाऱ्यांचा काय पाड!! तुमची सद्दी आहे तों द्याल आह्मांला त्रास! आलें एकदां त्या विश्वपालकाच्या मनांत ह्मणजे मग कुठले यवन आणि कुठलें काय! केव्हांच त्यांचे उन्मूलन करील!! पुराणांत सांगितलेल्यांप्रमाणें नीतिमान् राजे, किंवा विक्रमादिकांसारखे पितृवत् पालन करणारे राजे आह्मांस सध्या तर असूं द्या पण पुढें आमचे संततीसही कधींच मिळणार नाहींत काय? बोलण्याचें कारण ह्मणून इतकेंच कीं, हें वर्ष मोठें भीतिदायक दिसत आहे. अद्याप पर्जन्याचा थेंब नाहीं. विहिरी सर्व आटत चालल्या, जनावरें मरावयास लागलीं, दिवसास उनांतून जाणें ह्मणजे अग्नीवर पाय ठेवून चालण्या प्रमाणें झालें आहे! घरीं सुद्धां वाफा येतात त्या सोसवत नाहींत. गरीब

लोक एव्हांच उपास काढावयास लागले. आमच्या सारख्यांची एकदां जेवून काळ काढण्याची वेळ आली ! इकडूनही ईश्वराचा आह्मांवर कोप झाला ! काय करावें ? दुष्काळाचीं चिन्हें दिवसें दिवस वृद्धिंगत होत आहेत ! अजून ह्मणजे पर्जन्यकाल गेला आहे असें नाहीं, जगदीशाचे कृपेनें हवा तसा पाऊस लागल्यास खरीपाशिवाय सर्व पिकें भरपूर होतील. ज्यानें आह्मांस उत्पन्न केलें त्याचे मनांत जें आमचें कर्तव्य असेल तें तो करील. परमेश्वरा! दामाजी पंतासारख्या साधुपुरुषाचें जेथें वास्तव्य त्या गांवीं सुद्धां तूं आपली अवकृपा प्रकट करितोसना! अथवा तुझी लीला तूंच जाणतोस. तुला पुढें काय कर्तव्य आहे हें आह्मीं तरी अगोदर कसें समजावें; आह्मी काळजी करणें व्यर्थ आहे. त्याला सर्व आहेच. तरी पर्जन्यवृष्टि व्हावी एतदर्थ अनुष्ठानादिक कर्मं करणें हें योग्य, व शास्त्रोक्त उपाय आहे. यत्न करणें आपलें काम, फलदाता परमेश्वर समर्थ आहे. तर हे ब्राह्मण हो, तुह्मी एकाग्र चित्तानें, व मोठ्या श्रद्धेनें आतां ह्याच शंकराच्या देवालयांत अनुष्ठानार्थ बसावें. सूर्योदय अद्याप होणें आहे. हा प्रातःकाळ कसा रम्य आहे, वायु गार वहात आहे. हा पर्जन्यसूचक तर नसेलना. ! अस्तु; भगवन् त्वदीयेच्छा बलीयसी ! ( सर्व जातात. )

## प्र० ३. स्थळ –पंढरपुरचें एक श्रीमंताचें घर.

( रघुनाथराव व त्याचे व्याही. )

रघुना०--कसें काय व्याही, आज अगदीं संध्याकाळींच आपलें कुणीकडे इकडे आगमन हें! ह्या दिवसांत तुह्मीं बाहेर विहेर पडूं नका फारसे! इकडच्या प्रांताला मोठा दुष्काळ पडला आहे. ह्या पंढरपुरांत तर अतोनात भिकार लोटलें आहे असें म्हणतात. मला एक महिना तर बाहेर जाणें कसें तें माहीत नाहीं. जांवयाला उद्यां मेजवानीबिजवानी करतां कीं काय?

व्याही– आपली इच्छा असेल तर नको करायाला? तुम्हीं ऐकिलेंच असाल हें–आज भर दिवसास विजापुरओळींत-विसाजी नाईक सराफाच्या घरांत होतें तेवढें सर्व धान्य भिकाऱ्यांनीं लुटलें. घरांत एकही दाणा ठेवला नाहीं असें म्हणतात. तेव्हां तुम्हीं मोठ्या सावधगिरीनें रहा. मोठे सावकार, आमचे व्याही म्हणून मुद्दाम सांगायाला आलों.

रघु०–आपण मला सांगतां हेंच. अन्न मिळत नाहीं, लोकांनीं तरी काय करावें! तो विसोबा मला ठाऊक आहे. ( मनांत ) बरें झालें. आपल्या जवळ वीसएक खंडी धान्य आहे. तें पहा आतां रुपायास एक पायलीप्रमाणें विकतों. इतके दिवस दोन दोन पायली विकीत होतों. बरें आहे, ह्या दुष्काळांत-आपणास चार पैसे मिळतील ह्यांत संशय नाहीं. ( उघडपणें ) रक्षणकरणारा पांडुरंग आहे. आमच्यानें काय राखवणार आहे. तशांत आमच्या जवळ धान्य आहे कोठें! पहा, गोपाळराव, घरांत पाहिलेंना, आतां घरचीं पांच मनुष्यें

च कायर्ती, बाकी सर्वांला तेव्हांच जा ह्मणून सांगितलें. दुष्काळांतून आह्मी वांचून पुढच्या वर्षी जर पर्जन्य पडला तर तुह्मांला ठेवूं ह्मणून त्यांस सांगितलें. फार काय सांगूं, तिच्याच माहेरची नातलग एक बाई आमच्याकडे वीस वर्षे होती, तिचा दुसरा कोणी नाहीं पण तिलाही घरांतून घालवावें लागलें. आपलींच मनुष्यें जास्त झालीं आहेत! एकवेळ सरासरीस प्राण वांचण्यापुरतें अन्न खातों.

त्याही०— ( मनांत ) काय निर्दय गृहस्थ हा ! ह्या दुष्काळांत सहज पांचपन्नास मनुष्यें पोसण्याचें ह्याचें सामर्थ्य असून काय दैन्य सांगतो हा ! सत्पात्रीं दान देण्यास, अहाहा ! काय योग्य प्रसंग आहे. पण ह्या जवळ बोलून तरी काय उपयोग ! ( उघडपणें ) दादासाहेब ! प्रसंग आला आहे, ह्मणून थोडें बोलतों. राग न येईल तर.

रघु०— आपल्या बोलण्याचा मला राग येईल, असें कधीं तरी होईल काय ? ( मनांत ) हा कांहीं कां सांगेना, मतलबाशीं आपल्या गांठ ठेविली ह्मणजे झालें.

त्याही०— आपल्याजवळ दाहा बारा आश्रित मनुष्यें असून त्यांस आपण अशा संकटसमयीं सोडलेंत हें तुह्मीं चांगलें केलें नाहीं. मला ऐकून फार वाईट वाटलें. मुठ मुठ अन्न देऊन हजारों प्राण्यांचे जीव वांचविण्याची आपल्याला योग्यता परमेश्वरानें दिली आहे ! आणखी पैसा मिळवून आहां ह्यापेक्षां श्रीमंत होऊन पुढें कर्तव्य तरी काय ? एक दमडी तरी आपल्या बराबर परलोकीं येईल काय ? ह्या वेळेस धर्म केल्यानें यावच्चंद्रदिवाकर आपलें यश पृथ्वीवर अनेक रीतीनें गातील. तुह्मीं ह्यावेळेस द्रव्याच्या राशी मुलांकरितां ठेवाल खऱ्या, परंतु ते पुढें त्याचा कसा व्यय करतील कोण जाणे. लहानशा

कुटुंबाच्या, आपल्या मतें, भावी हिताकरितां तुह्मीं इतके झटतां ! आणखी सध्यां हजारों कुटुंबें पटापट मरत आहेत तें निमुटपणें पहातां ? हर हर ! काय लोभ हा ! किती ही मनुष्याची आशा व मोह तरी !

रघु०- तुह्मी ज्या एवढ्या वेदांताच्या गोष्टी सांगतां, ते तुह्मीं काय ध्वज लावले अहां ?

व्याही०- आह्मी तुमच्यासारखे श्रीमान कोठें आहों ? तरी दादासाहेब, तुह्मांला सांगतों, आमच्या घरीं जीं चार आश्रित मनुष्यें आहेत त्यांला मीं ह्या दुष्काळांत मुळींच सोडलें नाहीं, इतकेंच नाहीं तर त्यांच्रीं सर्व कुटुंबांतील मनुष्यें परवांचे दिवशीं आणून ठेविलीं आहेत. व मला जेथपर्यंत एक घांस अन्न मिळत आहे, तेथपर्यंत मी त्यांस घालीन. व दररोज तीन चार भाकरी भिकाऱ्यांस वांटीत असतों- आपण विचारिलेंत ह्मणूनच हें सांगितलें. मीं माझी फुशारकी सांगितली असें नाहीं. माझ्या बोलण्याचा आपल्यास राग आला असेल हें मी समजतों; पण आला प्रसंग, गेलों बोलून. मी क्षमेस पात्र आहें, आतां अवकाश नाहीं. रात्र झाली. येतों तर. नमस्कार.

रघु०- ( हसून ) या कधीं कधीं अशा उपदेशाच्या गोष्टी सांगायाला. ( गोपाळराव जातो. )

रघु०- ( अपल्याशीं ) अरे मला हा गोपाळराव माझ्या हिताच्या लांब लांब गोष्टी सांगतो ! काय चमत्कार आहे ! आज एवढा मी जो सावकार झालों आहें तो स्वतःच्या पराक्रमानें. बापाच्या वेळची एक फुटकी कवडीही नव्हती. द्रव्याचेच योगानें पाहिजे ती वस्तु प्राप्त होते. धन असलें तर लोकांत मान व प्रतिष्ठा आहे. राजे-

लोक, कांहीं तरी कारणें काढून ज्या मोठ मोठ्या लढाया करितात त्या कशाकरितां ? तर एक पैशा करितां. "लढाई-मध्यें लाखों लोक मरतात, हजारों कुटुंबें निराश्रित होऊन दु:खांत पडतात, तेव्हां कशाला लढाई पाहिजे ? तुझ्या बरोबर काय राज्य येणार आहे ?" असा त्या सज्जांना, आमचे व्याह्यासारखे उपदेश करणारे पाहिजेत ह्मणजे त्यांस शेवटचेंच बक्षीस मिळावयाचें ! मनुष्यमात्र अनंतकालपर्यंत रात्रंदिवस ह्या संसारारण्यांत धनरूप हरिणाच्या पाठीमागें लागलाच आहे, आणि तें साध्य होण्याकरितां तो हर प्रयत्न करीत आहे. तेव्हां ज्यास ह्या जगांत मनुष्यपणानें ह्मणून राहणें असेल त्यानें धन मिळविलेंच पाहिजे. धनापासून ह्या लोकीं काय असाध्य आहे ? परलोकाचें भय घालतात तो पाहिला आहे कोणीं ? धर्म करून आहे तें घालवा आणि मग बसा रडत !! द्रव्यहीन झाल्यावर मग आपणास कुत्रा तरी विचारील काय ? द्रव्य काय सर्वदा सारखें मिळतें ? पाण्याची लाट आहे ती. गोपाळराव हा पूर्वीचा मोठा पिढीजादा श्रीमान, परंतु ह्याचे बापानें व ह्यानें हा असा वेड्यासारखा दानधर्म करकरून अशा स्थितीस आला ! पैसा कसा मिळवावा हें ह्या लेकाला कोठून ठाऊक असणार ? तें अस्मादिकांलाच माहीत. द्रव्यासाठीं काय काय खोटें नाटें करावें लागतें ! आपलें धान्य बंदोबस्तानें तर आहेच. 'मोठ्या सावधगिरीनें रहा' ह्मणून जें त्यानें सांगितलें आहे, तेवढें मात्र आपण त्याचें ऐकावें. एवढी द्रव्य मिळविण्याची संधी आली असतां, ती व्यर्थ घालविणें हें महा मूर्खाचें काम होय. जेवणाची वेळ झाली ! आंत जावें आता ( जातो. )

## अंक. ३.

### प्रं० १. निकडील प्रांतांतील एक मोठा रस्ता.

( झादबा व खंडबा येतात. )

झा०— राम राम खंडबा.

खं०— क्कान झादबा, राम राम, राम राम.

झा०— कस काय वो खंडबा, कुनिकड, बेगि बेगि चालला हां! आन् असकाय अक्शी दोङक्यावानी दिसता जी?

खं०— सोलापुरच्या पल्याड धेटन गांव हायना तकड त्ये- किकड. हकड काय पाऊस ना पानी! राहुनश्यान काय करान? आन् त्यांत अमासनी बायको ना प्वार! हातपाय थकल्यावर तांब्याभर पानीबी देन्याला कुनी न्हाइ. ह्मून ह्मंगतो का तिच्याकड जाव. तुमच्या धेनांत कसं यत, झादबा?

झा०— आव तिकडं बी कुठ‌्पाऊस हाय! समदीकडं हीच ठवॉंब. खरिपाच्या पिकाची तर आशा कंदीच ग्येली. रब्बीचा औंदा सगळ्यासनी लइ भरौसा व्हता पन तिथबी हत्तीन फाटा फोडलाया! गुदस्ता बी हाच परसंग पुन् रबीन वायसा हात दिला व्हता.. काय खंडबा, कराव तारे काय असल्या काळादुकाळामंदी जाव कुनिकड? आन् जीव कसा वाचवावा? घरचीं मानूस कशीं पोसावीं ही इ- मदी रातंदिस इवंचना लागलिया. काय देवाच्या मनाम् हाय क्कान जान.

खं०— काय राव तुमासारखे ख्येती अस झंगता तर मंग आ-
मासारक्यानी काय कराव ?

झा०— आव कसूच ख्येतीन् कस्च काय ! लइ विकट परसंग !
बगा यामंदी किती मरतीलन् काय ! गत्सालीं आमची
गुरढ्वारं चट् सारी म्येलीं. त्यासनी खायस्ला बाटुकच
न्हाइन वाचत्याल कशीं. आन् त्याघडी सावकार तरी कान
उभा ठाकतो. आव करज तरी कान देतो ! ह्या घडी करज तरि
काढुनश्यान काइ पैसा चावायूचा हाय देवाची विच्छा
आपुन काळजी करून तरि काय व्हायच हाय.

खं०— आव दुकाळच जर आमासूनी खानार, तर मंग आम-
च्या प्वाटाची का झूंनशेन काळजी होवी ! बरं पुन् ते
सार असुन्द्या. झादवा, तुमी कुनिकड चालला जी ?

झा०— आमी व्हय ? आमी जाव हाटल कुट वाट फुटल
तकड ! घरामंदी राहुनश्यान तरि काय प्वारवाळ रडल्याती
त्येच आयकाच की न्हइ ! जातो एकाद्या रानांत उटून !
बगा, घरच्या तरासामंदी परान जानार त्यापक्शी कोल्या
कुतऱ्यांनीं खाल्येल बरं ! पन् घरच हाल आन् इपळाप
बगय्यूला नकोत.

खं०— असं काय अलत भलत बोलतां राव, समद्या पिरिथिमिंत-
ल्या मानूसाची देवाला कशी बशी तजवीज करन हायच.

झा०— आव काळजी असती तर अशी दशा कां झाली असती !
पिरथिमिवर मानस बी लइ झाली बगा. त्यांचा त्येला कं-
टाळा आलाया. आमी कुनबी मानस आमाला कंदी मुटभर
अन आन् व्वाटभर लंगोटी असली झंजे झाल, त्यांतच
संतोस ! पन त्येलाबी आता झाग झालों; तवा जगून न जगू-
न सारखच. या दुकाळाच्या अदोगर जे म्येले, ते नसिबाच.

न-

देवा इटोबा, येक मरन् तरी दे अगर प्वाटाला तरि दे कोन्चेबी दे. मरन द्यायच तरि न्हाइ अव्घड तुला ?

खं०— असा का दूक करता गा ? समद्याची वाट ती आपन्नी क तर मी जातों. राम राम. ( जातो. ) भा

झा०— ( पुढें होऊन ) अरे मी कुनिकड जायाला निगा! व्हतो कोन जान. ( कपाळास हात लावून ) आता क. जाव आन् काय कराव ! का लोक दरवड घोलुनश्य, दाना लुटत्याती तस त्यांच्यात शिरुनशी कराव ? छे, अर पन भूक लागली हाय ! हथ आज घडिला बायका प्वार समद्यास्नी अंबिल भाकरि देउनश्यान जीवंत ठेवल्याती पुन् आतां पुढ काइ आपल्याच्यान न्हाइ र देवा, पोसव-नार ! जाव याच रस्त्यान जाव. ( असें ह्मणून निघून जातो.

---

## प्र० २. स्थळ —खेडेगावांतील स्मशानभूमि.

( प्रेताबराबर आलेली मंडळी. )

राघोपंत— शव तर तिकडे जळत आहे ! या इकडे अरे आपण बसूं. ( बसतात. ) केवढा एका एकीं आपल्य गांवचा श्रीमान गृहस्थ गेला हो ! काय करतां, मृत्यू पुढें उपाय नाहीं ! काल संध्याकाळीं चांगले आम-च्याबराबर बोलत होते, आणि आज ह्यांस यावेळेस ह्या पटकीनें इकडे आणिलें. हर ! हर ! ह्या वेळीं काय कोणावर प्रसंग येईल सांगवत नाहीं. कदाचित् उद्य लोक आह्मांला ह्या स्मशानांत वाहून आणणार नाहींत कशावरून !

काशीनाथशास्त्री— राघोपंत, ह्या आपल्या प्रदेशावर काय ईश्वर कोपला हा ! दुष्काळ तर हा असा ! ह्या पटकीनें तर कांहीं अनर्थच उडविला आहे ! घरोघर रडारड चालली आहे ! पहा, ह्या स्मशानांत काय गर्दी उडाली आहे ही ! काय प्रेतें जळताहेत इकडे हीं ! काय भयंकर स्थळ तरी हें ! हीं पहा इकडे प्रेतें कोल्ह्याकुत्र्यांनीं उकरून, ते कसे फाडताहेत ! जिकडे तिकडे हाडेंच हाडें पडलीं आहेत ! हें प्रेत तर अर्धेंच जळून पडलें आहे. हर ! हर ! शंकरा, काय हा मनुष्यदेह ! ज्या देहाला सुखप्राप्ति होण्या करितां व ज्याचे रक्षणार्थ मनुष्य हजारों यत्न करीत असतो त्या देहाला शेवटीं असा परिणाम होतोना !

रा०— काशीनाथ शास्त्री, हे स्थळ पाहून एकाएकीं माझी वृत्ति कांहीं विलक्षण झाली आहे ! ती सांगतां येत नाहीं. संसारांत आजपर्यंत आपण केलेल्या वाईट कृत्यांचा मला पश्चात्ताप होत आहे. आजपर्यंत झालें तें झालें. आतांपासून सत्कर्मानें वागून पुण्य आचरण करण्याचा मीं निश्चय केला आहे. ह्या देहाची अशी दहन होण्याची वेळ येईपर्यंत, म्हणजे ह्या देहांत जीव आहे तोंपर्यंत कधीं कोणाशीं द्वेष करूं नये, यथासामर्थ्य परोपकार करावा, कोणास टाकून बोलूं नये, इमानानें वागावें, व सदासर्वकाळ, हा वेळ स्नानसंध्येंत कथा पुराणें ऐकण्यांत व ईश्वरभजनांत घालवावा असें वाटत आहे ! ह्या संसारांतील एकही वस्तु आपल्या बरोबर येणें नाहीं मग त्यांजवर उगाच लोभ तरी काय कामाचा ! फक्त पापपुण्य हेंच आपल्या बरोबर परलोकीं येणार पाप तर नरकाचें साधन

आहे. तेव्हां आतां शास्त्रीबावा, पुण्याचरण ह्या पातकी मनुष्याचे हातून कसें होईल. आतां पश्चात्ताप होऊन काय उपयोग ! देवा ! हा विचार मला अगोदर कसा समजला नाहीं. परलोकाची भीति मला फारच वाटते. काय करावें. ह्या भीतीपासून कोण मला रक्षील ! ( असें ह्मणून डोळे पुसतो. )

गोविंदराव — राघोपंत, माझी ही आपल्या सारखीच स्थिति झाली आहे. छातीमध्यें ह्या मृत्यूच्या भयानें घर करून बसला आहे. अरेरे ! अशा ह्या स्थळीं आमच्या ह्या देहाची राख होणारना ? देवादिदेवा ! आह्मांला मनुष्य देह तरी कशा करितां दिलास ? जन्म द्यायला तुला दुसऱ्या हजारों योनि होत्या. हाय ! हाय ! मनुष्यदेहांत काय कर्तव्य तें मजकडून कांहींच झालें नाहीं. मृत्यु तर " आ " करून बसला आहे ! परलोकच्या प्रवासाची सामग्री मजजवळ कांहींच नाहीं. मग काय तेथें माझी गति होणार !

का० शा० — बाबांनो, आपलीं आज येथें अशीं उदार अंतःकरणें पाहून मला आनंद होत आहे. आपल्या मनांत आल्या प्रमाणें इतःपरही जर आपलें वर्तन होईल तर मनुष्यदेहाचें कर्तव्य अजूनही आपले हातून होणें आहे. खरोखर पश्चात्तापरूपी पर्जन्यानें पूर्वींचे सर्व प्रकारचे विकाररूपी मळ धुवून आपली हृदय भूमि जर शुद्ध झाली असेल तर तिजवर फार त्वरित सद्धर्माचें बीज उत्पन्न होऊन अप्रातिम अमृतफळें येतील ह्यांत संशय नाहीं. परंतु हें हृदय निर्मळ होणें कठीण आहे. शतशः पश्चात्ताप झाले तरी कर्म...

वरील उदकाप्रमाणें ते व्यर्थ होत. मनांत आल्याप्रमाणें हातून कृति कोठें होते ? मनुष्याचे देहाचें पर्यवसान ह्या ठिकाणीं डोळ्यांनीं धड धडीत आह्मांस दिसत आहे! कसें झालें तरी आपण मनुष्यच आहों, तेव्हां हें पाहून. येथें फारच वाईट वाटतें, त्यामुळें मनावर अनेकप्रकारचे- तरंग उद्भवतात. ह्यांत आश्चर्य नाहीं. पुनः घरीं गेल्यावर ते सर्व लयास जातात ? हें एका प्रकारचें वैराग्य आहे. ह्यालाच श्मशानवैराग्य ह्मणतात. हें असेंच अशा स्थळीं तुमच्यासारख्यां आजपर्यंत लक्षावधि मनुष्यांस झालें असेल. परंतु उपयोग काय ! बाबांनों, ह्या अशा वैराग्यानें खरोखर अनुताप पावून जर जगांत लोक नीतीनें वागते, तर हें जगत् केवळ प्रतिस्वर्गच झालें असतें. एवढें बोलण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, आपल्या मनांत आल्या प्रमाणें आपण सर्वांनीं वागावें हें उत्तमच. परंतु असें होण्याला पूर्व पुण्याईच पाहिजे.

—आपलें ह्मणणें खरें आहे, परंतु माझा हा पश्चात्ताप- तशा प्रकारचा नव्हे. कांहींही होओ आतां ह्या देहाच्या हातून वाईट कर्म ह्मणून कधींही होणार नाहीं. हा भयंकर दुष्काळ व क्षणांत सर्व जगतास लयास नेणारा हा पटकी- सारखा रोग, ह्यांच्या तडाक्यांत आह्मी मनुष्यभक्ष सांपड [illegible] असून भयानें लट लट कांपत आहों. हे आपल्याजवळ [illegible]के आले आहेत कीं ह्यांचे विषारी श्वासोच्छ्वास जगु- [illegible]ह्मांला जाळीत आहेत कीं काय! [illegible] वाटतें. आपणा- [illegible]र असा प्रसंग तर बेतला आहे ! आतां ह्यांतून माझी सु- [illegible] होण्याचा मला मार्ग कोण दाखविणार ? कोण म-

त्पुरुष मला योग्य उपाय सांगून ह्यांतून मुक्त करील ह्
ह्यासाठीं मी कोठें जाऊं ? कोणाला भेटूं ? परमेश्वरा !
मी ह्या स्थळीं अगदीं अंध झालों आहे. मला हातीं धः
रून नेणारा कोण आहे ! अहो, असा सांप्रत कोण स
त्पुरुष आहे कीं, ज्याच्या संगतीनें अथवा ज्याच्या कृपे
नें किंवा दर्शनानें माझें मन सांगतें ह्या प्रमाणें वागत्
येईल.

का० शा०—ज्यापेक्षां असा सत्पुरुष आपण विचारतां त्यापेक्षां त्यां
ह्मणायाला एक जवळच माझ्या पहाण्यांत आहे. आप
ल्या शेजारच्याच गांवीं मंगळवेढ्यांत दामाजीपंत, बादशा
हाचा कारभारी, मोठा वैराग्यशील मनुष्य आहे.

रा०— असें काय ? तर तिकडे जाण्याचा झालाच माझा नि
श्चय. हो हो, तो सत्पुरुष आहे खरा.

गो०— अहो राघोपंत, ह्याविषयीं विचार करावा तेवढा थोड
आहे आपणही तिकडे जाणार. हा पहा, सूर्य अस्ताा
जात आहे. आपण आतां लौकर घरीं चलावें. फार वेळ ते
थें राहूं नये. ही प्रेतभूमि मोठी भयंकर आहे ! रात्रंय
भूतपिशाचांचें हें क्रीडास्थान !! तर चला लौकर, जास्त
परवां येथें नदींत राखाडी टाकण्यास यावयाचें आहे
अहो, पण ह्या नदीस ह्या वर्षीं पाणीच नाहीं. कालाचा
महिमा विलक्षण आहे !

का० शा०— चलावें आतां. ( पश्चिमेस आकाशाकडे पाहून
काय आकाशावर चित्रविचित्र रमणीय रंग दिसताहेत
क्षणमात्रानें कांहीं नाहींतसे होतात! पुन: क्षणानें राक्षस, हत्
महिष, डुकर ह्यांच्याप्रमाणें कांहीं आकृति दिसतात. स. ईल
... ... संध्याकाळच्या रंगाची ...

हे ती अगदीं यथार्थ आहे. पायांखालीं दिसेनासें झालें आतां ! चला लौकर. ( सर्व जातात. )

---

प्र० ३. स्थळ, पंढरपुरांतील एक ब्राह्मणगृह.

( ब्राह्मण, त्याची पत्नी व मुलें. )

पत्नी– काय हो करूं ! हजारों लोक पटापट अन्न अन्न-करून मरत आहेत, आणि माझेंच कीं हो कुठें अजून-मरण पळालें ! आजचा तिसरा दिवस, ह्या थोरल्या-मुलीच्या तर राहूं द्या पण ह्या लहान मुलीच्या व त्या बा-ळाच्या पोटांत अर्धी भाकरसुद्धां गेली नसेल. ही मु-लगी सासऱ्यांस पाठवावी तर तिचा नवरा कोठें गेला आहे, त्याचा थांग नाहीं. जाऊन दोन एक महिने होत आले. हिची सासू तर अन्न अन्न करून मेली ह्मणून काल शे-जारच्या सगुणा बाई सांगत होत्या. आवडे, हो एकीकडे. तुला दाहा दिवस सुतक आहे. मी कळविणार नव्हतें पण विसरतांना आलें तोंडांतून ! बरें झालें. सुटली बिचारी. मला व आपणाला कालपासून उपासच आहे. घरांत पायलीभर खील धान्य नाहीं. कसें आतां पुढें होणार ? हे प्राणी कसे वांचतील ! हाय ! हाय ! देवा, कसला माझा नक्ष-त्रा सारखा मोठा पोरगा ह्या दुष्काळांत गेला ! बाळ मा-झा डोळ्यांसमोर दिसतो आहे ! ( रडावयास लागते. ) बाबा, मी कसली तुझी अभागीण आई ! तुला अन्ना-वाचून मीं मरूं दिलें. बाळ्या, सोन्या, मी येतें रे तुझ्या-पाटील, तुजवांचून मला येथें कसें करमेल ! विठोबा देवा – मला मरण देशील तर मोठा उपकार...

होईल. मग मला हे माझे मनुष्यांचे हाल तरी नकोत पहायाला. .कोठें जीव द्यावा तर पाणी सुद्धां नाहीं. चंद्रभागा कशी कोरडी पडली आहे. मला तहान लागली, घसा अगदीं कोरडा पडला. डोळ्यांपुढें सर्व अंधार दिसतो आहे, मला घेरी आली, धरा ! ( पडते. )

**ब्रा०**— ( धांवून तिला धरतो. ) अहो, पाणी आणा पाणी ! ( मुलें रडावयास लागतात. ) अगे ऊठ ऊठ सावध हो. डोळे उघड. हिकडे ह्या मुलांनीं रडून धिंगाणा घातला आहे, तो माझ्यानें पहावत नाहीं. अग, पुनः भलतेंच मनांत आणून उगाच शोक कां करितेस ? झालेलें काय पुनः परत येतें. आह्मीच काय ह्या दुष्काळांत सांपडलों आहों. लोकांकडे पहा ! त्यांची दशा ती आमची. परमेश्वराच्या मनांतील हेतु कोणीं जाणावा ? ह्या जुलमी मुसलमानी राज्यांत महान् महान् पातकें घडतात, गाईब्राह्मणांचें रक्षण होत नाहीं. तेव्हां पुढें काय काय चमत्कार होणार आहेत ते, परमेश्वरा, तुलाच माहीत. मुलींनो, रडूं नका. बाळे, इकडे ये जवळ. ती पहा डोळे उघडायाला लागली. होईल ती आतां सावध. तिच्या दोन दिवसांत पोटांत कांहींच गेलें नाहीं. त्यामुळें तिला ग्लानि आली. अन्नमय प्राण ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. ऊठ ग. ( तिला आपल्या ढोंपराला टेकून बसवितो. )

**पत्नी**— ( किंचित् सावध होऊन ) बाळांनो, रडूं नका.

**मुलें**— आई, आई, काय हें ! ( रडतात. )

**ब्रा०**— मुलीं, बाळ्या, अगदीं मीट रहा. आली ती आतां शुद्धीवर. रडून रडून पोटांत अधिकमात्र आग पडेल

पत्नी– अहो, माझी ही रात्र निभावतांना कठीण दिसते. एकूण लौकरच पांडुरंगानें माझें गाऱ्हाणें ऐकिलें. ह्या हालांत राहणें त्यापेक्षां मरण फार चांगलें. बाळांनो, जवळ-या. मला एकदां शेवटचें तुह्मांला पोटभर पाहून घेऊं द्या.

ब्रा०– असें काय वेडेवांकडें बोलून त्या लहान मुलांना व मला दुखवितेस ! भवितव्य कांहीं चुकावयाचें नाहीं. घरांतजें कांहीं चीजवस्त होतें, तें केव्हांच विकून रुपयास पायली प्रमाणें धान्य घेऊन दोन तीन महिने प्राण वांचविले. दोन गाई होत्या त्या सुद्धां विकल्या !! जवळ कांहीं राहिलें नाहीं. आतां माझा उपाय खुंटला. तर कोठें तरी लांब निघून जातों.

मुलें– बाबा, नका हो सोडून जाऊं आह्मांला. तुमच्या पायां पडतों आह्मी.

पत्नी– महाराज, एवढें मात्र करूं नका शहाणपण ! चार मनुष्यें आहेत तीं घराच्या वाशांखालीं तरीं असूं द्या. वाईट बरें काय व्हावयाचें तें येथेंच होईल. आपण गेल्यावर आह्मीं येथें कसें रहावें ? आपण जाणार कोठें ? बाहेर तरी काय दुष्काळानें अशीच आग लाविली असेल.

ब्रा०– परमेश्वर सर्वांचें रक्षण करील. तूं भितेस कशाला ? त्याला जर हे प्राणी वांचवायाचे असतील तर तो हरतऱ्हेनें त्यांचे पोटास देईल. आमची काळजी व्यर्थ आहे. त्याची करणी अगाध आहे. ती मनुष्यमात्रास काय समजणार आहे ! अगं, मी बाहेर कोठें जावें या विचारांत होतों, तों एकदम मंगळवेढ्यास जावें असें मनांत आलें. सरासरीस दाहाबारा महिन्यांपूर्वीं मी तेथें गेलों होतों. त्या गांवीं दामाजीपंत ह्मणून कोणी यजुर्वेदी

ब्राह्मण बादशाहाचा कारभारी ठाणेदार आहे. त्याच्याकडे दोन दिवस होतों. तो मोठा दयाशील सत्वस्थ कलियुगांतील केवळ श्रियाळच ! तो ब्राह्मणांसच काय, सर्व याचकांस संतुष्ट करणारा गृहस्थ आहे. त्याची स्त्रीही माउली साक्षात् दुसरी चांगुणाच ह्मटली पाहिजे. तेव्हां त्याजकडे आज पहाटेस निघून जातों. जवळच आहे. चार पांच दिवस राहून कांहीं धान्य वगैरे दिल्यास घेऊन येतों.

पलें— बाबा, उगाच तुह्मीं जवळ जाईन ह्मणाल आणि लांब जाल.

ब्रा०— बाळांनो, खरोखर लांब नाहीं.

मुलगा — घ्या तर मग विठोबाची शपथ.

ब्रा०— विठोबाची शपथ. झालें आतां ?

स्त्री —काय आतां ह्या भोळेपणास ह्मणावें ! आपण जायाचें त्याला महिने झाले दाहा बारा ! त्या वेळेस ठीकच. तेव्हां कांहीं दुकाळ नव्हता. आपण सांगतां तसे ते गृहस्थ असतील, माझें ना ह्मणणें नाहीं. पण त्याचें ह्या वेळेस काय असें चालणार ? हजारों भिकारी त्याजकडे जात असतील. तो बिचारा कोणाला ह्मणून देईल ? ह्याचा आपणच विचार करावा.

ब्रा०— अग तूं ह्मणतेस तें खरेंच आहे. तो असा जरी गृहस्थ आहे तरी लाकांत ह्मणजे दातृत्वाविषयीं फार प्रसिद्ध आहे असें नाहीं. जे त्याच्याकडे गेले आहेत त्यांनाच त्याचे गुण ठाऊक. ज्यापेक्षां एकदां माझ्या मनांत आलें आहे, त्यापेक्षां आजच्या पहाटेच्या कण्र्याबरोबर निघून जाणार. ह्मणजे हळु हळू उद्यां संध्याकाळीं तरी तेथें पोंचेन.

पत्नी — मग लौकर तरी परत यायाचें होऊं द्या. नाहीं तर पाठीमागची कांहींच शुद्ध राहाणार नाहीं.

ब्रा० — ठीक आहे. घरांत वेतावातानें राहा. सारा वेळ दाराला आंतून कड्या घालून असा. सध्या चोरांची फारच भीति आहे. घरांत एकादे वेळी शिरून उगाच उपद्रव मात्र देतील. मुलांना जपत जा.

पत्नी — घरांत चोर शिरून नेणार आहेत काय ? पण पहाटस जाण्याच्या वेळेस मला उठवा.

ब्रा० — ठीक आहे. फार रात्र झाली. चला आतां निजायाला. ( सर्व जातात. )

( ब्राह्मण पुनः बाहेर येतो. )

ब्रा० — हें काय ! मोठ्या पहाटेस उठून निघणार होतों, पण बहुतेक उजाडायाला झाल्यासारखें दिसत आहे ! काकडआरती होऊन चौघडा देवळांत सुरू झाला. आतां देवदर्शन घेऊन तसाच आपला पुढें मार्ग धरावा. मनुष्यें गाढानिद्रेंत आहेत त्यांना कशाला उगाच उठवा आण ? ( चालल्यासारखें करून ) ह्या वेळेस ह्या देवळांत किती पण गर्दी असते, परंतु आज सर्व दाहा बारा लोक दिसत आहेत. ह्मणतात तें " आधीं पोटोबा मग विठोबा " तें अक्षरशः खरें आहे. पोटाला अन्न नसल्यानें केवळ अस्थिपंजर मात्र राहून एक पाऊल टाकण्यासही शक्ति नाहीं अशी लोकांची दशा झाली आहे. ( हात जोडून, ) पांडुरंगा, तुलाच आमचा कटाळा आला ! ह्मणून हा आह्मांवर त्वां असा प्रसंग आणिला. येथें ह्या सभामंडपांत सतत किती बरें साधुसंत यात्रेकरी

तुझ्या नांवाचा घोष करीत असतात. परंतु सध्या येथें काय आहे ! एकही मनुष्य दिसत नाहीं. विठोबा, आपले खरे भक्त किती आहेत हेंच पहाण्याकरितां, तूं ह्या दुष्काळाची योजना केली आहेस काय ? मनुष्याची परीक्षा जर तुला पहाणें होती तर बिचाऱ्या मुक्या जनावरांला खाण्याला व पिण्याला पाणी ठेवायाचें होतेंस. असो; तूं सर्वज्ञ आहेस. देवा, मी दोन दिवसांचा उपाशी आहें. अजून प्राण मात्र आहेत. गात्रें सर्व विगालत चालली आहेत. एकही पाऊल पुढें टाकण्याचें मला अवसान नसून मंगळवेढ्यास अन्नासाठीं मी निघालों आहे. तेथें दामाजीपंत तुझा भक्त आहे, त्यांचे मनांत प्रेरणा करून माझे व माझ्या सर्व कुटुंबाचे प्राण वांचतील असें त्याजकडून करीव. जास्त काय बोलूं शक्तीच नाहीं ! ( चालल्यासारखें करून ) येथें तरी काय आहे ? गर्दीचें नांव नाहीं ! ( नमस्कार करून ) हे माते, तुजपुढें काय बोलावें ? भक्तांचे मनोरथ तूं सर्व जाणतेस. दुष्काळानें दररोज हजारों दुःखकारक प्रसंग येत आहेत हे तुला कसें आवडतें ! ( चालल्यासारखें करून ) मला तर हा पृथ्वी लयास नेणारा काळ वाटतो आहे ! हा दुष्काळ तरी कोणत्या प्रांतापर्यंत आहे हें समजत नाहीं ! अरे अगदीं उजाडलें. ही पूर्व दिशा तर श्री आदित्याचें आगमन होणार ह्मणून कशी अगदीं तेजःपुंज दिसत आहे ! तिकडे पाहून आनंद मानण्यास पोटांत काय आहे ! हे भास्करा, सूर्यनारायणा, पर्जन्यानें अवकृपा केली ह्मणून तुम्हीही, आपले द्वादश नेत्र उघडून ह्या जगताची राख करून टाकण्यास हा समय योग्य आहे ! अशानें ह्या वेळेस हाय ! हाय ! करणाऱ्या लोकांवर मोठे

उपकार होतील. ( चा० क० ) हा प्रहर दिवस आला तरी अजून एक कोशही आलों नाहीं ! पायांत कांहीं नाहीं. रस्त्यांत धूळ ढोपर ढोपर असून ती अग्नीप्रमाणें अगदीं तापली आहे ! कोठें विश्रांतीसाठीं दोन घटिका झाडाच्या छायेखालीं बसावें तर तीं पहा—तुशीं काय दग्ध झालीं आहेत अशीं दिसत आहेत ! वर एकही पान नाहीं. अरे रे, मेलों मेलों ! देवा ! काय एकदम वाऱ्याचा सोसाटा आला हो ! ह्या धुळीच्या लोंढ्यानें चोहोंकडून कोंडून गेलों आहें पुढें कांहीं दिसत नाहीं ! डोळ्यांत व तोंडांत सर्व धूळ गेली. डोळे उघडत नाहींत. ( तोंडावरून धोतर घेऊन बसतो. ) काय मला घरांतून निघण्याची बुद्धि झाली हो ! तरी ती सांगत होती कीं नको जाऊं. घरालाच परत जावें हें ठीक आतां. परंतु निघालों तो निघालोंच. घरीं तरी काय आहे ! रस्त्यांतच जर माझें मरण नेमलेलें असेल तर तें कसें टळेल ! ( चा० क० ) हा कोणी मनुष्य हिकडच्या गांवाहून येत आहे वाटतें. तर जरा येथेंच थांबावें. आपल्याला सोबत होईल. याचा पाय तर मुळींच उचलत नाहीं. एक घटका होत आली तरी त्याच्यानें हा एवढासा मार्ग चालवत नाहीं अरे रे ! तो तेथें पडला वाटतें ! ( जवळ जातो. ) हा कोण कुणबी दिसत आहे. पाटील, अहो पाटील, ( बसून ) हाय हाय ! श्वासोच्छ्वास सुद्धां नाहींत. तोंडांतून हा फेंस बाहेर पडला आहे. हात पाय अगदीं ताठले गेले आहेत. डोळे खोल वितभर गेले आहेत काय पोटाचें झालें आहे तिकडे पहावत देखील नाहीं पोटांत किती दिवस अन्न नसेल कोण जाणें. अरेरे ! मेलाच हा ! काय भयंकर प्रसंग हा ! आतां येथें राहून तरी काय फळ ?

आपली ही रस्त्यांत आतां हीच दशा होणार. ( चा० क० ) ही तर इकडे गाय मरून पडली आहे ! अरेरे ! हें तर फारच भयंकर. ही कोणी रस्त्यांत बायको आपला नवरा किंवा मुलगा मेला ह्मणून मोठ्यानें रडत बसली आहे ! ही ह्मणा तर केवळ मसणवटीप्रमाणें मला दिसत आहे ! बये, कशाला उगाच रडतेस ? ईश्वरच आह्मां सर्वांवर कोपला, तेथें काय करावयाचें ? बाई, तुला कोणीकडे जावयाचें ? ही कांहींच बोलत नाहीं ! हिनें आपलें डोकें ह्या प्रेताच्या उरावर टेकून ही रडत बसली आहे. येथें तरी आपल्या हातून काय होणें आहे ? काय ही स्थिति ! हे इकडच्या बाजूस पक्षीच मरून पडले आहेत, पक्ष्यांनों, तुह्मांस परमेश्वरानें उडण्याची शक्ति दिली असून तुह्मी ह्या पापी प्रदेशांत कां ? मला जर तुह्मांसारखे पंख असते तर मी केव्हांच, जेथें अन्न विपुल, पाणी पुष्कळ हिरव्या गार वृक्षांची दाटी अशा रम्य ठिकाणीं गेलों असतों. बाबांनों तुह्मी तरी काय कराल ? तुह्मांस परमेश्वरानें आह्मांसारखें ज्ञान दिलें नाहीं, व आह्मांस तुमच्यासारखे पंख दिले नाहींत. ( चालून ) ही काळी भोर जमीन कशी वाळवंटाप्रमाणें ओस दिसत आहे ! हीवर एक तरी धान्याचा कण उगवला आहे काय ? हे सुमाते धरित्री, आह्मा बालकांस तूंच जर धान्यरूपी दुग्ध देण्याचें सोडिलेंस तर आह्मीं जावें तरी कोठें ! तुझा पति अथवा आमचा प्रजांचा पिता बादशाहा यास आमची काळजी मुळींच नाहीं ! तेव्हां हे आई, तूं तरी असें करावयाचें नव्हतेंस. द्रव्यहीन झाल्यावर तो पुरुष जसा ओळखतां येत नाहीं त्याप्रमाणें हा पूर्णविहीन

कसला वृक्ष आहे हें कांहींच ओळखतां येत नाहीं. अगा हे महावृक्षा, आपत्काळीं तूं मला ओळख देत नाहींस काय ? बाबा, मीं तुझ्याजवळ कांहीं मागत नाहीं. हजारों लोकांवर तूं आजपर्यंत उपकार केले असशील हें तुझ्या देहावरूनच समजतें. ( वर पाहून ) ह्यावरील वेलीनें ह्याला इतकें घट्ट आलिंगन देऊन शेवटीं ही मेलेली दिसत आहे ! पतिव्रतास्त्रिया अनिष्ट काळीं आपल्या नवऱ्यांस आपल्या योगानें दुःख होऊं नये असें इच्छितात, व त्यामुळें त्या पतींच्या अगोदर मरणाची इच्छा करितात !! ह्या एवढ्याशा टप्यांत दुष्काळाचें हें भयंकर रूप दिसत आहे, तर त्याणें व्यापलेल्या एकंदर सर्व प्रदेशांत काय हाहाकार उडाला असेल !! एक अन्न नसल्यानें हजारों लोक दुःखसमुद्रांत पडून नानाप्रकारचीं पातकें करीत आहेत, सर्व धर्म बुडाला !, ह्या वेळेस यवनांचे हातचें अन्न भक्षण न करणारा असा एकही मनुष्य सांपडणार नाहीं असें मला वाटतें. पुण तसें तरी कोठें आहे अन्न ? हा मोठा आंब्याचा वृक्ष दिसत आहे. ह्यावर एकही जरी पान दिसत नाहीं तरी ह्याच्या फांद्यांची अल्प छाया पडली आहे त्या खालीं जरा निद्रा घेऊन, आज सायंकाळीं येथें एक कोशावर धर्मशाळा आहे तेथें रात्र कशी तरी काढून हळु हळू उद्यां दोनप्रहरच्या सुमारास तरी त्या दाद्याचें दर्शन होईल असें करावें. तहान फारच लागली आहे ! पण येथें पाणी कोठें मिळणार ! ( जातो. )

## प्र० ४. दामाजीपंतांचा वाडा.

( दामाजी पंत व चिंतोपंत. )

दा०—क्कां चिंतोपंत, पाऊस आज पडेल उद्यां पडेल असें ह्मणतां ह्मणतां हे असे भयंकर दिवस शेवटीं आले !! अनुष्ठानें झालीं, सर्व झालें ! शेवटीं तरी एकादें पीक यावें, अशा प्रकारचा एकही पाऊस पडला नाहीं ! काय ईश्वरी कोप हा !

चिं०—ईश्वरेच्छा, तेथें आपल्या काय स्वाधीन आहे ? तो ज्या स्थितींत ठेवील तसें राहिलें पाहिजे. आणखी काय ?

दा०—तें तर आहेच. परंतु अनावृष्टि होऊन दुष्काळ पडून हजारों मनुष्यें हाय ! हाय ! करून मरणें हा ईश्वराचा आपल्यावर मोटा क्षोभ आहे असें ह्मटलें पाहिजे.

चिं०—ह्यांत काय संशय !

दा०— पृथ्वीवर पातक फार वाढलें ह्मणजे असे प्रकार वारंवार व्हावयाचेच.

चिं०—लोक तरी पातकें केव्हां अतिशय करूं लागतात ? राजाच जर मुळीं नीतिन्यायधर्मादिकांहीं भ्रष्ट असेल तर प्रजेमध्यें तशीं पुण्यकर्में कोठून यावींत ? ह्या मुसलमानी राज्यांत अनान्वित कर्में काय होत आहेत त्यांचा उच्चार करणेंसुद्धां पाप होय !

दा०—तें कांहींहि असो. काळ तर मोठा विलक्षण आलेला दिसत आहे ! किती लोक अन्न अन्न व पाणी पाणी करून तड फडत मरत असतील ! राज्यांत स्वस्थता कांहींच नसेल ! चोऱ्या, मारा मारी, दरवडे ह्यांचेविषयीं तर

विचारूंच नका. काल एकानें असें सांगितलें कीं एका कुणब्याचे बाईनें एका शेजारीण बाईचें मूल मारून तें शिजवून खाल्लें. कित्येक तर माती चांगली गाळून ती खाऊन प्राण वांचवीत आहेत! अरेरे! नरमांस, व आई पृथ्वी हिलाच खाऊं लागले!! शिव! शिव! काय मनुष्याची आतां गति होणार. कितेकांनीं अन्नासाठीं आत्महत्यासुद्धां केल्या. परमेश्वरा! ही स्थिति ऐकून व कांहीं प्रत्यक्ष पाहून मला फार दुःख होतें. सर्वांस अन्न देऊन त्यांचे प्राण वांचवावे असें मला वाटतें, पण उपयोग काय? माझ्या घरीं जे कोणी येतील त्यांस माझ्या घरीं आहे तोंपर्यंत एक ग्रास तरी देईन. परंतु अशानें काय होणार? देवा, तुझ्या ह्या क्षोभरूपी प्रळयाग्नीवर लक्षावधि लोकांनीं जरी कृपोदक ओतलें, तरी तें शहरांतिल प्रज्वलित झालेल्या घरांवर संध्येच्या पळ्यांनीं पाणी घालून विझविण्याच्या उद्योगा प्रमाणें व्यर्थ आहे! ह्या दुष्काळांत आजपर्यंत इतके लोक मेले असतील कीं तितके मोठ्या भयंकर लढाईंतही मेले नसतील! चिंतोपंत, तुह्मी असें करा कीं मंगळवेढ्यांत ह्मणून जे लोक अन्नासाठीं येतील त्यांनीं सर्वांनीं मजकडे यावें, मला त्यांचे प्राण माझेप्राणांपेक्षां जास्त आहेत. चिंतोपंत आणखी दुसरें काम हें करावयाचें कीं बादशाहास एक विनंतिपत्र पाठवावयाचें त्यांत अर्ज ह्मणून इतकाच कीं, इकडे दुष्काळानें प्रजा अगदीं नाडली आहे, तिचे फारच हाल होत आहेत. तेव्हां त्यांच्या रक्षणार्थ सरकारी धान्यांतून कांहीं तरी धर्मार्थ दररोज खर्च करण्या विषयीं हुकूम व्हावा, गतवर्षाचा व ह्या वर्षाचा वसूल प्रजांस माफ असावा, हें तर अगदीं योग्य

आहे, तेव्हां ह्याविषयींहि सरकारांतून मंजुरी असावी. जा, अगोदर कचेरींत जाऊन हा अर्ज लिहा. उठा.

च०— आपल्या हुकुमाबाहेर मी नाहीं. परंतु— ( मनांत ) बादशाहाकडून कांहींही होणार नाहीं ! ( उघड ) आपला प्रजांविषयीं कीर्य कळवळा हा ! बादशाहानें मात्र असें केलें पाहिजे. तिकडे दाद तरी लागेल काय ? बरें तर मी कचेरींत जातों ( चिंतोंत जातो. )

( इतक्यांत बाहेर एक ब्राह्मण येतो. )

ब्राह्मण— हेंच दामाजी पंतांचें घर असावें. याचक भणंग भिकारी इत्यादि यांच्या घरीं हजारों लोक येत असल्यामुळें घरासभोंवती ढोंपर ढोंपर धूळ झाली आहे !! पाणी नसल्यामुळें हीं इकडच्या बाजूस तुळशीच्या झाडांचीं फक्त काष्ठें मात्र शिल्लक उभीं आहेत. ( ऐकल्यासारखें करून ) " दामाजी तूं माझा मायबाप. " असें कोणी ह्मणत आहे काय ? तेव्हां आतां हेंच घर ह्यांत संशय नाहीं. हां हां ह्मणतां येथें काय गर्दी होत चालली आहे ही! ( आंत प्रवेश करून दरवाजाकडे पाहून ) पहाटेस पंत उठण्याचे अगोदर भिकार येऊन त्यांणीं दरवाजा ठोकल्यामुळें हा ह्या ठिकाणीं कांहीं झिजून गेला आहे असें दिसतें! काय ह्या घराचा गुण तरी हा ! आंत पाऊल ठेवतांच मन अगदीं शांत झालें आहे. काय तरी सत्पुरुषाचें वसतिस्थानाचें माहात्म्य हें ! अहो पंत, मी तीन दिवसांचा उपवासी असल्यामुळें थकून गेलों आहें. येथपर्यंत मीं आपले प्राण कसे तरी आणले, आतां सर्वस्वी माझ्या

प्राणांचे आपण धनी आहां. ( पडतो. )

दा०— अरेरे ! कोणी क्षुधेनें व्याकुळ होऊन पडला वाटतें ! ( जवळ जाऊन ) अहो सावध व्हा, उठा. भोजनाची तयारी आहे. स्नान करा ह्मणजे सावध व्हाल.

ब्रा०— अगोदर थोडें गूळपाणी येऊं द्या. मग सावध होईन. तुमच्यासारख्या दात्यापुढें तोंड पसरण्याला मला मुळींच लाज वाटत नाहीं.

दा०— अहो ब्राह्मणहो, हें घर सर्वस्वी तुमचें आहे.

ब्रा०— हे दयाळु पुरुषा, तुझें सर्वदा कल्याण असो.

दा०— आंत चलावें महाराज. ( जातात. )

( नंतर उपाध्याय येतो. )

उपाध्याय—(आपल्याशीं) पुनः पुनः दामाजीपंताच्या औदार्यादिगुणांची स्तुति केल्याशिवाय रहावत नाहीं. ह्या दुष्काळांत तर क्षुधेनें व तृषेनें पीडित लोकांस अन्नोदक देऊन तो सत्पुरुष लोकांवर अतोनात उपकार करीत आहे. लोकांचे हाल पाहून त्यास फारच वाईट वाटतें. त्याला ह्या वेळेस असें वाटत असेल कीं, आपणास जर मोठें राज्य असतें अथवा संग्रहीं विपुल द्रव्य असतें तर दुष्काळ दुष्काळ म्हणजे काय आहे ? एकही मनुष्य ह्या भयंकर काळरूपी राक्षसाच्या दाढेंत न सांपडतें. परंतु हे सत्पुरुषा, राजा प्रजेचें दुःख जाणून कळवळणारा, धनाढ्य असून दाता, विद्वान् असून श्रीमंत, इत्यादि वारंवार पहाण्याचें ह्या पृथ्वीच्या कपाळीं कोठें येतें ? जें ज्याचे ठिकाणीं अवश्य पाहिजे तें त्यास मिळेल तर पृथ्वीवर काय होईल नकळे ! ! तसें ईश्वरकृपेनें पंताला एवढें कारभाराचें काम आहे

म्हणून बरें आहे. परंतु जें विपुलद्रव्याधीन उपकार ते सत्पुरुषांच्या हातून तत्काल कसे होतील. ! गोड शब्द बोलून याचकांची तृप्ति होईल काय ? अस्तु; काल दोनप्रहरीं पंढरपुरचा एक ब्राह्मण क्षुधेनें व्याकुळ होऊन पात्रावर बसला असतां, ते पात्रावरील पदार्थ पाहून आपल्या मुलाबाळांची स्थिति आठवून हल्ढळां रडूं लागला. त्यावेळेस नवनीताहूनही कोमल, अशा पंताचे अंतःकरणास अप्रतिम द्रव आला, तो काय वर्णावा ? तें पंतांचें दयासागरांत तरंगणारें रूप पाहून माझेही डोळे भरून आले. त्यांनीं त्यास मृदुशब्दांनीं सांगितलें कीं, "अहो, ब्राह्मणहो, आपण स्वस्थ मनानें भोजन करावें, आपल्या कुटुंबास एक वर्ष पुरे इतकें धान्य, आपण जेवल्यानंतर आपल्यास घरीं न्यावयास देतों कांहीं काळजी करूं नये." त्या प्रमाणें पंतांनीं दोन खंडी धान्य, बराबर चाकर माणसें देऊन बैलांवरून पाठविलें. अशावेळीं काय हें दातृत्व ! आणि काय ही भूतदया ! पंत, तुह्मी खचित अवतारी पुरुष आहां, हे साधो, यद्यपि तुझा देह ईश्वरी संकेताप्रमाणें नाश पावणार, तथापि तुझी कीर्ति ह्या पृथ्वीवर यावच्चंद्रदिवाकर अबाधित राहील ! व मधून मधून अनेक प्रसंगीं कविसमूह तिला उज्वालित करतील !! पंताची भार्याही तशीच पतिव्रता प्राण्याच्या सावलीप्रमाणें नवऱ्याला अनुसरणारी आहे. जगतांत अशाच स्त्रिया होऊन आपल्या पतींस सुख देवोत. ( इतक्यांत एक मनुष्य येतो, त्यास ) कां रे रामा, कां आलास ?

रामा— हाराज, दादासाब आपनासनी बोलावल्यात.

उपा०— चल, हा मी आलों ( जातात. ).

## प्र० ९. स्थळ–पंढरपुर, गोपाळपुरा.

( ब्राम्हणादि अनेक जातींचे लोक. )

एक– ह्या दुष्काळांत आमचे क्षेत्रस्थांचे जसे हाल होत अहेत तसे कोणांचेही होत नसतील !

दुसरा– ठीकच आहे हें. आह्मांस शेताच्या जमिनी नाहीं कांहीं नाहीं. आमचीं शेतें काय तीं यजमानांचीं घरें.

एक– यंदा तर कांहीं विचारावयासच नको. पंढरपुरांत ह्मणजे कोणाकडे दरवडा पडला नाहीं, अशी गोष्टच नाहीं. आह्मी तर सर्वस्वी नागवलों. जन्मापासून जो कांहीं संचय केला होता, तो सर्व दरवडेखोरांनीं लुटला. ह्या रामभटजीच्या घरीं ज्या वेळेस उभ्या दोनप्रहरीं शेंदोनशें मनुष्य हत्यारबंद आले त्या वेळेस मी तेथें होतों, सर्व घर शोधून जें जें हातास लागलें तें सर्व त्यांनीं उपटलें. एक नथ कीं कायसा दुसरा लहान दागिना ह्यांच्या सुनेनें पायांखालीं दाबून ठेविला होता, ह्मणून त्या निर्दयांपैकीं एकानें त्या बिचारीचा पायच कीहो तोडून तिला धाडकन् भूमीवर पाडिलें. काय हा जुलूम, सर्वत्र बेबंद पातषाही, वळी तो कान पिळी असें झालें आहे. न्याय मनसुबा कोठेंच नाहीं. हर ! हर ! काय प्रसंग हा आम्हावर !

एकगृहस्थ– ह्यासाठींच ज्यांच्या जवळ पैसा असेल त्यांनीं जमिनी घेऊन ठेवाव्या. दुष्काळांत पैसा काय उपयोगी !

०– हें तर खरेंच, आह्मांजवळ जरी पैसा असला तरी आह्मी काय, दोन महिन्यांची पुढां घरांत बेजमी करीत नाहीं. कारण शहरांत पाहिजे तो जिन्नस ह्मटल्यावेळीं मिळतो.

राम०— पाऊसच जर नाहीं तर जमीन तरी काय करावयाची?

तिसरा— काय ब्रामनानों, अशाच गोष्टी सांगनार काय ? हथ तर आपुन कयास केल्या परमान निवूनश्यान आलों, आतां कुनिकड जायाच त चला वेगिनी.

एक— हो हो ! आपलें ह्मणणें खरें आहे, आतां कोणीकडे तें चलावें.

राम०— अन्नासाठीं व ह्या बाईच्या भीतीनें आपण स्वदेश सोडून जाणार हें ठीकच आहे. परंतु ईश्वरदयेनें जे ह्या प्रळयांतून निभावतील, त्यांनीं पुनः आपल्या घरीं यावें.

दु०— अहो, घरेंदारें सोडून चालेल कसें ! घरीं तर आलेंच पाहिजे. अहो पण जेथें घटिकेचा नेम नाहीं तेथें पुढील विचार पाहिजे कशाला आज ?

तिसरा०— समद्यांनीं मिलून एकाच ठायीं जान बराबर न्हाई.

एक— अहो, ह्या वेळेस ऊन तर फार लागत आहे ह्यांतून जाणें म्हणजे मोठें कर्म कठीण आहे ! ( पडद्यांत.— “ आई, आई, मला भूक लागली ग, खायाला दे कांहीं तरी; येथें मला बसवत नाहीं ऊन्ह फार लागतें. ” “ बाळा, कायरे देऊं तुला खाण्याला ! मलाच खा एकदां म्हणजे झालें ” “ बाबा, मला तहान लागली हो. ” असे शब्द होतात. ) अरेरे ! त्या झाडाखालीं बसलेलीं आपलीं बायकामुलें तृषाक्रांत व क्षुधेनें आर्त अशीं झालीं आहेत, अशांना बराबर घेऊन आपला निभाव कसा लागणार ? त्यांना एकही पाऊल टाकण्याचें सामर्थ्य नाहीं. तर आपण उदयिक पहाटेस निघावें हेंच योग्य.

०— ( पुढें लांब पाहून ) समोर पहा, अहो समोर पहा, कोणी आपल्याकडे तीन चार मनुष्यें येत आहेत.

म०— अहो अशा वेळेस ह्या पंढरपुरास कोण येणार ! जाणून बुजून पेटलेल्या चितेंत कोण उड्या टाकावयास आले हे ! असतील बोवा कोणी तसे विठोबाचे निस्सीम भक्त. पृथ्वी आहे ही. ( पाहिल्यासारखें करून ) येत आहेत खरे कोणी तरी.

क— आतां तर अगदीं अंबळच आले. मोठ्या जलदीनें चालत आहेत, दुष्काळानें जरजर झालेले हे दिसत नाहींत. तेव्हां हे सुकाळाच्या प्रदेशांतून आलेले असावे असा तर्क निघतो. आपण येथें थांबावें. त्यांनांच येऊं द्या पुढें.

दु०— ते देखील तेथेंच उभे राहिले ! आतां तर हे चांगले दिसतात. पुढें एक ब्राह्मण आहे. पाठीमागें पुष्कळ बैल गोण्यांनीं लाधलेले दिसत आहेत. हें धान्य आहे खचीत ! विठोबानें आमच्यावर दया केली. कोणीं उदार पुरुषानें आह्माकरितां हें पाठविलेलें आहे.

राम०— काय धान्य ! धान्य ! वहातां काय पडा तुटून ! सर्वांनीं एकदम जाऊन लुटूं. ते तरी ह्याच भीतीनें तेथें उभे राहिले असतील !

सर्व- चला, करा तर एकदां विठोबाच्या नांवाची गर्जना. " पुण्डलीक वरदे हरिविठ्ठल. " ( सर्व जातात. )

( ते सर्व लोक धान्याचीं ओझीं घेऊन व तो ब्राह्मणवैगेरे येतात. )

ब्रा०— नशीब खोटें माझें व माझ्या कुटूंबाचें ! ह्या घोर दुष्काळांत इतकें धान्य मिळून शेवटीं तें ह्यांणीं सर्व लुटलें. काय करूं कोठें जाऊं ( रडावयास लागतो ) घरीं न्यायाला ! एक पायलीही मला राहिलें नाहीं. अहो, मला तुम्हीं जीवंत कशाला ठेविलें ! माझे एकदां घ्या प्राण ! चोरांनो, मला तुह्मी सर्वस्वी नागविलें. अरे, ही बहुतेक मंडळी माझ्या

ओळखीची दिसत आहे.

काही- रे ब्राह्मणा ! तूं अद्याप सांगत नाहींस काय, हें धान्य तुला कोठें मिळालें तें. आतां न सांगशील तर मात्र तुला हे सर्व लोक काय करतील हें सांगतां येत नाहीं. आम्हीही तुला ओळखतों, तूं पंढरपुरचा आहेस. पण पोटा आड ओळख येईल तर ती काय कामाची ?

ब्रा०- तुम्हांला धान्य पुष्कळ मिळालेंना ? आतां कां त्याविषयीं चौकशी.

तिस०- हें आमच्या बायकापोरासनी दोन दिस तरी पुरल ?

राम०-अरे बोल लौकर. असा हा कोण मोठा दाता ? कीं ज्याणें अशा ह्यां दुष्काळांतही असें आपलें दातृत्व प्रकट केलें. अर्थात तो मोठा श्रीमान असला पाहिजे. व अशा दात्याचें दर्शन तुलाच कसें घडलें ! बोल लौकर. तुला ठाऊक असून तूं तिकडे एकटाच गेलास काय !

ब्रा०- ( मनांत ) आतां आपण दामाजीपंतांकडे कुटुंबासह रहावयास जावें हा बेत चांगला. ( उघडपणें ) सांगून त्याचें आतां काय करणार.

कित्येक- अरे काय करणार म्हणून कपटानें विचारतोस काय ? भटजी बोवा, तुह्मीं त्याचें काय केलें तेंच आह्मी करणार. समजलेत. आतां न बोलशील तर ही सर्व मंडळी काय करील हें आमच्यानें सांगवत नाहीं. क्षुधेनें जरी आह्मी बलहीन दिसत आहों, तरी रागानें तुह्मांकडे पहात आहों !

ब्रा०- ( मनांत ) आतां मात्र सांगितलें पाहिजे. नाहीं तर हे सर्व लोक अंगावर तुटून पडणार. ( उघडपणें ) अहो जसें दशग्रंथी ब्राह्मणानें विचारावें कीं, "गायत्रीमंत्र" को[illegible]

आहे ? त्या प्रमाणें तुह्मीं मला विचारीत आहां ! ह्या अन्नदात्याचें नांव तुह्मांस माहीत असूनही काय हा तुह्मांला भ्रम पडला आहे !

**सर्व लोक—** अरे स्पष्ट काय तें लौकर सांग. आह्मांला तसें कांहीं समजत नाहीं.

**आ०—** बादशाहाचा कारभारी, मंगळवेढेमहालाचा ठाणेदार, विठोबाचा मोठा भक्त, तसाच भूतमात्रावर अत्यंत दया करणारा असा दामाजी पंत ह्मणून सद्गृहस्थ आहे त्यानें हें माझ्या कुटुंबाकरितां धान्य दिलें होतें !

**कांहीं—** ह्या साधु पुरुषांचें नांव पंढरपुरास सर्वांस माहीत आहे. परंतु हा असा दाता आहे हें आह्मांस आजच समजलें ! प्रसंगाशिवाय मनुष्याचा गुण समजत नाहीं !

**रा०—** तर आतां सर्वांनीं मिळून मंगळवेढ्यास उद्यां परवां जावयाचें. आज हें धान्य घेऊन पोटभर चला जेऊं.

( जातात. )

---

## अंक. ४.

### प्र० १. स्थळ, पंढरपुर.

( एक वृद्ध गृहस्थ येतो. )

**वृद्ध०—** काय माझी अवस्था ही ! कानांनीं ऐकूं येत नाहीं.

डोळ्यांनीं धड दिसत नाहीं, दांत एकही तोंडांत नाहीं, काळा केसही एक अंगावर औषधास मिळणें कठीण, मान तर लट लट कांपतच आहे, सर्वांगास सुरकुत्या पडल्या, हात पाय कांपतात, कफानें तर नाइलाज केला, पाठीला पोंक येऊन शरीर धनुष्याकार झालें आहे, काठीशिवाय एक ही पाऊल असतां येत नाहीं, स्मरणशक्तीनें तर केव्हांच सोडलें. अशा स्थितींत मी असतां, माझा मुलगा, सून व एक नातू हीं ह्या बाईच्या सपाट्यांत सांपडलीं ! हर ! हर ! एक दुःख ह्मणून रडूं ! हा देहच मुळीं दुःखसमुद्रांत पडला आहे. तो आतां मृत्युरूपी लाटेनें केव्हां नाश पावेल ह्मणून वाट पहात आहें. असें आहे तरी पोटांत अगदीं आग पडली आहे, कधीं अन्न मिळेलसें झालें आहे. परंतु ह्या दुष्काळांत मजसारख्या थेरड्यावर दया कोण करणार ! काय भयंकर काळ हा ? हा प्रळयकाळ तर नव्हेना ! माझ्या आठवणींत असा काळ कधींच पडला नव्हता. विठ्ठला, एवढें पंचायशीं वर्षांचें वय मला हींच दुःखें भोगायासाठीं दिलें आहेस काय ? गांवांत तर पटकी इतकी उठली आहे कीं कांहीं कांहीं कुटुंबांत एकही मनुष्य उरलें नाहीं. ह्या दुष्काळांत कित्येक स्त्रियांनीं आपलीं प्रियबालकें सोडून दिलीं. स्त्रियांनीं आपल्या भर्त्यांस, भर्त्यांनीं आपल्या स्त्रियांस सोडिलें ! मोठ मोठीं अब्रूदार कुटुंबें विभक्त झालीं. हाय ! हाय ! माझा वंशवृक्ष ह्या वादळानें धाडकन् एकाएकीं कसा उपटून पडला हा ! ह्मातारा मनुष्य झाल्यावर कोणासही आवडत नाहीं ! ही पटकी ह्या इतकी मातली असून, मोठ मोठे तरुण बळकट अशा

सही केव्हांच ओढीत नेते, आणि मज सारख्याला-स्पर्श सुद्धां करावयास ही भिते ! हे माहामारी, ह्या वेळेस जर मजवर कृपा करशील तर मला दुख:समुद्रांतून वर काढं-ल्याचें तुला श्रेय येईल, इतकेंच नव्हे. तर, मज सार-ख्या हजारों अनाथांस ह्या दुष्काळांत पोटभर वाढ-ल्याचें पुण्य तुलाच लागेल. आंधळयाचा हात धरून नेलेंसें होईल. फार काय सांगूं ! हे राक्षसी, जगतांत सर्व परोपकाराचीं ह्मणून जेवढीं कृत्यें आहेत तेवढीं सर्व के-ल्याचें यश तुला एकटीला मिळणार आहे ! काल ब्रा ह्मण व इतर अनेक जातींचे लोक अन्नार्थ मंगळवेढ्यास, अलीकडे कोणी दामाजी पंत ह्मणून बादशाहाचा ठाणेदार झाला आहे, त्याच्याकडे गेले आहेत, ह्मणून ऐकिलें; परंतु काय उपयोग ! मला शक्ति नाहीं. शक्ति असती तर मीही गेलों असतों. हर ! हर ! हे कल्पांता-नळा, तुझ्या ज्वाळा कोठें आहेत ? मला त्या अद्याप जाळून माझी खाक कां करीत नाहींत ? हे मृत्यो, तुझी भीति मला मुळींच कशी ती वाटत नाहीं ! काय, येथें राहून तरी काय आहे ! विठोबाच्या देवळांत जाऊन त्याचे चरणापाशीं मरावें हेंच ठीक. ( जातो. )

---

### प्रवेश २. स्थळ – पंतांचा वाडा.

( दामाजीपंत व धान्यार्थ आलेले लोक. )

१० – ( दुःखानें सुस्कारे टाकून ) दिवसें दिवस दुष्काळ आपलें भयंकर रूप दाखवून लोकांस आपल्या तोंडांत

टाकीत आहे. आणखी अशा समयीं माहामारी ही त्रय मध्येंच उत्पन्न होऊन आपल्या ह्या भावास मोठें साहाय्य करित आहे ! हा मोठा दुरतिक्रम काळ आहे. ज्य सावकारांजवळ ईश्वरकृपेनें ह्या वेळेस धान्य असेल त्यां नीं द्रव्यलोभ न धरितां लोकांचे प्राण वांचविले पाहिजे त. जे ह्या दुर्धरप्रसंगीं असें करतील ते ह्या पृथ्वीवर मो ठी कीर्ति मिळवून परलोकीं पुण्यधन घेऊन तेथें अक्षय सुख भोगतील ह्यांत संशय नाहीं. जोंपर्यंत हे हात चां गले हलनचलनादिव्यापारांनीं युक्त आहेत तोंपर्यंत ते, स मर्थ लोकांनीं ह्या प्रसंगीं क्षुधेनें व्याकुळ झालेल्य लोकांच्या रक्षणासाठीं पुढें करावे, तेच पुढें प्राणान्तस मयीं गार पडले म्हणजे मग त्या हातांनीं काय होणा आहे ! ह्या दुष्काळानें मोठाच प्रदेश व्यापिला आहे असें ह्मणतात ! दोन तीन दिवसांपूर्वीं पंढरपुरच्या एक ब्राम्हणाच्या कुटुंबाकारितां दोन खंडी धान्य दिलें होतें ते पंढरपुराजवळ तेथील लोकांनीं लुटलें ह्मणून काल रोज त्याच्याबरोबर दिलेले मनुष्य सांगत आले. ते लुटणा नाहींत तर काय बिचारे करतील ! पोटाला तर पाहिजे इतक्यांचें त्या दोन खंडी धान्यानें काय होणार ! एकवेळ ही सर्वांच्या कुटुंबांस पोटभर अन्न मिळालें नसेल. जि कडे तिकडे फिरून पीडित लोकांचे प्राण वांचविण्याचे कांहीं तरी तर्तूद करणें मला योग्य होतें, परंतु मज सार ख्या अभाग्याच्या पदरीं एवढें पुण्य कोठें आहे ? बादशा हास पाठविलेल्या विनंतीपत्राचा जाब येईल काय कोण ला माहीत ? मी ह्या संकटरूपी भोंवऱ्यांत गरगर फिर आहें, ह्यांतून वर येण्यास मला कांहींच आधार सांपड

नाहीं. हे पंढरीनाथा, विश्वंभर, दीनबंधु, करुणासागर इत्यादि नांवांचा प्रभव ह्या वेळेस नाहीं तर केव्हां दाखविणार ? आतां हा तुझा भयंकर खेळ आटप.

(पडद्यांत -" अगा, हे महापुरुषा, दामाजीपंता, तुझ्या दातृत्वादिगुणांची प्रतीति प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहूनी, धेनुवृषभादिपशु तृषेनें अत्यंत व्याकुळ होऊन उदकार्थ नदिप्रवाहावर जसे धावत धावत जातात त्याप्रमाणें आह्मीं पंढरपुरक्षेत्रस्थ ब्राह्मणादि अनेक जातींचे लोक ह्या काळानें जर्जर होत्साते धान्यासाठीं तुझ्या द्वारीं प्राप्त झालों अहों. आमचा प्राणरक्षक आतां तूंच आहेस." असें ह्मणून सर्व बाहेर येतात. )

दा०— मी मोठ्या नम्रतेनें सर्वांस नमस्कार करितों. बसावें महाराज.

लोक— परमेश्वरानें तुजसारख्या सत्पुरुषाचें सदा कल्याण करावें ह्मणजे अर्थात सर्व लोकांस सुख होईल.

दा०— लोकहो, तुमची दीनावस्था पाहून मला क्षणोक्षणीं दुःख होत आहे. पण काय करावें ?

लोक - सर्वांस धान्य देऊन संतुष्ट करावें. एवढेंच.

दा०— ठीक, आहे; आपल्या येण्यानें मला अत्यानंद झाला आहे. आपल्यास अन्न अन्न करून, इतकें लांब यावें लागलेना ? काय करतां ? काळच तसा आला आहे.

लो०— हें लांब कशाचें ? अन्नासाठीं हजारो लोक पूर्वींच स्वदेश सोडून दूर कोठें गेले आहेत त्यांचा ठावठिकाण नाहीं. आणि आह्मीही पाहिजे तेथें जाण्यास तयार आहों, पण अन्न मिळतें कोठें !

दा०— तुह्मी फार दिवसांचे उपाशी असाल तर अगोदर अन्न

खाऊन सावध व्हावें, मग धान्य देण्याविषयीं काय तें—

श्लो०— काय हो ह्याची ही भूतदया ! हे साधो, ह्या पृथ्वीवर तुजसारखा तूंच आहेस. तुला उपमा देण्यास अन्य पुरुष ह्याकाळीं क्वचित्च मिळेल. हे दयाळु पुरुषा, आमचीं वायका-पोरें उपाशी मरत आहेत तें आमच्यानें पहावत नाहीं. तेव्हां आह्मांस लवकर धान्य द्यावें. हे भटा, आमचे डोळे किती आंत गेले आहेत ते, पोटाला भकाळा पडल्या आहेत ! फार बोलण्यास सामर्थ्य नाहीं.

दा०— तुमच्या इच्छेप्रमाणें सर्व पांडुरंग करील. आपण स्वस्थ वसून मार्गांतील श्रम दूर करावे ( जातात. ),

---

## प्र० ३ स्थळ—मागील.

( दामाजीपंत व त्यांची स्त्री सावित्रीबाई. )

दा०— हजारों जरी ह्या जगतांत आपले जिवलग ह्मणून मित्र असले तथापि प्रपंचांत स्त्रीसारखा दुसरा मित्र मिळणें नाहीं. स्त्रीचा स्नेह ज्यापेक्षां परमेश्वरानें जोडून दिला आहे, त्यापेक्षां तो विशेष आहे हें उघड आहे. स्त्रीपुरुषांमध्यें जें निष्कपट प्रेम असतें त्याचें वर्णन करणें कठिण आहे. अशीं स्त्रीपुरुषें देहांनींच काय तीं भिन्न; पण मनांनीं एकच. त्यांपैकीं जर एकाला सुख किंवा दुःख झालें तर तें दुसऱ्याच्या मुखावर केव्हांच प्रतिबिंबित व्हावयाचें. ज्याची स्त्री भर्त्याचे मनाप्रमाणें वागणारी, पतिव्रता, शहाणी तोच पुरुष ह्या लोकीं सुखी व पुण्यवान् होय ! अशा स्त्रि

येला सुखदुःखाच्या गोष्टी सांगून आपलें सुखदुःख केव्हां वाढवीन अथवा कमी करीन असें होतें. असो; अग हे पतिव्रते, आजपर्यंत कधीं न आलेलें असें संकट मला प्राप्त झालें आहे, तें तुला सांगण्याकरितां मुद्दाम येथें आलों आहें.

सा०– आपणाला पहातांक्षणींच आपल्या मुखचर्येवरून तें मला समजलें; व काय संकट आहे हेंही मला तेव्हांच कळून आलें. बाहेर ब्राह्मणवगैरे मंडळी धान्यासाठीं आली आहे. वेळ मोठी कठिण तर खरी.

दा०– अगे, त्यांना बाहेर बसवून तुमच्या इच्छेप्रमाणें सर्व होईल ह्मणून मीं सांगितलें आहे. तर हें आतां माझ्या हातून काम कसें होणार ? घरांत धान्य आहे पण तें फार थोडें असेल ! इतके लोकांस घरीं न्यावयास पुरणार नाहीं. काय करूं, कांहीं सुचत नाहीं. माझी मति अगदीं गुंग झाली आहे. आजपर्यंत याचकांस मीं कधींही परत पाठविलें नाहीं. आणि आजच कसा हा प्रसंग आला ! अग, सांग कांहीं तरी युक्ति, कीं जिच्या योगानें हा संकटपर्वत सहज उल्लंघून जाईन. अनेकप्रसंगीं स्त्रियांनीं आपल्या युक्तिचातुर्यांनीं स्वपतीस संकटांतून मुक्त केलें आहे.

सा०– मीं आपल्याला काय युक्ति सांगावी ? आह्मां बायकांना काय कळतें. कोठें धान्य असेल तर हे माझे अंगावरील दागिने घेऊन तें आणण्याचें करावें. आणखी काय तरें मी अधिक सांगूं ?

दा०– तुझे दागिने ते किती !! त्यांनीं होणार काय ? वीस पायलींची धारण आज एक पायलीवर येऊन बसली आहे. तरी धान्य आहे कोठें ? बाहेर लोक पुष्कळच आहेत. धान्य द्यावयास लागलों कीं हजारों मनुष्य येथें जमेल.

तुझ्या ह्या एवढ्या दागिन्यांनीं काय होणार ?

सा०— जेवढें धान्य येईल तेवढेंच द्यावें. दुसरा काय उपाय ? बुद्धिदाता, संकटनिवारणकर्ता आह्मांस त्या पांडुरंगाशिवाय कोण आहे ?

दा०— अगे, शरणागताचें दुःख दूर करणारा, मला विठ्लाशिवाय कोणी नाहीं, हें मी जाणतों. त्याणें आजपर्यंत भक्तांसाठीं अनेक खेळ केले आहेत. तो परम कृपाळू आहे. जो त्यास भक्ति, श्रद्धा आणि भाव ह्यांहीं भजतो, त्याचीं कार्यें तो स्वतः अंगें करितो. त्याचें वात्सल्य काय सांगावें ? हे विठ्ला, पंढरीनाथा, माझी सध्या काय अवस्था झाली आहे, मजवर कसें संकट आलें आहे, हें, हे सर्वज्ञा, तूं सर्व जाणतच आहेस. ह्या वेळेस तूंच मला आधार आहेस, तुजवांचून कोणाला हांक मारूं. माझे सहस्रशः जरी अपराध असले तरी ह्यावेळेस त्यांची क्षमा करून सत्वहरण होत आहे तें होऊं देऊं नको. तुझी भक्ति कशी करावी ह्याविषयीं मी सर्वथैव अज्ञ आहें, अर्थात् मी महान् पापी आहें. तरी, हे दयाळा, मला ठाऊक आहे कीं, जो लीन होऊन तुला शरण आला, त्याचें पापकर्मादि नपहातां त्याचें रक्षणच करितोस ! तुझें मानसिक स्मरण करून लोकांना बाहेर बसा ह्मणून सांगितलें आहे. त्यांना बसून प्रहर एक होत आला ! तुझ्या अनुग्रहावांचून ते कितीही प्रहर बसले तरी त्यांची इच्छा माझे हातून पूर्ण होणार नाहीं हें काय सांगावें ? अग, बाहेर ते केवढा वेळ बसतील? घरांत त्यांच्या जेवणाची तयारी लौकर कर आणखी आपले हे सर्व दागिने मजजवळ दे, ह्मणजे त्यांचें धान्य आणण्याची तजवीज करितों.

झा०— बहुतेक घरांत तयारी झालीच असेल. मी तिकडे जा-ण्येच हे घ्यावे माझे दागिने. ( काढून देते, त्यांजकडे पाहून ) आज इतकीं वर्षें तुझांस अंगावर वाळगिले, याचें आज खरें सार्थक झालें. कोणतीही वस्तु अशासाठींच वाळगावयाची कीं तिचा योग्य वेळीं उपयोग व्हावा. हे दागिने सत्कर्मी लागणार हें पाहून मला मोठा आनंद होत आहे.

दा०— ( स्तब्ध राहून जरा वेळानें ) हे घे आपले दागिने. ते नकोत मला. ह्यांस धान्य कोठलें द्यावें, ह्याविषयीं चिंता लागून मन केवढा वेळ अगदीं गोंधळून गेलें होतें, कांहीं च सुचेनासें झालें होतें. परंतु मनांत एक प्रेरणा उद्भवली आहे. ती व्यवहारदृष्ट्या मात्र काय ती भयंकर, अनीती-ची व अन्यायाची आहे ह्मणून ती तुला सांगून तुझ्या ह्या नाजुक अंत:करणास दुखवावें अशी माझी इच्छा नाहीं. ह्याप्रमाणेंच केल्यास ह्या महत्संकटांतून पार पडेन. नाहीं-पेक्षां दुसरा कांहीं उपाय दिसत नाहीं !

सा०— आपल्यापासून भयंकर प्रेरणा कशी निघेल ? चं-द्रभागेचा पाट काढून आणला तर त्याचें पाणी खारट निघेल काय ? काय मनांत आलें आहे तें मला सांगित-लेंच पाहिजे. मघाशींच आपण ह्मणायाचें झालें होतेंना का स्त्रीला सुखदु:खाच्या गोष्टी केव्हां सांगेनसें होतें ? मग आतां असें कां बरें ?

दा०— खरोखरच मीं सांगितलें तशा प्रकारचें तें मोठें साहस आहे ! परंतु ह्या दुष्काळांत लोकांचे जे विलक्षण हाल होत आहेत ते पाहून व ऐकून माझें हृदय अगदीं वितळून जात आहे ! लोकांचे प्राण ज्या रीतीनें वांचतील त्या रीती-

नें वांचवावे हाच माझा सर्वस्वी सध्या नेम आहे. तो सिद्धीस नेण्याकरितां मी कर्तव्याकर्तव्य कांहींच समजत नाहीं. मी आतां अगदीं अंध व बधिर झालों आहे. मला पुढील काळ तर कांहीं दिसत नाहीं; मग त्या काळांत होणाऱ्या माझ्या अपकीर्तिची मीं कां ह्मणून परवा करावी ? माझ्या परोक्ष कांहींही लोक मला ह्मणोत. पंढरीराया, आजपर्यंत मी याचकास कधींही नकाराचा शब्द बोललों नाहीं. हा दुर्भिक्षकाळ माझें सत्व पाहण्यासाठींच आणलास काय ? सत्संकल्पाचा दाता व पूर्णकर्ता तूंच आहेस. याचकांस देणें हा सत्संकल्प नव्हे काय ? देवा, हा संकल्प सिद्धीस न्यावयाला माझ्या मनांत आलेलेंच कस करावयास नको काय ! ह्मणून मीं जें कांहीं करावयाचें मनांत आणिलें आहे तें सर्वथैव तुला मान्य आहे असें होतें. मान्य होणार नाहीं तर तुला सत्संकल्पाचा दाता व पूर्णकर्ता कोण ह्मणेल ? श्रीयाळराजानें सत्वहरण होऊं नये ह्मणून पुत्र मारिला ! पण तो त्याचा होता, दुसऱ्याचा नव्हता. नळराजा व दमयंती यांनीं स्वतः दुःखें सोशिलीं ! शिबीराजानें आपल्या आंगचें मांस दिलें ! हरिश्चंद्रानें आपल्याला विकून घेतलें ! शुक्राचार्यांनीं रंभेला न भुलतां आपलींच इंद्रियें स्वाधीन ठेविलीं. इत्यादि अनेक साधुपुरुष, वज्रप्राय कठिण प्रसंगांतून दृढनिश्चयानें पार पडून, लोकांत अक्षय्य शुभ्र यश ठेवून गेले. सध्या मजवर आलेलें संकट मजसारख्या यःकश्चित् मनुष्यास ह्या दुष्काळांत मोठें दुस्तर आहे. माझे शरीरास मोठे क्लेश होऊन संकट दूर होण्याजोगें असतें तर मला कांहींच वाटलें नसतें. परंतु मनांत काय आलें आहे कीं, बादशाहाचीं

पेवें भरलीं आहेत तीं लोकांना खुलीं करून द्यावीं, ह्मणजे कोणालाही दुष्काळ वाटणार नाहीं. ( मनांत ) अरे, पण ही जवळ उभी आहे. मला देहभान नाहींसें झालें ! आतां ही काय ह्मणेल नकळे ! ( उघड ) मला ह्यावेळीं पाप नकळे, पुण्य नकळे, लौकिक माहित नाहीं. मी राजसत्ताही कांहींच जाणत नाहीं. तो माझें कांहीं करो. मी वेड्याप्रमाणें अगदीं झालें आहे.

।१०– आपला मानस मला आतां कळला ! बादशाहा काय करील, याचा नेम नाहीं. अगबाई, मला भय वाटतें ! आधींच मुजुमदार आमचे केव्हां कमी पडेल ह्मणून वाट पहात आहे, तशांत आपण हें कृत्य करणार, मग काय विचारतां? मला कांपरें सुटलें आहे! येवढें कृत्यमात्र आपण करूं नये. मी आपल्या पायां पडतें. माझें ऐवढें ऐकावें. नकाहो, नका, मला काळजींत ठेऊं. घरदार दागिने सर्व विकून जो पैसा येईल तेवढ्याचेंच धान्य वांटावें, त्याचे पेवांस बोट सुद्धां लावूं नका !

।१०– ( सुस्कारा टाकून ) पाहिलेंस, ह्याचसाठीं मी तुला सांगणार नव्हतों. परंतु तोंडांतुन निघालें. तूं मला आतां कांहीं सांगूं नको. मी कोणाचें ऐकणार नाहीं. मला सर्व समजतें.

।१०– देवा, कायरे तरी करूं आतां ! कशी त्यांना बुद्धि दिलीस ही ! मला बादशाहाचें भय वाटतें, ( रडावयास लागते. ) देवा !

।१०– अगे रडायाला काय झालें? उगी, रडूं नको, लोकांनीं बाहेर ऐकिलें ह्मणजे ते काय बरें म्हणतील ? बादशाहाची इतकी भीतिशीं तुला कां वाटते ! प्राण घेण्या पलिकडे तो काय शिक्षा करणार आहे ! हजारों लोकांचे प्राण, माझे ए-

कन्याचेच प्राण जाऊन जर रहात आहेत, तर ह्यापेक्षां जन्मास येऊन आणखी काय मिळवावयाचें आहे ? जा, आतां उशीर झाला. अन्नाची तयारी झाली असेल. तुजवांचून त्यानां कोण तृप्त करणार आहे ! तूं चल पुढें, मी हा येतोंच पाठीमागून. जा, विठोबास सर्वांची काळजी आहे. कांहीं भिऊं नकोस.

सा० – मी आतां ह्या:पुढें काय बोलूं. मी आपल्यास आतां कधीं सोडणार नाहीं. आपल्यास बादशाहाच्या कोठारांकडे जाऊंच देणार नाहीं. ( पडद्यांत गडबड होते. )

दा०—अगं, उशीर झाला ह्मणून लोक इकडे येत आहेत वाटतें. जा तर आंत लौकर.

सा० – आपली आज्ञा. पण नका हो तसें करूं. ह्याचा चांगला विचार करा. ( जाते. )

दा० – ( आपल्याशीं ) तिणें जरी मला हें कृत्य न करण्याविषयीं माझी पुष्कळ विनवणी केली, तरी मला ह्मणजे तें करूं नये असें मुळींच वाटत नाहीं. उलटें, तिचा हा उपदेश मला त्वरा करण्यासच जणूं सांगतो, असें वाटतें. हा मनोदय आपल्या उपाध्येबोवांस सांगावा काय ? त्यांना तरी कशाला सांगा ? आवडेल न आवडेल. माझा हा निश्चय आतां, कोणी कांहीं सांगो फिरणें नाहीं. हा निश्चय माझ्या हृदयरूपी तांब्रपटावर आतां मीं खोदलाच. हा नरजन्म केवळ आपलेंच पोट जाळण्यासाठीं केला आहे असें नाहीं, तर परोपकारार्थ आहे. आतां ह्या विषयीं मी जास्त कांहींच विचार करीत नाहीं, मनांत आलेलें कृत्य करण्याच्या उद्योगास लागतों, मग काय होणें असेल तें होईल. ईश्वरेच्छा. ( जातो. )

## प्र० ४. स्थळ– एका कारकुनाचें घर.

( चिंतोपंत, कृष्णाजीपंत व रामभाऊ. )

चिं०– कृष्णाजीपंत, कालपासून येथें काय प्रकार चालला आहे तो पहात आहांना ? काय दादासाहेबांनीं आरंभिलें आहे हें ! ह्या दातृत्वाला ह्मणावें तरी काय ? आतां एकूण कळस झाला ! हें पाहून आपण फारच दिलगीर आहों. ह्याचा पुढें परिणाम तरी काय होणार ?

कृ०– सरकारी कोठारें बेधडक लोकांच्या सांगण्यावरून पंतांनीं लुटावयास त्यांस सांगितलें असल्यास ही मोठी त्यांची चूक आहे. ह्यावेळीं कशी त्यांची बुद्धि चकली कोण जाणे. ह्यापासून खचित मोठा अनर्थ होणार ! इतकीं वर्षें इमानानें चाकरी करून शेवटीं ह्या लोकांसाठीं नाहक त्यांचे आचरणास काळिमा आला !

रा०– दादासाहेबांनीं हें मोठें भयंकर कृत्य केलें, हें कोणीही सांगेल ! आपण सर्व मंडळी एक दिलाचे असतों कीं नाहीं ह्मणजे कांहींही झालें नसतें. तिकडे कशानें मग दाद लागते ! पण ते काळेबुवा आहेतना ! ते लागले असतील आतां एका पायावर नाचायाला ! दादासाहेबांच्या ह्या कृत्यानें आह्मा सर्वांला खालीं पहावें लागणार ! बादशाहाकडे आह्मां सर्वांविषयीं नालस्ती करण्यास त्यास हें योग्य कारण झालें. चिंतोपंत, पुढें आतां काय करावें, काय मसलत योजावी, हें आपण सांगावें. आपण सुज्ञ अहां. आपणावर हा मोठा प्रसंग खरा !

चिं०– पंतांनीं असें कृत्य न करावें हें नीतिदृष्ट्या योग्यच,

परंतु ते तरी काय करितात ! त्यांचें कोमलांतःकरण, या चकांच्या अति दीन शब्दांनीं फारच द्रवलें असेल ! ते व्हां त्यांणीं सांगितलें असेल कीं ह्या विठ्ठलाचें नांव आणि तें विठ्ठलाचेंच धान्य आहे असें समजून न्या पाहिजे तेवढें. काय चमत्कार हा ! लोकोपकार करण्याचे कामांत सत्पुरुष कर्तव्याकर्तव्य कांहींच जाणत नाहींत ! ! हजारों लो कांचे प्राण वांचविण्याच्या पंताच्या ह्या कृतीस अपराध तरी कसा ह्मणावा ! आतां झालें तें झालें त्या विषयीं शास्त्रार्थ सांगत बसणें व्यर्थ आहे. पुढें काय करावयाचें ह्याविषयीं मात्र विचार केला पाहिजे.

कृ०— बरें पण चिंतोपंत, अगोदर त्यांणीं उपाध्येत्रोवांस तरी ह्या विषयीं कांहीं तरी विचारिलें होतें काय ?

चिं०— ह्याविषयीं अगोदर ते कोणाजवळ बोलले असतील असें मला वाटत नाहीं, उपाध्येत्रोवांस ते विचारते तर असें कधीं झालेंच नसतें.

रा०— किती कोठारें लुटलीं हें कोणाला बरोबर माहीत आहे काय ?

कृ०— मी नुकताच तिकडून आलों; पंढरीस आषाढीकार्तिकीस जशी यात्रा भरते तशी तेथें गर्दी दिसली, तेव्हां किती लुटलीं वगैरे तें काहींच मला समजलें नाहीं. मी मग तसाच इकडे आलों. काय तिकडे गोंधळ व मारामारी चालली असेल !

रा०— तो मुजुमदार तर हें सर्व वर्तमान बादशाहास कळवील ह्यांत संशयनाहीं. त्याची आह्मीं किती विनवणी केली, पायां पडलों तरी तो सोडणार नाहीं. त्याचें हृदय मांगाच्या हृदयाहून कठिण आहे. दादासाहेब कधीं गुन्ह्यांत सांपडतील ह्मणून हा किती वर्षें आज टपत बसला आहे. तेव्हां

ही संधि तो कशी फुकट दवडील ?

कृ०— किती धान्य लुटलें वगैरे आपणांस कांहींच माहीत नाहीं, अजून ही अशी लुटालुट किती दिवस चालणार हेंही समजत नाहीं, तेव्हां आतांच ह्या विषयीं आपण तिघेच होऊन कोणत्याही प्रकारची मसलत योजणें किंवा वाटाघाट करणें बराबर नाहीं. दादासाहेब उपाध्येबोवा यांचे संमतीनेंच काय तें केलें पाहिजे. तेव्हां थोडक्याच दिवसांत ह्या विषयीं सर्वानुमतें कायतें करावें ! ह्या वेळेस त्याचा विचार करणें व्यर्थ आहे तुह्मी भितां कां ? पृथ्वीवर काय तो शाहणा एक मुजुमदारच ! आह्मी काय हातांत अगदीं बांगड्याच भरल्या आहेत ! धान्य कोणीं नेलें? बादशाहाचेच प्रजेनेंना! चला आतां. आपण दादासाहेबांकडेस जाऊं.

चिं०— कृष्णाजीपंत, आपण फारच योग्य बोललां. ह्या वेळेस त्याविषयीं विचार करणें रास्त नाहीं हें खरें. चला तर.

रा०— अहो, मुळीं आपण असेंच वेदरास कळवावें कीं दुष्काळामुळें क्षुधेनें अगदीं पीडित झालेले असे अतोनात लोक येथें आले. व त्यांणींच होऊन कोठारें फोडलीं, व लुटलीं. आमचा त्यांच्या पुढें कांहींच उपाय चालेना. मुजुमदार कांहीं कां लिहीना ?

चिं०— अहो तें खरें, पण दादा साहेब, प्राण गेला तरी कधीं असें खोटें लिहितील काय ?

कृ०— याची पण ह्या वेळेस कशाला वाटाघाट ? चला आपण तिकडेसच जाऊं. ( सर्व जातात. )

## प्र० ५. स्थळ—मंगळवेढें, मुजुमदाराचा वाडा.

( मुजुमदार व गणपतराव. )

मुजुमदार — गणपतराव, पहा, कोणतेंही एकादें आपलें, काम सिद्धीस जावें ह्मणून आपण आपल्या बुद्धीप्रमाणें हजारों यत्न करावे, परंतु परमेश्वराच्या कृपेवाचून ते सर्व व्यर्थ होतात. आजचा दिवस मोठा आनंदाचा खरा; असा दिवस यावा ह्मणून मी काय काय प्रयास करीत होतों ते माझे मलाच ठाऊक. आज आलें देवाजीच्या मनांत मला संतुष्ट करण्याचें! एका फळाचा तरी लाभ व्हावा ह्मणून एकाद्या मनुष्यानें आम्रवृक्षावर खांदे दुखत तोंपर्यंत दगड मारमार मारावे, आणि शेवटीं निराश होऊन श्रम दूर होण्याकरितां कांहीं वेळ त्याच्याच दाट छायेखालीं बसावें; तों इतक्यांत वारा सुटून हजारों पक्क फळांची जशी त्याचे पुढें वृष्टि व्हावी, त्याप्रमाणें आज मला लाभ झाला आहे. किंवा एकाद्या निराश झालेल्या वृद्ध श्रीमान गृहस्थास पुत्रप्राप्ति झाल्यानें त्यास जसा आनंद होतो त्यापेक्षां, मला ह्यावेळीं, शतपट आनंद झाला आहे. अथवा फार काय सांगूं! आजच्या लाभाला व आनंदाला उपमाच नाहीं.

गणपतराव — ह्या दुष्काळांत प्राणहानी अधिक झाले आहेत, अशी लोकांची स्थिति असून तुह्मांलाच एवढा मोठा आनंद कशाचा झाला?

मु०— अहो, तुमच्या लक्षांत कांहींच कारण येत नाहीं?

ग०— नाहीं ह्मणायाला काल पासून हजारों भिकारी येथून धान्य घेऊन जात आहेत. दामाजीनें पेवें अगदीं मोकळीं

करून ठेविली आहेत ! हवें त्याणें त्यांतून धान्य न्यावें अ-
सें ह्मणतात. ह्या मुळेंच आपल्याला आनंद झाला आहे
असें वाटतें.

१०– दुष्काळ विचारा पडेना ! आह्माला लोकांशीं काय
करावयाचें ! दोन वर्षें जरी दुष्काळ पडला तरी मी डग-
मगावयाचा नाहीं. दोन तीन वर्षांची वेगमी आज माझ्या
घरांत आहे.

१०– ( मनांत ) अजून फळ काय ! सुकाळांतही भुकेनें
ज्याचा कंठ शुष्क झाला असून पुढें पाऊल सुद्धां टा-
कण्यास शक्ति नाहीं असा मनुष्य उभ्या दोनप्रहरीं घास-
भर अन्नासाठीं दारीं आला असतां, त्याला मिळणें कठि-
ण, मग ह्या वेळेस तर काय विचारता ! ( उघडपणें )
आपलें दैवच तसें आहे कीं, ह्या ऐन दुष्काळांतही समृ-
द्धिदेवि आपली सेवा करीत आहे. पण अजून आनंदा-
चें कारण कांहींच माझे लक्षांत येत नाहीं हें कसें ! तर
आतां तें सांगाच कारण, तुह्मांस आनंद झाला तो मला-
च असें मी समजतों

० - अहो, दामाजीनें सरकारी धान्याचीं पेवें फोडवून य-
थेच्छ लोकांकडून तो धान्य लुटवीत आहे ! त्याचे बापाचा
माल वाटतें !

० - मग मीं तें मघाशींच सांगितलें तुह्मांला. त्याला आज्ञा
असेल तसा बादशाहाकडून हुकूम. त्याचें आज दरबारांत
वजनच तसें आहे. ह्याच्याकडूनही अगोदर ह्यासंबंधी कां-
हीं लिहून गेलेंच होतें.

१० – काय वजन वजन घेऊन बसलां हो तुह्मीं, गणपतराव! अ-
सा कोण तो बादशाहाचा लागून गेला आहे ! असा त्याचा

भलताच मोठेपणा सांगून माझा कोपाग्नि पेटवूं नका
नाहीं नाहीं, गणपतराव, मी चुकलों; तुह्मीं असेंच बोला
ह्मणजे मला जें पुढें कर्तव्य आहे तें करण्यास अधिक उमेद
येईल. अशा वेळीं उत्तेजन देणें हें खऱ्या मित्राचें काम
होय ! तुह्मीं ह्मणतां तसा बादशाहाकडून कधींतरी हुकूम
येईल काय ? निर्दय, लोभी मनुष्याचे हातून असें कृत्य क-
धीं होणार नाहीं.

०– ( मनांत ) अरेरे ! ह्या दुष्ट मनुष्याच्या नादीं लागून
बिचाऱ्या दामाजीशीं मला वैर करावें लागलें. लोभाला गुंत-
लों, काय करावें ! तें कांहींही मनांत आलें तरी आतां उ-
पयोगी नाहीं. आतां तर ह्याच्याच तंत्रानें वागलें पाहिजे
कारण आपला कार्यभाग होणें तो आतांच. ( उघड ) त
र काय ह्मणतां, दामाजीनें आपणच होऊन तीं फोडविलीं

०– ह्यांत काय संशय! काय बेइमान हे. साधुना हे ! मुसळा-
ला कदाचित् कांहीं कैतीनें पल्लव फुटतील, परंतु बादशा
हास कधीं दया यावयाची नाहीं ! उलटा यावेळेस तिकडून
असा हुकुम यावयाचा कीं, ह्या दुष्काळांत धान्य खबरदा
रीनें विकून चांगला पैसा उत्पन्न करावा. व तिकडे दाबड तो
रवाना करावा. बादशाहाच वाईट असेल असें ह्मणतां येत
नाहीं ! पण हाताखालची मंडळी आहेना हिंदुलोकांचें हि
इच्छिणारी !!

०– हे कसचे राजे हो, प्रजेला केवळ हे जनावरें समजतात
त्यांची थैली भरली ह्मणजे झालें. प्रजा मरेना ! त्यांचें का
य गेलें ! हर हर ! ज्या राज्यांत प्रजेस अतिशय दुःख त
राज्यें रसातळास गेलींच असें समजावें.

०– तें असो; बोलणें भलतिकडेच पाहलें. असें हें साहस

कृत्य दामाजीनें तिकडे कोणास विचारपूस न करितां केलें, हें बादशास कळविलें पाहिजे, ह्मणजे दामाजीपंत जो एवढा चढला आहे त्याची बादशाहाचे हातून काय दशा होईल हें सांगवत नाहीं. व आपली त्याचे दरबारांत मानमान्यता होऊन इकडचें सर्व आपले स्वाधीन होईल.

ग०— वा:! आपली मसलत फार उत्तम आहे. आपण तर किती वर्षे दामाजीपंताचें बादशाहाकडे वजन कमी करण्या करितां यत्न करीत आहों, परंतु कांहीं कारण मिळेना. दामाजीनें हें मोठें भयंकर कृत्य केलें!

मु०— तेव्हां अशा अपराधास शिक्षा होणें हें रास्तच आहे. दामाजी, माझ्या तडाख्यांत भला सांपडलास!

ग०— शिक्षेचें आपण कशाला बोला? आपण ज्यापेक्षां त्याचे हाताखालीं आहों, त्यापेक्षां आपले वरीष्ठानें केलेला अपराध बादशाहास कळविणें हें न्याययुक्त आहे. इतकेंच आपण तोंडानें बोलावें. अहो पण मुजुमदार, त्या धान्याचें मोल तो बादशाहाकडे पाठविणार असला तर.

मु०— तुह्मीं तरी मोटे शहाणे दिसतां; एवढी रक्कम पाठविणें ह्मणजे खाण्याचीं कामें नव्हत!

ग०— एवढी ती केवढी दोन महीन्यांनीं, तीन महिन्यांनीं किंवा पुढच्यावर्षीं पाठवील, व ह्याविषयीं अगोदर तिकडे सविस्तर तो लिहील.

मु०—ह्यावेळपर्यंत दोन मोठीं पेवें लुटविलीं असें ऐकितों. त्यांत साडेतीनशें दुणें सातशें खंडी इतकें धान्य असलेंच पाहिजे. सध्या धारण पायलीचीच धरली तरी, खंडीच्या पायल्या दोनशें चाळीस, तेव्हां इतकेच रुपये एका खंडीचे होतात. जर एक खंडीला दोनशें चाळीस, तर सात-

शें खंडींचे रुपये एक लाख अडसष्ट हजार होतात. इतके रुपये दामाजी कोठून आणणार ? अरे दामाजीपंता, एवढी रकम बादशाहा ऐकून बहुधा तो तुझा प्राणच घेईल ! अथवा त्यानें कां न घ्यावा ? ह्याचें हें कृत्यच हरामखोरीचें आहे. मला तुझ्याविषयीं दया यावा, मुळींच यावयाची नाहीं ! मला बादशीहास कळविलेंच पाहिजे, नाहीं तर तुझ्या बरोबर मला शिक्षा होणार ! मला तुझा साहाय्यकर्ता आहे असें तो समजेल.

ग०— मला असें वाटतें कीं पंधरा दिवसपर्यंत आपण ह्याविषयीं कांहीं हाल चाल करूं नये. तोंपर्यंत कसें काय होतें तें मुकाट्यानें पहावें.

मु०— मी तर महिनाभर हा कसा काय चमत्कार होतो तो पहाणार.

ग०— मग ह्या गणपतरावावर मात्र ह्या वेळेस आहे अशी कृपा असावी, ह्मणजे झालें.

मु०— मग काय जास्त होणार ? आपण स्नेही जन्माचे आहों. पेवें किती लुटविलीं, ह्याविषयीं खरी हकीकत मिळण्या करितां चला तिकडे जाऊं व डोळ्यांनीं पाहूं.

( जातात. )

## अंक ५.

### प्र० १. स्थळ –बेदरयेथील पातषाहाचा दरबार.

(पातषाहा, वजीर, काजी, मुतसद्दी व इतर नौकरलोकवगैरे.)

चोपदार– रोषनूनिघाल्बरू, रोषनूनिघाल्बरू, जनाबे सुलतान साहेबकी मद्दोआ हासिल होवें, पायेतख्त सलतनत् कायम रहें, और हुजूरके दुषमनोंका पायमाल होवें.

(मुजरे वगैरे झाल्यानंतर,)

वजीर –गरीबपरवर, आज हुजूरको दरबारमें आनेकेलिये तजादियां दिई, इसलिये माफी मांगके बंदा ये अर्ज करता- है के चंदरोजके नीछे एक ऐसा अर्ज अयाहि के मंगल- बेढेका जो ठानेदार दामाजीपंत कहेनेहारा एक बम्मन है, उसने आपने तमाम हिंदुलोगोंकेलिये हुजूरके कोठारें सब फोडके तमाम अनाज लुटवादिया, और सदहू अर्जमें ऐसा खुलासा लिखाहै के अनाज लुटवानेका सबब पूछो तो इस जिल्हेमें बारिष न गिरनेके सबबसे महेंगाईसे तमाम लोग हैरानो परेषान होनेलगे. जबके हम यहांके ठाने- दार कहेलातेहैं तो रइयतकी अच्छीतौरसे बरदाष्ती करना- हमे लाजमहै, गर्चे इसमें कुछ मेरी तकसीर होतो सजा पाने- केलिये गुन्हेगारहुं, ऐसा इस अर्जमें लिखाहै, और अर्ज लिखनेहारा अक्सर करके उसी ठानेदारके तैनातीमें नौक रीकरताहै. सदहू अर्जमें अव्वलसे आखोरषतक जो कु- छ मजकूरहै सो सब बराबर है, इसमें कुछ षक नहीं, अब ऐसे गुन्हेगारीके लिये क्या सजाहोना सो मालिक्के तर- फसे हूकूम होना चाहिये.

पातषाहा – ( रागाऊन. ) अरे ऐसा कोन बदमाषहै के इस मुल्कमें लूटलाटकरें, और लोगोंको सतावें, बडी अजायबकीबातहै ! खैर, अब उसके अर्जपरसे युं साबित होताहै के हजारों कोठारोंको फोडके लुटवादिया, और इसीमाफिक् आजरोजतक उसने बहोत दंगामचा आपना मतलब हासिलकरके आखरिषको ऐसा अर्ज लिखभेजाहै ? आगर्च उसमें मतलब पूछो तो महेंगाईका सबब लिखताहै देखो, क्या बेवकूफहै ! अरे महेंगाई हुई, और तमाम लोग बरबाद होतेहैं, ऐसातो मै कभी नहीं सुना; बरबादी कहां है ? खैर इसके लिये कुछ सला करना जरूर है. ( वजीरास. ) क्योंजी दीवानसाहेब, अपने मुल्कमें बारिष बगैरा बरसके रइयतको इजा न होते उनके परवर्षीके लिये अच्छीतौरसे बंदोबस्ती तो करतेहोना ?

व० – खुदाबंद दामेमुल्कहू, इस कमतरीनको ये क्या पूछतेहो ? आपके कदमके तुफेलसे इस मुल्कमें जिधर देखो उधर आबादानी और खुषीकी षादियाने बजतेहैं, व वख्तपर बारिष गिरके लोगोंका दिलखुषी ओ खुरेमीसे रखताहै. सच पूछे तो हुजूरके कारवाईमें तमाम लोग एषोआरामसे रहेके आपकेलिये खुदाकेनस्दीक दुआभी मांगतेहैं, मै समझताहुं के इस षहेरके लोग जैसे खुषीसे रहतेहैं वैसा और दूसरे पातषाहतमें नहोंगे इसमें कुछ नहीं, मुफालसी याने बिलकुल न रही.

पा० – क्योंजी काजीसाहेब. इस सालमें बारिष वगैरा, कैसा गिरा ? खुद मै समझताहूंके बहोत अच्छा बरसा होगा.

का० – ( मनांत ) इस सालमें बारिष बिलकुल नहींगिरा, और जिधर देखो उधर अनाजका काल गिरा. ऐसा

हरवख्त मै सुंताहुं. ऐसा रहेके वजीर साहेब बोलतेहैं के चारो तरफ आबादानी है ? खैर, अब हमकोभी उन्होके माफिक कहेना जरूर है. ( उघड ) गरीबपरवर, ए सालमें गर्चे थोडा वारिष गिरा तोभी खेतोंकेलिये बहोत अच्छाथा, क्योंके हंगामोंके वख्तपर पानी बरसा, इस वास्ते महेंगाई वगैराके लिये दहेषत करना कुछ जरूर नहीं. ऐसा मुझको मालुम होताहे.

व. — खुदावंद दामेमुल्कहू, हाल आपने रियासतमें हिन्दूलोग बडे नाखुष रहेते हैं. देखो के हुजूरके तैनातीमें और दूसरे पातषाहतमें कहो तो आज सेकडों हिन्दू सर्दार नौकरियां करतेहैं, मगर खुद मै जानताहू के वे लोग हमपर कब टूटपडेंगे इसका कुछ भरोसा नहीं. इसवास्ते आपने मुल्कमेंसे या यहांसे सैरवदरकरें, ऐसा कैएकबार हुजूरके तैं जाहिर कियाथा, मगर मालिक बिल्कुल ख्यालमें नहीं लाये. देखो के, ए लोग इस मुल्कमें आके तैनातमें हमारे नौकरियां करके हमको इजा दिया चाहते हैं; सो उन्के लिये अच्छी तजवीज करना जरूर है. अव्वल इन् लोगोंको मुसीबतमें गिरफ्तार करें, इन्के दीनकी खराबी करें, और इन्के सब पोथियोंको जला देवें, और इन्के रूबरू गाईयोंको कटवावें, व देवलोंमेंके देवोंको फोडके उन्की बरबादी करें, ऐसा कियेबाद वे लोक रंजीदा होके यहांसे और दूसरेतरफ् निकलजावें, या मुसल्मीन होजावें. गर्चे मुसल्मानी दीनको कबूल करें तो बहोती अच्छाहोगा, क्यौं के वे नहीं तो उन्की आलऔलाद इस दीनको कबूल करेगी. फिर आपने रियासत्केलिये कुछ दहेषत न रही.

ग०— वा: क्या बात है ! हमारे दीवानसाहेबकी नजर दूरतकहै, गर्व दिवानसाहेबके सल्लाके माफिक हो तो अल्बत्ता मुसल्मानी दीनको कहो या रियासत्को, और दूसरे याने हिन्दूलोगोंसे डरना कुछ जरूर नहीं, लेकिन हुजूरके तरफुसे ये बन्दोबस्ती जल्दी होना चाहिये. क्या बहादरी हिन्दूलोगोंकी के हमारा निम्मक खाके हम्पर टूट पडने मागतेहै!!

ग०— हां सच्छ है, ऐसा करना जरूर है, ( डोळे लाल करून ) देखो, भक्तरकरके सब् हिन्दू लोग हमारे लिये दुष्मनीकी दावा और गीबत् करतेहोंगे इस्मे कुछ षकनहीं, मगर उसी हिन्दूलोगोंमें बम्मन् कहेने हारे एक उम्दा जात है, वो जात बडी बदमाष और उन्के दिल्में यहांतक् कीना है, के जिन्के तैनातमें वे रहेंगे तो उन्हीकी खराबी करनेकोलिये मुस्तईद होते हैं. यही अकलमंदीकी बात है. इसी मासलेका मंगलवेढेका ठानेदारहै, उस हरामखोरने आपने लोगोंको मदद करनेकोलिये तमाम कोठारें फोडके उसमेका अनाज लुटवादिया; और थोडे रोज रहेगा तो हमारीबी खराबी करें, इसमे कुछ षकनहीं. इस्वास्ते ए बम्मन्की जात आपने मुल्कमेंसे निकल्वादेना चाहिये. हाल कहो तो हमारे दरबारमें या इस षहेरके अतराफ् हमारे तैनातमें जोकोयी होंगे उन्में जो वडेबडे हुदेदारीपर बम्मन् लोग हैं, उन् सबके तैं कौन्सेभी तौरसे याहांसे दूर किया चाहिये; उन्के जायपर नये लोग रखना होतो दूसरोंको मुकर्रर करें. सच्छ कहो तो इन् हिन्दूलोगोंकी खराबी किये बगैर दूसरी इलाज नहीं.

व०— सच्छ है मालिक, आपका कहेना बहोत दुरुस्त है.

ख़िलफ़येल् उस् दामाजीपंतने जो कुछ गुन्हा किया है, उसके गुन्हेगारीके बाबतमें, जो कुछ नुक्सानी हुई सो हुजूरको रोषन है , इसवास्ते उस्को सजा देवें, या आजातकरें, फक्त इस्केलिये हुकुम होना जरूर है.

पा०— अछा, जो कुछ करनाहो सो हमारे काज़ीसाहेबसे पूछो तो वे कहेंगे, लेकिन अव्वल उस् बम्मन्ने सरकारी नुकसानी कित्नी की सो समझना जरूर है.

व०— खुदावंदबदौलत, इस अर्जमें लिखनेहारा मुतसद्दी यों जाहीर करताहै, के नुक्सानी कित्नी हुयी इस्के लिये खास मुकर्रर नहीं, तोभी इस् साल्के महेंगाईके सबबसे चार या पांचलाख रुपयेतक् नुकसानी हुयी होगी, ऐसा अंदाज होताहै. क्योंके मंगलबेढा और उस्के अतराफके दरमियान काल गिरनेके सबबसे लोगोंका बडा जोर ओ षोर हुवाथा.

पा०— अछा, ऐसे आदमीको और क्या करें ? उस्को वहां बगैर कत्ल करने शिवाय दुसरी क्या सजा देवें ? गर्चे ऐसा होतो वहांके लोग बडे दहेषत और हुषियारीसे रहेंगे, और उन्के तैं इस् रियासत्का कारोबार तमाम जाहिरभी होवेगा.

का०— जीहां मालिक, आपका कहेना दुरुस्त है, मगर अर्ज लिखनेहारा, और दामाजीपंत वे दोन्नो एक दिलहोके खर्च हुवासो पैसा खावें, ऐसा न करतेहुवे ए तमाम मज़कूर हुजूरमें लिख भेजनेका क्या सबब है ? सच कहोतो दामाजीपंतने सरकारके तैनातीमें चन्दरोज बडी इमानीसे आछि अछि कामें कीई हैं. जाहिरात में ऐसा सुन्ताहूं के वो बम्मन् बडा नेकबख्त और बुर्दबाजहै, उसमें मुजुमदार आपना मतलब हासिल करनेकेलिये दामाजीपंतका नाम

जाहिर नहीं किया, ऐसा क्योंकर न समझें? इसवास्ते जो कुछ उसके हक्कमें सजा मुकर्रर कीईहै सो वो सजा चाहिये-तो–

पा०– अजि हां काजीसाहेब, हमतो वोही सजा कायम किये हैं; मगर तुह्मारी क्या सला है.?

का० – मालिक इसमें मेरी ये सला है, के अव्वल उसको यहां पकडलावे, और उसकी बराबर इनसाफ करें, बाद दरियाफत के वो साबित गुन्हेगार ठैरा तो फिर जो कुछ हुजूर उसके लिये सजा मुकर्रर कीईहै, सो आमलमें लावे.

व०– सछ है, काजीसाहेबकी सला मुझकोभी पसंद आयी है. इसवास्ते अव्वल उस् दामाजीपंतको पकडलानेको अच्छे मजबूत और हुषियार जवानोंको भेजना चाहिये, और उसमें हरहमेषा उधर जानेहारा, और उसके पहेचानका, उसकी सब् खुबी पहेचाने एसे जुवामर्दको भेजो, के जिस्से आपना काम फत्ता होवे.

पा०– मेरा मतलब तुह्मारेको जाहिर कियाहुं. अब तुह्मारे दिलमें जैसा अछा बने उसमाफिक करो. ( असें ह्मणून निघून जातो. )

चोप०– रोषान्निघाल्बब्ब, रोषन्निघाल्बब्ब, हुजूरके दुष्मनोंका पायमाल होवें. दरबार बरखास्त.

व०– हां, क्यौन होवे, जिस्माफिक् हुजूरसे हुकूम हो उस्माफिख् बंदेकीभी तय्यारी है. खैर जिस जुवामर्दको वहां भेजके पकडलानेकी तारिफ् करतेंहै, सो वो जुवान यहां हाजिर है. आजि मीरसाहेबजान, कल बडी फजर खुद तुम् और पसंद आवे ऐसे पचास साठ जुवानोंको लेके इसी वख्त मंगलबेढेकी तय्यारी करो, वहां जाके उस् ठानेदार-

को कैद करके गलेमें उसके तौकूजंजीर पहेनाके यहां खींचलावें. और तुम् जाते वख्त हमारे कचेरीमें आवो तो उसको पकडनेकेवास्ते हुजूरका मोहोर सिक्का दिलवाताहूं, उस हुकूमके माफिक पकडनेके लिये उसे कभी कम नहिं करना, बाद उसको यहां लानेके इस दरबारमें तुह्मारी अच्छी तौरसे सरफराजी कीई जायगी.

का० - वाहवा क्या बातहै! दीवानगिरीके लायक हो, और उसी के सबबसे ये जाय आपको मुकर्रर कीई गई.

मीरसाहेबजान- मालिक, इतने रोज मैं फक्त खाविंदके हुकूमका इन्तेजारथा, इनूषाल्लाहोताला, मै इसी वख्त वहां जाके उस निमक हरामको पकड तौकूजंजीर पहेनाके यहां खींच लाताहुं इसमें कुछ षक नहीं. ( सलाम करून निघून जातो. )

ब०- क्योंजी मुनषीसाहेब, बिलफयेल यहां हुवासो चर्चा तुह्मारे तैं सबकुछ मालुम होगा, तोभी उस् ब्रम्हनको पकडनेकेलिये एक परवाना लिखो, के कल् बडीफजर मीरसाहेबजानको हुजूरे दस्कत् करदेना चाहिये के जिस्से उसके काममें खलल् न होवें.

मु०- जी हां, हुकूमके माफिक् अभी लिख् तय्यार करताहुं. अगर मर्जी होतो आप दस्कत कीजिये, या कल् बडीफजर हुजूरके दस्कतसे उस जुवामर्दको यहांसे जल्दी रवाना करें.

ब०- अछा, काजीसाहेब, दरबारमें काररवाई चलाने लायक कुछ मुकदमे तो नहींहै, इसलिये कचेरीभी बरखास्त करें.

चो०- रोषन्निघाल्बरू, रोषन्निघाल्बरू, पायतख्त सलतनत् कायम रहें, कचेरी बरखास्त ( पडदा पडतो. )

## प्र० २. स्थळ–मंगळवेढयाचे अलीकडे अर्धा कोश.

( चौघे जासूद येतात. )

**मिरसाहेबखान**– अजी गुलामहुसेन, अबतो हम मंगलवेढेके नस्दकि आन् पहोंचेहैं, बहोत होगा तो यहांसे आधाकोस, वो देखो किलेके बुर्ज नजर आतेहैं ! खैर, गुलामहुसेन, आपना काम बडे हुषियारीसे किया चाहिये; क्यौंके पचास साठ जुवानोंको बराबर लेनेकेलिये सरकारका हुकूम हुवाथा मगर हमारी जुवामर्दी दिखानेकेवास्ते हम् चारं असामी बस्सहैं, वख्तपर पहाडहो तोभी उसके टुकडे करडालें, फिर आपने बढतीके लिये कहोतो ये कामकेबाद हुजूरके नस्दीक मांगे, या अर्ज करनेकेलिये अपनेतैं हक्कहै.

**गुलामहुसेन**– आपके हुकूमके बमोजब जो काम कहो सो वो करनेकेलिये हम तय्यारहैं. इसमें उस बम्मनके वास्ते डरना ? क्या बात है ! अभी उस्को एक पलभरमें पकड लावेंगे, इसमें कुछ षकनहीं, बाद पकडनेके हुजूरके तरफसे आपका हुद्दाभी बढेगा. खैर, मिरजासाहेब बेदरसे मंगलवेढा कहोतो षुमार साठ सत्तर कोस होगा? और हमको वहांसे निकलके आजका पांजवा रोज, रस्तेकी मांदगीके सबबसे हम्तो साब बीमार होगयें, और दिनभी थोडारहाहैं, इसलिये आज यहांका मुकाम करें तो बहोत अछा होवेगा, थके मांदगीके सबबसे कुछ अमल पानीतो करें.

**हुसेनखान**– अजी तुह्मारातो हरवख्त यही रोना सुन्नेमेआताहै ! नाहाक टकटक करके मग्ज खाजातेहो ! हम यहां आये सो अंमलपानीकेलिये नहीं आये समझेहो ? अव्वल.

सरकारी काम तो होना चाहिये, खैर, मिरजा साहेबके कहेने माफिक बेदरसे मंगलवेढा साठ सत्तर कोस होगा, तोभी हम् जल्दी आन पौंचेहैं, अब इसवख्त दामाजीको पकडनेके लिये उसके घरमें जाना नामुनासिबहै, और हम् इस जायपर आये सो किसीको खबर न देतेहुवे आजके षबको कौंनसेभी जायपर मुक्काम करके उसके पकडनेकी मसलेहत करें, क्यौंके षाम होनेके सबबसे यहांसे आने जानेवालेभी नजर नहीं आते, इसवास्ते ये काम हाल तहकूब करो तो बहोत अछा होवे.

**षेकराहिमान**— वाहवा, बहोत अछी मसलेहत निकालिहो ! जब के दामाजीपंत सरकारीं गुन्हा करके नुकसानी कियाहै तो बगैर बंदोबस्तीसे रहेगा ? अलबत्ता वो हुषियारहै, इसलिये आज रातोरात यहां कहीभी मुक्काम करके कल वडीफजर बिछोनेंपरसे उठानहीं, उसीवख्त जाके उसको जेरबंद करें ऐसा मुझकोभी मालूम होताहै

**मीरसाहेबजान**— षाबास, षेकरहिमान्ने बहोत अछी मसलेहत निकालीहै, और सछ पूछो तो खुद मुझको जाना पडेगा, क्यौंके मंगलवेढेके कामोंके सरबराईकेलिये हरवख्त मैं यहां आया जाया करताहुं, उसीके सबबसे दामाजीकी और मेरी अछी पहेचान हुईहै. गर्चे उसको मेरे तरफसे चलकरके बोलुं तो झट घरसे बाहेर निकल आवेगा, और पकडनेके वख्तमें उसे कौंन मदद करनेवाला है ? ऐसे कामोंकेलिये कोई मदद नहीं करेगा. ये मुझको यकीनहै, खैर आज षुमार करके देखो तो दामाजीके माफिक हुषियार नौकर, उसके कामोकी निघेबानी, और भरोसेदार, अबतक् मेरे नजरमें नहीं आया, लेकिन गुन्हेगारीके लायक

आज उसने बडा तोहमतका काम किया. इनसानकी अक
कब बदलजायगी इसका कुछ भरोसा नहीं, अगर ये का
दुष्मनीके सबबसे या दूसरोंने उसके दगाबाजीके लि
तोहमतो नहीं उठायाहोगा ? अव्वल इसकी तहकीकात
लिये मुजूमदारके घर जाताहुं, उसकी तमाम गुफ्तगू निक
लके लेआताहुं, न जाने गर्व उसीने आपना मतलब हा
सिल करनेके लिये दामाजीपंतका नाम जाहिर कियाहो
क्यौं न समझे, अगर ये बात सछहै तो उसीको कैद करेंगे,
नहीं तो इस बलामें बिचारा दामाजीपंत मुफ्त माराजायेग

गुलामहुसेन — आप कहेतेहो सो सब रास्तहै मालिक, इसी माफि
क करना आपने तें लाजम है, और ए सला हमकोभी पसंद है
अब ऐसा करना हो तो कल बडीफजर उसके तरफ जाने
की ताय्यारी करें, और कोई एक आसामी यहां रहेके सामा
वगैराकी बंदोबस्ती रखें. ( सर्व निघून जातात. )

---

## प्र० ३. स्थळ—दामाजीपंतांचा वाडा.

( खिन्न झालेला दामाजीपंत येतो. )

दा०— ( आपल्याशीं ) माझें मन आज अगदीं उद्विग्न झा
लें आहे. कांहीं सुचत नाहीं. भ्रमिष्टासारखा झालों आ
हें. दहा घटिका रात्र झाली तरी अजून संध्या स्तोत्रपा
वगैरे कांहीं नित्यकर्म झालें नाहीं, भजनही होणें आहेच
अन्नावर तर वासना मुळींच नाहीं. दिवसास कचेरींत प
काम कांहीं झालें नाहीं. एकाद्याचा मृत्यु समीप आल
ह्मणजे त्यास पूर्वीं जशीं कांहीं दुश्चिन्हें व्हावींत त्याप्रमाणे

मजवर येणाऱ्या महत्संकटाचीं हीं लक्षणें दिसत आहेत, ह्यांत संशय नाहीं. काय अरिष्ट येणार आहे तें तो विठ्ठल-जाणे. कांहीं कां विचारें येईना! अणणारा तोच व नि-वारण करणाराही तोच, मला काय त्याचें. बादशाहाचें धान्य लुटविण्यास मी निमित्त झालों ह्मणून बादशाहा माझें पारिपत्य तर करीत नसेलना ? त्या गोष्टीला दीडएक म-हिना होत आला. काय ह्या देहाला भोक्तृत्व असेल तें तो भोगील. ( डोळे मिटून स्तब्ध बसतो व थोड्याच वेळानें, ) अरे ! उगाच निमिषमात्र डोळे मिटले तों काय तरी च-मत्कार पुढें दिसला हा ! बादशाहाचे तीन मनुष्य मला स्पर्श करून " चलो अभी चलो ! " असें ह्मणून मला ओढीत होते ! डोळे उघडले तों कांहीं नाहीं ! ह्या शरी-राची मला भावी स्थिति आतां कळून आली. मला बादशाहा पकडून नेणार खरा! तर आतां आपण तयारींत असलें पाहिजे. हें सर्व वर्तमान त्या मुजुमदारानें कळविलें असेल ह्यांत संशय नाहीं. ह्यांत त्याचा कांहींच अपराध नाहीं. त्यानें योग्यच केलें. मीं मात्र ही खबर बादशाहास कळ-विली नाहीं, हा मोठा गुन्हा केला. अथवा गुन्हा केला असें मला वाटतच नाहीं मग काय कळवावें ? आतां त्या-विषयीं दुःख करणें व्यर्थ आहे. पंढरीनाथास अनन्य भावें शरण गेलें ह्मणजे तो कधींही उपेक्षा करीत नाहीं. तर आतां सर्व नित्य नैमित्तिक आटपून त्याचेंच भजन करावें.

( जातो. )

( नंतर तिघे जासूद येतात. )

**मीर साहेबखान**—षेकरहिमान, दामाजीपंतका मकान ५.. होगा, लेकिन दरवाजे तो अबतक बंदहै, इसपरसे युं मालुम होताहै के बिछोनेपरसे नहीं उठाहोगा.

**षेकरहिमान**—जिहां मालिक, नहीं उठाहोगा, और हम भी वडीफजर यहां आनके दाखल हुये, और जिधर देखे उधर रात कालीभोर नजर आतीहै, उसमें ये अच्छा हुवा के रस्तेमें हमको किसीने देखा नहीं. ( कांहीं चालल्यासारखें करून )

**गुलामहुसेन**—अजी मिरजासाहेब, एक पलभर खामोष रहो अंदरसे कुछ गानेकी आवाज आतीहै !

( दामाजीपंत आंत भजन करतो. )

पद

( " धाव विभो, करूणाकर० " या चालीवर. )

धाव पाव, भो पंढरिराया, नतकल्पद्रुम कोमलहृदया. ॥ ध्रु० ।

**मी० सा०**— ओहो! क्या मीठी आवाज, और क्या उमदा गात है.! गर्चे हम् को उसका मायनाभी नहीं समझा, तोंभी कुछ मुजाका नहीं; लेकिन गानेकेलिये जबान क्या षीरीन है- सुभानल्ला !

**गुलाम०**— मै समझता हुं के हिन्दू लोगोंमें वडी फजरके वख्त परवरादिगारकी यादं करना ऐसा रुसुमहै, और हमकोभी लाजम हैं के ऐसे कामोंमें खलल नहीं करें, इस लिये हम् सब कहींभी एक घडीभरतक बाहेर बैठजावें तो बहोत अच्छा होवें.

म॰ – सुनोजी, नाहक बकवा मत करो.

(पुनः गावयास लागतो.)

व पाव भो पंढरिराया, नतकल्पद्रुम कोमळहृदया. ध्रु०
। नामामृत अनर्घ्य फुकटहि, प्रेमें प्राशन केलें नाहीं. १
ोपकारीं क्षणभर मम हा, देह न श्रमला काय करूं, हा! २
ळबुद्बुदवद् मानवजीवित, समजुन व्यर्थ न केलें निजहित. ३
तो पश्चात्ताप, विभो, मज, दीन शरण मी आलों तुज, अज. ४
तारवनीं चिंताजालीं, पडलों सोडिव हे वनमाली. ५

ा॰सा॰– वा: साहेब ! इसके गानेकीं बडी कमाल है ! गानेके बाबतमें इसने हमारे कलीजीमें गोया नषतर चुबादिया !

ुर्लाम॰– अगर ये षक्स और एकवार गावे तो बहोत अछा होवे.

( पुनः गातो. )

" उठिं गोपाळजी जायि धेनूंकडे पाहती० " ह्या चालीवर. )

उठीं विठ्ठलेशा रुक्मिणीप्रियकरा
जोडितों तुज करा प्रेमभावें ॥ ध्रु० ॥
पूर्वदिग्वधू ही कशी रक्त पाही
रविपति लवलाही उदित व्हाया १
अहाहा नाचती पक्षिगण हे किती
मधुर मधुर गाती तव कृपेनें २
दयाघन तव दया तुहिनरूपें अगा
दिसे महाभागा भूमीवरी ३

स्वकर्मी रत द्विज अर्घ्य हें द्यावया
भानुला, माधवा सिद्ध झाले ४
उठीं नंदात्मजा रुक्मिणीनायका
व्रजांतिल नायका तुज बहाती ५
उठावें वामना हर्ष द्यावा मना
करीं मनकामना पूर्ण आतां ६
जानकीवल्लभा हे कृपासागरा
भो ब्रह्मावतारा बा उठावें ७
अगा पांडुरंगा उठावें उठावें
विनंतीस द्यावें लक्ष पूर्ण ८

षे० रे० — घरमें कौनहै ? खोलो दरोजा ! !

दा० — ( आंतून ) काय, मला आज उठावयास इत उशीर झाला ? कोणी याचक दरवाजावर आले आ वाटतें. बाबांनो, उघडतों दरवाजा.

मी० सां० — अबतक नहीं खोला ? अरे हम् कबसे बाहेर डेहैं ! खोल जलदी.

( दामाजीपंत बाहेर येतो. )

दा० — ( सलाम करून ) कां मीरसाहेबजान, आज हुजुर हून, अगदीं सकाळींच स्वारी ? रातोरात येण्याचें अ बादशाहाचें निकडीचें काम मजकडे काय आहे बरें ? स गा, मी करण्यास तयार आहें.

मी० सां० — ( दोघांस ) अरे इसने जो गुन्हेगारी किईहै ं खुदक तैं मालुम नहीं ? बडी अजायबकी बातहै ! अग ये काममेंसे बचालेनेके वास्ते मुद्दाम तो नहीं करता होगा खदा जाने मालुम नहीं. ( उघडपणें ) हुजूरके कामने

लिये कुछ जरूरीथी सो हम चार आसामीको तुह्मारे तरफ उन्होंनें भेजेहै, और हम् कल षामको याहां आये उसवख्त अंदर आनेकेलिये इरादा था, मगर अंधियारीके सबबसे नहीं आये, आज बडीफजर होते ही हम् तीन जुवान तुह्मारे तरफ आये, और चौथा षक्स सामान वगैराके बंदोबस्तीके लिये मुक्कामपर है.

ा० — मग गेल्या रात्रींच तुह्मी कां नाहीं आंत आलां ? आपले उतरलेल्या ठिकाणीं बहुत हाल झाले असतील !

० १२ ० — क्योंजी, मिरजासाहेब, ए क्या बोलताहै ? क्याकरें हमको तो इसकी जबांभी नहीं समझ पडती !

ी० सा० १३ ० — अजी षेकरहिमान, तुह्मारे सबको समझके क्याकरनाहै, मै अकेला समझूं तो सबकुछ करसकताहुं, फक्त मैं कहूं सो काम तुम बखूषी बंदोबस्तीसे करना. इसकी और मेरी जानपहेचान वहोत अछीहै, सो इसको पकडना कुछ बडी बात नहीं.

ा० — बादशाहाची स्वारी खुशाल आहेना ?

ी० सा० १४ ० — ( मनांत. ) जबाने षीरींसे हमको गिरफतार कियाजाताहै; लेकिन हम् कहां ऐसे बातोंपर भरोसा रखतेहैं. ( उघड. ) अव्वल हमारी मतलब हासिल करना जरूरहै, तुह्मारे माफिक ईमान्दार नौकर पातषाहाको अबतक नहीं मिला, खैर, अबे दामाजी, चंदरोजकेनीछे सरकारी कामोंमे दगाबाजी करके नुकसानी कीई सो तुझको कुछ यादहै ?

ा० — मला नाहीं कांहीं आठवत. बादशाहाची मजकडून कधींही नुकसानी होणें नाहीं.

लोम० — क्या ! नहीं कहेताहै ?

मी० सा० — हां, ऐसा तो बोलताहै, देखो कैसा दाओपेंच करके आदमीको पकडताहै ! कुछ मुजाका नहीं, तुम फक्त उसके अतराफ रहो, ( दामाजीस. ) क्योंबे, तेरी तकसीर तू कबूल नहीं करता ? अरे तूने ऐसा गुन्हा कियाहै के उसका बयानभी नहीं कियाजाता, और उस गुन्हेगारिकेलिये तेरे हक्कमें हुजूरसे क्या सजा मिले इसकाभी अंदाज नहीं कियाजाता, तूने जो सरकारकी गुन्हगारी किईहै, वो तमाम लोगोंको जाहिरहै. बोल जलदी, छुपानेसे कुछ फायदा नहीं उठावेगा.

दा० — ( मनांत ) रात्रीं जे मला दिसले ते हेच ! सरकारचें धान्य सरकारचेच रयतेनें नेलें, ह्यांत मजकडून काय अपराध घडला ? ( त्यांस ) मला तर कांहीं गुन्हा दिसत नाहीं. तुह्मींच कृपाकरून सांगा काय तो.

मी० सा० — ( मोठ्यानें ) अबे हरामखोर, ऐसा काम करके कबूलभी करना तुझको दुषवार हुवाहै ? अरे बुढापेमें जो कोई दीवाना होके पागल होताहै, उसमाफिक तेरी खसलत हुईहै. अबे महीने देड महीनेके अंदाजमें सरकारी कोठारोंको फोडके उसमेंका अनाज तमाम बरबाद किया ! ऐसा करनेकेवास्ते तुझको पातषाहाका हुकुम हुवाथा ? गर हुकुमहै तो हमे बतला ? जिसने आजरोजतक तेरे लिये अहेसानमंदी कीई सो उस नेकीके बदले तूने बदीकर छोडा, आँ ! षाबास, अरे उसवख्त तेरी अकल तोभी कहां गईथी ? मैं समझताहूं के तू पागल हुवाहै, इसमें कुछ षक नहीं, अब सच्छ पूछे गा तो हम इसी गुन्हेगारीकेलिये तेरेको पकडेने आयेहैं. चलो पकडोजी इसको. ( दोघे जवळ जातात. ) ये देख सरकारी मोहर कियाहुवा कागज. ( आंगा-

वर फेंकतो. )

०— ( वाचतो, नंतर ) हो हो, या हुकुमांत तांत्रडतोब ज-
सा असेन तसा तुह्मीं मला धरून नेण्याविषयीं लेख
आहे खरा. बादशाहाचा हुकूम मला शिरसा वंद्य आहे.
ज्यावेळेस ही नौकरी पत्करली त्यावेळेसच हा देह त्याचा
ह्मणून मानला होता, तेव्हां तो ह्या देहाचें पाहिजे तें क-
रो मला त्याविषयीं यत्किंचित्‌ही आतां वाईट वाटत नाहीं.
माझा हा एकट्याचा देह जाऊन हजारों देहांचे कांहीं
कालपर्यंत तरी अन्नानें प्राण वांचले, येणेंकरून मी फार
कृतकृत्य झालों आहें. ह्याच्या राज्यांत धान्य असून प्रजा
दुष्काळरूपी वणव्यांत पटापट मरावी हें योग्य काय ?
तुह्मींच पहा कीं, सर्व लोक जर अन्न अन्न करून मरते
तर पुढच्यावर्षीं शेतीवगैरे धंदे करण्यास कोण लोक वरे
मिळाले असते ? पाऊस ह्या वर्षीं नाहीं ह्मणून पुढच्या
वर्षींही पडणार नाहीं? लोक न मिळाल्यानें धान्य उत्पन्न
होणार नाहीं ! ह्मणून होणारा तोटा तो बादशाहाचा नव्हे
काय ? व हा तोटा एकच वर्ष झाला असता असें नाहीं,
नर जी कांहीं थोडी प्रजा वांचली असती ती नंतर दोन तीन
वर्षांनीं अनेक अडचणी सोसून आपापल्या उद्योगास ला
गणार. तेव्हां धान्य देऊन कांहीं लोकांचे प्राण वांचविले
ह्यांत दूरवर नजर दिली असतां बादशाहाचा मीं कोणत्या
हि प्रकारें गुन्हा केला नाहीं. आतां, त्याला एकदम सुमारें
दुष्काळामुळें दीड एक लाखाची आज नुकसानी झाली असें
वाटतें, परंतु विचार केला असतां एका जीवाचा तरी प्राण
लाखों रुपये दिले असतां परत येईल काय ?

मी० सी०— अरे, लंबी लंबी बातें हमें क्यौं सुनाताहै, जो कु

छ तेरी अकलमंदी होगी सो पातषाहाके नस्दीक जाहिर कर. हम तो हुकुमके बंदेहै, चल कर तेरी निकलनेकी तय्यारि. अब तेरेको बगैर लेजानेके कभी न छोडेंगे, अगर तेरे औरतके साथ कुछ गुफ्तगू करना हो सो करले. हम नहीं समझतेहैं के इसकेबाद तेरे औरतसे फिर तेरी मुलाकात होगी.

दा०— मला कोणालाही भेटावयाचें नाहीं. मी हा अशाचा असाच तिकडे यावयास तयार आहे. हा देह आतां तुमचा आहे. आपण हुकूम देतां त्यापेक्षां एकदां आंतून जाऊन येतों.

मी० सां०— बहोत अच्छा, जलदी कर नहीं तो घरमें जाकर भाग जानेकी तजवीज करेगा, जरासी देरी हुईके तेरे धरम करमकी बिलकुल परवा न करते हुवे, बेधडक अंदर चला आवेंगे समझा, अव्वलकी पहेचान रहेनेके सबबसे अंदर जानेकोलिये छोडताहूं, नहीं तो उसीवख्त बांधके लेजाता.

दा०— महाराज, मजकडून उशीर मुळींच होणार नाहीं हा जाऊन आलोंच. ( घरांत जातो. )

मी० सां०— ( दोघांस, ) दामाजी अंदर गयाहै, अभी बाहेर आवेगा, देखो उसको पकडनेकेलिये कुछ मेहेनत नहीं, बिचारा हमारे कहेनेके माफिक सुनताहै, और चलनेके लिये भी कुछ तकरार नहीं, इसलिये हमकोभी यहांसे निकलनेकी तय्यारी किया चाहिये.

गुलाम व बेकराहमान— अजी, मालिक, हमारी तो सब कुछ तय्यारी है, फक्त उसके आनेकी देरी है.

( इतक्यांत दामाजीपंत व त्याची स्त्री येतात. )

सा०— हेच काय हो ते आपणास न्यावयास आलेले बादशा-

हाचे मनुष्य ! देवा, काय हा मजवर दुःखाचा डोंगर कोसळला ! आतां काय तरी करूं. !

दा०— अग काय उगाच दुःख करितेस ! उगी, घाबरूं नको. ( इतक्यांत सूर्योदय होतो, त्याजकडे पाहून ) अगा हे सूर्यनारायणा, हे विश्वाधारा, मी तुला अनन्यभावें नमस्कार करितों. हे सर्वसाक्षिन्, तूं, तो माझ्या हातून झालेला सर्व प्रकार पाहिलाच असशील, व आतां हे मला धरून नेत आहेत हेंही पाहाण्यास ह्याच वेळीं ह्या लोकीं प्रवेश करीत आहेस ! त्वां अनेक संकटीं भक्तांस तारिलें आहेस. तुजसारखा परोपकारी ह्या ब्रह्मांडांत दुसरा कोणीही नसेल. एक दिवस जर तुझा उदय न होईल किंवा एक क्षणमात्र तूं आपलें प्रखर तेज दाखविलेंस तर हें सर्व विश्व केव्हांच लयास जाईल ! तुजवांचून हें संकट कोण दूर करणार आहे ? अगा हे मित्रा, तूंच ह्या वेळेस माझा मित्र आहेस. विठ्ठला, ह्या दामाजीनें तुझे आजपर्यंत अनंत अपराध केले असतील, त्या सर्वांची क्षमा करून ह्या भवजाळांतून एकदां मला दूर कर. संकटसमयींमात्र लोक तुझें स्मरण करतात, एरव्ही सदा सर्वकाळ संसारांत निमग्न असतात हें खरें, परंतु जो अति दीन होऊन तुला शरण आला, त्याचें रक्षण तुजवांचून अन्य कोण करील बरें ? ही नोकरी सोडून आह्मीं उभयतांनीं तुझ्या चरणापाशीं " विठ्ठल विठ्ठल " ह्मणून तुझ्या द्वारीं आनंदानें राहावें असा मनांत विचार आला होता. परंतु हा आतां होणारा सोहाळा भोगणें माझ्या नशिबीं होता. तेव्हां मनांतील हेतु तृप्त कसा होईल ? देवा, ह्या देहाची आतां विटंबना होईल ह्यामुळें मला यत्किंचितही वाईट वाटत नाहीं. परंतु ह्या अभाग्या-

ला आतां तुझें दर्शन पुनरपि कधीं होणार नाहीं ह्मणून फार दुःख होतें. ( विठ्ठल विठ्ठल असें ह्मणत रहातो. )

**मी० सो०**[२२]— अबे दामाजीपंत, अब कहांतक टकटक करेगा ? गुलामहुसेन, देखते हो क्या ? बांधो इसको और लेचलो.

**सा०**— ( त्यांना ) अहो, मी तुमच्या पायां पडतें ह्यांनां बादशाह्यकडे नेऊं नका. मला चुडेदान द्याहो ! ( पायां पडायला जाते )

**षे०रं०**[२३]— अरे बाई, हट पीछे, मिरज़ासाहेब, ये औरत ऐसी क्या करतीहै, कुछ दीवानी तो नहीं ?

**मी० सो०**[२४]— अरे बाई, तू क्या बोलतीहै सो हमे बिलकुल समझ नहीं पडती, " चुडे दान " यानें क्या ? हमको कुछ मालुम नहीं. तेरे खाविंदको हम पातषाहाके तरफ लेजाते है, तू औरतकी जात इसलिये घरमें जा.

**सा०**— अहो नका नेऊं त्यांनां त्या दुष्टाकडे. त्याचा आह्मी अपराध कांहींच केला नाहीं ह्मणून त्याला समजावून सांगा. जा बाबांनो, तुह्मी परत जा. आणि माझा हा प्रियप्राण वांचवा ( रडूं लागते. ) बादशाहाला, माझ्याबद्दल दया येईल असें सांगा. तुमच्या सर्व स्वाधीन आहे.

**मी०सो०**[२५]— बाई, अब रोकर क्या फायदा होगा ? इसनें जो सरकारकी गुन्हेगारी किई है वो करनेके अव्वल इसको जान बचानेके वास्ते कुछ बंदोबस्ती करनाथा, अब कियेसो गुन्हेके लिये तेरे मर्दको बगैर सजेके दूसरी कुछ इलाज नहीं, चल हट पीछे. उसको जल्दी लेजानेका है.

**सा०**— ( नवऱ्यास ) अहो, हे दुष्ट माझें कांहींच ऐकत नाहींत ! काय करावें एकाएकीं मजवर हें आकाश कसें कोसळलें ! असें काय माझें मागच्या जन्मीचें पाप आड

आलें. अहो तुह्मी तरी माझ्याकरितां त्यांनां काकुळतीनें सांगा. परमेश्वरा, शेवटीं माझ्या वांट्यास हें यावेंना ? जो प्रसंग दुष्टदावेदाऱ्यांवर सुद्धां येऊं नये, तो आज मजवर- कीं हो येऊन ठेपला. कायहो करूं ! माझे पाय लटलट कांपूं लागले. शक्ति कमी होत चालली. डोळ्यांपुढें अं- धारी आली अहो मला घेरी आली. ( असें ह्मणून धाड- कन् पडते. )

मी० सॉ०– देखो, इस औरतने षैरो गुल कैसा मचायाहै !

हा०– ( तिला मांडिवर सांवरून ) अगे, शुद्धीवर ये, सावध हो, हें काय आरंभलें आहेस. असा प्रसंग काय हा आ- ज आह्मांवरच आला आहे, आजपर्यंत हजारों लोकांवर- ह्याहूनही विकट प्रसंग आले असतील. आला दिवस नि- मुटपणें काढला पाहिजे. अग, झालीस कीं नाहीं सावध ? हे लोक, पहा, वाट पहात बसले आहेत; ह्यांची खोटी होतेना ? ऊठ, ऊठ तर, ऊठ. असें रडून काय होतें ? उगी, रडूं नको. ( तिचे डोळे पुसतो. )

मी० सॉ०– अरे इतना दिन चढातोभी हमारा यहांसे निकल- ना नहीं होता, और ये लोगोंने तो धूम मचाय हैं, क्या करें; देखो, खबरदार कम जियादा कुछ करोतो इसको हम जनावरके माफिक खींच लेजावेंगे.

सा०– ( उठून ) बाबांनो, माझें एवढें ऐका, तुह्मांपुढें हा पदर पसरला, ह्यांना नेऊं नका.

हा०– अग पतिव्रते, तुला माझ्या वियोगानें अतिशय दुःख होईल हें काय बोलून दाखवावें ! अग, ही मृत्युलोकची वस्ती मोठी दुःखदायक आहे. तुझा माझा पूर्वजन्माचा होता कांहीं संबंध, त्या मुळेंच तूं मी आज पर्यंत होतों ए-

कांत ! आजचा हा दिवस असा वियोग होण्याचा आला, तरी ठीकच ! हा दिवसपर्यंत तूं माझ्याशीं चांगल्या रीतीनें वागलीस, माझें वचन कधींही मोडलें नाहींस, कधीं उणें उत्तर केलें नाहींस, सत्कर्माच्या कधीं आड न येतां तूं साह्यच करीत होतीस, तुझ्या सारखी चांगली स्त्री संगतीस होती, ह्मणूनच मी संसारांत होतों, नाहीं तर केव्हांच तीर्थयात्रा करीत फिरलों असतों. जा, घरांत जा, आणि रडूं नको. त्या विठोबांचें नांव घेत बैस. मी माझें मन आवरतों, पण तूं रडतेस यामुळें मलाही रडें येतें. मोहपाश मोठा विलक्षण आहे. त्याच्या गांठी सुटणें महा कठिण आहे. जा आंतें, पांडुरंग तुझें रक्षण करील.

सा०—( गळ्यास मिठी मारून ) अहो, ह्या आपल्या बोलण्यानें मी सर्वस्वीं खचल्यें. हाय ! हाय ! देवा, मी जन्मास तरी कशाला आल्यें! मला रडें अगदीं आवरत नाहीं, व यामुळें बोलतां येतनाहीं. आपण तिकडे जाऊं नये. बादशाहा मोठा दुष्ट आहे, काय करील नकळे. आई ! आई ! काय तरी करूं. ज्यांच्या पतींवर अशी वेळ आली नसेल त्या किती सुखी असतील ! मीच कशी पापिणी ! आपल्यावांचून मला आतां एक पळ सुद्धां करमणार नाहीं, आणि हें एवढें आयुष्य दुःखांत कसें तरी घालवूं. देवा, ह्या क्षणीं मला मरण तरी देरे. आपल्यास तेथें नेल्यावर आपली बादशाहा काय दशा करील हें मला येथून दिसतें आहे. माझ्या आई, नको जाऊं; मी ही मिठी सोडणार नाहीं. ( त्यांस, मोठ्यानें ) जा परत ह्मणून मी तुह्मांस मघांच सांगितलें, अजून तुह्मी येथें उभे कां ? मी त्यांना कधीं पाठविणार नाहीं. न्यावयाचें असेल तर आपल्या तरवारींनीं माझी अगो-

दर मान कांटा. ही ही कमरेची आतां मिठी कधींच सोडणार नाहीं. ( कमरेस मिठी घालते. )

मी॰ सि॰— अरे दामाजी, जिसवख्त हमने तेरेको गिरफतार किया उसी वख्त लेजाते तो वहोत अछा होता, तेरे औरतको मिल्कर आनेकेलिये हमने रहम की, सो तूने उसको बाहेर ले आके हमसे ऐसा मसखरियां करता है ? इसलिये खुद तू बदमाष है, छोड उस औरतको, और चल हमारे साथ, ऐसे गुन्हेगारोंको हम कभी नहीं छोडेंगे.

दा॰— तुह्मीं कांहीं ह्मणा मला त्याचा राग नाहीं. ( तिला ) प्रिये, काय हा तुझा वेडेपणा. अगे तूं मिठी मारून मी नाहीं पाठविणार ह्मटलेंस, ह्मणून हे लोक तुझें ऐकतील काय ? त्यांना आपलें काम बजावलें पाहिजे. तुझी यांना दया कशी ग येईल ! आणि येऊन तरी काय उपयोग ? सोड सोड, हा कमरेला घातलेला प्रेमपाश. मी मिठी सोडायाला जातों पण हिचें एकही बोट माझ्यानें हलत नाहीं. मला अगदींच शक्ति नाहींशी झाली ( गळ्यावरून व तोंडावरून हात फिरवून ) अग वेडे, काय हा तुला घाम ह्या वेळेसें आला आहे ! सर्वांग कसें अदीं थरथरलें आहे ! भिऊन काय होतें. मला तर ह्या विषयीं आतां काडीभर सुद्धां वाईट वाटत नाहीं. भिल्लानें गाणें तूं कधीं कधीं ह्मणत असतेसना ? मग, श्रियाळराजाची स्त्री चांगुणा हिनें गीत ह्मणून आपल्या मुलाचें शिरकमळ उखळांत घालून कशाकरितां कांडलें ? तसेंच, राजा हरिश्चंद्र यानें आपला देह विकला, त्याच्या अति सुकुमार स्त्रीबालकांस अंगावर कांटा उभा राहणारीं अशीं असहनीय दुःखें भोगावीं लागलीं, ह्याचें काय बरें कारण ? तर एक परोपकार. आतां त्यांची गोष्ट कोठें व

आपलीं कोठें! त्यांचे चरणधूलीचे कणाच्या लक्षांशाचीही आमची योग्यता नाहीं. तरी, मीं हा अल्प परोपकार ह्मणून केला आहे. आतां बादशाहा पाहिजे तें करो. तू कांहीं जरी केलेंस तरी हे मला नेल्याशिवाय रहाणार नाहींत. मग उगाच कां वरें हा तुझा हट्ट ! तुझी ही अवस्था पाहून माझ्यानें एक शब्द सुद्धां बोलवत नाहीं. कंठ दाटून आला. काय तुला जास्त सांगूं ?

गा०– अहो, मी तरी बरावर येतें. स्त्री ह्मटली ह्मणजे पुरुषाचें अर्धें आंग आहे. तेव्हां येथें अर्धें आंग तुह्मांस कसें ठेवतां येईल ? मी कांहीं येथें राहणार नाहीं. आपल्या पाठीं मागून मी, मीं हे पाय कधीं सोडणार नाहीं. मला रानामध्यें निजलेली टाकून जातां तर मी ही अशी मिठी घातली असती काय ? माझ्या डोळ्यांसमोरून तुह्मांला नेत असतां, जर मीं आपल्याला एकट्यालाच जाऊं दिलें तर हें ऐकून पृथ्वीवरील साध्वी स्त्रिया मला काय वरें ह्मणतील ? आपल्या पाठीमागें मी एकटी कशी राहूं ? हें घर आपल्यावांचून मला मसणवटीप्रमाणें उदास भासेल. प्राण गेल्या नंतर कुडीची जी अवस्था होते ती माझी आतां होणार ! हाय ! हाय ! देवा, ह्या भयंकर अरण्यांत आतां मी कशी राहूं. आपले संगतिरूप उदकावांचून मी कशी वांचेन ? ह्या गाईला नका येथें ठेऊं. ( त्यांस ) तुह्मीं माझें नाहीं का ऐकत ? चला मी स्वतः येऊन बादशाहाचे पाय धरितें. ह्मणजे तो खचित मजवर कृपा करील. ( नवऱ्याला ) खरोखर तुह्मीं नका जाऊं. मीच जातें.

२ शि०– ( दोघांस. ) आज यहांका मुकाम नहीं छूटता ! क्या जुलूम है ! पकडोजी उस दामाजीको और खींचो इधर !.

मी० सां०— हां सच्चहै, दो पहेर होने आयेहैं तोभी इनकी गडवड वंद नहीं हुई, और दामाजीको तो जलदी लेजाना जरूर है, और जरा देर रहे तो तमाम गांवके लोग जमेंगे; फिर यहांसे जाना मुष्किल होगा. अरे बाई! तू नाहक क्यों मग्ज फिराती है? छोड उसके गलेमेंका हात, नहीं तो हम तुम्हारे दोनोंको छुडाके उसको लेजातेहै, अब देनेसे या तेरे कहेनेसे इसको छोडेंगे ऐसा तो कभी न होवेगा. दामाजी, तेरे औरतको छोड और बाजू हटजा, नहींतो ये देख तेरे लिये तलवार कैसी चमक रही है. ( म्यानांतून तलवार बाहेर काढतो. )

दा०— अगे, उगाच त्यांचो व माझी कशाला नानाप्रकारें विनवणी करितेस? आमच्या हातून काय होणार आहे? ह्यांनीं मला न नेलें कीं दुसरे पुष्कळ न्यावयास येतील. हे बिचारे गरीब तरी आहेत. तुझी भेट तरी दिली करूं. अग, ह्या संकटांतून त्या पंढरीच्या राण्याशिवाय कोण पार नेणार आहे? त्याचें ह्रदय अति कोमल आहे. त्याची विनवणी कर. तो जवळ आहे, त्याला हांका मार. तो तुझ्या हांका ऐकून तुला "ओं" देईल. तो सर्व कर्म पहातो; मी तुझ्याशीं बोलत आहें मात्र, परंतु सर्व लक्ष त्या पंढरीनाथाच्या मूर्तीकडे आहे. हे सगुणरूपा, भक्तवत्सला, तुझ्यावर मी आतां एवढें संकट घालतों कीं, हे दयाळा, ह्या मोहपाशांतून मला लौकर सोडीव. मला घेऊन जात आहेत त्यांना आतां हिजकडून अडथळा होऊं देऊं नको. मला हिची मिठी सुटत नांहीं, काय करूं!

सा०— ( निराश होऊन ) तुह्मी सांगतां हें सर्व खरें, पण आपल्या पाठीमागें मीं येथें दिवस कसे हो काढावे?

मी० सां०— अरे तो भै बसकर, नाहक बातें करके मगज खागया. ( दोघांस ) अजी गुलामहुसेन, इसका हात पकडके एकतरफ खींचो, तो मैंभी एक हात पकडता हूं; नहीं तो इनके बीचमें खंजर रखताहूं इसके सबबसे तोभी इनकी मगर मिठी छुटेगी.

( त्यांला ओढतात, तिची मिठी सुटून ती धाडकन् भूमीवर पडते. )

दा०— शिव ! शिव ! विठ्ठला, काय हें !

सा०— ( त्याला नेतील, ह्मणून लौकर सावध होऊन ) अहो, थांबा, एक वेळ मला त्यांचें मुखकमल पोटभर पाहूं द्या. हे विठोबा, पंढरीनाथा, काय हा आमच्यावर दिवस येऊन ठेपला. असा आह्मांकडून तुझा काय अपराध झाला ? ज्याची विश्वासानें आज इतकीं वर्षें एकनिष्ठपणें चाकरी केली, त्या बादशाहानें आज माझ्या प्राणपतीवर असा भयंकर घाला घालावा काय ? विठ्ठला, मनुष्याची सेवा शेवटीं अशी व्यर्थ आहे, हें दाखविण्याकरितां तूं हें आम्हांवर असह्नीय संकट आणून लोकांस आपली सेवा करावी हें तुला सांगणें होतें काय ? असेंच जर तुला कर्तव्य होतें तर दुसऱ्या युक्ति तुझ्यापाशीं काय थोड्या होत्या ? हे बादशाहाचे दूत मला प्रत्यक्ष यमदूतांहून निष्ठुर दिसतात. बादशाहा, तूं खरोखर अविचारी, साहसी व मूर्ख आहेस. तूं यमाहून कठिण ह्रदयाचा आहेस. पहा, मरणसमयीं पंढरीराण्याचें नांव घेतलें असतां त्या यमाला आपल्याकडे नेण्याची काय बिशाद आहे ! परंतु इकडे एक सारखी विठ्ठल विठ्ठल नामावळी चालली असतांही तुझ्या ह्या दूतांला कांहींच दया येत नाहीं ! रुक्मिणीवरा, हें जें,

कृत्य त्यांनीं केलें तें घरांतील मुलाबाळांस पुढें संपत्ति करून ठेवण्यासाठीं केलें नाहीं, अथवा स्वतः ला नानाप्रकारचे उपभोग मिळावे ह्यासाठीं हीं कोठारें लुटविलीं नाहींत; तर ह्या भयंकर दुष्काळांत मनुष्यांची ती झालेली अवस्था त्यांच्यानीं पहावेना त्यांचे प्राण वांचविण्याद त्यांस कांहींच दुसरी युक्ति सांपडेना ! दयेनें त्यांच्या नेत्रां तून अश्रूंचे लोट वाहूं लागले. अहाहा ! ! ज्या वेळेस ते ब्राह्मणादि हजारो याचक दारापुढें आले आणि क रुणास्वरानें तिकडचें नाव घेऊन, अहो, प्राण वांचवा प्राण वांचवा असें ह्मणूं लागले, त्यावेळेस त्यांस ईश्वर—नाहीं तो हिकडचेच पाय असें वाटलें. भग ह्या प्रसंगीं तिकडचें परदुःखदुःखित होऊन जी अवस्था झाली ती, देवा, शब्दां नीं बोलून दाखवितां येत नाहीं. ती माझी मलाच ठाऊक ! त्य वेळची ती मुखचर्या ह्या वेळेस मला दिसत आहे, किं ती ग्लान पण दिसत होती ! सर्वांगावर एकदम शाहरे उ भे राहिले ! अहो, मला एकदां कडकडून भेटूं द्या. ( उ ठून तसें करिते. ) आतां आपली भेट तरी मला कधीं हे ईल ! हर ! हर ! मजवर कसा ईश्वर कोपला हा ! अहो मला न्या हो बरोबर. मी दिवस मोजीत आहें, कधीं येणें हो ईल तें बोला. ( रडावयास लागते. )

दा०— हे साध्वी, अगे आतां नको फार बोलूं. तुझा घस बसला, शब्द सुद्धां उमटत नाहीं. अग लौकर येईन पंध रा दिवसांच्या आंत. उगी, नको उगीच रडूं.

प्रो० सो०— अरे तो भी बसकर, और चल जलदी, ऐसे बा करके कहांतक हमको सतावेगा ?

( इतक्यांत उपाध्ये बोवा लगबगीनें येतात. )

उपा०— अहो, काय हा एकाएकीं प्रकार घडून आला ! मला कांहींच कळत नाहीं. पहाटेस स्नान करून देवघरांत ब्रह्मकर्मांत निमग्न होतों, तिकडे कांहींच ऐकावयाला आलें नाहीं. बाहेर नमस्कार ह्मणून घालावयास येणार तों ह्या साध्वीची करुणपर वाणी कर्णीं पडली ! तेव्हां अतिशय घाबरलों. पळीपंचपात्री तेथेंच टाकिली आणि येथें आलों, तों हा गोंधळ. पंत, काय हें ? अगोदर मला ह्याविषयीं कांहींच कळविलें नाहीं. काय ह्या आपल्या स्वभावास ह्मणावें !

दा०— कळविण्यासारखा कांहीं विशेष आश्चर्यकारक प्रकार आहे असें नाहीं. हा एक संसारांतिल स्वप्नावस्थेसारखा ल्हानसा खेळ आहे. आपल्यास आंत भेटणार होतों, परंतु आपण स्वकर्मांत अगदीं निमग्न होतां.

उ०— हे बादशाहाकडून आलेले मनुष्य दिसत आहेत!

मी० सा०— हां तो फिर तुह्मारा क्या कहेना है ? गुलामहुसेन, देखो साब मेरे कहेनेमाफिक ये दूसरा आदमी हमारी समजूत करनेकेवास्ते आयाहै, अब क्या करें ? ( उपाध्यास रागावून. ) हमारे बीचमें बोलनेहारे तुम कौन हो ? चलो जाओ आपना काम करो, चले आपने नाहक चेकियां करने !

उ०— बाबांनो, रागावूं नका, जरा थंड व्हा; दोन शब्द ह्यांच्याशीं कृपा करून बोलूं द्या. पंत, आपल्या मुखांतून हा प्रकार आतां कळलाच पाहिजे असें नाहीं. मला तो सर्व समजून आला. हन्त ! हन्त !! दुर्भिक्षपीडितांवर ह्या दयार्द्र पुरुषानें केलेले उपकार राजास न आवडून त्यानें ह्या सत्पुरुषास पकडण्याकरितां हे मनुष्य यतियमदूत पाठविले आहेत ! अगाई सुपतिव्रते, तुझा शोकही ह्याच कारि-

तां आहे. आतां समजलों. हर ! हर !

दा०— उपाध्ये बोवा, मला उशीर होतो, त्यामुळ आतां आपल्याशीं बोलण्यास अवकाश नाहीं. आपण सुज्ञ आहां, आपणास ह्मणजे कांहीं सांगायाला पाहिजे असा प्रकार मुळींच नाहीं. तरी मी ह्या वेळेस मोहानें अगदीं व्याप्त झालें आहे, त्यामुळें आपल्याला एवढें सांगतों कीं, हिचा वेळ चांगल्या रीतीनें जावा, व माझी अल्प काळ तरी हिला विस्मृति पडावी ह्मणून दररोज घरीं पुराण सांगत जा. हिचा सर्व प्रकारें सांभाळ करणारा तो पंढरीनाथ आहेच ! आपल्या समागमरूपी चंदनानें हा देह आजपर्यंत शांत होता, आतां ह्या वियोगाग्नीच्या उकाळा मला कशा सहन होतील ?

उ०— अगा सत्पुरुषा, काय करूं ! माझें दुर्दैव काय सांगावें ? सत्संगतिरूप भूमीवर माझें मनोबीज रुजून परलोकीं उपयुक्त होणारीं अशीं अनेक फळें मला प्राप्त झालीं असतां आज हा भयंकर दुष्काळ ती भूमीसुद्धां नाहींशी करीत आहे ! सज्जनांचीं कृत्यें जगतास सर्वकाळ सन्मार्ग दाखविणारीं असतात ! तेव्हां तुमचें बादशाहाकडून कांहीं वाईट होणार नाहीं. तुमच्या दर्शनानें त्याला मात्र विलक्षण लाभ होतील, ह्यांत संशय नाहीं.

शी०— दामाजी, चल छोड तेरे रिश्तेदारोंको, उन्से कहांतक बात करेगा? बोल यहांसे जलदी निकलता या नहीं?

दा०— उपाध्ये बोवा येतों आतां, नमस्कार (तिला) अग, येतें बरें; विठोबाला कधीं विसरूं नकोस. ( स्त्री रडावयास लागते.

उ०— नमस्कार, आपण लौकर परत यावें.

( दामाजीला घेऊन जातात, त्याची स्त्री मूर्च्छित पडते. )

उ०—( खिन्न होऊन दुसरीकडे बसतो नंतर तिच्याकडे पाहून

अरेरे! ही तर इकडे मुर्च्छित पडली आहे. अहो सावध व्हा, सावध व्हा पति संकटांत पडले असतां, पतिव्रतास्त्रियांची कशी अवस्था होते ती अन्य पतिव्रतांसच कळेल ! आम्हांस तद्विषयीं कांहींच कल्पना होणार नाहीं, हें उघड आहे. तुमचें नांव घेतांच त्या भारतांतील 'सावित्र्याख्यान' आठवतें. अहो, तिनें ज्याप्रमाणें स्वपतीला मुक्त केलें, त्याप्रमाणें आपण आपल्या पातिव्रत्याच्या योगानें पंतास मुक्त कराल ह्यांत संदेह नाहीं. आतां आपण व्यर्थ शोक करूं नये; पंत, पंधरावीस दिवसांनीं खचित परत येतील. बादशाहास पंतांच्या मुखांतून सर्व खरा वृत्तान्त समजल्यावर तो ह्यांना सोडून देईल. हें तुह्मांवर आलेलें अभ्र फार वेळ राहणारें नव्हे. व्याघ्रसर्पादिकांनीं व्याप्त अशा निबिड अरण्यामध्यें, मनुष्य सांपडून तो कितीहि सावध गिरीनें वागला असतां, त्याला जशी पदोपदीं मृत्यूची भीति असते, त्याप्रमाणें संसारांत नीतीनें वागलें असतांही असे दुःखकारक प्रसंग येतात; कारण, संसारच मुळीं दुःखमय आहे. तेव्हां अनीतीनें वागलें असतां दुःखावर दुःखें येतील ह्यांत कांहींच आश्चर्य नाहीं ! हें, जगतास ह्या उदाहरणानें आणखी समजेल. काय, एवढा वेळ माझें बोलणें अरण्यरुदिता प्रमाणें व्यर्थ गेलें ? अद्यापि ह्या सावध होत नाहींत ! कशा सावध होतील ! ह्यांचे पंचप्राणच मुळीं त्या सधुपुरुषाबरोबर गेले. अहो, ह्या पहा गोठ्यांत तुह्मांसाठीं गाई हंबरत आहेत ! हें आंगण आहे, येथें केवढा वेळ असा काढणार, ऊन्हही फार झालें.

( ती सावध होते. )

**सा०**— अहो उपाध्येबावा, काय ही मज दीनेवर वेळ आली त्यांच्या चरणांचा वियोग आतां मला कसा सहन होईल

माझें मन त्यांच्या बरोबर गेलें, तें कांहीं केल्यानें परतावयाचें नाहीं. मला वेड लागतसें झालें आहे. कांहीं सुचत नाहीं. तिकडून जेव्हां परत येणें होईल, तेव्हांच मी शुद्धीवर येईन, तेव्हांच मला अन्न गोड लागेल, देवधर्म सुचेल, व घरांतलें काम करवेल. काय हो बादशाहा तिकडच्ये आतां करील? मला घरांत या ह्मणून कशाला बलावितां! ही जागा व घर मला सारखेंच वाटतें! अग हे पृथ्वी, मलाच तूं येथें आपल्या पोटांत घे, ह्मणजे ह्या दुःखांतून एकदम सुटेन! काय ह्या दिवसांत ऊन्ह तरी असतें. हाय! हाय! त्या यमदूतांबरोबर चालावें लागेल. ते वाईट शब्द बोलून त्यांच्या मनास दुखवतील! वाटेंत आंघोळी सुद्धां वेळेवर होणार नाहींत. मग फराळ कशाचा? काय करूं एक ह्मणून आठवूं! असें हें मनांत येऊन माझी जी कांहीं मनाची स्थिति झाली आहे ती बोलून सुद्धां दाखवितां येत नाहीं. अंतःकरण काळजीनें अगदीं जळत आहे. अग हे पंढरीच्या आई, रखुमाई, तूंच मला आतां सर्वस्वीं आधार आहेस. तुजवांचून हें माझें दुःख कोणीही निवारण करणार नाहीं. बादशाहाच्या अंतःकरणांत दया येईल असें करून इकडचें येणें लौकर होईल असें कर. परत येणें झालें ह्मणजे कोणी कांहीं ह्मणो आह्मी उभयतें तुझ्या चरणापाशीं सर्व आयुष्य घालवूं.

३०— अहो, आपण ह्मणतां तशी आपली स्थिति होणें हें साहजिकच आहे. आम्ही आपलें सांत्वन अधिक काय करावयाचें आहे? पहा, भगवद्भक्तांचीं चारित्रें कोणास कांहीं समजावयाचीं नाहींत. पांडुरंगाच्या कृपेनें आपल्या पतीच्या एका केशासही धक्का लागावयाचा नाहीं. त्यांची विठ्ठलाचे ठायीं जी निःसीम भक्ति व श्रद्धा आहे ती विफल होईल

कोणं ? अमृताचा परिणाम कधीं मृत्यु होईल काय ? ई-श्वर, भक्तांना कधींहि पाठमोरा होणार नाहीं. तो परम-कारुणिक भक्तांचा अंत कधींही पहात नसतो. कोणत्याही तऱ्हेनें पंतांचें संरक्षण करील. आतां आपण काळजी करूं नये. पंत लौकर येतील. पंतांनीं, एकदा मागें तुम्हांसहवर्तमान पंढरपुरीं राहण्याचा बेत केला होता. परंतु मजकडून त्यांला अनुकूलाभिप्राय मिळाला नव्हता, त्यामुळें आत मला विषाद वाटत आहे. अथवा विषाद तरी कसा म्हणावा ? कारण पंत जर तसे त्यावेळेस करते तर ह्यांचें पोषण कसें झालें असतें? तेव्हां होणाऱ्या गोष्टी, त्याला कोणी कारण असतो अथवा नाहीं, त्या घडावयाच्यांच. तुम्हींच पहा, मला तरी त्यांचा वियोग सहन होईल काय? मी तुम्हांस उपदेश करतों मात्र, परंतु माझी अवस्था काय झाली आहे ती मलाच माहित. आम्ही आपलें मन विवेकानें आवरतों एवढेंच. फार काय सांगूं, आपण आतां आंत चलावें.

सा०— आपण मोठे पुण्यवान् आहां. आपलें वचन कधींहि खोटें व्हावयाचें नाहीं. आपल्या म्हणण्यापमाणें त्यांची वाट पहात बसतें. तिकडे अशा संकटांत पडण्याचें झालें असून मी अभागीण आजून जिवंत कशी राहिल्यें आहे ! अहो यमदूतांनो, तर्‍ही तरी गुपचिप येऊन बंदरास पोंचण्याचे अगोदर मला लौकर न्या !

( जातात. )

## प्र० ७, स्थळ—पंढरपुर विठ्ठलमंदिर.

( विठ्ठल व रखुमाई. )

वि०— अग हे आदिशक्ति, चित्स्वरूपे, विशेष बोलण्याचा हा प्रसंग नव्हे. तुझ्याशीं दोन शब्दही बोलण्याला ह्या वेळेस अवकाश नाहीं.

र०— अहो, आज एवढी घाई कशाची ? असें काय कोणावर संकट आलें आहे ? हे सर्वज्ञा, असा कोण आपला परमप्रेमळ भक्त या वेळेस करुणस्वरानें आपलें स्तवन करून आपल्यास प्रेमपाशानें आपल्या कडे ओढीत आहे ?

वि०— अग हे सर्वज्ञे, रुक्मिणी, कोण संकटसमुद्रांत पडला आहे, हें तुला ठाऊक नाहीं काय ? सर्व विश्व जणुं तुझ्या-डोळ्यांसमोर असल्या प्रमाणें आहे. असें असून, माझा संकटांत पडलेला परमप्रिय भक्त तूं पहात नाहींसना ? काय ग, मग मी हतभाग्य आहें ! भगवान् नाहीं तर ! !

र०— अगा हे परब्रह्म, सदयहृदया, आपले भक्त अनंत आहेत; त्यांची परीक्षा पहाण्याकरितां त्यांच्यावर हजारों संकटें आपण आणतां, व शेवटीं त्यांतून त्यांस मुक्त करून अक्षय्य सुख देण्यास आपणच समर्थ होतां! आपल्या अशा भक्तांमध्यें कोण, कोणत्या स्थितींत आहे हें मी आपल्या पुढें सांगण्यास असमर्थ आहें.

वि०— हे विनोदशीले, हा वेळ विनोद करण्याचा नव्हे; तूं समजून उमजून अज्ञान स्वीकारतेस ह्याला काय ह्मणावें ? पर्वतश्रेष्ठ हिमाचल, जगत्प्रकाशक रवीला माहीत नाहीं असें ह्मटल्यास कोणाला तरी खरें वाटेल काय? प्रिये, माझा प्रिय प्रेमळ भक्त दामाजी, हा ह्यावेळेस मोठ्या व्यसन-

महाणेपंत पडून सर्व भार त्यानें मजवर ठेवून माझ्या नांवा-
ची एकसारखी मोठ्या श्रद्धेनें जपमाळ घेत आहे. तर
अशा समयीं मला लौकर धावलें पाहिजे, व योग्य युक्तीनें
आजपर्यंत त्यानें केलेल्या भक्तिव्रताची मला आतां सांगता
केली पाहिजे.

— हो ही खरी गोष्ट, त्याला त्या अल्पज्ञ राजाकडून लोक
धरावयास गेलेले आहेत ! सांगता करणें हें आपलें ब्रीदच
आहे. व ह्मणूनच आपल्यास भक्तवत्सल असें ह्मणतात.
असा निःसीम सदय भक्त दामाजीपंत ह्याजवर आपण
लौकर कृपावृष्टि केली पाहिजे ! मला सांगाल तर मीही
त्याचें संकट केव्हांच दूर करीन !

वि०— अग हे देववधूस्तुते ! त्याचें संकट ह्मणजे काय पदार्थ
आहे ! आतांच त्याला मुक्त करीन. परंतु त्याचें दुःख नि-
वारण करण्याकरितां कांहीं लौकिक युक्ति योजिली पाहिजे;
अशाकरितां कीं ती लोकांच्या दृष्टिगोचर होऊन लोकांस
असें समजलें पाहिजे कीं, जे स्वधर्माचरण करून मला
कधींही विसरत नाहींत, जे कोणत्याही स्थितींत असले
तरी माझें सर्वकाळ भय बाळगतात, जे अनन्यभावें म-
ला शरण येतात, जे भूतमात्रावर दया करितात, फार
काय सांगूं ? जे आपला देह परोपकारार्थ खर्च करण्यांत
मागें पुढें पहात नाहींत, त्यांचें मी परमेश्वर सर्वदा आपल्या
अंगें रक्षण करितों. ह्मणून मला कांहीं तरी रूप घेतलें
पाहिजे कीं जेणेंकरून माझा हा भक्त मुक्त होईल. सदा अज्ञा
नांधकारांत निजणाऱ्या ह्या जगताच्या डोळ्यांपुढें कधं
कधीं असे चमत्कारप्रदीप आणले पाहिजेत. तर कश
रूपाची योजना करावी हें त्वरित सांग पाहूं.

र०— आपण आजपर्यंत भक्तकाजासाठीं नानाविध अवतार व रूपें धारण केलीं आहां, तेव्हां मी आपल्यास काय सांगावें? तरी मला वाटतें कीं सावकाराचें आपण रूप घेऊन दामाजीला द्रव्य द्यावें; ह्मणजे लुटलेल्या धान्याचें तो द्रव्य बादशाहाकडे रवाना करील. ह्या योगें त्याचें संकट दूर होऊन त्याला आपलें, सावकाराचे रूपानें दर्शनही होईल.

त्रि०— अहाहा ! ! ही योग्य युक्ति ! परंतु ज्याच्या पदरीं दामाजीपंताच्या रूपानें पुण्य राहिलें आहे त्या बादशालाही दर्शन देऊन त्याला साधुसमागमाचें माहात्म्य दाखविलें पाहिजे. तर मी आतां अंत्यजाचें रूप घेतों आणि त्याचें सर्व रुपये भरणा करून त्याची पावती आणतों. नंतर ती पंताच्या पोतींत ठेवावी किंवा त्याला त्याच वेषानें दर्शन द्यावें त्याविषयीं, मग दामाजीपंताविषयीं माझा प्रेमा त्या वेळेस जसें सांगेल तसें करूं. प्रिये, आतां योग्य समय पाहून तसें रूप घेऊन बेदरास बादशाहाकडे गेलें पाहिजे. बग ऐक, कोणी या वेळेस माझा धावा करीत आहे. तर त्याला संकटमुक्त करण्यासाठीं मी अगोदर तिकडे जातों.

( जातो. )

र०— परमेश्वर भक्ताधीन खरा ! तो भक्तांच्या कार्यासाठीं पाहिजे तें करील. कृष्णावतारीं त्याणें त्या अर्जुनाचे घोडे धुतले, त्याचे घरीं उच्छिष्ट काढलें ! आजपर्यंत नानारूपें धरून परमेश्वरानें भक्तांचीं रक्षणें केलीं, त्यांची गणना करण्यास कोण समर्थ आहे ? वेदपुराणादि त्याचें भाग्य गात आहेत, पण त्याविषयीं कांहींच समजत नाहीं असें ह्मणतात. त्याचप्रमाणें त्याणें कोट्यवधि दुष्टांचें निर्दलन करून साधुजनांस सुख दिलें आहे. मोठे मोठे पातकी असून

पश्चात्तापानें ज्यांनीं ह्याचें श्रद्धेनें ध्यानभजन केलें, असे काय परमात्म्यानें थोडे उद्धरिले आहेत ? ह्या कलियुगांत सर्व प्रकारें मनानें, आयुष्यानें, बुद्धीनें लोक निर्बल झाले आहेत ह्मणून ईश्वरप्राप्तीचा सुलभोपाय, त्यांना भगवन्नामसेवन सांगितलें आहे! तर असा जो भक्तकाजकैवारी सर्व भुवनांचा स्वामी, ज्यास लोक, अनेक पंथांनीं भजून शेवटीं ज्या सुखाची इच्छा करितात त्यांना त्यांच्या भक्तीप्रमाणें तें देणारा, ज्याचे गुण यथामति गाऊन व ज्याचें ध्यान करून योगिजन ब्रह्मानंदांत निमग्न होतात, त्याचा क्षणमात्र वियोग मला कसा सहन होईल ? मी तिकडे जात्येच. ( जाते. )

## प्र० ९. मंगळवेढें, पंतांच्या घराकडचा रस्ता.

( रमाबाई, सगुणाबाई, व यशोदाबाई. )

रमा०— काय हो सगुणाबाई, तुह्मीं कोणीकडे ह्या यशदाबाईंना बरोबर घेऊन ? तुह्मीं कधीं बाहेर पडावयाच्या नव्हत ह्मणून विचारिलें.

सगु०— हें हो काय माझ्याकडून कांहीं खरो बोलवायाचें ह्मणून मला असें विचारितां वाटतें ! सावित्रीबाईंवर काय अकस्मात वेळ आली ती ऐकिलीतंना ! तेव्हां जावें म्हटलें त्यांच्या समाचारास; . मी निघाल्यें तों यशदाबाई आमच्याकडे आली. काय हो, सावित्रीबाईसारखी बायको कोठें पाहूं गेलें असतां मिळावयाची नाहीं. तिची जी नवऱ्याच्याठिकाणीं

## प्र० ४, स्थळ—पंढरपुर विठ्ठलमंदिर.

( विठ्ठल व रखुमाई. )

वि०— अग हे आदिशक्ति, चित्स्वरूपे, विशेष बोलण्याचा हा प्रसंग नव्हे. तुझ्याशीं दोन शब्दही बोलण्याला ह्या वेळेस अवकाश नाहीं.

र०— अहो, आज एवढी घाई कशाची ? असें काय कोणावर संकट आलें आहे ? हे सर्वज्ञा, असा कोण आपला परमप्रेमळ भक्त या वेळेस करुणस्वरानें आपलें स्तवन करून आपल्यास प्रेमपाशानें आपल्या कडे ओढीत आहे ?

वि०— अग हे सर्वज्ञे, रुक्मिणी, कोण संकटसमुद्रांत पडला आहे, हें तुला ठाऊक नाहीं काय ? सर्व विश्व जणुं तुझ्या-डोळ्यांसमोर असल्या प्रमाणें आहे. असें असून, माझा संकटांत पडलेला परमप्रिय भक्त तूं पहात नाहींसना ? काय ग, मग मी हतभाग्य आहे ! भगवान् नाहीं तर ! !

र०— अगा हे परब्रह्म, सदयहृदया, आपले भक्त अनंत आहेत; त्यांची परीक्षा पहाण्याकरितां त्यांच्यावर हजारों संकटें आपण आणतां, व शेवटीं त्यांतून त्यांस मुक्त करून अक्षय्य सुख देण्यास आपणच समर्थ होतां! आपल्या अशा-भक्तांमध्यें कोण, कोणत्या स्थितींत आहे हें मी आपल्या पुढें सांगण्यास असमर्थ आहे.

वि०— हे विनोदशीले, हा वेळ विनोद करण्याचा नव्हे; तूं समजून उमजून अज्ञान स्वीकारतेस ह्याला काय ह्मणावें ? पर्वतश्रेष्ठ हिमाचल, जगत्प्रकाशक रवीला माहीत नाहीं असें ह्मटल्यास कोणाला तरी खरें वाटेल काय? प्रिये, माझा प्रिय प्रेमळ भक्त दामाजी. हा ह्यावेळेस मोठ्या व्यसन-

महार्णवांत पडून सर्व भार त्यानें मजवर ठेवून माझ्या नांवा-
ची एकसारखी मोठ्या श्रद्धेनें जपमाळ घेत आहे. तर
अशा समयीं मला लौकर धावलें पाहिजे, व योग्य युक्तीनें
आजपर्यंत त्यानें केलेल्या भक्तिव्रताची मला आतां सांगता
केली पाहिजे.

र०— हों हे खरी गोष्ट, त्याला त्या अल्पज्ञ राजाकडून लोक
धरावयास गेलेले आहेत ! सांगता करणें हें आपलें ब्रीदच
आहे. व ह्मणूनच आपल्यास भक्तवत्सल असें ह्मणतात.
असा निःसीम सदय भक्त दामाजीपंत ह्याजवर आपण
लौकर कृपावृष्टि केली पाहिजे ! मला सांगाल तर मीही
त्याचें संकट लेंव्हांच दूर करीन !

वि०— अग हे देववधूस्तुते ! त्याचें संकट ह्मणजे काय पदार्थ
आहे ! आतांच त्याला मुक्त करीन. परंतु त्याचें दुःख नि-
वारण करण्याकरितां कांहीं लौकिक युक्ति योजिली पाहिजे;
अशाकरितां कीं जी लोकांच्या दृष्टिगोचर होऊन लोकांस
असें समजलें पाहिजे कीं, जे स्वधर्माचरण करून मला
कधींही विसरत नाहींत, जे कोणत्याही स्थितींत असले
तरी माझें सर्वकाळ भय बाळगतात, जे अनन्यभावें म-
ला शरण येतात, जे भूतमात्रावर दया करितात, फार
काय सांगूं ? जे आपला देह परोपकारार्थ खर्च करण्यांत
मागें पुढें पहात नाहींत, त्यांचें मी परमेश्वर सर्वदा आपल्या
अंगें रक्षण करितों. ह्मणून मला कांहीं तरी रूप घेतलें
पाहिजे कीं जेणेंकरून माझा हा भक्त मुक्त होईल. सदा अज्ञा-
नांधकारांत निजणाऱ्या ह्या जगताच्या डोळ्यांपुढें कधीं
कधीं असे चमत्कारप्रदीप आणले पाहिजेत. तर कशा
रूपाची योजना करावी हें त्वरित सांग पाहूं.

प्रीति आहे, ती कांहीं बाई अतोनात, सांगतां येत नाहीं! कधीं बाई त्यांच्या घरीं जो, त्या सदा हस्तमुखी, त्यांचें सर्वकाळ देवाकडे लक्ष. त्या गोष्टी जरी सांगायला लागल्या तरी देवादिकांच्या गोष्टी सांगतील; गाणीं ह्मणवतील, त्यांचा अर्थ सांगतील. घरीं वेळ जात नसला तर मी क नाहीं आपली त्यांच्याकडे जाऊन वसत असतें. ह्मणजे तिकडून घरीं सुद्धां येऊं नयेसें वाटतें. काय त्या घराचा गुण आहे तो ईश्वर जाणे. तिकडे असलें किं नाहीं ह्मणजे देवधर्म करीनसा वाटतो, कुणाचा दुष्टपणा करूं नये, कुणाबराबर भांडूं नये, कुणाला लावून बोलूं नये, तिकडचें बोलणें ऐकावें, सदा प्रीतीनें वागावें, असें वाटतें.

रमा०— अशा चांगल्या बायकोवर कसा हो ईश्वर कोपला हा! धर्म करतां कर्म पाठीस लागतें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. मी त्या साधुपुरूषांनीं बांधलेल्या विहिरीवर सकाळीं पाण्यास गेलें होतें, तों रस्त्यावरून ते मेले शिपाई सावित्रीबाईच्या नवऱ्यास नेत होते त्यांला पाहिलें. तेथें त्यांला पाहून माझेचसे काय पण सर्वांचे डोळे भरून येऊन सर्वांस अगदीं गहिंवर आला, कित्येक ढळढळां रडूं लागले, काय देवा हें, अरेरे! आमच्या अन्नदात्याची काय ही दशा! असे सर्वांच्या तोंडांतून शब्द निघाले. मीं त्यांस नमस्कार केला. कित्येकांनां तर विहिरींत टाकलेले पोहोरे सुद्धां वर काढण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं. माझ्या पोटांत एकदम धस्स झालें. मला पंढरपुराहून न्याहो, असें पंत त्यांस ह्मणत होते, पण मला त्या गुलामांचीं बोलणीं कांहीं समजलीं नाहींत. तरी त्यानीं तें ऐकिलें असावेंसें वाटतें. तेव्हां ह्मटलें जावें सावित्रीबाईनां सांगायला कीं ते पंढरपुराकडून जात आहेत ह्मणून.

च. त्यांना आपल्या बुद्धीप्रमाणें दोन समाधानाच्याही गोष्टी सांगाव्या. दामाजीपंत ह्या वेळेस होते ह्मणून हजारों मनुष्यें वांचलीं. त्या प्राणदात्यास नेल्यामुळें ह्या आमच्या मंगळवेढ्यांतच काय परंतु ज्यांना ज्यांना ह्मणून ह्यांचें नांव माहित आहे त्यांना फारच वाईट वाटेल.

य०— पूतांस धरून नेलें ही जेव्हां बातमी आमच्या तिकडे कळली, तेव्हां मला सांगायाचें झालें की "अगोदर सर्व कामकाज टाकून सावित्रीबाईच्या समाचारास जा, मी ही देवपूजा करून तिकडे येतों." आह्मी सर्व मनुष्यें त्यांचे अन्नानें वाढलों आहों तेव्हां आम्हांस किती वरें दुःख झालें आहे! सावित्रीबाईवर असा दुःखाचा डोंगर कोसळेल असें वनच्या पांखरास तरी वाटलें होतें काय! हें आलेंच त्यांचें घर. आज तिकडे पहावतच नाहीं! मला बाई त्यांपाशीं काय बोलावें काय सवरावें हें कांहीं समजत नाहीं. म्हणून म्हटलें जावें सगुणाबाईबराबर, तों ह्या निघाल्याच होत्या.

रमा०— अहो हें वर्तमान इतक्यांत जिकडे तिकडे केव्हांच कळलें. तर मग एव्हां त्यांच्या घरीं पुष्कळ पुरुष असतील, मला बाई लाज वाटते, तर मागील दारानें आंत जावें. कशी हो, ती माउली आतां दिवस काढील. आतां हें मंगळवेढें अगदीं अमंगळवेढें झालें आहे! देवा, विठोबा, ह्या दुःखांतून त्यांना लौकर सोडीव एवढें आमचें मागणें आहे. आम्ही सर्वच दुर्दैवी मनुष्यें कशीं! कोणाचेंच पुण्य कसें उभें नाहीं राहिलें!

स०— तुम्हीं वाटेंत भेटल्यात म्हणून बरें झालें; बोलत बोलत आलों, तेव्हां घर लौकर आलेंसें वाटलें; चला आंत जाऊं. रमाबाई, तुम्ही चला पुढें, माझ्यानें नाहीं पुढें पाऊल

टाकवत.

रमा०— मी जातें पुढें, या मज बराबर.

स०— यशवदाबाई, चला.

य०— ही मी आपल्या बराबरच आहे. ( जातात. )

---

## प्र०६. मुजुमदाराचा वाडा.

( मुजुमदार व गणपतराव. )

मु०— काल रात्रीं बादशाहाकडून दामाजीस नेण्याकरितां चार स्वार आले, ते गांवाबाहेरच उतरले होते. त्यांपैकीं एक रातोरात मजकडे येऊन विचारूं लागलाकीं, " उस दामाजीको कौनसे तौरसे पकडें " नंतर त्यानें मला बादशाहाकडून आलेला हुकुम दिला.

ग०— वा: ! चांगलें वर्तमान आज तुम्हीं ऐकविलें. बरें काय तो हुकुम, व पकडण्या विषयीं काय युक्ति सांगितलीत, ती ऐकूं द्या तर खरी.

मु०— मीं सांगितलें कीं " दामाजी अगदीं भोळा मनुष्य आहे. त्यास धरणें ह्मणजे एकाद्या गरीब गाईला धरण्या- पेक्षांही फार सोपें आहे. त्याच्या कडून कोणत्याहि प्रकार- ची तक्रार होणें नाहीं. तेव्हां अगदीं पहाटेस तो भजन क रीत असेल त्या वेळेस तुह्मीं तेथें जावें " त्या प्रमाणें त्यांनीं करून त्याची येथून तळी उठाविली. जन्मास आल्यापासून समाधान, म्हणून जो काय पदार्थ आहे, त्याचा आजच काय तो मी पूर्ण अनुभव घेत आहें. माझ्या संतोषरूप समुद्रास आज

भरतें आलें. माझ्या, उद्योगरूपी जलानें शिंपलेल्या इच्छावल्लीस आज फळें आलीं. काय दामाजीनें हें अघोर कृत्य केलें हो ! ! आतां, त्यास सजा झाली असें वर्तमान ह्या कानीं पडलें, म्हणजे सर्व ठीक झालें. कित्येक मूर्ख लोक, वादशाहास ही मीं खबर दिल्यामुळें, मला फार दोष देतात असें मी ऐकितों, अजून माझ्या तोंडावर कोणी बोलला नाहीं. अहो, पण माझ्या तोंडावर बोलण्याची कोणाची छाती आहे ! ! कां न देतील दोष ? चोरांची चोरी जर मालकास कोणीं मुद्यासह पकडून दिली तर तो मनुष्य त्यांस दुष्ट कसा वाटणार नाहीं ? जारिणीस्त्रियांस अथवा चोरांस चंद्र, शत्रुवत् वाटला ह्मणून सर्व जगत् तसें ह्मणेल काय ? तेव्हां आपल्याच मतलबावर नजर देऊन लोकांस वृथा दूषणें देणाऱ्या लोकांच्या तोंडीं कोण लागेल ! काय लोकांचा तरी चमत्कार आहे ! दामाजीस चोर लुटारू ह्मणावयाचें तें त्यास उदार सदय असें म्हणतात ! विश्वासघात हें कलियुगांतील दातृत्व काय ? व अपराध करून मौन धरणें हा विश्वास काय ? अरे दामाजी, ह्या दातृत्वाबद्दल पुढच्या जन्मीं उत्तम फळ स्वर्गीं मिळावें ह्मणून तूं इच्छित असशील नाहीं बरें ? पण तुझें दातृत्व पडलें अतोनात ह्मणून ह्याच लोकीं तुला त्वरित फळ मिळालें ! माझा विठोबा ! माझा विठोबा ! ह्मणतोस तो आतां कोठें आहे ? अशा कर्माला बाबा देव काय करील ? गणपराव, हा पाहिलात हुकुम ? ह्यांतील मतलब असा आहे कीं. " तुम्हीं मोठे विश्वासू आहां, दामाजीच्या कृत्याची तावडतोब बातमी तुम्हीं दिली, ह्मणून दामाजीस असलेला सर्व कारभार तुह्मांला मोठ्या इतमामानें दिला आहे. तुह्मीं विश्वासानें वागावें.

दामाजीसारखी हरामखोरी करूं नये " व आणखी त्यास धरून देण्याचे कामीं मला मदत करण्याविषयींही आंत लिहिलें आहे ! आतां बादशाहास मोठी हुशारी दाखविली पाहिजे. हरतऱ्हेनें त्यास खुष ठेविलें पाहिजे. माझे शत्रूंचा आतां सुड उगवला पाहिजे. राजाचें बरें करतां प्रजेस कांहीं वाटो, मला त्याविषयीं यत्किंचितूही वाईट वाटणार नाहीं.

ग०– एकूण दामाजीपंत आज रवाना झाले. आतां तत्पक्षीय मंडळीस फार वाईट वाटेल. पण ते लोक ह्याचें कृत्य कोठें मनांत आणीत आहेत. अहो, ईश्वर डोळेझांक कसा करील ! तो सर्वांचीं कृत्यें पाहतो ! कुकर्म करणारास परमेश्वर शिक्षा करीलच करील. मुजुमदार साहेब, तुह्मांस हा अधिकार मिळाल्यानें आह्मासही फार आनंद झाला आहे.

मु०– तर आतां हळुहळू असें केलें पाहिजे कीं, दामाजीच्या पक्षाची मंडळी हरतऱ्हेनें काढून नवीन लोक नेमले पाहिजेत. तर आतां चला, आपला नवीन हुद्दा लोकांस कळविण्यास. ( जातात. )

---

## प्र० ७. स्थळ–पंढरपुर, रस्ता.

( केशवराव व विठ्ठलपंत. )

के०– अहो, विठ्ठलपंत, ह्या उभ्या दोनप्रहरीं एवढ्या घाइघाईनें, आमच्याशीं एक शब्दसुद्धां न बोलतां अगदीं अंगावरून कोणीकडे आपण चाललां ? आमचा गरिबाचा हा

एवढा नमस्कार तर घ्याल ! नमस्कार.

वि०- तें ह्या वेळेस मला विचारूं नका. देवा, मला त्य पुरुषाची भेट तरी होईल असें कर. अशा सत्पुरुषावर, एकूण शेवटीं असा प्रसंग येऊन ठेपलाना ! अरेरे ! लोकांनीं तेव्हांच भविष्य केलें होतें कीं, हें असें पुढें होणार ( व्रावृधास लागतो. )

के०- ( त्याचें धोतर धरून ) असें काय आपलें हें तुटक तुटक भाषण ? मला कांहींच समजलें नाहीं त्यांतील. भेट कोणाची ! सत्पुरुष कोण ? प्रसंग कसला ? मला सर्व सांगाल कीं नाहीं !

वि०- मला जाऊं द्या हो लौकर. ही वेळ अशी थट्टा करण्याची नव्हे.

के०- वाहवा, मी तुह्मांस नीट विचारीत असतां, तुम्हींच थट्टा म्हणतां ? काय चमत्कार ! मला सांगा काय तें नीटपणीं, म्हणजे आपण उभयतां गोष्टी बोलत बोलत बराबर जाऊं.

वि०- काय म्हणतां ? तुम्हांला अद्याप कांहींच ठाऊक नाहीं ! मग तुम्हीं करीत असतां तरी काय ? चांगल्या दोन तीन घटिका झाल्या. जो उठला तो देवळांत चालला आहे. तेथें मंगळवेढ्याचा तो आमचा अन्नदाता दामाजीपंत आला आहेना !

के०- मग म्हणतां काय तर. ते दर एकादशीस येतच असतात. मध्यें त्यांना वाटलें असेल दर्शन घ्यावेंसें. त्यांनीं आणखी धान्यविक्रय इकडे वांटण्यास आणलें असेल कदाचित्. खरा दयाळू पुरुष तो ! थांबा तर, मी कांहीं धान्याकरितां घेऊन येतों. तुम्हीं हात हालवीतसे चाललेत! एकूण त्या पुरुषाची ह्या क्षेत्रस्थलोकांवर पूर्ण कृपा खरी !

वि०— झालें सर्व बोलून तुमचें, कीं आहे कांहीं शिल्लक ? त्यांच्यावर केवढा प्राणान्त प्रसंग आला आहे, आणि तुम्हांला आपलें धान्य दिसतें !

के०— दुष्काळांतच आम्ही सांपडलों आहों ! मग धान्य कसें नाहीं दिसणार ? काय काय ! त्यांच्यावर असा प्रसंग ? बोला लौकर, मला कांहींच माहिती नाहीं.

वि०— त्याला बादशाहाच्या मनुष्यांनीं येथें कैद करून आणि- लें आहे, तिकडे बेदरास गादीजवळ न्यायाला.

के०— कांहीं तरी गप्प देतां झोकून तुह्मी. मंगळवेढ्याहून बेदरास जाण्याचा, हा पंढरपुरावरून तुह्मीं समोरचा नवा रस्ता कढला आहां वाटतें ! येथेंच जर त्यांना कैद केलें असेल तर आपलें म्हणणें संभवेल. असा ह्यानकडून त्याचा गुन्हा तरी काय झाला ? अरेरे ! त्यांना कैद केलें असल्यास मोठीच वाईट गोष्ट झाली. परंतु आपण म्हणतां असें होणें नाहीं.

वि०— अहो, मला खोटें सांगून काय मिळणार आहे ? मला- ही प्रथम आपल्यासारखेंच वाटलें. ही बातमी खोटी ठर- ली तर आम्हांलाही मोठा आनंदच आहे. परंतु आमचे शेजारचीं मनुष्यें देवळांत गेलीं होतीं, त्यांनीं त्याला पाहिलें; व सर्व हकीकत सांगितली. त्यावरून मी त्यांचे दर्शनावि- षयीं फारच उत्सुक झालों आहें.

के०— काय काय त्यांनीं हकीगत सांगितली ?

वि०— आतां बोलत बसूं नका, चला लौकर. मंगळवेढ्यास त्यानें सरकारी धान्य लुटविलें, तें इतक्यांत तुह्मी विसरलां वाटतें? त्या गुन्ह्याबद्दल त्यांस कैद केलें आहे. शेवटीं वि- ठोबाचें दर्शन घेऊन मग तिकडे न्यावें म्हणून त्यांस पंतांनीं

विनंती कल्या वरून तें सर्व प्रकरण येथें आलें आहे.

के०— हो हो आतां सर्व ध्यानांत आलें. अहो, ह्या मुसल्मानांनीं आमचा सर्व प्रकारें उच्छेद मांडला आहे ! ह्या दुष्काळांत आमचे लाखों लोक मेले ! त्यांच्यातील एकही मेला नसेल, इतकेंच नाहीं तर ते ऐषआरामांत व पैशाच्या धुंदींत इतके मग्न आहेत कीं त्यांना दुष्काळ पडला आहे, हें देखील माहीत नसेल !! अरेरे ! असा प्रकार झाला ना ? पुढें काय परिणाम होणार हें समजतच आहे. नशिबानें कोणालाही सोडलें नाहीं. हजारों लोकांचा प्राण वांचविणारा, उदार, धीर अशा एकट्या पुरुषाचे प्राण आज आमचे इतके लोक असून त्या काळाच्या मुखांत पडत आहेत ना ! आपल्यामध्यें असा एकही मायीचा पूत नाहीं कीं तो ह्या पुरुषास कोणत्याही प्रकारें ह्या संकटांतून मुक्त करील ? धिक्कार असो आम्हांस. हाय ! हाय ! काय आमची नीचावस्था ही ! ही आणखी कोणत्या थराला जाऊन पोहोंचणार ! अथवा लोक तरी काय करतील ! आपल्या लोकांचें दैवच तसें ! !

मि०— दु:ख करून आपले हातून काय होणें आहे. चला लौकर.

के०— चला. (जातात.)

---

## प्र० ८, स्थळ—पंढरपुर, विठ्ठलमंदिर.

( दामाजीपंत विठ्ठलमूर्तीजवळ हात जोडून उभे असून चौघे नासुद बाहेर आहेत व दुसरे कियेक लोक तेथें आहेत. )

दामाजीपंतः—

गीत.

अगा विठ्ठला, भक्तवत्सला, जगदाधारा, हे करकमला,
पाहुन तव ह्या वदनेंदूला, हरला मम शीण.
भूवरि तडफडणारा मत्स्य, डोहीं जातां जैसा होय,
तैसा झालों, पंढरिराय, सन्निद्ध तव येतां.
हरली माझी भूकतान, मज देहाचें नाहीं भान,
अश्रुजळानें दोन्ही नयन, भरेल हे सदया.
नयनसरीं तव दर्शनधारा, पडतां अति हे कृपाजलधरा,
प्रेमजळाचा पूर उदारा, आला सर्वांगा.
अवतार तुझा हा जरि बौद्ध, मजशीं बोलाया नणुं सिद्ध
दिससी, तरि वा बोल मुकुंद, एकांतीं मजशीं.
अपराधी मी बहू पातकी, दंडाया हा योग्य घातकी
म्हणुनी मजला राजसेवकीं, धरिलें हे ईशा.
आले मनिं जे प्रेमोद्गार, काथतों तुजला ते साचार.
मग मज तार अथवा मार, नतरक्षणदक्षा.

हरिणी.

उदक लवही पर्जन्यानें दिलें नच धान्यही !
लयसमय हा वाटे जाळी क्षणांत अतां मही !
हर ! हर ! किती अन्नें मेले ! श्मशानाचे भू दिसे !
तव अवकृपा होतां देवा, करील जगत् कसें ?

शिखरिणी.

क्षुधेनें यत्कंठांतुन असु निघायास बघती !
अहा ! गेले खालीं नयन अति उदांचे वदुं किती !
करीं, दीनावस्था, उदर मज दावून कथिती !
मदुद्यत्नें आल्या ममगृहिं अशा याचकतती.

त्यांतील मुलें तर असें म्हणत कीं:—

भुजंगप्रयात.

" अगे आइ, दे गे मला खावयातें !
तुझ्यावीण, आई ! असे कोण मातें ?
नको चिंत्ति आणूं जरी हट्ट केले!
अगे आइ गे, प्राण माझे भुकेले ! "
असे बोल ते बोलतां ऐकवेना !
सुदीनांस मातांसही पाहवेना !
तधीं वाटले बोल हे रे दयाळा,
जणूं कापिती अंतरींचा जिव्हाळा !

द्रुतविलंबित.

किति सती पडती पतिंच्या पदीं,
पति तयां वदती मृदुलीं पदीं
" अवन जो करितो अखिला जगा,
हरि रमापति कोमलगात्र गा."

दिंडी.

तयां पाहोनी हृदय फार फाटे !
कसें ' नाहीं ' मी बोलुं मुखावाटे ?
धान्य द्यावें मन्मनीं असें आलें,
अहा तत्कातिफल आजि हें उदेलें !

वैतालीय.

अयि ! शब्द न बोलवे मला, तनु रोमांचित, कंठ दाटला !
अपराध असेल सत्य हा तरि शिक्षा करिं मी उभा पहा !

( डाळ्यांत पाणी आणून ) हे परब्रम्ह, विठ्ठलेशा, तुझ्या चरणांपाशीं म्या मूढानें अधिक काय बोलावें सर्व हें हृद-

**दामाजीपंत:**— ...तच आहेस, इतके दिवस मीं तुझें एकाग्र ... ध्यानपूजन कांहींच केलें नाहीं. त्यामुळें आतां मला ...ार अनुताप होत आहे ! परंतु घराला आग लागल्यानंतर विहीर खणावयास लागणें काय उपयोगी ? अथवा, कफानें ज्याचा कंठावरोध होत असून पाय गार पडत चालले आहेत; सभोंवार माता, स्त्री, बाप, बंधु इत्यादि आप्तजन शांतपणें त्याच्या मुखाकडे पहात आहेत, व मधुन मधून अतिवात्सल्यानें स्त्री, माता निराश होऊन एकदम रडून मोठा हृदयभेदक कोलाहल करीत आहेत, व कपाळवक्षस्थळादि हातांनीं, हाय ! हाय ! ह्मणून पिटीत आहेत; त्यांस दुसरे लोक, "अहो, तुम्हीं हें काय मांडलें आहां ? अशीं घाबरतां कां ? ते आतां सावध होतील. तुमच्या रडण्यानें ते जास्त घाबरत आहेत" अशा प्रकारें समजावीत आहेत, अशा स्थितींत आंथरूणावर पडलेल्या मनुष्यानें—किंचित् शुद्धींत असून—कृतपापाचा पश्चात्ताप करून उपरांत सदाचरणानें वागण्याचा दृढनिश्चय केला तर तो जसा व्यर्थ आहे, त्याप्रमाणेंच आतां माझें बोलणें व्यर्थ आहे ! देवा, मी केलेलें कृत्य मला अपराध आहे असें वाटत नाहीं ! व बादशाहाचें करणेंही अन्यायाचें आहे असें नाहीं ! तो कांहींही शिक्षा करो, जन्मपर्यंत बंदींत टाको अथवा ठार मारो. ती भोगण्यास मी समर्थ आहें. परंतु, देवा, माझें तुझ्याजवळ एवढें मागणें आहे कीं, मी कोणत्याही स्थितींत असलों तरी मला तुझें मात्र विस्मरण होऊं नये. तुला मी दुसरें कोणत्याही प्रकारचें संकट घालीत नाहीं. मी हें संकट आहे असें मुळींच समजत नाहीं. जें जें ज्या ज्या काळीं व्हावयाचें तें होणारच ! तें कधींही

चुकणें नाहीं. देवा, वृक्षाचें एकही पान जर तुझ्या आज्ञे-वांचून हलत नाहीं ! तर बादशाहाच्या अंतःकरणांत तुज-वांचून दुसरा कोण प्रेरणा आणणार आहे ? तुजकडून अन्याय्य कृत्य कसें होईल ? इक्षूपासून कधीं कडु रस निघेल काय ? विठ्ठला, आज सकाळीं ज्या वेळेस मी इकडे यावयास घराहून निघालों, त्यावेळेस तिणें जें कांहीं केलें तें सांगतां येत नाहीं. हाय ! हाय ! तेव्हां माझी, विठ्ठला, तुझ्याजवळ एवढी विनंती आहे कीं, तिच्या जीवांत जीव आहे तोंपर्यंत त्या साध्वीचें त्वां रक्षण करावें. माझें तिला विस्मरण पाडून, सर्वदा तुझ्या चरणाचें स्मरण होईल असें कर. हंजारों लोकांस एकदम स्वाहा करून टाकणारा, ह्या दुष्काळा सारखा भयंकर अग्नि ह्या पृथ्वीवर कधींही पेटवूं नको ! अहाहा ! काय तुझें नेत्रांला आनंद देणारें ध्यान हें ! हे कटीवरील हात भक्तांनां भवसिंधूच्या खोलीचें परिमाण दाखवितात काय ! हें पंढरपुर भक्तजनांचें माहेर घर, प्रति वैकुंठच. येथें वैराग्यशाली मोठ मोठे प्रेमळ भक्त पुष्कळ होऊन गेले. आजपर्यंत कोट्यवधि लोकांनीं ह्या चरणसरोजीं आपलीं मस्तकें ठेवून ते भ्रमरांप्रमाणें तृप्त होऊन गेले आहेत. ( खालीं दगडांकडे पाहून ) हीं नांवें देवद्वारीं येणाऱ्यांच्या पायांनीं झिझावीं ह्यासाठीं खोदलीं आहेत काय ? अहो भाविक-लोक हो, तुम्हीं ह्या परब्रह्माच्या दर्शनानेंच मुक्त झालां आहां. हे पंढरीच्या आई, विठाई, माझें मन येथेंच रमलें आहे. अभागी मी; अशा स्थळीं मन रममाण झालें असतांही मला रहातां येत नाहीं. काय करावें; हा देह पराधीन पडला ! बाहेर राजाचे मनुष्य वाट पहात असतील ! !

देवळांतीललोक— अगा हे साधो, दामाजीपंता, काय हा आपल्यावर प्रसंग ! यथाकाळीं विपुल फलें देणारा, व मार्गानें श्रांत झालेल्या लोकांस दाट, रम्य व विस्तीर्ण छाया देणारा असा आंब्याचा वृक्ष जसा वादळानें एकाएकीं भूमीवर पडावा ; किंवा, कृष्णपक्षीं सूर्यास्ताचे वेळीं गांवापासून दूर अंतरावर, सकुटुंब जाणाऱ्या पांथस्थाच्या गाडीचें एकाएकीं जसें चाक मोडावें ; त्याप्रमाणे आमची गति झाली आहे! आपण देवाजवळ सांगितलेली सर्व हकीकत आह्मांस कळली. आपण आल्याचें वर्तमान ऐकून पुष्कळ लोक आपल्या दर्शनास आले आहेत. व एकसारखे येत आहेत! काय गर्दी ही! आपले उपकार हे पंढरपुरस्थ लोक कधीं तरी विसरतील काय? आपल्यासारखे पुण्यात्मे जगतावर मुळीं कधीं काळीं लोकहितार्थ जन्मतात, आणि त्यांची ही स्थिति व्हावीना !! अशा सत्पुरुषास बादशाहा पकडून नेत आहे ! मूर्खा बादशाहा, तुझ्या पदरीं हा परीस आहे हें तुला कोठून समजणार ? पंत, आपण बेदरास जाऊं नये, आह्मी या बादशाहाच्या मनुष्यांस येथें पकडून ठेवितों, तुह्मी जाऊं नये. तुमचा वियोग आह्मांस कसा सहन होईल ?

दा ०— लोकहो, असें करणें योग्य नाहीं. मनुष्यावर कसाही संकटाचा पर्वत कोसळो, त्याणें धैर्यवज्र हातीं धरलें ह्मणजे बस आहे. नीतीचा पदर कधींही सोडूं नये. मरण आज किंवा शंभर वर्षांनी निश्चयानें येणारच, मग पापाचा संग्रह करून नरकाचें साधन उगाच कां म्हणून करावें ? अहो, सत्य व सच्छील कधींही सोडूं नये. पुण्याचरण करून मानवदेहाचें सार्थक करावें.

मो० सौ०— ( आंत येणाऱ्या मनुष्यास ) अरे ए भाई, तू अंदर जाता है तो हमारा आदमी दामाजीपंतको जाके ऐसा सुना के, दरोजेपर जवान खडे तेरी रहा देखते हैं. तूं जलदी नहीं आवेगा तो हम् बेधडक अंदर चले आवेंगे.

मनुष्य—( घाबरून ) होहोहोय, ससरसरकार !

लोक—सत्पुरुष संकटसमुद्रांत बुडत असले ह्मणजे ते सद्गुणरूप नावेला अधिकच लगटून रहातात. कापूर जळत असतांही तो जसा अधिकाधिक सुवास देतो तसे सत्पुरुष संकटावस्थेत, परोपकारादिकाचा अधिकच अंगीकार करतात. पंत, घरांतील कुटुंबाची सर्व मनुष्यें एकत्र जमून सुखाच्या गोष्टी बोलत असतां तें घर जसें एकदम कोसळून पडावें त्या प्रमाणें, हें आह्मांस आपल्या वियोगानें दुःख होणार आहे ! देवा, विठोबा, पंतांचा तुझ्या चरणीं किती भाव आहे हें तुला काय सांगावें ? सर्व प्रकारें, त्यांचें तू रक्षण करून दीननाथ हें आपलें ब्रीद सार्थ करावें. तूं भक्ताधीन आहेस ! तेव्हां ह्याचा साक्षात्कार दाखविण्यास हा समय योग्य आहे. हे उदारपुरुषा, आह्मांस आपली भेट पुनः [illegible] होईल ती होवो ! आज आह्मांला कडकडून आण[illegible] [illegible] ( सर्व भेटतात. )

दा०— [illegible] विलक्षण आहे. मला हें देवालय, हें मजवर प्रीति करणारे लोक सोडून जाऊं नयेसें वाटतें. पण काय करूं ! मन स्वाधीन केलें पाहिजे. बाहेर ते वाट पहात असतील. ( डोळे भरून येतात. )

लोक०— अहो काय करावें ! आमच्या डोळ्यांतील पाणी खळतच नाहीं, तुमच्या ठिकाणीं जी आमची प्रेमबुद्धि आहे ती काय सांगावी ? तुमच्या दर्शनमात्रेंच बादशाहा दयाळ

होऊन तुह्मांस सोडून देईल यांत संशय नाहीं. आपल्या परत येण्याची आह्मी चातकाप्रमाणें वाट पहात आहों.

३६
चोपे०— ( बाहेरून ) अबे दामाजी, बाहेर आता या नहीं, हमारीभी खराबी किया चाहताहै ? अब हम् यहां कभी नहीं ठैरेंगे.

दा०—आलों आलों. मजकडून उशीर झाला खरा ! ( विठोबाच्या चरणीं मस्तक ठेवून अश्रुपूर्वक ) विठाई, हें तुझें मला शेवटचें दर्शनना ! माझे सहस्रशः अपराध तुजवांचून पोटांत कोण घालणार आहे ? देवा, हे चरण मला सोडून जाऊं नयेसें वाटतें. पण काय करूं ! देह माझा तिकडे विकला आहे. विठ्ठला, येऊना आतां ? दयाळा, ह्याला विसरूं नको. (लोकांस) लोकहो, ईश्वर सर्वज्ञ आहे, तो ज्या स्थितींत ठेवील त्यांत संतोष मानून राहावें. मी तुह्मांस हा शेवटचा नमस्कार करतों. आपली कृपा असूं द्यावी.

लो०— ( नमस्कार करितात. ) महाराज, आपली असली पाहिजे. शेवटचा नमस्कार ह्या आपल्या ह्मणण्यानें तर आमचीं अंतःकरणें अगदीं चर चर कापत आहेत. जास्त कांहीं बोलवतच नाहीं. आमचे कंठ दाटून आले.

दा०— ( चाललेसें करून ) अरे ! येथेंच मला पाऊल टाकण्याची शक्ति नाहीं ! मग आतां मी साठ पांसष्ट कोशांचा मार्ग कसा क्रमण करूं ! अरे, अद्याप माझें स्नान होणें आहे ! संध्या व्हावयाची आहे ! मला प्रातःस्नान अंतरलेलें कधीं आठवत नाहीं. काय करूं ? आतां रखमाईच्यादेवळांत जावें. ( चालून ) हे रुक्मिणी आई,

द्रुतविलंबित.

भववनांत मृगासम मी अहा !
व्यसनवन्हित सांपडलों पहा !
अहह ! लुब्धक हे, असु घ्यावया,
असति पाठिशिं दे तव आश्रया.

अगं हे अंबिदेमाते, मी तुला अनन्यभावें शरण आलों आहे. तुझी मूर्ति सर्वकाळ माझ्या हृदयांत असावी, पतिवियोग साध्वीस्त्रियांना किती दुःसह आहे हें सीतावतारीं तुला माहीत आहेच तिचें रक्षण सर्व प्रकारें आतां तुला केलें पाहिजे. दुसरें तुजपाशीं कांहीं मागणें नाहीं, आपल्या कर्माप्रमाणें मनुष्यास फलप्राप्ति होणारच, मग संसारांत मनुष्यमात्रावर येणारीं जीं स्वाभाविक संकटें त्यांविषयीं विषाद मानणें व्यर्थ होय ! माझे डोळे भरून आले, अधिक काय सांगूं ? आई, आतां मी बेदरास चाललों बरें ! (नमस्कार करतो. )

मी० सै०— अरेभाई दामाजी, बातें करके हमको यहां देरी मतकर, बडी तारीफ है ! अरे तेरेपीछे लोगोंका हलका कितना जमा ! गुलामहुसेन, हमारा तो सात्र मग्ज फिरगया.

दा०— ( लोकांस ) तुह्मीं आतां माझ्याबराबर येण्याचे कशाला व्यर्थ श्रम घेतां ?

तिघे— दामाजी, चलो जल्दी, नहीं तो हम् धक्के मारेंगे.

दा०— निघा, हा मी तयार आहे.

लो०— पंत, तुह्मी लौकर परत यालं, पंढरीनाथ तुमची कधीं उपेक्षा करणार नाहीं.

दा०— लोकहो, येतों आतां, नमस्कार, मजवर लोभ असावा.

लो०— नमस्कार, महाराज, लौकर या. शिव ! शिव ! काय प्रसंग हा !

दा०—( साश्रु ) विठोबा, हा माझा तुला शेवटचा नमस्कार.

मी० सं०—चलोजी जल्दी पांव उठाओ.

( सर्व जातात. )

## अंक. ६.

### प्र० १. स्थळ—बेदर.

( अंत्यजरूपधारी विठ्ठल प्रवेश करितो. )

वि०— (आपल्याशीं) मीं आपल्या भक्तासाठीं हें महाराचें रूप धरिलें आहे. जो मला अनन्य भावें भजतो तो कोणीही असो, मी त्यास जन्ममरणापासून मुक्त करितों. मला भक्तांवांचून प्रिय कांहीं नाहीं ! मी त्यांच्यासाठीं पाहिजे तें करण्यास तयार आहें. अहाहा ! डोकीस बांधलेलें हें फडकें, वैडूर्यरत्नांच्या किरीटीपेक्षां मला कितीं प्रियकर वाटत आहे ! कारण तो मुकुट पहाणाऱ्यांस मात्र शोभादायक दिसतो, परंतु हें भक्ताच्या कार्यीं लागलें आहे. हे कर्णांमध्यें पगर घातले आहेत, ते जणुं असें सांगत आहेत कीं, बा, भक्तासाठीं लौकर धांव मार ! ज्या स्थानीं रत्नकुंडलें घर्षण पावतात, तेथें गंधाचे शुभ्र पटे लाविले आहेत ! कंठांतील वैजयंती माळेचा आज काळा दोरा करावा ला-

-गला ! हें ह्या हृदयावरील शुभ्र आवर्ताकार श्रीवत्स-लांछन, ही काळी घोंगडी उजव्या खांद्यावरून घेऊन लपविलें आहे. शंखचक्रादि आयुधांचा त्याग करून गदे-ची लांब खुळखुळी काठी केली आहे. पीतांबराच्या ठिकाणीं दीड हाताची लंगोटी लाविली आहे. ( चालून ) पायांत् वहाणा तर करकर वाजत आहेत. भाकरीही कंब-रेला बांधल्या आहेत. पुढें माझे भक्त या रूपाचें प्रेम पुरःसर ध्यान करून मला आठवितील. हें पोतें बादशाहापु-ढें ओतावयाचें. ह्यांत तेथें एक लक्ष अडसष्ट सहस्र रुपये असले पाहिजेत. येथून बादशाहाचा वाडा अर्ध कोशही नाहीं. आतां चलावें हळू हळू. सरकारांत थेट महाराची भाषा बोललें पाहिजे. दामाजीला पंढरपुराहून निघून आ-जचा सहावा दिवस. अजून त्याला यावयाला तीन दिवस तरी पाहिजेत. हा कागद दरबारीं द्यावयाचा. ( उघडून ) थेट हें पंतासारखें अक्षर आहे ! ह्यांत तितके रुपये पा-ठविल्या विषयीं लिहिलेलें आहेना ? ( चालून ) हाच त्या-चा वाडा ह्यावेळेसच तिकडे वर्दी द्यावयास जावें हें यो-ग्य. हे मद्भक्ताशिरोवतंस दामाजी, अगा साधो, बा आतां कष्टी होऊं नकोस. हा पहा, तुजकारितांच राजवाड्यांत मी प्रवेश करीत आहें. बादशाहा, वजीर, काजी व दुसरी मंडळी आंत गुप्त कामासाठीं जमली आहे, तर हा समय आंत जावयास उत्तम आहे. बरें झालें ही देवडीही आली. ( उघड ) अबे जमादारसाब, मंगुळ्याहून इन्या येसूकर आलाया म्हुन सरकारच्या पायांजवळ वर्दी द्येवा.

देवडीवाला—( धमकी देऊन. ) अबे पीछे हट, समझतां नहीं ! पातषाहा, वजीर, बगैरे दूसरे सरदार कुछ मखफी मसलेहत

करनेके लिये अभी बैठे हैं, सो इसवख्त किसीको अंदर न जानेके लिये सख्त हुकुम है, फिर तू कैसा जावेगा ? इस-वास्ते आयेसो रस्तेसे चलाजा, नहीं तो नाहक धक्के खायेगा.

विठू– अवो, माज लइ निकडीच काम हाय ( पाटीवरच्या पोयाकडं बोट दाखवून ) ये बगा, जपुनद्यान आनूतां आनूतां माझा जीव अक्शी बेजार झालाया ! आज आट घा दिस झोप न्हाइ. तवां कुरपा करूनशेनी गरिबाची दात लावो.

दे[४१]० – वो कुछ नहीं, गर्चे हजार बहाने तू बतावेगा तोभी तेरी बात हरगिज नहीं मानुंगा. इसलिये यहांसे चला जा नहीं तो, ( तलवावार दाखवून. ) ये देख, तलवार कैसी चमक रहीहै

विठू– ( मनांत ) काय मला हा शस्त्राची भीति दाखवितो !! ( उघड ) आव, हा पैसा सर्कारामोहूर भरायचा हाय, तवां मला आंत मंदी जाऊं द्या.

दे[४२]० – अछी बात है, अंदर जाके मै वर्दी देताहूं, लेकिन ( बोटांनीं कांहीं खूण करून खिशांत हात घालतो. )

विठू– अवो, आमी खेड्यार्ची मानूस नीट समजूनश्येन सांगाव-( देवडीवाला, त्याच्या कानाशीं तोंड लावून कांहीं द्रव्य मागतो; विठू त्याचे हातावर टेवितो. )

दे[४३]० – अभी अंदर जाके तेरी वर्दी देताहूं, ( देवडीवाला आंत जातो. )

( इतक्यांत पडदा उघडतो आणि पूर्वी सांगितल्याप्रमाणे पातषाहा वगैरे मंडळी आंत असते. )

पा० – अजी वजीरसाहेब, कुछ जरूरीके कामकेलिये देड एक

लाख रुपयोंकी गरज है सो उस रुपयोंके लिये जलदी तजवीज होवे.

४५ वं०— मालिक, हाल पूछो तो बाकीमेंसे रुपये निकाले इसमें कुछ हासिल नहीं, क्यों के आज खजानेमें रुपयोंका बहोत तोटा है, गर्च इसमाफिक अतराफके लोगोंको समझे तो हमारे सल्तनत्कोभी धक्का है; ( मनांत ) अभी अतराफके सरदारोंसे चवथाई नहीं आई क्या करें. ( उघड ) अगर हुजूरको रुपयोंकी वहोत जरूरी है तो हरएक वहानेसे अभी ला हाजिर करताहूं फिकर करना कुछ गरज नहीं.

४६ दे०— ( सलाम करून ) गरीबपरवर, मंगलवेढेसे कोई जुवान आयाहै, सो अंदर आनेके लिये अर्जमंद है.

४७ कॉ०— सरकार, चंद्ररोजके नीछे दामाजीपंतको पकड लानेकेलिये जिस जवानोको भेजथे, षाद वे आये होंगे.

४८ पॉ०— ( रागाऊन. ) हां सच है, उस बदमाष दामाजीको कत्ल करनेकेलिये जिस जुवानोंको मै भेजाथा, सो वे आपने कामसे फता पाके आये होंगे, ( देवडीवाल्यास. ) अच्छा, उनको अंदर आनेकोलिये हुकुम करो.

४९ दे०— ( विठूजवळजऊन. ) अबे ओ भले आदमी, तुझको अंदर आनेके लिये हमारे सरकारका हुकुम हुवाहै, चल जलदी.

५० कॉ०— नहीं, उसको पकडलानेके लिये हुकूम हुवाथा फक्त.

५१ पॉ०— क्या ? पकडलानेकेलिये मै हुकुम किया था ? अच्छा कुछ मुजाका नहीं उसको अंदर लेआवो, ( तल्वार बाहेर काढून, मोठयानें. ) उस हरामखोरकी गर्दन इस खंजरसे अभी उतारताहूं.

( इतक्यांत विठूमहार येतो. )

वें०— अरे ये कौन है? अत्रे तो दामाजी, और यहांसे गयेसा जवान किधर है? और ऐसे दीवाने आदमीको यहां किस वास्ते लाया?

दू०— गरीबपरवर, फक्त ये अकेला मंगलवेढेमे आया है, और दूसरा तो कोई नहीं, सरकारके कदमोंके नस्दीक फक्त इसीकी लिये वर्दी दिया था.

वें०— बहोत अच्छा, इस दीवानेको बाहेर निकाल, खबरदार फिर ऐसे आदमीको अंदर आनेदेवेगा तो सख्त सजा पावेगा.

दू०— ( विठूस धरावयास जातो. इतक्यांत )

विठू- खाविंद. सर्कार, माबाप, लइ दयावंत धनी त्याच इमानी चाकर आमच समद्या गोरगरिबांच परानदात दामाजीपंत त्येनी ( हात जोडून ) मला सर्कारकडे धाडूल हाय.

वें०— अरे ए कौन आदमी है? दामाजीको ईमानी ठैराके और उसकी तारीफभी करताहे.

विठु— आव आपल मंगुडच्याच ठानदार दामाजीपंत त्येच्याकडून ये पैसे घेऊनश्यान, मी आलोया. त्येनी लकोटाबी दिलाया ( लाखोटा पुढें टाकतो )

वें०— ( लाखोटा हळूच वाचतो व हर्ष पावून पातषाहास. ) हुजूर, बडी अजायबकी बात है, और उसमें खुषी ए है के, जिस रकमके लिये सरकार मेरेतें हुकुम कियेथे, सो खुदायेतालानें वोही रूपयें भेज दियें, सो परवरदिगारकी हमपर कमाल मेहरवानी नजर आतीहै.

पा०— अव्वल ए दरियाफ्त करो के इतनी बडी रकम किसके तरफसे आई है!

-- मालिक, इस खतपरसे युं जाहिर होता है, के दामाजी पंत जोके अनाज लुटवा दियाथा, सो उसका पैसा भेज दिया होगा, ऐसा मालूम होताहै.

कों०— क्या? ये सब रुपये दामाजीनें भेज दिये? बडी तारीफ है, और वो कित्ने रुपयें हैं.

वं°०—एक लाख अडसट हजार इस खतमें दर्ज किया है, और मिन्नतोजारिसे युं लिखता है, के बडी रकम एकदम भेजनेकी थी उसके सबबसे देरी हुई, इस लिये मेरेपर मेहेरबानीकी नजर करके इस बंदेके तें हुजूरके साथ दौलतमें सरफराज करें, और जोके सात सौ खंडी अनाज खर्च किया गया उसका बराबर हिसाब करके तमाम पैसा भेज दिया है, इस माफिक तमाम उसका मजकूर है.

कों०— खर्च हुवासो अनाजका इतना पैसा भेजा है? बडा नेकबख्त सरदार है.

वं°०— बडी अजब तऱ्हाकी महेंगाई हुईथी, के सब लोग तमाम बेहालीमें गिरफतार होके मुफ्त गरीबोंकी जानकी खराबी, अक्सर करके रुपये पायली अनाज लेनेकोलिये रइयत तय्यार थी, मगर वोभी मिलना मुष्किल हुवा, युंभी जाहिर करता है.

पं°०— ओहो!! दीमाजी इतना हुषियार और भरोसेदार आदमी! लेकिन उसकेलिये मंगलवेढेसे दुष्मनोंका अर्ज आया है! ऐसा लिख भेजनेहारा कौन होगा?

वं°०— मालिक, जिसनें अर्ज भेजा हैं, वो आपना मतलब हासिल करनेकेवास्ते, दामाजींपंतके दावेदारीसे लिख भेजा होगा, ऐसा तो खास मालूम होता है.

कों०— सच है, इसमें कुछ षक नहीं.

दि० – ( विठ्ठलास. ) क्योंबे, इस थैलीमें रुपयें कितने हैं सो तुझको मालुम है ? ( थोडा थांबून ) वा: इसको हमारी जबानभी समझना मुष्किल है.

विठू – ( हात जोडून ) आपली जबान–बोली ! व्हय म्हाराज, व्हय उलि उलिस उमंगत, पुन् बोलतां न्हइ येत.

दि० – अजी काजीसाहेब, इन मरेटोंकी बात हमारे मतलब के माफिक हमको समझती है, लेकिन बातें करना नदारत, सच पूछो तो मरेटोंकी और बम्मन लोगोंकी जबानीमें बहोत तफावत है. बम्मनोंकी बात समझती है, और इनकी बात हमें समझना जरा मुष्किल है. खैर, अबे वीठू, इस थैलीमें कितने रुपये हैं सो तुझको मालुम नहीं ?

विठू – म्हाराज, रुपये पुसता व्हय, ( कानांवर हात ठेवून ) काय कि बा ! आपनाला ठाव न्हाइ. लकोट्यामंदी लिवूल असयाल. ह्ये घ्या मजूनरयान. ( पोतें खालीं ठेवितो ) आन् पावती द्या.

का० – अरे मंगलबेढा छोडके तुझको आज कितने रोज हुये ! भला, आते वख्त सरकारी जवान कोई तुझको नजर आये?

विठू – मी व्हय निगुतच निघालों. त्येनी न्हाइ मला पाइल, पुन् सर्कार, मी आपली समदी मान्स पायली.

दि० – (पातषाहाकडे पाहून ) मालिक हमारे काजीसाहेब उसको जो कुछ पूछे सो उसनें उसका क्या जुवाब दिया, हाल हमें तो कुछ समझ नहीं पडी, खैर, इस बातके लिये उसके पूछना कुछ गरज नहीं. हाल कहोतो अपने दामाजी पंतको रसीद लिखदेना है, उसके सबबसे अव्वल रुपयोंकी गिन्ती होना चाहिये. अरे म्या चोपदार, खजांची साहेबको इसी वख्त यहां हाजिर होनेकेलिये जाके जलदी वर्दी सुना

चो०— बहोत अच्छा मालेक, उनको अभी ले आता ( त्याला चोपदार घेऊन येतो. )

ख०— (सलाम करून.) क्या हुकूम है सरकार ?

प०— खजांची साहेब, ये रूपये कितने है सो गिनके बतानेकेलिये आपको तकलीफ दिये है.

ख०— ( थैलीकडे पाहून. ) मालिक, मेहेरबानी करके कोई मददगार दिलवावोगे तो एक पलभरमें गिनके बतलाताहूं. क्योंके थैला बडा जबरदस्त नजर आता है.

प०— बहोत अच्छा, आपको अभी मदद दिलवाताहूं, लेकिन एक बाजू बैठके गिनो. ( खजांची आंत जातो. )

पां०— ( विठूकडे पाहून मनांत. ) ये आदमी यांह आये जबसे मेरा दिल बहोत खुषी और खुर्मीमें है क्या है सो मालुम नहीं पडता ! ( विठूस ) अबे ए भले आदमी, इधर सामने तो आ, आज कितने रोजसे दामाजीपंतके नस्दीक तू नौकरी करता है ? तेरेको कुछ तनखाभी मिलता है ? और तेरा नाम क्या है ? सो ये तमाम जल्दी जाहिर कर.

विठू— ( मनांत ) आतां येथें फार वेळ रहातां कामा नये. ( उघड ) मला व्हय ? इटुम्हार म्हनत्याती मी येस्कर हाय. मी उमाप वर्स दामाजीपंताकड हाय. थोरल्या दादाच्या येळेपुन् मी आज त्येंच्याकड एक इसा आन् आट वर्स हाय. मला तन्का व्हय; तन्का ? सर्कारच उमाप बिग श्यात हाय. आन् गावांत बलुतबी हायना!

पां०— हां सच्च है, ये आदमी दामाजीका बडा भरोसेदार है; और इसीके सबबसे इतनी बडी रूपयोंकी थैली इसके बराबर भेजा, अब ये सच्च हैके जिस किसीके मेहेरबानी

में हरहमेषा पालाजाता है, फिर उसको तनखेसे क्या निसबत ? अच्छा, वे वीठू, तू हमारेपास रहेगा ? रहे तो माहावारभी अच्छा मिलेगा.

विठू- नग साब, नग बाबापच बर. तो बाबा लय दयाळू बामन बगा, आन् माझ्यावर त्येचा अवशीं समदा लोब. हरघडी त्येला इटु पायजे. माझ्या बिगर त्याला काइ सुचत न्हाइ, तवा त्येला, ह्याजी रुकमी आन् माजा ल्योक पुंड्या त्येला सोडूनश्यन नगरे नग. मी आपल्या खेड्यामंदाच बरा. मला चिटी देवी म्हंजी झाल.

पा०- अजी वजीर साहेब, जो कुछ लिखदेनाहो सो लिखो, और उसको जलदी भेजो. रुपयोंकी गिन्ती फिर कियेजायगी, क्योंके आपना दामाजी बडा तमीज और भरोसेदार आदमी है, दगाबाजी कभी नहीं करेगा, इस वास्ते रसीद तय्यार करके उसके सुपर्द करो के वो चला जावेगा. अजी वजीर साहेब, जिस बदखोरने दामाजीके दावेदारीसे दरबारमें अर्ज लिख भेजाथा, गर्चे उसके अर्जमें लिखेहुये मतलबपर भरोसा देते, और रुपये आनेके अव्वल दामाजी यहां आता तो बिचारा मुफ्तमें मारा जाता ! उस ठगबाजने आज बडी हुषियारी किईथी, मगर फ़ंसगया, ऐसे झूट खत लिखनेहारे बदमाषकी अभी कोषिष करके पकड मंगावे, बाद इनसाफके उसे कैद या कत्ल करें.

कॉ०- हुजूर, वहोत करके दामाजीपंत; और अपने जुवान दोतीन रोजमें आवें, बल्के षहेरके नस्दीकभी आन पहोंचे होंगे, फिर जो कुछ बात गुजरी है सो वे आयेबाद तमाम मजकूर उनके मूंसे जाहिर होगा; फिर उस लिखनेहारे दुष्मनको जो कुछ सजा हमारे दामाजीपंत मुकर्र

करें सो वो देनेमें आवेगा.

ध॰ ०– हां सच है मालिक, हमारे काजी साहेब जो कुछ फि
दवीमें अर्ज किये हैं उसी माफिक किया चाहिये.

पां० ०– बहोत अच्छी बात है.

विठू– रूपये मुजूनश्यान घेऊन कुरपा करून मला चिटी लिवून
द्येन देवी. द्ये दोनशें कमी असत्याल तर मी पुना जावुन
घेऊन येईन.

पां० ०– अरे वीठू, तू जातका धेड है, लेकिन जो जो तू बातें
करता है सो मेरेको बहोत पसंद आके दिलकेतै आरामभी
होता है ! इसका क्या सबब है सो कुछ मालूम नहीं होता!
तू यहांसे न जावे तो बहोत अछा होवे.

दि॰ ०– क्यौंजी खजांची साहेब, रूपयें अबतक नहीं गिनें ? रसीद
जलदी लिखदेनेकेलिये सरकारका हुकुम है, चाहतेहो तो
और दूसरोंको मदद लेके जलदी गिनके बतलावो.

ख॰ ०– ( आंतून ) मालिक, सब मिलके सव्वालाख रूपयें गि-
नाहूं, इतनेमें रसीद लिखनेकेवास्ते हुकुम करो तो बा-
कीके रूपयें अभी गिनके आपको इतला करताहूं.

दि॰ ०– ( पातषाहास. ) मालिक, मुतसद्दी तो रसीद ' लिख
तय्यार कियाहै, मगर उसमें कम जियादा कुछ करनाहो
सो हुकुम किजिये तो उस माफिक करनेमें अवेगा.

का० ०– अजी दीवान साहेब, उसमें हमको फक्त रूपयें पहोंचे
इतना जाहिर करो, बाकी लिखना कुछ गरज नहीं.

धा॰ ०– हां, जबके दामाजीपंत यहां आनके खुदके कामके-
लिये और उसके दुश्मनकेलिये क्या बोलता है सो सब
जाहिर होगा फिर इसमें दर्ज करना क्या गरज है ?

दि॰ ०– ( विठूस पावती देतो. ) अबे वीठू, तेरे खाविंदने जो

कुछ रुपये भेजे थे, वे तमाम हमको पहोंचे, ऐसा बोलके ए रसीद उनके हातमें दे.

विठू— यामंदी समद बराबर लिवल हायनां म्हाराज ? तुमी माज्या धन्याला आनन्याला मान्त धाडलीं हायत काय ? अर ! अर ! काय तुमी केलया ! माज्या धन्याबानी इमानी चाकर कंदी कंदी तुमाला गवसायंच न्हाइ. लइ ( हात वर करून ) इस्वास् बगा सव्र्यासनी गरीब. अकशी पंडरीच्या इटोबाला भंजत्याती आन् लइ धार्मिक बगा.

पॉ०— खैर, जो कुछ होना था सो हुवा, लेकिन इसके मारिफत• से उसकी मुलाकात तो होगी, अब वीठू, तेरा धनी जो दामाजीपंत अभी आवेगा, उसकी और तेरी यहां मुलाकात भी होगी जबतक जानेकी फिकीर मत कर, मेरे दिलको ऐसा मालूम होता है के तू हमेषा मेरे नस्दीक रहे, इस तख्तपर आनके बैठें, और साथ तेरे हम् बगलगीर होवें ऐसा चाहताहूं, और तेरेसे गुफ्तगू करना जो कुछ मेरे दिलमें है, सो ए लोग हसेंगे, इसलिये कुछ इलाज नहीं, खैर, मैं तेरेको खूब देखने चाहाताहूं, सो तू इधर आ.

विठू—( मनांत ) आतां येथें फार वेळ राहणें योग्य नाहीं ( उघड ) आब अस काय लंगता सर्कार ! मी जातीचा ध्येड हाय ध्येड, येस्कर पार्टीला कस शिवाब आमी ? संमद लोक हसंयाल ( घोंगडी सांवरून आणि कपाळावर हात ठेवून ) माज्या बाबासनी धरायला पाटिवल, हे बगा लइ वंगाळ झाल ! बगा साब आपल शिपायी लोक रस्त्यामंदी त्येला तरास देयाल ! इया देयाल, रस्त्यामंदी सनान देवाची पुंजा झाल्या बिगर आन्यबी न्हाई घ्यायच बाबा माज ! माज्या बाइसायबानीबी आन्य सोडूल असल ! त्येला पकडल्या•

मुळ समद्या लोकांला लइ दूक व्हइल वगा ! येनी मला कं-
दी भेटयाल अस झालया. त्येला सोडायला हुकूम साव ते-
वड़ा द्येवा, हंजे मी चाललों वगा! नग नग सर्कार, मी जा
तोंच भेटायला. जोहार सर्कार. ( विठू जातो, व तत्क्षणीं
पातषाहा खालीं पडतो. )

व०–( घाबरून ) मालिक, ऐसा एका एक बेफाम होना क्या सबब
है ? जरा होषमें आके हमसे बातें तो करो, अजी काजी साहेब,
देखो कैसी अजायबकी बात है ! इसलिये अपने हकीम
साहेबाको बुलवा भेजो. क्या हैसो मालुम तो पडेगा.

कां०– हां बुलवा भेजना जरूर है, ( पातषाहास ) सरकार,
ऐसे क्या करतेहो ? जरा अच्छी तौरसे उठ बैठो !

पा०–(सावध होऊन) अरे, दामाजीके तरफसे रुपयोंकी थैली लेकर
आयासो वीठू कहां है ? उसको मेरेनस्दीक ले आवो. क्या वो
चलागया ? हाय ! बडी अफसोसकी बात है!! अजी वजीर
साहेब, गर्चे वो चलागया होगा तो जलदी बुलवाभेजो, उ-
सको देखनेकोलिये मैं बहोत इष्तियाक हूं, नहीं तो मेरी जान
बचना बहोत मुष्किल है. देखो के वो जिसवख्त यहांसे गया,
उसवख्त जैसी बिजली चमक जावें ऐसी मेरी आंखियें रो-
षन होगई, और उसीके सबबसे इस तख्तपरसे मैं गिरप-
डा, काजीसाहेब, नाहक देरी क्यौं करते हो ? बल्के वो दूर-
गया होगा तोभी तुम लोग मेरोलिये मेहेरबानी करके जल-
दी आवे ऐसा करो. वो आयेबाद ऐसा करनेका क्या सबब
था, सो खुद उसे मैं पूछताहूं.

को०– हुजूर, उसने क्या किया ? उसके लिये नाहक गम
करते हो ? पितके जोरसे आंखियोंके सामने अंधियरी आई
होगी धार, इसमें कुछ षक नहीं, कहोतो आपके लिये उसको

बुलवा भेजताहूं, अजी उसको लाना कितनी बडी बात है ? ( मनांत. ) अव्वल हकीम साहेबको यहां ला हाजिर करना जरूर है फक्त. ( जातो. )

पा॰— ( उभाराहून. ) अजी वजीर साहेब, पितका बहाना बताके दूसरे बातें नाहक क्यों सुनातेहो ? सच्छ पूछोतो उस बेठू घेडके लिये खुद मैं दीवाना हुवाहूं, सो उसे जलदी मुझको दिखावो, नहीं तो मैं कैसा समझूंके वो कौन है ? और दिल मेरा ऐसा चाहाता है के, साथ उसके बगलगीर करूं.

व॰- हुजूर, ए क्या बात करते हो ! उसकी लियाकत कहां, और आपकी बुर्दबाजी कहां ? कहो तो जमीन आसमानका फरख है, और उसमें हिंदूकी जातमें घेडकी जात बडी कमीनी है, ऐसा रहेके, साथ उसके बातें करनें और नस्दीक उसके बैठने चाहते हो ? क्या तारीफ है ! ऐसे कामोंके लिये दुनियां तोभी क्या कहेगी ? ख्याल करोके ऐसे कामोमें बिलकुल जेबा नहीं.

पा॰— अजी दीवान साहेब, कचेरी बरखास्त करोके हम दरबार अमीर लोग आप आपने घर जावें. ( चोपदार ओरडतो. कचेरी बरखास्त होते. बादशाहा व वजीर मात्र राहतात. )

पा॰— वजीर साहेब, उस आदमीकेलिये मुझको बहोत षक आताहै के वो कोई बडे खांदानीमेंका होगा ! खुदको छुपानेकोलिये आपनें दामाजीपंतके मोहबतके वास्ते घेड बनके यहां आया, इसमें कुछ षक नहीं. ओहो ! ! बातें करते वख्त कितनी तमीज, और खुबसूरतीमें तोभी कैसा था ! अगर वो दिलावर आदमी नहीं तो, हमारा तोभी दिल उसपर क्यों टूटपडता? खैर, वजीर साहेब, ये टकटक सब छोडो, और मेरा मोहबते जिगर कहां है सो जलदी ...

करो, हाय ! हाय ! वीठू, अरे भाई वीठू, मुझ गरीबको छोडके तूं अकेला कहां गया ? बगैर तेरे मैं बेकरार हूं, सो जलदी आके तेरा मूं दिखा, अरे तेरेलिये मैं इतना दीवाना हूं के जैसी कोई खुबसूरत महेजबीं आपने आषकका दिल छीनलेके पिषेमान करती है, उसीमाफिक तूनें मुझको दीवाना कियाहै, इसलिये जलदी आके मिल, नहींतो मरजाऊंगा [ वजीरास मीठी घालितो ] वजीर साहेब, वीठू कहां है ? अजी साहेब, जलदी जाके उसकी कोषिष करो, देखो उसके बगैर मै बिलकुल बेकरार हूं. अरे उसके देखेबगैर मुझको खाना पीनाभी हराम है, अछा मैं आरामसे रहेने मांगताहूं तो कुछ खुषमस्खरियां भी सूजती नहीं, क्या करूं ? दरबारोंके कामोंसेभी नाराज हुवाहूं, ( वजीरास ) क्यौंजी खडे क्यौं ? उसको यहां जलदी लानेकी तजवीज नहीं करतेहो ?

वं० – ( मनांत ) इनकी ऐसी तबियत होनेका क्या सबब है ? कुछ मालुमतो नहीं पडता, क्या करें, बडी मुष्किलकी बातहै ! और उस आदमीको तो लाना जरूर है, ( उघड. ) हुजूर, आप तषरीफ वहांतक ले चलो तो तुर्त उसे दिखलाताहूं.

पा० – ( रागावून ) हुजूर, मालिक, तषरीफ करके मेरे जलेहुये कलीजेपर और क्यौं डाग देतेहो ? उसको यहां लाना हो तो जलदी लाके मेरे नझदीक हाजिर करो. उसकी राहेदारी देखतें मैं बैठना हूं, अरे तुम अबतक नहीं गये ! सच्छ कहो तो मै खुद पिषेमान हुवाहूं, उसमें ये लोग दिलको आये सो बातें सुनाके और मुझको दीवाना करतें हैं. ऐ मेरे परवरदिगार, मुझ गरीब बेकसपर ऐसा अंगार बरसाना क्या

जरूरथा ! खैर तेरी मर्जी, तू जो चाहेसो कर सकेगा, इसमें कुछ षंक नहीं, ( अमळ थांबून ) अजी तुम षैतानोंके माफिक मेरे सामने क्यों खडेहो ! यहांसे जाके आपना मूं काला करो.

दे० — बहोत अच्छा मालिक, मैं अभी जाके उसको लेआताहूं, ( मनांत. ) क्या ताआजबकी बात है ! के उसवख्त हम इतने लोग यहां थे, मगर हमारा दिल ऐसा नहीं चहाके दुबारा उसको देखें, लेकिन ये हमारे साहेब आपने तनबदनकी बेहोषी करके उसकी इन्तजारी खींचतेहैं! क्या करें कुछ बन् नही आता ! सच्छ पूछो तो उसके लिये इतना दीवाना होना क्या सबब है ? ( उघड. ) अच्छा मालिक जानेकेलिये रूकसत मांगताहूं ( जातो. )

पा० — ( आपल्याशीं. ) अरे म्या वीठू, मोहोबतके फासेमें गिरफतार करके मेरे दिलको खींचनेहारा ऐसा तू कौन है! या कोई जादूगीर है ? या कोई तिलसम कहेलावे, तो हमारे दामाजीपंतके तैनातीमें बहोत रोज बडे एतेबारीसे नौकरी करके इजत कमायाहुवा नजर आताहै. और उसीके सबबसे दामाजीपंत तेरे हात इतने रूपयें भेजे हैं, इसपरसे मुझको खूब यकीन हुवाके तू बडा दानिषमंद है, लेकिन जिसवख्त तू यहांसे गया, उसवख्त तुझको सरकारमेंसे कुछ बक्षिसभी मिली थी ? नहीं ! हाय हाय ! बडी जुलूमकी बातहै ! ! के उसवख्त हमारी अकिल तोभी कहां मारेगईथी ! अफसोस के ऐसे अहेसानमंदीके कामोंमें दामाजीपंतके वफादारीके वास्ते हमारे तरफसे कुछ नजरानाभी न पहोंचा ? खैर, ऐसा कोई मददगार नहीं के इस काममें कोषिष करके उस वीठू धेडकी मु-

लाकात करवादे ! बगैर उसके चैनोआराम मुझको जहेरको मानिंद हुवाहै, क्योंके वो मेरा आब है, और मैं उसका तिष्ना जिगरहूं, गर्च मुलाकात न होवे तो एक पलभरमे मेरी जान उखड जावे ! ( कान देऊन ) काहेकी आवाज आती है ? क्या " सरकारकी सुरत दौलत कहांहै ?" करके कोई पूछताहै ? अगर कोई मेरी मुलाकात करने मांगताहो तो, उस वीठू धेडके हमराह होके यहां आवें, नहीं तो दूसरोंको अंदर आना बेफायदा है!! ( थोडे थांबून ) क्या करें कुछ सबर नहीं आता, हरचंद दिलको समझताहूं, लेकिन वो आपने माफिक कर छोडताहै ! सिवाये उसके मुझको सब कुछ अंधियारी नजर आती है, गर्च मुझको पर होते तो इसीवख्त यहांसे उडके उस दिल जिगरको ढूंड लाता, ऐसे मुष्किलातमें फसाहूं के उसका कुछ ठिकाना नहीं. कहो तो मैं ऐसा गाफिल कभी नहीं हुवाथा ! जिसके सबबेसे ऐसा दीवाना बनाहूं. अगर इस बारेंदातमें पिषेमानी हासिल किया ऐसा मानूं तो लोगोंको अछी तौरसे पहेचानके उनके साथ बखूबी बातें करताहूं ! मेरी तबियत होषमें है ऐसा मुकर्रर करूं, तो उस वीठू धेडको दर्सनकी खाईष क्यों होती ? और तमाम लोग तोभी मेरे लिये क्या बोलते होगें ! ओहो ! कुछ तदबीर नहींके मेरे बिरादरको जाके झट मिलूं ! ( इतक्यांत हकीम येतो,) ( पातषाहा त्याच्या गळ्यास मिटी घालितो ) ऐ मेरे हकीमसाहेब, मेरे कलीजेका टुकडा कहां है ? अगर वो बाहेर होतो अंदर आनेके लिये कुछ हरकत नहीं. ( मोठ्यानें ) अरे भाई वीठू अंदर आनेके वास्ते तुझको अटकाव कोई करता होगा, तो तेरे मिलनेको मै खुद बाहेर

आताहूं, ( मोठ्या रागानें ) अरे तुम सब लोग बदमाष हो, के वीठूसे मेरी मुलाकात नहीं करवाये? बडा अजब खेल है! अगर्च वो एक लहेजे भर मेरे नजर नहीं आवेतो मैं क्या करूंगा इसका कुछ भरोसा नहीं! हकीम साहेब, ये देखो मेरे हातमें नंगी तलवार कैसी बिजलीके मानिंद चमकती है! अच्छा, भाई वीठू, तू मुजको छोडके काहां जायगा! खुद मैं तेरे मुलाकातके वास्ते बाहेर आताहूं. ( असें ह्मणून निघून जातो. )

हकीमं ० — सच करके पूछो तो, हमारे सरकार दीवाने हुये हैं, इसमें कुछ षक नहीं, अब मुझको भी उनके बराबर जाना लाजम है, क्योंके हातमें उनके नंगी तलवार है, न जाने वख्तपर क्या करेंगे! सो इस लिये जाना जरूर है ( असें ह्मणून निघून जातो. )

---

## प्र० २. स्थळ—वाटेंतील धर्मशाळा.

( चौघे जासूद व दामाजीपंत येतात.)

मी ० सं० ० — दामाजी, तुजको कुछ रोटी वगैरा बनाना होतो, इस कारवानसराईमें उतरके बनाले, इसलिये कुछ जिन्सकी गरज है, तो बाजारमें जाके मैं तेरेवास्ते कुछ लेआताहूं. इतने रोज तूने अनाजका एक निवालाभी नहीं खाया, जबके पातषाहाके नस्दीक तुजको हाजर करना है तबतक तेरी जानकी खबरदारी करना हमें जरूर है अगर चहताहै सो यहां थोडा पानीभी नजर आता है, रस्तेके मांदगीके सबबसे

सराईमें कुछ बनावेगा तो अच्छी बात है.

षे ० रे[१०३] ०— मैं तो खूब समझताहूं के इसने राहेदारीकी सफर पैदलसे कभी किई नहीं, क्यौं के उसके मूंपरसे थका हुवा ऐसा साफ नजर आता है, खैर, बेदरभी यहांसे बीस एक कोस होगा.

दा० — तुह्मी फार दयावंत आहां. माझे रस्त्यांत मुळींच हाल झाले नाहींत. ईश्वर तुमची बादशाहाचे दरबारीं बढती करो ! गावांत जाऊन माझ्यासाठीं कांहीं खटपट करूं नका. आपल्यासाठीं काय ती करा. बादशाहाची भेट होई पर्यंत वाटेंत फक्त देह राहण्यासाठीं थोडा फराळ मात्र करण्याचा मीं निश्चय केला आहे.

मी० सां[१०४] ०—फराल? कुछ मुजाका नहीं, तेरे कहेने माफिक करें. ( दोघांस ) षेकरहिमान, तुम दो आदमी बस्तीमें जाके कहीं भटियारखाना हो तो उस भटियारनको मस्दूरी देके कुछ रोटी, सालना वगैरा ले आनेकी तजवीज करो, और आते वख्त दामाजीपंतके वास्ते भी कुछ मेवामिठाई लाना के वोभी बिचारा कुछ खायेगा.

( दोघे जातात. )

दा० — ( आपल्याशीं ) प्रातःकाळीं आपलें स्नानवगैरे सर्व आटपलेंच आहे. गीतापाठ मात्र राहिला होता, तो करण्यास हा वेळ बरा आहे. ( गीता काढतांना धर्मशाळेकडे पाहून ) कोणीं पुण्यशीळ पुरुषानें ही धर्मशाळा बांधली असेल बरें ? असेच पुरुष जन्मास आले म्हणावयाचे. नाहीं तर मी ! ( पुस्तक वाचावयास लागतो, दोघांना नीज लागते, इतक्यांत अंत्यजवेषधारी विठ्ठल प्रवेश करितो. )

वि० — ( पंतांच्या पाठीमागें राहून आपल्याशीं ) अहाहा !

भक्ताचें दर्शन किती आनंदकारक वाटतें ! मातेला, आपलें तान्हें बालक पाहून, पान्हा काय तो तिच्या स्तनांच्या ठिकाणींच फुटतो; परंतु भक्तदर्शनामुळें माझें तर सर्वांग प्रेमानें परिप्लुत झालें आहे ! त्याला घट्ट आलिंगन देण्याविषयीं माझे हे चरण जणूं मला त्याच्या जवळ नेत आहेत असें वाटतें. हे हस्तांनो, तुम्हीं इतके उतविळ कां ? हे तुमचे प्रियमित्र नेत्र, भक्तदर्शनामृतानें तृप्त होत आहेत, मग तुम्हींही तृप्त झालां हें उघड आहे. कर्णांनो, तुह्मीं मात्र आतां सस्पृह व्हावें. कारण, तुमचें व नेत्रांचें जन्मतःच वैर आहे ! व ह्यामुळेंच परस्परांस परस्परांचें दर्शन सुद्धां होत नाहीं ! ! ( इतक्यांत पंत, " अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ॥ तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्" ॥ अ० ९ श्लो० २२, मोठ्यानें वाचतात. )

त्रि०— ( आपल्याशींच ) मीं माझ्या ह्या वाणीप्रमाणें तुझा योगक्षेम तर वाहिला आहेच ! काय तो, ह्या क्षणीं ह्याला समजावा म्हणून ही तिकडची पावती गीतेच्या पुढील पृष्ठांत सांपडावी असें करूं काय ! अथवा मीच होऊन बेदरास झालेला सर्व वृत्तान्त ह्याला निवेदन करूं ? आतां ह्या भक्ताला दुःख देणें योग्य नाहीं. ह्याला सर्व सांगतोंच. अथवा भगवद्भक्तांना दुःख कोठें आहे ? किंवा अर्जुनास पूर्वयुगीं सूतवेषानें जशी समग्र गीता सांगितली, तद्वत् आज ह्या अंत्यजवेषानें ह्या कलियुगीं ह्याला ती सांगूं ? काय करूंसें झालें आहे. फक्त येथें ह्याला अभिज्ञानासाठीं दर्शन मात्र द्यावें. ह्याला दोन दिवसांत बेदरचा सर्व वृत्तान्त समजणारच आहे. ( दामाजीपंतांस ) अगा वाटसरू दादा

पंडरीला ह्योच ( बोटानें दाखवून ) रस्ता जातोया का ? हतून पंडरपुर किति मजूला हाय ?

दा०— ( त्याच्या कडे पाहून, हर्ष पावल्यासारखें करून ) "स मोरचा दिसतो हाच रस्ता. पंढरपुर येथून फार लांब आहे, चाळीस पन्नास कोश. अरे वाटसरा, ह्या धर्मशाळेच्या छायेखालीं क्षणभर विश्रांति घेऊन जरा हुशार हो. ह्या ऐन दोनप्रहरच्या उन्हांतून चालणें फार कठिण आहे ! तुझें सर्व आंग घामानें फारच थबथबलें आहे ! तहान लागली असेल तर तुला बाबा, पाणी प्यावयास घालतों. ये इकडे बैस.

त्रि०— मला वेगी वेगी घरी गेलं पायजे. समदीं माझी मूलं मानूसं वाट पात असत्याल.

दा०— अरे आज तूं कोठून आलास ?

त्रि०— वेदरापुन.

दा०— तिकडे काय काम होतें ?

त्रि०— कांम व्हय, मी एका ठानदाराच्या कामापायीं येट गुजरायला गेलो व्हतो.

दा०— ( मनांत ) जास्त कशाला आपण उगाच चौकशी करा. ( उघड ) बरें तर ओळख देख असूं दे.

त्रि०— आमी गरीब मनुक्श्य, आमची कसली वोळख घेऊन बसला रावसाब ? आपली शिरीमंताची असावी हंजे झालं आमासनी कंधीं इसरू नका. हीच आमची तुलासनी इनंती हाय.

दा०— बरें तुझें नांव ?

त्रि०— आमा गरिबासनी नाव कस्च पुसता म्हाराज, ह्या देह्याला इठु म्हंगत्याती.

दा०— मी तुला कोठें पाहिलें असावें असें वाटतें. बहुतकरून पंढरपुरीं असेल !

चि०— ( हसून ) व्हय तिथलाच मी. तत दादा तुमासनी पन पाहिल्यावानी वाटत. आपनबी तिथूच काय ?

दा०— मी मंगळवेढ्यास असतों, पंढरपुरास देवदर्शनाला कधीं कधीं जातों.

चि०— ( मनांत ) आतां लौकर येथून जावें. ( उघड ) तुमी मंगुड्याऊन आला व्हय ? तत आमचा गोरगरिबांच दामाजीपंत म्हून भान्यदात खुशाल हायती ? तो लइ चांगला परानी बगा. देव त्याच कल्याण करो.

दा०— ( मनांत ) तोच मी असें ह्याला उगाच कशाला सांगा. ( उघड ) तो खुशाल आहे.

चि०— जोहार. म्हाराज मी येतों तर, जोहार. ( जातो. )

दा०— ( पुन: वाचावयास लागतो. ) कां बरें माझें मन चंचल झालें हें ! पुस्तकाकडे लक्ष मुळींच लागत नाहीं. तो पांथस्थ गेला काय ? तो जातीचा अंत्यज असून त्याचें रूप कसें मनोहर दिसत होतें ! अहाहा ! त्याला कडकडून भेटावेसें वाटतें ! तो माझ्याशीं थोडें बोलला पण तें बोलणें किती मधुर लागलें. जों जों मी त्या पांथस्थाविषयीं बोलत आहें, तों तों माझें हृदयकमल प्रफुल्लित होत आहे. ह्याचें काय बरें कारण असावें ? त्याच्याविषयीं अत्यंत प्रेम उत्पन्न होऊन त्याला पुन: पहाण्याविषयीं मी फार उत्सुक झालों आहे. असें माझें मन पूर्वीं कधींही सस्पृह झालें नव्हतें. तो इतक्यांत फार लांब गेला नसेल. त्याला एकदां हाक तरी मारतों. ( उठून रस्त्याकडे पाहून ) तो कोठें दिसत नाहीं. काय त्याला गांठण्याला त्याचे पाठीमागें धांवत

जाऊं ? ( जावयास लागतो ) अरे, पण मी बादशाहा
कैदी आहेंना ? मी कोठें निघालों ? ( पुनः बसतो ) मा
मन मला येथें बसूंच देत नाहीं. त्याला एकदां तरी भे
टच ह्मणून सांगत आहे. कामिजनासारखी माझ
अवस्था झाली आहे ! असा तो माझें मन हरणकरणा
कोण तरी होता ! गौडबंगाली जादुगीर तर नसेलना
रस्ता आहे हा, कोण लोक कोणत्या हेतूनें येतात याच
काय नेम आहे ? हे गारुड्या, धनाचे आशेनें जर मल
वेड लाविलें असशील तर मी कफल्लक आहे. तूं कोणीही अस
मी येतोंच तुझ्या पाठीमागून ! ( जावयास निघतो व मोठ्यानें
अरे विठू, अरे पंढरपुरच्या विठूमहारा, मी आलों थांब.

( इतक्यांत चौघेही जासूद जमतात. )

मी० सां०— अरे किधर चलाबे ओ दामाजी ? क्या कुछ
भागजानेका इरादा करता है ?

दा०— नाहीं महाराज, नुक्ताच येथून एक वाटसरू कोणी
विठूमहार गेला, त्याला पाहावयाला जाणार होतों. म-
हाराज, तुह्मांला कोठें तो भेटला काय ?

१०६ ष०— अरे काहेका वीठू महार लेके बैठा है ! मिर-
जा साहेब, इन कैदियोंपर कभी एतेबार नहीं रखना
इस कैदिको लेके झट् यहांसे निकलो.

दा०— हे विठोजी, मला तूं आतां कसा व कधीं रे भेटशील ?
इतक्यांत हांहां ह्मणतां मला हें तुझें वेड कसें लागलें ! तुला
पाहण्याविषयीं मी फारच उत्कंठित झालों आहें ! विठूमहारा,
तूं येथें येऊन माझी बुद्धि कशीरे चंचळ केलीस ? तूं कोण
आहेस मला कांहींच समजत नाहीं. या विठ्ठलाच्या मूर्तीकडे
लक्ष लागलें ह्मणजे मला जें कांहीं प्रेम येतें त्यापेक्षां शतपट

तुझ्या विषयीं माझे ठिकाणीं या वेळेस प्रेम उत्पन्न झालें आहे ! अरे विठू ! अगा विठूजी, लौकर येरे . मला एकही पाऊल टाकवत नाहीं. ( त्याला हातांत धरून घेऊन जातात. )

---

प्र० ३, स्थळ, पातषाहाच्या दिवाणखान्या बाहेरील जागा.

( दोघे हुजरे येतात. )

जांफर — अरे म्या फरिद, अपने सरकार होषमें कब आवेंगे ? रात और दिन उस वीठूधेडकी फिकर करते हैं, षुमार आज दोतीन रोज हुये हैं के हम खाविंदकेसाथ वीस पचीस आदमी मारे फिरतेहैं, जो मिले सो उसको पूछतेहैं के " वीठू कहां है " ऐसे दीवानेके माफिक भटकते फिरतेहैं.

फरिद — अब जो तूने कहा वो सब सछहै, और मैंभी देखताहूं के कलसे धूप या छांव इसका कुछ परवा न करते हुये, वीठू धेडको बताओ, ऐसा बोलतेहुये फिरतेहैं.

जाफर — अरे यार, तू क्या कहेता है, कल तो तमाम रातभर नींद नहीं आई, और जाहिरातमें उनका कहेना ये है के गर्च कोई वीठूको यहां ला हाजिर करें तो मेरी तमाम पातषाहात उसके सुपर्द करूं ! खैर, उनको खुदा अछीतौरसें रखे, मगर अभी अंदर बिछोनेपर लेटे हैं, और जरा नींदभी लगी ऐसा मालूम होता है, सो बातें करना हो तो आस्तेसे कर.

११० फरीद – ( हळू. ) आज कहो तो उस धेडको ढूंडनेकेलिये जिधर देखो उधर आदमीयोंको भेजे हैं, मगर उसका अबतक पत्ता नहीं लगा, क्या करें !

१११ जाफर – अरे ये हकीकत तुझको नहीं मालुम ? अेब वो मंगळवेढेके ठानेदारका नौकर है, उसको पकडलाना कुछ बडी बात नहीं. लेकिन वो यहांसे जाते वख्त सीधा मंगलवेढेको न जाते हुये और आपने कामको कहीं गया होगा, नहीं तो वो कभी मिलजाता. ( आंत, " मुझको वीठू धेड कब मिलेगा ? " असे शब्द होतात. )

११२ जाफर – अपने पातषाहाकी सवारी नींदसे उठी होगी याद ! चलो हम यहांसे अंदर निकल जावें. ( इतक्यांत पातषाहा डोळे चोळीत बाहेर येतो. )

११३ पा० – ( जाफरास ) वीठू धेड अबतक नहीं आया ?

११४ जाफर – जिहां मालिक, वो अबतक नहीं आया, मगर उसके ढूंडनेकोलिये बहोतसे जवान गये हैं, और वो अभी आवेगा.

११५ पा० – दामाजीपंतको लानेकोलिये यहांसे जो जवान गयेथे, सो उसको अबतक नहीं लाये ? ऐ बिरादर दामाजी, तूतोभी मुझको मिल, फिर बाद मुलाकातके और मारिफतसें तेरे वो वीठू धेड तोभी मिलेगा. ( पडद्यांत " अरे विठू महारा, मला कधीं रे भेटणार ? " असे शब्द होतात. )

११६ पा० – अरे, हमारे वीठु धेडका नाम कौन लेता है ! ( इतक्यांत पंत व मीरसाहेबजान वगैरे मनुष्य येतात. )

मी० सा० ११७ – ( पातषाहास सलाम करून ) हुजूर, बमोजब हुकुमके आपके दामाजीपंतको पकडलाया हूं, और मैंने गुन्हा किया ऐसा वो खुद कबूलभी करता है.

दा०— ( आपल्याशीं ) विठूजी मला एकदां दर्शन देरे ! हें बेदर माझें वधस्थान आलें ! आतां तूं कधीं रे भेटणार ? हाय ! हाय ! काय माझें दुर्दैव तरी ! माझा अंतकाळ आला असूनही माझ्या तोंडांतून त्या विठ्ठलेशाचें नांव येत नाहीं ! तो कोण महार भेटला त्याचाच मला छंद लागला ! काय करावें ? मन त्या पांडुरंगाकडे लावितों, पण व्यर्थ ! त्या धर्मशाळेंतील महाराचीच मूर्ति डोळ्यांसमोर दिसत आहे. नशीब माझें ! ( उघड ) विठू, आतां माझा हेतु कसारे पूर्ण होणार !

पां[118] ०— ऐ बिरादर दामाजी, तूनें उस धेडको मेरे तरफ लाया-था , सो वो अब कहां हैं ? ( मिठी मारून व हनवटीस हात लावून ) भाई, इसमें तेरी गुन्हेगारी नहीं, मगर मेरी तकसीर हुई ऐसा कहे तोभी चलेगा, क्यौंके अव्वल इस बातकी तहकीकात न करते हुये दोचार जवा-नोंको तेरे पकडनेकेलिये भेजाथा, सो ये मेरी खता है, खैर, हाल इस बातसे कुछ गरज नहीं, तूनें कहीं वीठू धेडको देखा है ?

मी० मां[119] ०— जिहां मालिक, वीठू धेड कहेनेहारा कोई राहेदार इसको मिलाथा; और ये बम्मनभी उसीके मोहो-बतमें गिरफतार हुवा है.

पां[120] ०— अच्छा दामाजी, तेरा नौकर वीठू धेड कहां है ?

दा०— हें काय सरकार आपलें बोलणें! कोण माझा चाकर ! मी सरकारचा गुन्हेगार आहें; कोठारांतील धान्य सरका-रच्या हुकुमावांचून मीं लोकांस दिलें खरें. त्या गुन्ह्याबद्दल मला काय सज्जा द्याल ती मी भोगण्यास तयार आहें,

पां[121] ०— अजी साहेब मेरे दामाजी, ये तुह्मारा कहेना मैं हर-

गिज कबूल नहीं करनेका, जिस आदमीके हात तुमने रूपयोंकी थैली भेजी थी सो वो भरोसेदार आदमी कहां है सो जलदी मुझको बतावो.

मीर० सा[११२]० — सरकार, दामाजीपंतके तरफसे या इनके बराबर आया होगा ऐसा आप गुमान करते हो, मगर वो न होगा, क्योंके आज आठ दस रोजसे हम दामाजी-पंतके सात हैं.

दा० — मीरसाहेब सांगतात हें सर्व खरें आहे. मजकडून असा मनुष्य इकडे आला नाहीं. विठू महार या नांवाचा माझा कोणीही नोकरच नाहीं व मीं कोणाजवळ सरका-रांत भरण्याकरितां रूपयेही दिले नाहींत !

पां[११३]० — क्या गलत बोलते होजी ? अरे खुद मैं तोभी होषमें हूंना ? अरे जिस वख्त उसने रूपयोंको जमीन पर उंडेले उस वख्त मैं उसके नस्दीक था, और उसका नाम क्या और वो तुह्मारे नस्दीक कितने बरस्से नौकरी करता है तमाम अहवाल उसको पूछा तो, ये माजिरेको सुनके वो बोला मैं दामाजीपंतका पिढीजात नौकर हूं, और मेरा नाम वीठू है, ऐसा उसने जाहिर किया. ओहो ! ! मैं उसके खूबसूरतीका तोभी कैसा बयान करूं षाबास, जबान तोभी क्या षिरीन थी, आखरिष जिस वख्त वो यहांसे गया, उस वख्त मेरे आंखियों के सामने मानिंद जैशी बिजली चमक जावे उस माफिक मेरे तैं सब रोषन् नजर आया, उस वख्त मेरे दिलकीभी तऱ्हादारी कुछ और थी, मुझको ऐसा बेहोष पाके उसी वख्त उसने रूपयोंकी रसीद लेके यहांसे चलागया, अजीं ये तो रहा, मगर तुमको मैं पूछताहूं के तुह्मारे लिखे हुये हर्फ

तुम पहेचानोगे या नहीं ?

।०— होय सरकार, मी अक्षर ओळखीन. ( गहिंवर येऊन ) काय चमत्कार आहे हा ! मला जो विठूमहार रस्त्यांत भेटला त्याला पाहून माझीही सरकाराप्रमाणेंच अवस्था झाली आहे !

ां १२४ ०— क्या बात है, उसकेलिये तेरीभी तबियत खराब हुई है? तो फिर उसके बगैर तू अकेला कैसा आया ! अगर सच्छ पूछेगा तो उसके मोहोबतमें गिरफतार होके मैंभी- दीवाना हुवाहूं, और उसके तलाषके लिये पूछेगा तो आज सेकडो जवान फिरतेहैं मगर उसका कुछ ठिकाना नहीं लगता. क्या करें, कौंन है, साहेबजान, इसीवख्त वजीर साहेबको यहां आनेकेलिये हुकुम करो.

मी० सां १२५ ०— बहोत अच्छा मालिक, हुकुमके माफिक उनको अभी जा लेआताहूं. ( असें ह्मणून निघून जातो. )

पां १२६ ०— ये क्या खेल है सो कुछ मालूम नहीं पडता ! दामाजी, मैं सच्छ करके बोलताहूं, आज दोतीन रोजका अंदाज होगा, सो तुह्मारे तरफसे एक आदमी आया और तुह्मारा नाम जाहिर करके ये रकम भरी है, उसवख्त वो रकम कितनी थी सो मैं नागव्हाथा, मगर जाहिरातमें कहो तो सिवाये तुह्मारे भरोसेदारीके इतनी रकम कौन भेजेगा ! ऐसा रहेके तुम खुद बोलते हो के मुझको मालूम नहीं ! या मेरा दिल लेने मांगते हो सो कुछ समझ नहीं पडता, अब कहोतो इसमें मेरी गुन्हेगारी है, वो येके, तुह्मारे दावेदारीके बाबतमें उस मुजुमदारनें अर्ज लिखा था, उसमें मजकूर क्या था सो बराबर चौकसी न करतें और उस मतलबको सच्छमानके पकड लानेके लिये तुमको

जवानोंको भेजनेमें आया, उस गुस्सेके सबबसे मेरी बात कबूल नहीं करते होंगे षाद. अरे झूटा मतलब दर्ज करके ऐसा अर्ज लिखनेहारा कौन होगा ? खैर उसके लिये तुम जो कुछ सजा फर्मावोगे तो वोही मुकर्रर किई जायगी, लेकिन दामाजी, तेरा नौकर वीठू कहां है सो जलदी बता, जियादा कुहनेकोलिये मुझको बिलकुल ताकत नहीं, मगर मैं ये केहताहूं के वो नीमजान मुझको नहीं दिखेगा तो तुम जानोके मेरी जान उखड गई. ( त्याच्या गळ्यास मिठी मारतो )

दा०— सरकार हें काय आपण आरंभलें! सरकारापुढें खोटें कोण बोलणार आहे ? व बोलण्याचा हेतु तरी काय ? महाराज, भुकेनें हाय ! हाय ! करणारांची मला दया येऊन सरकारच्या हुकूमावांचून मीं त्या लोकांना धान्य नेण्याकरितां कोठारें खुलीं करून दिलीं. हा एक माझा गुन्हा तुह्मांपुढें आहे; व दुसरा गुन्हा हा आहे कीं, मीं होऊन सरकारास ही खबर कळविली नाहीं. त्याबद्दल खावंदांनीं मला पाहिजे ती सजा करावी, मी आतां आपल्या आधीन झालों आहें. खरोखर मी सांगतों मजकडून कोणताही मनुष्य आला नाहीं. ती रक्कम दुसऱ्या कोणाकडून आली असेल!

१२७ पा०— वा: साहेब, अब तुमको क्या कहे ! अरे मैं जागा रहे के नींदकी खललके लिये साबिती करके मुझको ऐसे बातें सुनातेहो ? खैर, अब तुह्मारे हातके हुर्फ तुमको दिखाये बगैर उसका कुछ रफा दफा नहीं होवेगा, लेकिन तुह्मारे सायमें पालाहुवा वीठू कहां है, सो जलदी मेरे सामने ला, खडा करो, दूसरे बातोंसे कुछ गरज नहीं, और तुम रंगलबेढेसे आतेवखत वीठू कहेनेहारा जो धेड मिला सो

वो कैसा था ? और उसकी बदन की निषानियां तो भी कैसी थी ? ये तो कहोगे ?

द्दा०— त्याचें रूप फारच मोहक होतें, ह्यापेक्षां दुसरें काय सांगू ? त्याचें माझें बरेंच भाषण झालें, पण त्यानें आपण पंढरपुरचा महार आहें असें सांगितलें. तो त्या धर्मशाळें तून गेला न गेला इतक्यांत पुन: त्याला भेटण्याची मला अतिशयितइच्छा झाली. ह्मणून तो ज्या रस्त्यानें गेला तिकडे पुष्कळ वेळ पाहिलें परंतु कोठें मग तो दिसला नाहीं. पुढें जावें तर मी सरकारचा कैदी. त्या क्षणापासून तो मला कधीं दिसेल असें झालें आहे ! फार काय सांगू आपल्यासारखीच माझी दशा झाली आहे.

१२८ पा०— अच्छा, मुझकोभी मालुम होताहैके कुछ तिलसम है ! देखो जो कोई उस वीठूको लाके मुझको मिलावेगा तो मेरी वफादारी पूरी करनेकेलिये तमाम रियासत उसके सुपर्द करताहूं, वगैर उसके दर्सनके ये पातषाहातके कारोबार तमाम मुझको खार नजर आतेहैं. और जिधर देखो उधर उसके तालाषके लिये सेकडो जवान फिरते हैं, मगर वो किसीकोभी नहीं मिलता ऐसा वो कौन होगा ? ( इतक्यांत वजीर येतो. )

१२९ वं०— ( पातषाहास सलाम करून ) क्या हुकुम है मालिक !

१३० पा०— वजीरसाहेब, दो तीन रोजके नीछे हमारे दामाजीपंतके तरफसे रुपयोंके बाबतमें जो कुछ रुक्का आयाथा सो कहां है ?

१३१ वं०— जिहां मालिक, अर्ज आया था और वो अपने दफ्तरदारके तरफ होगा, चाहोतो इसविख्त मंगवाताहूं. अजी मिरज़ासाहेब, तुम इसीवख्त दफ्तरदारके तरफ जाके दो

तीन रोजके आरसेमें जो कुछ सरकारी काररवाईके काग-
ज आये होंगे, सो तमाम सात दफ्तरके तुह्मारे जल्दी आनेके
लिये सरकारका हुकुम हुवा है, ऐसा जाहिर करो.

मी० सा० — [१३२] बहोत खूब मालिक, अभी जाके उनको के
आताहूं ( जातो. )

पा० — [१३३] अजी दीवान साहेब, उस वीठू घेडकी मुझको बडी
फिकर है, सो वो कब मिलेगा ? और अपने दामाजी
तो युं बोलते हैं के मेरा ऐसा कोई भरोसेदार नौकर नहीं
के सात उस्के इतने रुपयें देके भेजदेवें, ए तमाम गलत
है, वो कोई दूसरा आदमी होगा, ऐसा करके जाहिर क-
रते हैं, अब क्या करें !

व० — [१३४] क्या हमारे दामाजीपंतका कहेना है के इतनी बडी
रकम हमने नहीं भेजी ? फिरतो बडी तारीफ है ! ( पंतांस ) हमने
उस वीठू घेडके पास पहोंचीहुई रकमकी रसीद दिई-
थी सो वो तुमको नहीं मिली ! अबतक् याद वो तुमको
मिला नहीं होगा, तो रसीद तोभी कहांसे पहोंचेगी !

दा० — मला कोण भेटणार ? व मला कोण पावती देणार ?
मीं कोणाबरावर रुपये दिलेच नाहींत. धान्य लोकांनीं
लुटलें, त्याचे रुपये कसे उत्पन्न होतील ? माझ्या शिल-
केंत एकही पैसा नसतां मीं सरकारांत महाराबराबर ही रक्कम
पाठविली, असें कसें होईल ?

व० — [१३५] ( पातशाहास ) हुजूर, ये रुपयें भेजनेवाला था, मगर
जिसवख्त हम इस्को पकड लानेकेलिये जवान भेजेथे, वो माज-
रा आपने दिलमें लाके मारे गुस्सेके मैने रुपयें नहीं भेजे
ऐसा बोलता होगा.

पा० — [१३६] अजी दामाजीपंत, इसीके लिये हमारी बातें सब मस्ल-

रियां समझके और उन्को नाकबूलभी करते हो! इसपरसे हम झूट और सच्छ क्योंकर समझें? उस मुजुमदारके खतकोलिये, बराबर चौकशी नकरेत हुवे, तुह्मारेतें पकड मंगवाये ये खुद हमारी तक्सीर है. गर्चे उसमें हमारी खता हुई है तोभी माफ करके ( मिठी मारून ) उस नीमजानकी मुलाकात करदेनेकेलिये तकलीफ "उठावें," क्योंके मुझको बिलकूल खबर नहीं.

दा०— खरोखर मीं सरकारी धान्य लुटावयास सांगितलें. मुजुमदारानें लिहिलेलें सर्व खरें आहे. मीं रुपये देऊन कोणीही मनुष्य सरकाराकडे पाठविला नाहीं. असें पुनः पुनः सांगतों, ह्या आपल्या मनुष्यांला आपण विचारावें, मीं असत्य कशाकरितां बोलूं? खरोखर मीं रुपये भरले नाहींत, दुसरीकडून कोठून आले असून सर्वांचा समज मजविषयीं झाला असेल!

बा[१३७]०—( पातषाहास ) ये षक्स रुपयें भेजके और उसको नाकबूलभी करता है तो उसमें इस्का मतलब तोभी क्या होगा! अच्छा, अभी दफ्तरदार आवेगा तो इस्के हुर्फ बतावेंगे फिर नाकबूल करे तो कैसा चलेगा? ( इतक्यांत दफतर घेऊन दफ्तरदार येतो. )

द[१३८]०—( मुजरा करून) क्या हुकुम है, हुजूर!

बा[१३९]०— दोतीन रोजकी जिकर है के मंगळवेढेसे एक लाख अडसट हजार रूपयोंकी रकम आई सो उस्के बाबतमें हमारे दामाजीपंतके जो कुछ कागज व चिठियां होंगे सो सब निकालो तो देखें उसमें क्या मतलब है.

दा०—( आपल्याशीं ) काय प्रकार आहे, हें कांहींच समजत नाहीं. हा दस्तऐवज निघाल्यावर आतां सर्व निकाल होईलच,

ह्यांत संशय नाहीं.

१४० द० —अजीसाहेब, घोडा मैदान सामने, ये देखो उनका दस्त-ऐवज. ( दाखवितो.)

१४१ व० —( हातीं घेऊन पंतांस ) ये देखोजी महाराज, ये कि-सके हातके हुर्फ है ? अच्छी तौरसे पेहचानो, ये तुह्मारे दिलकी इम्तेहान हुयेबाद फिर सब कुछ याद होगा.

दा० —( न्याहाळून उलट सुलट पाहून ) अक्षर तर माझेंच असें वाटतें, माझ्या अक्षरांत व ह्यांत तिळभरही तफावत नाहीं ! परंतु असा मजकूर मीं कधींही लिहिलेला नाहीं. ह्यावरच्या तारिखेला आज दाहवा दिवस, इतक्यांत मी कसा विसरेन ? सरकार, हें अक्षर सर्वप्रकारें जरी माझेंच असें दिसत आहे, तरी हा मजकूर मीं लिहिला नसून रुपयेही मीं पाठविले नाहींत !

१४२ पं० —फिर ये काम किस्का होगा !

दा० —सरकार मीं तरी काय सांगावें ? (विचारांत निमग्न होऊन, आश्चर्यानें) काय ह्या चमत्कारास ह्मणावें ! माझ्या प्राण-रक्षणासाठीं कोणीं बरें हें कृत्य केलें असावें ? अगा हे भीमातीरनिवासा, विठ्ठला, माझी मति अगदीं गुंग झाली! मला कांहींच समजत नाहीं. ( गाहिवर येऊन ) विठ्ठला, आलें माझ्या लक्षांत. खचित खचित ही तुझीच करणी ! त्वां म-जकरितां अंत्यजाचें रूप कांरे धारण केलेंस ! मजसाठीं तूं इतके श्रम कशाकरितां उगाच व्यर्थ घेतलेस!

पद.

( " दाखवीं तव दिव्य पाय० " या चालीवर. )

हर हर ! हें काय तुझें कृत्य, सदय देवा! ध्रु०

पापभीतिकंपित मी वदलों तुज धावा ..

ह्मणुन भागलास, हाय ! हे कमलाजीवा ! १
ज्ञानहीन मीं न केलि क्षणभर तव सेवा,
मग किमर्थ भागलास ? कोमलस्वभावा ! २
संतत मी, विभो ! जरी तव गुणौघ गावा,
परि तुवां अयोग्य हा न हीनवेष घ्यावा. ३

तुला काय ह्मणावें ! मला बादशाहा ठार मारतां, तरु ह्यांत काय वाईट झालें असतें? पृथ्वी कांहीं ओस पडली नसती! देवा, माझ्या सारखें अक्षर काढून एवढा द्रव्यभार मस्तकीं घेऊन दरबारांत माझा महार असें सांगितलेंसना ? माझ्या तर्फेनें तूं पुष्कळ बोलला असशील ह्यांत संशय नाहीं. दयाळा, तें रूप कसें होतें हें मजला दाखविण्याकरितां त्या धर्मशाळेंत तूं-च तो प्रकट झालास. हाय ! हाय ! मीं तुला त्या वेळेस ओळखिलें नाहीं. तुला यःकश्चित मनुष्य समजलों. अनाया-सें परीस हातीं सापडला असून तो पाषाण ह्मणून टाकावा, त्याप्रमाणें माझे हातून झालें. विठ्ठला, तूं मजकरितां फार फार रे भागलास, श्रमलास ! तूं तेथें गुप्त झाल्यापासुन मला तुझा ध्यास लागलेला आहे. काय परमेश्वरा, तुझा हा साक्षात्कार ! ( साश्रु ) पांडुरंगा, तुला असें कर-ण्याला, हें मला महत्संकट वाटत होतें असें मुळींच नाहीं. परमेश्वरा, हें तुझें ऋण मीं कोणत्या रीतीनें आतां फेडावें हें कांहींच समजत नाहीं. त्या धर्मशाळेंत जें तूं अल्प बोललास त्यावरून तूं पंढरपुरस्थ विठ्ठलेश भक्तकाजकैवारी आहेस असेंच मला जाणविलेंस !! मीं तुला विचारलें कीं, बेदरास काय काम होतें? त्या वेळेस तूं मला उत्तर केलेंस कीं, " एका ठाणेदाराच्या कामापायीं येट गुजरायला गेलो व्हतो " देवा, कोण तो ठाणेदार ? हाय ! हाय ! तुझे

उपकार किती आठवूं! ( पातषाहास ) महाराज, हें काम त्या खुदाचें आहे. त्याणेंच विठूधेडाचें रूप घेतलें ह्यांत संशय नाहीं. त्यामुळेंच सरकाराला व मला त्याचें वेड लागून गेलें आहे. ( डोळे पुसतात. )

वं॰ ०.– ( पातषाहास ) हुजूर, जिस्ने तमाम मख्लुकातको पैदा करके और उन्को परवर्षभी करता है, ऐसा वो पाक परवरदिगार अदना इनसान बनके ऐसा काम करेगा? क्या बात है! अजी इसीनें रुपये भरे हैं, और आपकियासो काम छुपानेके वास्ते कुछ नकल करते बैठाहै, इसपरसे युं मालुम होता है के इस्का मतलब कुछ अलाहेदा है.

पा॰ ०– वजीर साहेब, सछ कहो तो तुह्मारा कहेना सब गलत है, उस्को वीठू धेड क्यौं कर समझे? अजी जिस वख्त मैं उस्का तेज देखा, मानिंद आफ्ताबको देखनेसे जैसी आंखियां चमक जाती हैं उस माफिक उसे देखनेसे मेरी आंखियां हुई हैं, भला, तुम कहीं देखेभी हो कें हीरेका चमक कोयलेको आया? मै सछ करके बोलताहूं के उस्ने आपनी कर्दगारी बताई, इस्में कुछ षक नहीं. अगर वो इनसान होता तो एक लाख अडसट्ट हजार रूपयोंकी भरीहुई थैली अकेला कैसा ले आता? और ऐसी छोटी थैलीमें इतनी बडी रकम तोभी कैसी रहेगी! तुम ख्याल करोके वो अदना आदमी होता तो मुझको इनसानियतमेंसे निकालके दीवाना क्यौं बनाता? और वो मेरे तख्तपर आनके बैठे ऐसी मेरी खाईष तोभी क्यौं होती! और सात उस्के गले मिलनेका इरादा क्यौं होता? जिस वख्त वो यहांसे गया या नगया उतनेमें गायब क्यौं

होता ? ये सब खसलत इनसानकी है ? सछ कहोतो, ये लुत्फ उसीके है के जिस्ने हमे पैदा किया ! ये बारेदात तुम को कुछ मालुम नहीं, इस कामसे बाज रहो. ( पंतांस मिठी मारून) भाई दामाजी, तेरे लिये वो यहां आया, उस्को तू बता वेगा तो तमाम उमरभर तेरे अहेसानमंदीमें गुलाम होके रहुंगा, इसलिये वो चीज मुझको जलदी बतलाo नसीब तेरा बहोत अछा है के, तेरे गिरीयावजारीको सुन्के खुद परमेसरभी आया ! ऐसा अचंबा खेल मैतो कभी नहीं देखा और नसुना. ओहो उस्के कोषिषमें आज हजारो आदमी घूमते फिरते हैं, मगर वो कुछ ऐसे आदमीयोंको मिलेगा ? नहीं, बगैर तुह्मारे मारिफतसे उस्का दर्सन नहीं होवेगा.

दा० — सकार, त्याचें दर्शन आतां कसें होणार? हें दुनियेचें अवाढव्य राज्य चालविण्याकारेतां तो राजाधिराज परमेश्वर काय करीत असेल हें त्याचें त्यालाच ठाऊक. आमचे मनुष्यांचे त्याविषयीं तर्क निरर्थक आहेत, तो ज्यावेळेस जसें पाहिजे तसें नटतो. तेव्हां परमेश्वर ह्मणजे एकच रूप घेऊन बसला आहे असें नाहीं. ज्या कामासाठीं त्याणें महाराचें रूप घेतलें होतें तें काम त्यानें केलें, आतां त्याचें दर्शन कसें होईल ? स्वप्नामध्यें कामिजनास, कधींही न पाहिलेल्या अशा रूपवती स्त्रीचें दर्शन होऊन तिच्या प्राप्तीसाठीं त्यानें यत्न केल्यास ते निर्फळ होत, हें काय सांगावें ? हें परमेश्वराचें दर्शन आपल्यास जागृदवस्थेंत झालें एवढेंच. असो; आतां त्याचें दर्शन आह्मांस, आंधळ्यांस सूर्यदर्शना प्रमाणें, सर्वथैव दुर्लभ आहे !

पं० — मुझको जो कुछ तमा थी के विठू धेडको मिलूं और उसको घट दबाके पकडूं, ऐसा न होते नाउम्मेदीके दरि-

यावमें डूबके फसाहूं ! ! फिर मेरे जानके लिये तुमको बिलकुल परवा नहीं, ऐसा समझना जरूर है. क्योंजी सछ है या नहीं ? अब मेहेरबानी करके ये कहो के हम उसको कौनसे राहासे मिलें ? उसने आपना नाम बीठू क्यौंकर रखा.? और ऐसा काम खुद तुम्हारे लिये क्यौं करके किया ? •,

दा० — सरकार, त्यानें माझ्यासाठींच रूप कां घेतलें. तें मीं आपल्याच तोंडानें काय सांगावें ? आपल्या पदरीं पुण्य फार म्हणून तो सरकाराच्या दरबारांत आला !

पा० — दामाजीपंत, सछ करके मैं कहेताहूंके इतनी बडी रकम वो तुम्हारे मोहोबतके लिये लाया, इस बातपरसे यु जाहिर होताहै के तुम बडे परहेजगारहो, और सदूक दिलसे खुदाकी बंदगी और वैसेही रहेबाजहो, ये मेरा कहेना नहीं, खुद उसने आपने मूसेभी जाहिर किया, और यु कहाके वलियोंके फरमाबरदारीमें हमसरीके गरीबोंको बगैर मेहनतसे कोई एक चीज कैसी मिलती है, सो येभी बयान किया, इसलिये महाराज, आप वली और विलायतके दर्जेसे वाकिफगारहो, ऐसा रहेके मैने आपकी बहोतसी गीबतें किई, इतनेसे कुछ नहीं, मगर तमाम हिंद, अक्सर करके तुम्हारे बम्मनोंको गालियां और चाहेसो बातें सुनायाहूं, सछ करके पूछो तो जिस किसीके तैनातीमें जो लोग नौकारियां करते हैं, वे अछे अकलमंदीमें वाकिफगार, और दिलके बडे बुर्दबाजे चाहिये, के जिसके सबबसे अपने खाविंदका दिल अछा रहे, नही तो कंबख्त लोग सछ और झुटकी बिलकुल चौकशी न करते आपने खाविंदकी और उसमें दिलको आयेसो सच बताके

आपनीभी खराबी करलेतेहैं, उसी माफिक मेरा हाल हुवा है, तुम्हारे पंडत लोगोंकी मैंने बहोतसी गीबत किई और उनकी खराबी करनेके लियेभी मुस्तईद हुवाथा, मगर तुम्हारी लियाकतको पेहेचानके मेरे दिलकी अछी खातरदारी हुई, और आजसे तुम्हारे लोगोंके लिये मेरा दिल बहोत साफ राहेगा.

दा०—खावंद हें काय बोलतां ? ह्या हलक्या कामासाठीं परमेश्वरास फार श्रम पडले, त्यास दरबारांत नीच मनुष्याप्रमाणें उभें रहावें लागलें, वगैरे गोष्टींविषयीं मला फार वाईट वाटत आहे ! असो, वाईट वाटून तरी काय उपयोग ? त्यानें केलेल्या कृत्यास नांव कोणीं ठेवावें ? आपण त्याला भेटण्याचा मार्ग विचारलात, तो ह्मणजे मीं आपल्यास नवीन सांगावा असें कांहीं नाहीं, पूर्वीं अनेक परोपकारी व सत्पुरुष होऊन गेले त्यांनीं अनेक मार्ग सांगितलेच आहेत ! त्यांत मुख्य मार्ग ह्मटला ह्मणजे स्वधर्मानें वागून निष्कपट त्याची भक्ति करावी, अधिकाराच्या योगानें किंवा दुसऱ्या कोणत्याही सत्तेच्या योगानें परधर्माचा व परधर्मी लोकांचा उच्छेद करणें हें इहलोकीं व परलोकीं मोठें दुःख देणारें पाप आहे. सरकार, ज्या वेळेस दुसऱ्याचे धर्माविषयीं राजाचे मनांत तिरस्कार येतो व त्याचे नाशाविषयीं तो उद्युक्त होतो, त्या वेळेस खचित खचित असें समजावें कीं, तो राजा आपले राज्याचा नाश करण्याविषयीं तयार झाला आहे ! त्यानें विठू असें नांव सांगितलें ह्यावरून त्याणें असें दाखविलें कीं, पंढरपुर येथें आमच्या लोकांचें मोठें जगत्प्रसिद्ध फारच जुनें देवालय आहे, त्यांत जी परमेश्वराची मूर्ति आहे ती विठ्ठल ह्या नांवानें प्रसिद्ध आहे,

तेथें हा भक्तांचा पिता असाच आपल्या एका पुंडलिक भक्तासाठींच धावून आला होता, व त्या दिवसापासून तो त्या भक्ताच्या आग्रहानें जगत्कल्याणासाठीं मूर्तिरूपानें उभा आहे. त्या दिवसापासून त्याची भक्ति करणारे पुष्कळ मोठमोठे सत्पुरुष होऊन गेले. व ह्यानेंही अनेक भक्तांचीं नाना तऱ्हेनें संकटें दूर केलीं आहेत. तो विठ्ठल आपण विठू बनला, व त्यानें हा चमत्कार दाखविला.

पां०— तुह्मारे बात परसे मुझकोभी यकीन हुवा है के तुम खुदायेताळाके बडे आषक हो, अगर हमको तुम्हारी दीनकी रुसूम बिल्कुल मालुम नहीं, तोभी नेकबख्त और रहमबाज वली लोंग तुह्मारेमें बहोतसे होगये हैं, उसी माफिक कमदरजेसे लेके दाना आदमीतक् आप आपनें मर्तबेके माफिक उस परवारदिगारको पहेचान्नेकेलिये अच्छी तदबीर जानते हैं, ऐसाभी हम सुने है, और हिंदू धरम्में ये नहीं के दूसरोंके दीनकी खराबी करें या उन् लोगोंको झिटकारें औरभी बहोतसे बातें हैं, मगर मेरे दिलकी ऐसी खातरदारी हुईके हिंदू धरम बहोत अच्छा है. इस दीनमें खुदाकी बंदगी करें तो उसकी दुआ मकबूल होवे या नहीं इस लिये फिकर करना कुछ गरज नहीं, लेकिन मेरे तैं तुम्हारे दीनमें लेके उस देवलमेंके देवकी दर्सन होवे ऐसी तदबीर करो.

दा०— खावंद, ज्या धर्मांत आपण जन्मलों तो सोडून दुसऱ्याचा घेणें हें फार भयंकर काम असून बेअकलेचें आहे. कोणताही धर्म असला तरी त्यांत सदाचरणानें वागून त्या एक परमेश्वराला भजावें हाच उपदेश असणार, तेव्हां अमुक धर्म चांगला आणखी अमुक वाईट म्हणणें ह्यास काय म्हणावें?

आपल्या राज्यांत आमचे पुष्कळ लोक अनेक कारणांनीं आपल्या धर्मांत गेले आहेत, परंतु ते नानाप्रकारच्या दुःखांनीं गांजले असतील ह्यांत संशय नाहीं. तेंव्हां आतां आपल्या राज्यांत, धर्माच्या कामांत कोणत्याही प्रकरचा जुलुम न व्हावा असा बंदोबस्त आपण ठेवावा. येणेंकरून लोक सुखी राहून आपलें हें बादशाही तख्त ईश्वरकृपेनें फार दिवस राहील.

मौ०– महाराज, आपका कहेना मुझको बहोत पसंद आया लेकिन उस देवलमेंके मूरतकी दर्सन करवावोगे तो तमाम उमरभर आपके अहेसानमंदीमें रहेके तुह्मारा कहेनाभी हरवख्त ताबे मगदूर बजा लावूंगा.

दा०– सरकारास त्या मूर्तीचें दर्शन होण्यास कांहीं हरकत आहे असें नाहीं, परंतु परमेश्वर पाहिजे त्या ठिकाणीं आहे, तो त्या पंढरपुरांतील मूर्तीतच आहे असें नाहीं. तो सर्वत्र भरलेला आहे. फार काय तो आपल्या हृदयांत आहे ! त्याला जाणणें हें मात्र आपलें काम आहे. कस्तुरिमृग कस्तुरीच्या वासानें सर्व रानभर फिरतो परंतु त्याच्यापाशीं ती आहे हें त्याला कळत नाहीं. असो; मग तेथेंच जाण्यांत विशेष अर्थ आहे असें नाहीं ! परमेश्वराचें रूप तर समजणें नाहींच, आपण समजावें तें रूप. आमच्या शहाण्या पूर्वजांनीं, आमच्या कल्याणासाठीं त्याची सुलभ रीतिनें सेवा व्हावी ह्मणून, परमेश्वराची मूर्ति कल्पून तद्द्वारा त्याची भक्ति करावी ह्मणून सांगितलें आहे ! अहाहा परमेश्वरा, तुला जाणावयास किती सुलभ उपाय हा !

मौ०– क्योंजी, मेरी कौन्सी भी बात कबूल नहीं करतेहो ये क्या है !! अगर गौर करके देखो तो तुह्मारा कहेना सब

दुरुस्त है, मगर मेरा आखरिषका अर्ज ये है के और उस्में बखुवी तुम कबूल करो तो खातरदारीसे कहेताहूंके उस देवको मैं देख चुका.

दा०– काय तें बोलावें. माझ्या हातून होण्यासारखें असल्यास तें करण्यास मी तयार आहे.

पा०– आपके सरीके दानिश्मंद और रहंम्बाज आदमी इस बेदरके सल्तनतमें रहें इस्के सबबसे हमको तुह्मारी हरवख्त मुलाकात होते रहीगी, चाहोतो आपको बडे ओहदेपर बिठाऊं, या कुछ ईनाम कबूल करके सात कबीलासाहेबेक तुह्मारे यहां रहें. जबके तुह्मारे बंदगीको कबूल करके खुद परमेसर तुमको दर्सन दिया ऐसे आदमीके सोहबतमों हम रहें तो उसीमें हमारी भलाई है, इसवास्ते मेहरबानी करके रहेनेकेलिये कबूल करो तो तुह्मारे रिश्तेदार वगैरा लोगोंको बुलवानेके लिये यहांसे अभी जवानोंको भेजताहूं.

दा०– सरकार, आपल्या हुकुमाबाहेर मीं वागावें अशी माझी योग्यता नाहीं, आजपर्यंत हा देह आपल्याच अन्नानें पुष्ट झाला आहे. आपलीही आतां पूर्वीप्रमाणें नोकरी करावी हें योग्यच, पण महाराज, ज्यानें माझे प्राण वांचविण्याकरितां हलक्या मनुष्याचें रूप घेतलें व सरकारांत रुपये भरतांना माझा चाकर ह्मणून सांगितलें, त्याचे उपकार मीं कोणत्या रीतीनें बरें फेडावे ? ह्मणून सरकाराजवळ माझा शेवटचा अर्ज एवढाच आहे कीं, पंढरपुर येथें राहून मरेपर्यंत त्या विठ्ठलांची सेवा करण्याकरितां मला परवानगी मिळावी. त्या भगवंताचे कोणत्याही रीतीनें उपकार फेडले जाणार नाहींत हें तर उघडच आहे, परंतु ज्याणें एवढें अलौकिक कृत्य केलें त्याला प्रतीकीचे-

त् तरी कृतज्ञता दाखविण्याकरितां हें सर्व सोडून त्याजवळ राहण्याचा मीं निश्चय केला आहे. ज्या वेळेस आपले मनुष्य मला पकडून नेऊं लागले त्या वेळेसच मी मनांत त्याला असें बोललों होतों कीं, जर या संकटांतून तुझ्या कृपेनें सुटलों तर हा संसार सोडून सर्व आयुष्य तुझ्या सेवेंत मीं घालवीन. मग मला आतां सरकारच्या हुकमा-प्रमाणें कसें बरें वागतां येईल? तेव्हां मला मात्र आपण, तसें करण्याविषयीं परवानगी द्यावी.

[१५१] पां०— मैं किया सो अर्ज आप बिल्कुल कबूल नहीं करतेहो ! इसमें हमारी कम नसीबी समझना चाहिये ! आप सरीके वलियोंके सात तकरीरभी करना अच्छा नहीं. खैर, आख-रिष्का मेरा कहेना ये है के दोतीन रोज तोभी यहां आ-राम करें. जबके आप मंगलवेढेमें रहेनेके लिये नाकबूल होते हो तब उस जायपर कौन्से आदमीको रखें, ये आपके तरफसे मुकर्रर होवे तो बहोत अच्छा है.

दा०— ह्या वेळेस आपण ज्याला नेमलें आहे, तो मुजुमदार फार वाकबगार असून फार चांगला हुषार आहे, त्या-सच ती असामी कायम करावी. मला येथें रहाण्याविषयीं हुकुम करतां त्या प्रमाणें मी एक दिवस रहातों. परंतु पंढरपुरास जाऊन त्या मूर्तीस पाहण्याविषयीं फारच उत्सुक झालों आहें. इकडे मात्र सरकारचें लक्ष असावें.

[१५२] पां०— जिस आदमीने आपकी बे आदबी और खराबी करने चहा फिर उसीके बरदाश्त करनेकेलिये तय्यार हुये हो, बडी तारिफ है, खैर, हाल बहोत थकेहुये नजर आतेहो इसलिये हम नहीं चाहातेहें के तुमको और तस्दियां देवें, अगरचे हम बहोत सी बातें करें तोभी हमारे दिल्की तमा कभी दूर नहीं होवेगी

मेहेरबानी करके दोतीन रोज रहो तो सबलोगोंको आपकी मुलाकात होवे ऐसा दरबार भरवाताहूं.

दा० – मी यःकश्चित् मनुष्य आहें ! माझी भेट लोकांला कशाला पाहीजे !

पो३० – दामाजीपंत, आपको मुख्तसरमें कहेताहूं के तुमको बराबर न पहिचान्नेके सबबसे कैद करके पकड मंगवाया, औरभी मेरे तरफसे बहोतसे तक्सीर हुयेहैं सो वो माफ करके ये पातषाहत अच्छी तौरसे चले और मेरेभी हक्कमें उस जनाबेइलाहीमें दुवा मांगोगे ऐसी मेरे दिल्की बखूबी खातरदारी हुई है. ( असें ह्मणून त्याचे पाय धरावयास जातो. )

दा० – सरकार हें काय ? मी मात्र आपला सर्व प्रकारें अपराधी होतों खरा, आपल्या हातून माझें कांहींही वाईट झालें नाहीं, आपणांस परमेश्वरानें प्रजेचें चांगलें रक्षण करण्या विषयीं बुद्धि द्यावी, व त्यानें, आपलें राज्य सतत उत्तम प्रकार चालवावें हीच माझी इच्छा आहे.

पो४० – आपको मेरेतरफसे बहोत तकलीफ हुये है सो माफ करके अंदर चलो तो सब कुछ आराम होजायगा.

( सर्व जातात. )

---

## अंक ७.

### प्र० १. स्थळ– दामाजीपंतांचा वाडा.

( उपाध्याय व दामाजीपंतांची स्त्री सावित्रीबाई.)

सा०– उपाध्येबोवा, तिकडे जाऊन आजचा एकुणिसावा दिवस! तिकडील अजून कांहींच समाचार समजत नाहीं. रात्रीं पुष्कळ प्रकारचीं वाईट बरीं स्वप्नें पडतात, काय पडतात त्यांची दुसऱ्या दिवशीं आठवण सुद्धां राहात नाहीं इतके दिवस मीं कसे तरी दुःखानें लोटले, आतां माझ्यानें दिवस कंठवत नाहींत तिकडचें वर्तमान मला काय असेल तें सांगा. तुह्मांस खचित ठाऊक असेल पण तें मला आपण सांगत नसाल! तर असें करूं नका; कसाही समाचार असला तरी सांगा. माझें मन आतां अगदीं दगडापेक्षांही कठिण झालें आहे! सांगा हो सांगा, मग पुढें मला काय करणें तें मी करीन. ( डोळा चोळून ) उपाध्येबोवा, हा माझा डावा डोळा फारच लवूं लागला आहे, काय ह्याचा गुण तोही मला सांगा. खरें मात्र सांगा, संकोच धरूं नका.

उ०– स्त्रियांचा वामनेत्र लवणें हें शुभ चिन्ह होय; ह्याचें फळ इष्टजनप्राप्ति आहे. तेव्हां आपल्यास पंतांची भेट आतां लौकर होणार यांत संशय नाहीं. आतां उगाच तुह्मीं शोक करूं नका. पंतांचा मलाही अद्यापि मुळींच समाचार कळला नाहीं, कळल्यावर आपल्यास सांगितल्याशिवाय मी कसा राहीन? कालच माझ्या मनांत आलें होतें कीं, कोणी तरी बेदरास मनुष्य अशासाठींच पाठवावा; परंतु तसा विश्वासू मनुष्य कोणी सांपडला नाहीं. एक

दोन दिवस आणखी त्यांची वाट पाहून नंतर मीच स्वतः तिकडे जाण्याचें करणार. पंतांला बादशाहाकडून कांहीं-ही अपाय होणार नाहीं. हें तुम्हीं पूर्ण लक्षांत ठेवावें. पंतांच्या वियोगानें माझीही आपल्यासारखीच दशा झाली आहे.. परंतु त्यांस ह्मणजे बादशहाकडून कांहीं इजा होईल, असें माझ्या मनांत सुद्धां येत नाहीं.

सा०— असेंच मला सर्व लोक दररोज सांगतात. परंतु तेवढ्यानें मला सुखास कसें पडेल ? जेव्हां त्यांचे पाय पुन्हा पाहीन तेव्हांच माझ्या जिवांत जीव येईल.

[ इतक्यांत एक दूत येतो. ]

दूत — दामाजीपंतकी औरत कहां है ?

उ०— ( घाबरून तिला आंत जाण्याची खूण करितो. ) ( मनांत ) काय हें आणखी दुसरें अरिष्ट आलें ! ( उघड ) अरे कोण तूं व कोठून आलास ?

दूत — महाराज मैं बेदरपातषाहाके तरफसे आयाहूं.

सा०— ( मनांत ) हाय ! हाय ! आतां हा काय सांगणार व कशाकरितां आला आहे नकळे ! माझें हृदय तर करपून गेलें ! ( उतावीळ होऊन त्याला ) अरे बाबा, तिकडचें काय वर्तमान आहे तें मला लौकर सांग ! तूं मला तिकडे नेण्याकरितां आला आहेस कीं काय ? नेत असशील तर ही मी येण्यास तयार आहे.

उ०— ( रागावून ) अहो, तुह्मांला आंत जायाला सांगितलें होतेंना ? मग इतक्या तुह्मी उतावीळ कां ? मी सर्व त्याला विचारतों. तुमचें बोलणें त्याला समजणार नाहीं. ( त्याला ) कशाकरितां आलास बाबा, दामाजीपंतांची तुला कांहीं खबर माहीत आहे काय ?

दूत[१५७]— जिहां, उन्हीका खबर आपको सुनानेकेलिये आयाहूं.

सा०— ( मनांत ) माझें हृदय फार धडधडत आहे. पण हा काय सांगेल तें ऐकण्याविषयीं मीं फार उत्सुक झालें आहें.

उ०— काय वर्तमान आहे, माझा दामाजीपंत खुशाल आहेना !

दूत[१५८]— जिहां महाराज, वे बहोत अच्छे हैं.

उ०— ( तिला ) पंत खुशाल आहेत. कांहीं काळजी करू नका. ( त्याला ) तर मग बादशहाकडून काय हुकुम आहे ?

दूत[१५९]—पंडत महाराज, पातषाहाका तो कुछ हुकुम नहीं, मगर उन्होने युं बोलके भेजे हैं के दामाजीपंतकेलिये फिकर करना कुछ गरज नहीं, क्योंके, वे यहां आनेके अव्वल उनके मेहरबानीमें पाला हुवा एक धेड आके तमाम रुपयें चुका दिये. और वे दो एक रोजमें यहां आवेंगे. सो ये तमाम हकीकत उनके औरतको जाहिर करो, मेरेको और दूसरे कामोंकी जलदी है, सो मैं जाताहूं.

( जातो. )

उ०— अहो सावित्री बाई, धन्य तुमची. कोणी पंतांच्या महारानें बादशाहाचे दरबारीं जाऊन सर्व रुपये भरले असें त्यानें सांगितलें. तो तर आतां निघून गेला. पंत खुशाल आहेत हेंच सांगण्याकरितां तो आला होता. ( स्तब्ध राहून ) काय चमत्कार हा ! कोण पंतांचा महार हा ! कोणीं त्याला रुपये पाठविले ? त्याजवळ इतके रुपये कोणीं दिले! हा काय प्रकार असावा कांहींच समजत नाहीं. ( विचार करून ) हे रुपये या पंढरीनाथानें पंतांकरि-

तां भरले असें मला खास वाटतें. एवढी रक्कम ह्या दिवसांत दुसरा त्याशिवाय कोण भरणार! काय तो विठ्ठल परब्रह्म स्वतः महार झाला असेल काय? संशय कशाला! भगवद्भक्तांचा महिमा मोठा विलक्षण आहे! परमात्म्याला भक्तकाजकैवारी नांव उगाच मिळालें आहे काय? दामाजी, तूं धन्य आहेस. तुझें वर्णन करणें माझ्या वाणीला अगम्य आहे. हें खचित खचित त्या विठ्ठलाचेंच कृत्य! काय पंतांचें भाग्य हें!

ना०— काय ह्मणतां तें मला कांहींच समजत नाहीं. विठोबानें आह्माकरितां असें केलें काय? पण असें होईल कसें! ह्या वेळेस मी स्वभ्रांत तर नाहींना! देवा, तुला आमच्यासाठीं इतके भाग वें लागलेंना? विठ्ठला, त्वां घेतलेले श्रम त्यांचे प्रचीतीस येऊन त्यांना काय बरें वाटलें असेल!! पंढरीनाथा, तुझ्यावर तिकडची अतोनात श्रद्धा होती ह्यांत संशय नाहीं, आणि ह्मणूनच तूं निर्वाणीं धावलास; देवा, हें तुझें ऋण आमच्या हातून कसें व केव्हां फिटणार? आतां ह्या गांवीं एक घटिकाभर सुद्धां राहणें योग्य नाहीं तिकडून येणें झालें कीं, पंढरपुरास त्याचे चरणांजवळ राहावयास निघून जावयाचें. देवा, आतां त्यांना मात्र इकडे आल्याशिवाय परस्पर पंढरीस जाण्याची बुद्धि देऊं नको. आह्मी उभयतें बरोबर तुझ्या पायांजवळ येणार. त्यांचें मुख जेव्हां दिसेल तेव्हांच हें वर्तमान मला खरें वाटेल.

इ०— ह्या ईश्वरसदृश प्राण्याचें दर्शन कधीं होईल असें मला झालें आहे. एतद्विषयीं सविस्तरवृत्त त्यांच्या मुखांतून श्रुत व्हावें ह्मणून मी फारच उत्कंठित झालों आहे. ईश्वर-

साक्षात्काराच्या कथा इतके दिवस आपण ग्रंथांतच अव-लोकन करीत होतों, व ऐकत होतों. आज तर हा प्र-त्यक्ष अनुभव आला. अहो नास्तिकलोकहो, अहो कर्म-धर्मभ्रष्टजनहो, परलोकाविषयीं निर्भय राहून, ह्या पृथ्वी-वरील, क्षणिक सुखाचा आभास मात्र उत्पन्न करणाऱ्या विषयवित्तादिकामध्यें गढून ह्याउपर तरी त्या परमका-रुणिकास नका हो विसरूं. परमेश्वराचें भय बाळगून नरकयातनेपासून दूर रहा. ह्यांतच तुमचें कल्याण आहे. अर्धवट विद्या, अविचार, कुसंगति, वित्त, अ-धिकार इत्यादिकांचा चिखल आपल्या ज्ञानचक्षूंवर उडवून घेऊन, अंध बनून हीं अमोलिक शरीरयष्टि हरवूं नका. विचार करा ! विचार करा ! आणि ह्या मनुष्यजन्मांत, अफाट वाळवंटांतील वाळूच्या एका कणाप्रमाणें, तुमच्या वांट्यास आलेलें हें अल्प आयुष्य भलत्याच कामांत खर्च करूं नका. धन्य ! धन्य ! पंतहो तुमची धन्य आहे. पांडुरंगाशिवाय हें कोणाचेंही कृत्य नव्हे, असें माझें मन मला सांगतें. व तद्विषयीं मला किमपिही शंका सुद्धां येत नाहीं. आतां हें शुभ वर्तमान सर्वत्र केव्हां कळवीन असें मला झालें आहे तर प्रथमतः आपल्या मंडळींत हें विश्रुत करावें. ( जातात. )

## प्र० २. स्थळ–मुजुमदाराचा वाडा.

( मुजुमदार व त्याची स्त्री. )

मुजुमदार– अहो अशा या इकडे; किती सारा दिवस रागावावें, आह्मीं तुमच्याकरितां जरी कितीही श्रम केले तरी ते आपल्या मनास कधींच यावयाचे नाहींत. असा काय स्वभाव हा ! काय असेल तें मला निष्कपटपणें सांगावें. काय पाहिजे असेल तर बोलून दाखवावें, मी द्यावयास तयार आहें. असें वेड्यासारखें कोणीं केलें ह्मणजे मला अगदीं राग येतो. आज ह्मणजे मला कोणत्या गोष्टीचा तोटा आहे असें बिलकूल नाहीं. तुह्मी मात्र ह्या अशा !

स्त्री– आपल्याला कोणत्याही गोष्टीचा तोटा नाहीं सर्व ठीक आहे. मी मात्र मनास येत नाहीं, म्हणून दुसरी करावी म्हणजे ठीक होईल.

मु०–( लाडांत येऊन ) दुसरीही केली असती, पण आपला राणीसरकारचा हुकुम पाहिजेना ? मुलांना काय तोटा आहे ?

स्त्री– माझें काय गेलें आणखी दहा लग्नें केलींत म्हणून! खुशाल करा, माझी आपल्यास मुळींच आडकाठी नाहीं. मला काय बरेंच झालें. ह्या संसारांतून सुटेन तरी एकदांची. ( आंत जावयास लागते. )

मु०– ( जवळ जाऊन तिचा हात धरून ) असें काय बरें हें! तुम्हाला मस्करीनें बोललेलें सुद्धां खरें वाटतेंना ? आम्ही जर आपल्या बायकांशीं विनोद करूं नये तर करावा तरी कोठें. मागा तुम्हाला पाहिजे तें मजजवळ, आ-

हा मंगळवेढें महाल माझा आहे. सर्व खजीना माझ्या हातीं आहे. इतके दिवस तो दामाजी होता, तो सुद्धां आतां गेला. काय त्याचें झालें तें अद्याप समजणेंच आहे. तुमच्या तोंडांतून काय तें येऊं द्या. मी देण्यास तयार आहें. बोला बोला, आतां उशीर करूं नका.

स्त्री– सगळें आपले स्वाधीन आहे म्हणावयाचें, मात्र, परंतु मला उपयोग काय?

मु०– असें कां बरें म्हणतां? मीं तुम्हांला काय कमी केलें आहे! काय माझा अपराध असेल तर सांगा. मला तुमच्या अशा बोलण्याचा अगदीं राग येतो. परंतु (हनुवटी धरून) ह्या मुखकमलाचा एकदां मुका घेतला कीं–(असें ह्मणून मुका घ्यावयास जातो)

स्त्री– (हात झिटकारून तोंड एकीकडे करते.) नका माझा घेऊं मुका. व्हा पलिकडे.

मु०– अहो, ही सर्व खटपट मी आपणाकरितां करीत असतां शेवटीं आम्हाला तुम्हांकडून हें बक्षीस मिळावेंना! ही बायकांची जात मोठी खराब आहे. ह्यांचे जों जों आपण लाड करावे तों तों ह्या अधिकच डोक्यावर बसतात. आम्हीं पुरुषांनीं बाहेर मरमर श्रम करावे, लोकांचें बोलून घ्यावें, खोटें नाटें करावें, आणि ह्यांच्या तब्बेती राखाव्या तरी ह्यांना त्याचें कांहींच नाहीं. सुखानें नवऱ्यांबरावर कधीं ह्या गोड बोलावयाच्या नाहींत, स्त्रियांसारखी कृतघ्न जात जनावरांमध्यें सुद्धां मिळणार नाहीं. तरी परमेश्वरानें ह्यांना परतंत्र केल्या आहेत! ह्यांच्यामध्यें गर्भसंभवादि गोष्टी स्वातंत्र्यदानि करणाऱ्या आहेत ह्मणून फार चांगलें आहे! जगतांत कुकर्म व्हावयास मुख्यसाधन स्त्रीच

होय! ज्या पुरुषाचे पायांत ही जबरदस्त बिडी पडली नाहीं तोच पुरुष तुरुंगांत पडला नाहीं, व त्यामुळें ते सुखी म्हणावयाचा ! ह्या भवनदींतील खरोखर ह्या मगरी आम्हा पुरुषांस धरण्याकरितां ' आ ' करून राहिल्या आहेत. ह्यांना उगाच कोणी स्त्रीलंपटानें अबला हें नांव दिलें आहे! परंतु ह्या अशा पराक्रमी आहेत कीं लढाई मध्यें हजारों लोकांचे प्राणहरण करणारे जे महा वीर त्यांना सुद्धां ह्या दृष्टिबाणानें बलहीन करून केव्हांच शत्रू प्रमाणें हस्तगत करितात ! मग यःकश्चित् अमच्यासारख्या मनुष्यांची ह्यांच्यापुढें काय मातबरी. ह्या बोलतील एकाशीं, मन असेल भलतीकडे, आज प्रेम असेल एकाशीं, उद्यां त्याला सोडून तिसऱ्याशींच माया दाखवितील! स्नेहप्रेमादि छेदण्याविषयीं ह्या साक्षात् शस्त्रांच्या तीक्ष्ण धारा होत ! दारूहून हजारपट मादक. हा स्त्रीसारखा पदार्थ ह्या पृथ्वीवर जर मुळींच नसता तर पुरुष कधींही निर्लज्जपणें पापमार्गांत पडले नसते. साहस करण्याविषयीं तर ह्यांचे ठिकाणीं वायूपेक्षांही जास्त वेग येतो. परमेश्वरा, प्रजोत्पत्तीचा मार्ग हा अशा रीतीनें कशाला काढलास ह्यांनीं पृथ्वीवर काय काय अनर्थ केले आहेत ! कोणी तप केलें कीं ह्या आल्या पुढें कपटी ! आजपर्यंत ह्यांनी कोट्यवधि श्रीमंतांस भिकेस लाविलें असेल ! लक्षावधि तरुण मदनासारख्या सुंदर पुरुषांचे प्राण हरण केले असतील! ह्यांची योग्यता ह्मटली ह्मणजे ह्यांना बसतां लाथ व उठतां बुक्की हेंच बक्षीस पाहिजे. असें नायकांविषयीं किती बोलूं ! जा येथून निघून, कर काळें ! माझ्या दृष्टीसमोर नको.

स्त्री— असें अगदीं रागावयाला काय झालें? मीं आपल्याशीं उगाच विनोद केला, त्यामुळें आपण मजवर एवढा कृपेचा वर्षाव केला ना? ही मी तुमच्या पायां पडतें. मला सर्व क्षमा करा. हा तुह्माला पदर पसरला. मला नकळे बाई एवढें पेटेल हें! ( असें ह्मणून मिठी घालते. )

मु०- मी तुह्माला कोठें बोललों? उगाच रागानें भकलों कांहीं तरी! स्त्रियांशिवाय पृथ्वी चालेल तरी कशी? स्त्रियांची योग्यता काय सांगावी! स्त्रिया ह्या सर्व सुखाचें मूलस्थान आहे. ह्या भवारण्यांत तृषित झालेल्या पुरुषाची विमल स्त्रीजलावांचून आणखी कशानें तहान भागणार आहे? संसारांत स्त्रिये वांचून रहाणें ह्मणजे अगाध समुद्रांतून नावेवांचून जाण्याचा यत्न करणें ह्या प्रमाणें आहे! लगामेच्या योगानें घोडा जसा स्वाधीन रहातो त्याप्रमाणें ह्यांच्या योगें पुरुष बेफाम न होतां सन्मार्गांत राहतो. बहुधा आड मार्गानें जाऊन खाड्यांत पडत नाहीं. पुष्कळ समंजस पुरुषांना स्त्रीबंधन नसल्यानें, ऐन तारुण्याचे धुंदींत, अति निंद्य आचरणानें ते ह्या जगांत अगदीं कवडीच्या किंमतीचे होऊन पशूंच्या उपमेसही अयोग्य असे झाले आहेत! पुष्कळ ठिकाणीं साधु ह्मणविणाऱ्या पुरुषांनीं स्त्रियांची व्यर्थ निंदा केली आहे! पुरुषांना आपलीं इंद्रियें आपल्या आधीन ठेवण्याचें सामर्थ्य नाहीं, ह्यांत त्या बिचाऱ्यांचा काय दोष! ह्याबद्दल वास्तविक पाहतां पुरुषांनींच आपली निंदा करावी. परंतु तसें न करितां आपल्या अपराधांबद्दल ते दुसऱ्यांस दूषणें देतात! ज्याच्या जवळ विद्या वगैरे, द्रव्य मिळविण्याचें कांहींच साधन नाहीं व दुसरे कोणत्याही रीतीनें तें त्यास मिळत नाहीं

अशा दरिद्री पुरुषानें लक्ष्मीची निंदा केलेली कोणास तरी रुचे-
ल काय? सारांश काय कीं प्राणिमात्रांच्या विश्रांतीसाठीं जशी
परमेश्वरानें रात्र केली आहे त्याप्रमाणेंच ही स्त्रीजाति उत्पन्न-
केली आहे !! झालें आतां ?

(इतक्यांत पडद्यांत 'अहो मुजुमदार, दार उघडा.' )

मु०- बाहेर कोण ह्या वेळेस रात्रीं हाक मारीत आहे ?

ग०- महाराज, मी गणपतराव.

स्त्री- आली इतक्यांतच कोणी कटकट !!

मु०- कोण गणपतराव ! या की हो आंत.

( गणपतराव येतो, ती जाते. )

मु०- आज आपण रात्रीं कोणीकडे ?

ग०- काय करतां, तसें काम असलें ह्मणजे अशा वेळींही यावें
लागतें. आजचें वर्तमान तुह्मांस कांहीं समजलें नसावें,
असें मला वाटलेंच होतें, आणि ह्मणूनच मी तुमच्याकडे
आलों.

मु०- अहो, असें काय वर्तमान तें ?

ग०- ऐका, सांगतों. दामाजीपंत निरपराधी ठरून सुटला
बहुधा तो उद्यां किंवा परवां येथें येईल.

मु०- काय तें बोला लौकर ' उगाचं काय ह्मणून थट्टा
करितां. थट्टा करणें ती तरी वेळ पाहून करावी. दामाजी
सुटला असेल नाहीं कोण ह्मणतें,. ह्या जन्मांतून सुट-
ला असेल खरा ! सांगाहो काय वर्तमान तें.

ग०- मीं जें आज संध्याकाळीं ऐकिलें तें तुह्मांला सांगितलें
मग तुह्मांला खरें वाटो कीं खोटें वाटो; मी आपली भ-
लत्याच वेळीं थट्टा कशी करीन !

मु०- बरें बरें काय ऐकिलेत, कोठें ऐकिलेत, कोणीं सांगि

तलें, तें बोला. ऐकायाला आपलें काय जातें! तुम्ही मुद्दाम रात्रींचे आलां तेव्हां तुम्हांला मान नकोका द्यायाला?

ग०— तें कांहीं ह्मणा, मीं चिंतोपंत, रामभाऊ वगैरे मंडळीच्या तोंडांतून असें ऐकिलें कीं आज कोणी बादशाहाकडून मुद्दाम मनुष्य आला होता, त्याणें असें सांगितलें. कीं पंढरीच्या विठोबानें महाराचें रूप घेऊन, पंत जाण्याचे अगोदरच सर्व रुपये भरले. तेव्हां आतां दामाजीचा कांहींच अपराध नाहीं हें उघड झालें. हें कृत्य पाहून बादशाहास केवढा चमत्कार व आनंद वाटला असेल. उगाच आपण त्या साधुपुरुषाशीं आजपर्यंत वैर धरिलें !!

मु०— ( हसून ) तुमच्या शहाणपणाची आतां कमाल झाली ! काय हा गणपतराव तुमचा भोळेपणा ! मग मीही प्रत्यक्ष पाहिलेलें एक तुह्मांला वर्त्तमान सांगतों.

ग०— तें काय वर्तमान ? असेंच कांहीं चमत्कारिक आहे कीं ह्याहीपेक्षां चमत्कारिक आहे ?

मु०—काल येथें रात्रौ असें झालें कीं, स्वर्गांतील इंद्रादि सर्व देव अप्सरांसह येऊन त्यांनीं एक रत्नखचित मंडप तयार करून त्यांत नानाविध उपभोग घेतले. त्या वेळेस मीहि तेथें गेलों होतों. अहाहा ! काय तें सौख्य ! त्या ठिकाणीं, कल्पतरु ह्मणतात ते सुद्धां म्या पाहिलें.

ग०— म्हणजे ! कांहीं तरी बोलतां आपण, भलतेंच कांहीं तरी सांगतां ! खरोखर कांहीं असेल तर सांगा ! हें स्वप्न पडलें असेल तुह्मांला !

मु०— आह्मी भलतेंच सांगतों, आणि तुम्ही मात्र काय तें खरें सांगतां ! अहो, तर तुम्हाला असें समजत नाहीं कीं, तो परमात्मा परम पवित्र, निराकार मनुष्याचें रूप घेऊन

रुपये भरील असें कधीं तरी या कलियुगीं आतां संभवेल काय ? मागच्या युगांतील आतां गोष्टी राहूं द्या.' तो भक्तांसाठीं पाहिजे तें करील असें मी पण ह्मणतों, परंतु ईश्वरानें त्याच्यासाठीं रूप घेऊन त्याचें कार्य करावें असे भक्त व भक्ति ह्या काळांत आहे कोठें ? असा काय दामाजी भक्त लागून गेला आहे ! तो मोठा दांभिक व कावेबाज आहे. विठोबानें रुपये भरले हें जर तुमच्या ह्मणण्याप्रमाणें क्षणभर खरें मानिलें, तर दामाजीनें केलेलें विश्वासघाताचें कृत्य त्या पंढरीनाथासही आवडलें असें झालें. हें धडधडीत वाईट कृत्य शतमूर्खाशिवाय कोणालाही आवडणार नाहीं, मग गणपतराव, त्या न्यायी परमेश्वरास कसें बरें आवडेल ? अहो, दामाजीच्या पक्षाच्या मंडळीनें हें कांहीं तरी उठविलें आहे, आणि तें तुम्ही खरें मानितां, काय ह्या तुमच्या अकलेस म्हणावें. असें भलभलतेंच त्यांनीं सांगितलें म्हणून आमचें काय त्यांत कमी होणार ? बादशहाचा मनुष्य तुम्हीं प्रत्यक्ष पाहिला होता काय ?

ग० – मीं प्रत्यक्ष त्याला पाहिलें नाहीं. मी आपली गांवबातमी सांगायाला आलों. ती खोटी असेल असें तुमच्या बोलण्यावरून मला पण आतां खास वाटतें. ह्यांत त्या मंडळीचा काय मतलब असेल तो परमेश्वर जाणे. गांवांत सर्व ठिकाणीं हीच बातमी पसरली आहे.

[ग]० – तुमची तर आतां खात्री झालीना ? मंडळीचें आतां कांहीं चालत नाहीं, तेव्हां त्यांनीं ही एक टूम काढली. तिकडे दामाजीचें काय झालें हें बहुधा उद्यां परवां समजेल. मग त्यांनाच विचारा तुम्ही कीं कशांतून तुमचा दामाजी सुटला तो !

ग०— बरें आतां फार रात्र झाली आली जातों.

मु०— येथेंच कां निजाना आतां ? एक दिवस घरीं नाहीं तर नाहीं !

ग०— गेलेंच पाहिजे मला, अद्याप जेवण कोणाचें झालें आहे ?

मु०— बरें तर या. अरे कोण आहेरे बाहेर ? ह्यांना सोबत जा कोणी बराबर. (सर्व जातात. )

---

### प्र० ३. मंगळवेढें, पंतांचा वाडा.

( उपाध्ये व चिंतोपंतवगैरे कारकून मंडळी येते. )

चिं ०— ह्या वेळेस जरी पंत भजन करीत नाहीं आहेत, तरी ही त्यांची वेळ दररोजची भजन करण्याची असल्यामुळें भजनाचे ध्वनि जणुं माझ्या कर्णांत पडत आहेत असा भास होत आहे. उपाध्येबोवा, काल आपण सांगितलेलें पंतांचें वर्तमान ऐकून आह्मांस जो अत्यानंद झाला आहे तो कांहीं सांगतां येत नाहीं. ह्या साधुपुरुषाच्या वियोगापासून तों आज पर्यंत रात्रीं झोंप सुद्धां मला लागत नव्हती. काल आनंदाचें वर्तमान ऐकिल्यामुळें म्हटलें असतां गेल्या रात्रीं तरी ती सुखानें लागावी, परंतु हें विठ्लाचें पंतांसाठीं अलौकिक कृत्य ऐकून नानाप्रकारचे विचार माझ्या मनांत येत, अन्तःकरण प्रफुल्लित होई, क्षणमात्र मध्यें निद्रा लागली न लागली कीं पुढें पंतांची मूर्ति उभी राही ! केव्हां त्या पुरुषाचें दर्शन होईल असें झालें आहे.

धन्य त्या पंतांची ! धन्य पंतांच्या आईबापांची कीं, ज्यांच्यापासून हें सद्रत्न निघालें. अहो कोणी येत असल्यास महजराबर चला. पंतांशिवाय एक घटिका सुद्धां माझ्यानें आतां काढवत नाहीं. तो दयामृत मेघ ह्या चातकाच्या मुखांत दर्शनधारा केव्हां घालील ?

रा०— आपण ह्मणतां अशीच माझीही अवस्था झाली आहे. तुम्हीं ती कांहीं तरी बोलून दाखविलीत मला ती मुळींच बोलून दाखवितां येत नाहीं, इतकेंच. चला येत असाल तर मी हा असाच निघालों. अहो ज्याच्यासाठीं साक्षात् परमेश्वरानें महाराचें रूप धरिलें त्याच्या दर्शनासाठीं अद्याप आह्मी गेलों नाहीं हें केवढें आमचें हतभाग्य !

कृ०—हतभाग्य कां ? आह्मी मोठे भाग्यवान आहों, कारण अशा सत्पुरुषाचा समागम आम्हांस सर्वकाळ आहे, व त्यामुळें आम्हांस आजपर्यंत बहुत लाभ झाले आहेत. ह्या दुष्काळांत अन्न नसल्यानें जी लोकांची स्थिति झाली आहे, तीच पंतांच्या वियोगानें माझी स्थिति झाली आहे. अहो पंत, तुमची गांठ आतां केव्हां पडणार ! तुम्हाला कडकडून भेटून तुमच्या पायांवर हें मस्तक ठेवून हे आलेले प्रेमाश्रु कधीं त्यांवर पडतील ? हे साधो, तुमच्याशीं भाषण करण्यावांचून आतां इतर बोलणें मला व्यर्थ भासत आहे. पंत, आपल्यावांचून जर आम्हाला एक एक क्षण युगाप्रमाणें वाटत आहे तर आपल्या कुटुंबास काय बरें वाटत असेल !

ड०— अहो, बादशाहा म्हटला म्हणजे किती दुष्ट आहे, हें आपणास ठाऊक आहेच. पहा, एवढा भयंकर दुष्काळ पडल्यानें राज्यांत काय काय अनर्थ उद्भवले आहेत हें

त्यास कांहीं तरी माहित असेल काय ? पंतांस धरून नेण्यासाठीं त्यानें ते मनुष्य पाठविले त्या वेळेस तो किती क्रोधाविष्ट होऊन खवळला असेल याची कल्पना सुद्धां करणें कठिण आहे. त्या वेळच्या त्याच्या आवेशावरून पंतांस देहान्तच शिक्षा झाली असती हें अगदीं स्पष्ट आहे. असें असून बादशाहाकडून मुद्दाम जासूद समाचार सांगण्यास आला ह्यावरून तेथें काय चमत्कार झाला असेल बरें ? पृथ्वीवरील लाखोंगणती मनुष्यांसारखें मातेचें तारुण्यवन छेदून या अवनीतलावर पशुवत् यथेच्छ आहार निद्रा करण्याकरितां पंत जन्मले नाहींत, तर हा कोणी अलौकिक पुरुष आहे हें अखिल जगतास कळविण्याकरितां परमेश्वरानें हा खेळ केला, यांत किमपि संदेह नाहीं. त्याच्या दर्शनानें बादशाहाच्या अंतःकरणास पश्चात्ताप, दया, शांति आणि प्रेम ह्यांचे झरे लागले असतील. महारावरावर एवढी रकम पंतांसाठीं पाठविणारा असा उदार व श्रीमान गृहस्थ ह्या दुर्भिक्षकाळांत त्या भगवंताशिवाय कोण मिळणार आहे ! इष्ट वस्तु कल्पवृक्षाशिवाय कशी प्राप्त होईल ? पंत, तुमचा वियोगाग्नि आतां विलंबरूप वायूनें न पेटवितां तो दर्शनवर्षावानें तुह्मी थंड करा. आपलें एकदां दर्शन झालें ह्मणजे सर्व तीर्थांचें दर्शन झाल्याचें श्रेय येणार आहे. अहो, तुह्मीं त्याला भेटण्यासाठीं निघण्याविषयीं सर्व तत्पर आहां, त्याप्रमाणें मीही आहें: परंतु पंत बहुधा आजच येथें येतील असें मला वाटतें; आज न आल्यास उदयिक आपण सर्वांनीं तिकडे निघावें. अजून त्यांची येण्याची वेळ आहे.

( इतक्यांत कांहीं ग्रामस्थ मंडळी येते. )

एकटेक- आमचे पंत अद्याप आले नाहींत काय ? ते कधीं येणार ? आह्मी त्यांच्याशिवाय अगदां परदेशी झालों आहों. पंतांसाठीं भगवानानें महाराचें सोंग घेऊन सर्व रुपये भरलेना ?

उ०- असासारखें वाटतें खरें, पंत येऊन सर्व वृत्त कळेल तेव्हां निःसंशय काय तें समजेल. पंत ह्मटले ह्मणजे आजच यावे असें मला वाटतें.

( इतक्यांत परिवारासह दामाजीपंत येतात व सर्व लोक पायां पडण्यास जातात. )

दा०- अहो काय हें ! मी आपल्यासारखाच एक मनुष्य आहें. माझ्या पायां कशाला उगाच पडतां ? ( उपाध्येबोवांस, डोळ्यांत पाणी आणून) महाराज, आपल्या चरणांच्या आशीर्वादानें. लोकांस जें महत् संकट वाटलें होतें त्यांतून मुक्त झालों, हें वर्तमान आपल्यास दूतमुखें कळलेंच असेल.

उ०- ( त्यांस दृढालिंगन देऊन ) पंत, त्यानें सविस्तर वर्तमान कांहा सांगितलें नाहीं; कोणीं महार नें सरकारांत सर्व रुपये भरले, आपण खुशाल आहां, व लवकरच येणार एवढेंच सांगितलें; परंतु तेवढ्यावरून आह्मांस असें वाटलें कीं, हें कृत्य खचित खचित त्या पंढरपुरनिवासी, व्यसनसमुद्रपतितपोतविठ्ठलेशाचेंच आहे ! पंत आपल्या भक्तीचा आतां कळस झाला. हजारीं पापिजन आपल्याच दर्शनानें पापविमुक्त होतील. अरे ! ह्या सत्पुरुषागमनानें मीं अगदीं तल्लीन झाल्यामुळें क्षणभर मला देहभान नाहींसारखें झालें होतें ! पंतांची भार्या अद्याप आंतच आहे काय ? त्या आंत

कशा राहातील ? ह्या आल्याव. ( इतक्यांत सावित्री बाई येते.) धन्य ह्या स्त्रीपुरुषांची ?

दा० — अहो आपणास वाटलें तें सर्व खरें आहे ! गुरुराज, अहो सर्व लोकहो, पंढरीनाथाचा मी फार ऋणी आहें; ज्याचें ध्यान अचिंत्य आहे, तरी संसारादिपाशांचा छेद करून अरण्यासारख्या निर्जन स्थळीं कंदमूलादि „ खाऊन झऱ्याचें मधुर उदक पान करून ज्याचे प्राप्तीची इच्छा कारितात, ज्याच्या शोधार्थ योगादि अनेक शास्त्रांचा अभ्यास कारितात असा, जो अनंत विशेषणांनीं युक्त परमेश्वर त्यानें मजकरितां अंत्यजाचें हुबेहुब रूप घेतलें व बादशाहाचे दरबारीं जाऊन तेथें हीन सेवकाप्रमाणें उभा राहून सर्व रुपये भरले. मला हें प्रथम समजलें त्यावेळेस त्याचें कृत्य असें वाटलें नाहीं; परंतु हा पहा, माझ्यासारखें अक्षर काढून दरबारांत त्यानें लाखोटा दिला तो ! मग संशय मुळींच राहिला नाहीं. ( सर्व तो कागद पहातात ) उपाध्येबोवा, त्या विठ्ठलाचें कौतुक ऐकण्याला ते मुजुमदार व गणपतराव येथें नाहींत काय ? त्यांना पाठवा हो कोणीं तरी बोलावण्यास. अहो चिंतोपंत, व्यर्थ हो मजसाठीं त्यानें एवढे श्रम केले. ( डोळे भरून येतात. )

उ० — बादशाहा मोठा पुण्यवान् ह्यांत संदेह नाहीं; कारण कीं, योगिजनांसही ज्याचें दर्शन दुर्लभ, त्याचें, बादशाहाला सावकाशपणें दर्शन होऊन परमेश्वराशीं त्याचें संभाषण झालें असेल इतकेंच नाहीं तर पंत, त्यानें बादशाहाला हात जोडून 'खावंद, सरकार, मायबाप' असें ह्मटलें असेल त्याला लवून जोहार केला असेल !

दा० — त्यानें काय काय केलें असेल तें त्याचें त्यालाच ठाऊक. हे

काय ह्मणून सांगावें. (इतक्यांत मुजुमदार व गणपत
येतात. त्यांस, ) आपण उभयतां खुशाल आहांना ?

मु०— खुशाल आहों तर काय झालें !

दा०— मला आपल्याला एकदां कडकडून भेटूं द्या. ( दोघ
भेटतात. ) मुजुमदार, आपल्यास तिकडील सर्व वृत्त कळ
लेंच असेल.

मु०— ( मनांत ) ह्याची ही सर्व लुच्चेगिरी आहे ! ( उघड
महाराज, कांहीं समजलें होतें पण मला तें मुळींच खरें वाटे
नाहीं. व अजूनही मला त्याविषयीं सर्व प्रकारें संशय
आहे. भलतीच गोष्ट खरी कशी मानावी ?

चि०— ( उपाध्यायास ) काय मनुष्य आहे हा ! ह्याला अ
जूनही खरें वाटत नाहीं !

दा०— ( मुजुमदारास ) कोणालाही प्रथमतः सत्य वाटूं नये
अशी गोष्ट ही झाली खरी, परंतु ही पाहिलीत बादशाहाची
पावती !

मंडळी— मुजुमदार, चांगले डोळे उघडून पहा ! चष्मा
आहे कीं, आणी देऊं ! गणपतराव, तुह्मालाही चाळशी
लागत असते नव्हे काय ?

उ०— तें असूंद्या. पण ही पावती आपल्या हातीं कशी व
कधीं आली ? तुह्मांस त्याचें दर्शन झालें किंवा नाहीं. तें
सर्व सविस्तर वृत्त अगोदर आह्मांस सांगा.

स्त्री— ( आपल्याशीं ) हे हृदया, जें ऐकावयाचें तें अगोदरच
ऐकून तुला अतिशयित आनंद झालेला आहे. ही मूर्ति
तर प्रत्यक्ष पाहून तुझ्या ठिकाणीं अतोनात प्रेम उत्पन्न
झालें आहे; तर आतां तिकडील वर्तमान ऐकून, हे हृदया,
तूं आणखी कसें होणार, हें मला कांहींच समजत नाहीं.

८१०- ऐकाहो, ऐका त्या विश्वंभरानें काय केलें तें. आम्ही जाते वेळीं, बेदरच्या अलीकडे सुमारें वीस पंचवीस कोशांवर एक धर्मशाळा आहे तेथें ऐन दोनप्रहरीं मार्गांतील श्रम-परिहार करण्याकरितां उतरलों होतों. त्या चौघांपैकीं दोघे त्या गांवीं खाण्या पिण्याची कांहीं सोय पाहण्याक-रितां गेले होते. नंतर आम्ही त्या धर्मशाळेंत तिघे राहिलों. मी गीतेंतील नवमाध्याय वाचीत वसलों होतों. ईश्वराचीच करणी ती ! ते दोघे तेथें तेव्हांच झोंपी गेले ! इतक्यांत तो पंढरीनाथ अंत्यजाचे वेषानें त्या स्थळीं प्राप्त झाला ! अहो, त्या वेषांत तो तिळभरही चुकला नाहीं. तो गळ्यां-तील काळा दोरा, ती अंगावरील घोंगडी, हातांतील काठी अगदीं कशी पण हुबेहुब ! बोलणें थेट महाराचें ! मग त्यानें प्रथम असें विचारिलें कीं, पंढरपुरचा रस्ता कोणता व येथून तें किती आहे ? त्या वेळेस त्याची मुद्रा मोठी आनंदी दिसत होती उन्ह लागल्यामुळें त्याच्या सर्वां-गाला घर्म आला होता ! व तो तोंडानें 'शू' म्हणून घाम हातानें वारंवार निथळीत असे, त्याच्या रूपाप्रमाणें मी एक पंढरपुरीं मनुष्य पाहिला होता असें मला वाटलें म्हणून तूं पंढरपुरचा काय असें त्याला मीं विचारिलें. त्याणें-ही होय म्हटलें ? व मलाही तेथें पुष्कळ वेळां पाहिलें आहे असें तो म्हणाला ! नांव विचारतांच विठू महार असें त्याणें सांगितलें ! मी माझा मंगळवेढें गांव सांगतांच मला माझें नांव घेऊन तो खुशाल आहेना म्हणून वि-चारिलें ! मी होय म्हटलें ! इतक्यांत स्वारी पुढें निघाल्या सारखी होऊन अदृश्य झाली. ह्याप्रमाणें त्या धर्म शा-ळेंतील झालेलें वृत्त अगदीं थोडक्यांत सांगितलें. नंतर मी पुनः

तोंच गीताध्याय वाचावयास लागलों. परंतु कांहींच सुचेन डोळे भरून त्या मार्गस्थाचा ह्मणजे विठ्ठलाचा मला निदिध्यास लागला ! लोहचुंबकानें लोह जसें आपल्याकडे आकर्षण करावें तसें प्रथमतः माझें मन त्यानें ओढून घेतलें. लोकहो, त्या वेळेस माझी स्थिति काय झाली ती तुह्मांला सांगतां येत नाहीं. हा देह त्या वेळच्या अत्युत्सुक मनाला बरोबर घेऊन त्याला पुनः पाहण्याकरितां त्याच्या मागें जावें ह्मणून निघाला. तो तर पुनः दिसला नाहींच ! नंतर तितक्यांत ते चोघेही जासूद तेथें जमले. व त्यांणीं मला धरून कोठें पळतोस ह्मणून विचारिलें ! नंतर आह्मी दोन चार घटिकांनीं बेदरच्या रस्त्यास लागलों. मला तर त्याचें अगदीं वेड लागून गेलें होतें. त्याचें दर्शन एकदां तरी व्हावें ही मनांत उत्कंठा झाली. असें होण्याचें कारण काय तें त्यावेळेस कांहींच समजेना, तोंडानें हे विठो, मला भेट कधीं रे देशील, असें ह्मणत ह्मणत बादशाहाच्या वाड्यांत गेलों, तेथें जातांच बादशाहानें माझ्या गळ्यास मिठी मारून "तुह्मारा वीठू धेड कहां है सो जलदी बताओ" असें मला ह्मणाला. तेथें तो परब्रह्म रुपये भरावयास गेला त्या वेळेस ह्मणजे अगोदरच त्याला त्याचें दर्शन झालें होतें, त्यामुळें त्यालाही त्याचें अतिशयित वेड लागलें होतें. नंतर आम्ही एकमेकांनीं एकमेकांस झालेला सर्व वृत्तांत कळविला. तेव्हां पंढरीनाथाचेंच हें कृत्य अशी सर्वांची तेथें खात्री झाली.

सो०— अहाहा ! एकून आपणांसही त्यानें दर्शन दिलें ! धन्योसि, धन्योसि !

दा०— अहो पण मला मूढाला त्या वेळेस हें पंढरीचें पूर्ण

ब्रह्म असें कोठें कळलें ? हाय ! हाय ! तो महार आहे असेंच मी तेव्हां समजलों ! हजारों औषधें घेऊन निराश झालेल्या रोग्यास कोणीं सिद्धानें अमृताची वाटी त्याचे हातीं द्यावी, परंतु आज पर्यंत सेवन केलेल्या औषधांप्रमाणेंच हें कडु असून त्यापासून कांहींही गुण येणार नाहीं, असें समजून त्या मूर्खानें तें पियूष जसें फेंकून द्यावें त्याप्रमाणें माझ्या हातून झालें !

चिं०— नंतर पुढें काय झालें ?

दा०— तेथें सर्वांची हा परमेश्वरच अशी सर्व प्रमाणांनीं खात्री झाली. बादशाहा त्याच्या पुनर्दर्शनाविषयीं अत्यंत उत्कंठित झाला. कसें तरी करून एकदां त्याचें दर्शन व्हावें ह्मणून माझें आर्जव करूं लागला. परंतु उपयोग काय ! अंधानें अंधाला मार्ग कधीं दाखविला अशी गोष्ट झाली आहे काय ? असो; ह्याप्रमाणें पुष्कळ बोलणें झाल्यावर बादशाहानें पंढरपुरीं विठ्ठलमूर्तीच्या दर्शनास निघण्याचा बेत केला. परंतु तो भगवान सर्वत्र आहे. पंढरपुरींच आहे असें नाहीं असें त्याला तेथें मीं व सर्वांनीं समजावून सांगितल्यानंतर त्यानें पंढरीस येण्याचा आग्रह सोडिला.

ग०— बरें मग आपणांस ही पावती कशी मिळाली ?

चिं०— हो हो तें सांगणें राहिलेंच.

दा०— तेथें बेदरास एक दिवस बादशाहानें मला राहवून घेतलें. तेथें दररोजच्याप्रमाणें गीतापाठ करीत असतां त्या पोथींत ही सांपडली. ( डोळे भरून येतात. ) मग तर अगदीं खात्री झालीच.

र०— संत आतां श्रमून आलेले आहेत, व ह्या कथनानें

त्यांना अगदीं गहिंवर आला आहे. ह्या वेळेस आतां कोणीं त्यांना कांहीं विचारूं नका. आमच्या सर्वांच्या पूर्वसंचितानें पंतांचा पुनःसमागम आह्मांस झालाच आहे, तेव्हां ते सर्व यथासांग उदयिक सांगतीलच.

दा०—गुरुमहाराज, मला आतां येथें कोठें राहणें आहे?

उ०—ह्मणजे? हें आपण काय ह्मणतां? मी नाहीं कांहीं समजलों.

मुजुमदार (गहिंवर येऊन पंताचे पाय घट्ट धरितो.) पंत, मी सर्व प्रकारें त्या परमेश्वराचा व आपला मोठा अपराधी आहें तुमचा इतके दिवस मला सहवास असून तुह्मांस न ओळखतां म्या मूर्खानें तुमचा आजपर्यंत दुष्टपणाच केला! मला आपण चुकूनही कधीं वाईट शब्द बोलला नसून मी मूर्खानें मात्र सारा वेळ स्वहितासाठीं ह्मणून तुमची जिकडे तिकडे नालस्ती केली! पण सज्जनांचा द्वेष करून हित कसें होईल? खरें सोनें आहे त्याला कोणीं कांहीं ह्मटलें तरी त्याची योग्यता कमी होईल काय? पंत, आपण प्रत्यक्ष मजपुढें परमेश्वर उभे आहां, आतां मी आपले अपराध तुह्मांपुढें लपवून काय करूं! आजपर्यंत मीं काय काय वाईट कृत्यें केलीं आहेत त्यांची आठवण सुद्धां नाहीं. हाय! हाय! वाईट कृत्यांनींच मी सर्व पैसा मिळविला आहे! दानधर्मांत एकही कवडी खर्च न करतां कुमार्गांतच काय तो घालविला. आपणांस दया येऊन कोठारें लुटविलींत हें मी बादशहास कळविलें. पंत, मी मूर्ख, मी दुष्ट, मी साधुद्वेषी, मी माहापातकी तुह्मांस शरण आलों आहें, मला क्षमा करा, ह्या पातकांतून मला बाहेर काढा. मला नरकयातनेपासून सोडवा.

मला दुष्टाला ह्मणजे असा पश्चात्ताप होईल असें कोणाला तर काय, पण मलाही वाटलें नव्हते. हा आपल्या संगतीचा लाभ आहे. आपल्यासाठीं देव भागला तेव्हां आपलें साधुत्व काय सांगावें ! काय आपला प्रतापाग्नि हा! कीं ज्याच्या योगानें माझा अत्यंत दुष्ट स्वभाव लोण्याप्रमाणें विरघळत आहे. पंत, मजवर आतां दया करा, दया करा, माझ्याकडे कृपादृष्टीनें एकदां पहा !( स्तब्ध राहून ) अहो उपाध्येबोवा, अहो चिंतोपंत, अहो सर्व मंडळी, मजवर कृपा करा. मला आपल्यांत घ्या. बाहेर टाकूं नका ! ( रडावयास लागतो. )

दा०— मुजुमदार, हें काय करतां ? वर उठा ! कोणी कोणाचा द्वेष करीत नाहीं. माझें तुह्मीं कांहींच वाईट केलेलें नाहीं. उलटें तुमचेच मजवर उपकार आहेत. आपण जर मुळींच तिकडे लिहून न पाठवतेत तर हा असा शुभ प्रसंग आला असता काय? पहा, रात्रीं मोठ्या वृक्षावर पक्षी एकत्र वस्तीस जमून सकाळीं जसे भुरभुर उडून जातात त्याप्रमाणें ह्या जगतावर आमचा तुमचा अल्प समागम आहे ! तेव्हां क्रोधादिकांस वश होणें किती मूर्खत्व आहे ? तुह्मी उगाच कां भितां ? उठा उठा, मुजुमदार, माझी सर्वांवर कृपा आहे.

म०— वर उठतो ) अहाहा ! साधूंचें हृदय किती तरी निर्मळ असतें! त्यावर वैरादि दुर्गुणांचा तिळमात्रही डाग सांपडत नाहीं ! पंत, मी आपला इतका द्वेष करीत असतांही आपल्या मनांत त्याविषयीं कांहींच नाहींना ?

ग०— पंत, मीही ह्या मुजुमदाराच्या संगतीनें, लोभास गुतून, तुमच्याशीं विरुद्ध आचरण केलें. मी महदपराधी आहें.

मलाही ह्यांतून मुक्त करा. ( पंतांचे घट्ट पाय धरतो. )

दा०— ( त्याला उठवून ) तुह्मी सर्व निरपराधी अहां, कांहीं काळजी करूं नका.

मु०— उपाध्येबोवा, आह्मी सर्वांचे अपराधी आहों. प्रत्येकाला किती ह्मणून सांगूं ! सर्वांनीं आमचे दोष पोटांत घालावे, बोलण्याचालण्याचा राग मानूं नका.

उ०— अहो राग कशाचा ? तुम्हीं आमचें काय वाईट केलें आहां ? त्या सृष्टिनाटककर्त्याला पुढें हा खेळ जगतास दाखविणें होता, तेव्हां त्यासाठीं त्याला जीं सर्व साधनें अगोदर योजणें होतीं, तीं त्यानें योजिलीं. ह्यांत तुमचा कांहींच अपराध नाहीं. आतां तुम्हांला अनुताप झाला हेंही योग्यच आहे.

मु०— अशी तुम्हीं सर्वांनीं कृपा केली म्हणजे झालें. पंत, आतां आपला पूर्ववत् अधिकार चालवून सर्व लोकांस आनंद द्यावा, मी आपली एकनिष्ठपणें सेवा करण्यास तयार आहें. अथवा, माझा स्वभाव कोणास आवडत नसेल तरही नोकरीही सोडून देण्यास मी राजी आहें ! पंत, आपल्याशीं मी सर्वकाळ द्वेषभावानें वागल्यामुळें सर्व लोक माझ्याविषयीं असंतुष्ट असतीलच ! परंतु आपले आतां पाय मात्र मी कधीं सोडणार नाहीं.

वि०— ( इतर मंडळीस ) काय एकाएकीं ह्याच्या वृत्तींत व स्वभावांत पालट हा ! खरोखरच मोठी आश्चर्य मानण्यासारखी ही गोष्ट आहे. मनुष्याचा स्वभाव कोणत्या कारणानें, केव्हां व कसा पालटेल ह्याचा नेम नाहीं. पहा, ह्याचें तोंड कसें खाडदिशीं उतरून गेलें आहे तें ! ह्याला वास्तविक पश्चात्ताप झालेला दिसत आहे.

उ०— ( चिंतोपंतास ) अग्नीचें दाहकत्व जाऊन त्याचेठायीं शीतत्व येणें त्यासारखीच ही गोष्ट झाली, असें ह्मटलें पाहिजे. अथवा ह्यांत आश्चर्य तरी कसलें! आत्मवत् करण्याचें साधूंच्या ठिकाणीं सामर्थ्य असतेंच. त्याचें हें प्रत्यक्ष उदाहरण पहा!

दा०— मुजुमदार, काय ह्मणतां असा प्रकार झाला तरी मीं पूर्वीचेच निरर्थक कष्ट करावेना? अहो, ज्याणें एवढा चमत्कार दाखविला, ज्याणें एवढें द्रव्य मजसाठीं भरलें, त्यालाच आतां सर्वस्वी हा देह विकला आहे!

उ०— अहो, आपण त्याला देह काय आतांच नवीन अर्पण करणार आहां? केव्हांच आपण पूर्वी अर्पण केलात ह्मणून त्यानें आपलें हें ऋण फेडलें. आपल्यासारिखे 'अंतस्त्यागी बाह्य:संगी' पुरुष कोणत्याही स्थितींत असले तरी सारखेच. तेव्हां मुजुमदाराचें ह्मणणें योग्यच आहे, परंतु ह्याचा विचार आपण तिकडून आलां न आलां इतक्यांतच करावयास नको, ह्याचा सावकाशपणें विचार होईल. पंत, आपण दमून आलां आहां नाहीं बरें! तेव्हां आतां —

दा०— 'आतां तुमची सेवा माझ्यानें मुळींच होणार नाहीं मला आतां रजा असावी. मला त्या विठू महाराची सेवा करावयाची.' असें बादशाहाजवळ तेथें बोललों; त्यानेंही प्रथमतः आग्रह धरिला. परंतु शेवटीं तसें करण्याविषयीं मला हुकुम दिला. मुजुमदार चांगले वाकबगार हुशार आहेत व ते सध्यां कामही करीत आहेत. त्यांजकडेसच हें काम कायम ठेवावें असें आपणही मीं त्यास सांगितलें. त्यानें तें मान्य केलें तेव्हां मुजुमदार, आपण चांगल्या रीतीनें ह्मणजे

पोटच्या मुलांप्रमाणें सर्व लोकांस वागवीत जा. आपण सुज्ञ आहां फार काय सांगूं.

मु०— ( गहिंवरून ) पंत, मीं आपल्यास इतकें दुखविलें असूनही तुह्मीं बादशाहाजवळ माझ्याविषयीं असें सांगितलेंना ? अरेरे ! जें जें आपला अप्रातिम स्वभाव अनुभवास येतो तों तों माझ्या कर्माची मला लाज वाटत जाऊन अंतःकरण अगदीं जळत जातें. पंत, ह्या मूर्खाविषयीं तेथें असें कशाला सांगितलें ? मलाही हें आतां नको काम ! मी तुमची सेवा करणार, तुह्मी जाल तिकडे मी येणार.

चितोपंतवगैरे — पंत, आपण हा अधिकार सोडूं नये, आपल्या छायेखालीं आपण आजपर्यंत जसें आह्मांस ठेविलें तसेंच आतांही ठेवावें, आह्मास दूर करूं नका. आम्हास सोडिलेंत, तरी आह्मी आपल्यास कधींही सोडणार नाहीं. आपण जाल तिकडे आह्मी बरोबर येणार.

उ०— इतकीं वर्षें नोकरी केल्यामुळें व हा अपूर्व साक्षात्कार झाल्यामुळें पंतांस पूर्ववत् आतां नोकरी करणें आवडणार नाहीं हें स्पष्ट आहे. व त्यांच्या मतास माझेंही अनुमोदन आहे. परंतु माझें एवढेंच ह्मणणें आहे कीं, आपल्या वास्तव्यानें हें मंगळवेढें प्रतिक्षेत्र झालें आहे ! तर ह्याच पुण्यक्षेत्रीं आतां आपण निरंतर वास करावा, ह्मणजे सर्वांस आनंद होणार आहे.

दा०— उपाध्येबोवा, माझा मनोदय आता पंढरपुरास राहण्याचा तेथें बेदरासच ठरला आहे. व त्याप्रमाणें मीं परस्पर त्या क्षेत्रीं जाण्याचा बेत केला होता; परंतु माझें मन विचारांत अगदीं निमग्न झाल्यामुळें पंढरपुरास जाण्याचा

रस्ता केव्हां लागला त्याचें मला भान सुद्धां राहिलें नाहीं. एखादा मनुष्य निद्रामग्न असून कोशांचे कोश चालून त्याला कोठें पाण्याचा स्पर्श होतांच तो जसा जागा होतो, त्या प्रमाणें माझी अवस्था घरीं आल्यावर झाली !

चिं०— ह्यावरून, आपण येथेंच रहावें असा पंढरीनाथाचाही मनोदय दिसतो.

दा०— अहो सर्व मंडळी, आतां आपण फार आग्रह करूं नये, मी उद्यां सकाळीं तिच्यासह पंढरीस निघून जाणार.

सर्व— आपल्या मनोदयाविरुद्ध आमचें आतां कांहीं ह्मणणें नाहीं. परंतु आपला वियोग आह्मांला सहन होणार नाही, ह्याची वाट काय करावी ? आह्मीही तुह्माबरोबर तेथेंच रहावयास येतों.

दा०— असें करूं नका, आपआपल्या नोकरीवर राहून लोकांचें व आपल्या कुटुंबाचें चांगल्याप्रकारें रक्षण करा. मी ह्मणजे आपल्याहून दूर आहें असें नाहीं.

उ०— तर मग मलाही आतां काशीवास करणें इष्ट वाटतें. तो कधीं व कसा घडेल तो घडो ! पंत, आतां मी तुम्हांला येवढें सांगतों कीं, उदयिक जो आपण बेत केला आहां त्याप्रमाणें आपण तेथें चलावें आम्ही सर्व मंडळीही आपल्या बरोबर तेथें येणार. व आह्मांबरोबर एकदां परत येऊन, येथील सर्व व्यवस्था नीट लावून सर्वांस भेटून मग पुनः आपल्यास वाटेल तसें करावें.

दा०— बरें तर, उदयिक जाण्याविषयीं आपलें अनुमोदन आहेना ? आपण सर्व मंडळी मजबरोबर येणार काय ?

सर्व— होय महाराज, आह्मी सर्व उदयिक पहाटेस येथें येतों.

उ०— मग आतां सर्वांनीं आपल्या घरीं चलावें, फार रात्र झाली.

आतां बोलण्यांत वेळ घालवूं नका.

( दामाजीपंत व त्याच्या स्त्रीशिवाय सर्व जातात. )

स्त्री– ( पंतांच्या गळयास मिठी घालून ) आपल्याला कधीं घट्ट मिठी घालीन असें मला झालें होतें, पण जवळ मंडळी होती. हे पाय अशी मिठी मारून पाहण्याचा हा आनंदाचा दिवस येईल असें कोणाला तरी वाटलें होतें काय ? माशानें गिळलेलें माणीक हातास येईल, पण हें होणें कठिण होतें. आपण येथून गेल्यापासून माझी काय अवस्था झाली होती ती माझी मलाच ठाऊक; आजच्या विसाव्या दिवसानें आतां मला जन्मभर विसावा दिला.

दा०– अग, तें मला सांगावयास नको; पाणी नसल्यानें तुळशीची जशी अवस्था होते त्याप्रमाणें तुझी झालेली दिसत आहे ! काय हे तुझे हात ! तोंड तर अगदींच बसून गेलें !! मला तर तेथें असें वाटलें होतें कीं. ही माझ्या मागें कसची जिवंत रहाते! परंतु आमचा सर्व भार वाहाणारा तो पंढरीचा राजा, त्यानेंच मुळीं कृपा केली, तेथें विपरीत कसें होईल.

स्त्री– जो देह परमेश्वराच्या भजनीं लागला त्याजवर कोणाचीही सत्ता नाहीं. ज्या वेळेस ते दूत आपणास न्यावयास आले होते त्या वेळेस आपल्यास मारलेली मिठी ती कोणत्या दुःखानें होती ! व ही किती प्रेमानें आहे !

दा०– अग, तिकडे झालेलें वर्तमान तुला सर्व समजलेंना ?

स्त्री– मला सर्व समजलें, मी ऐकतच होतें. ती सर्व मंडळी होती ह्मणून बरें झालें; तिणें सर्व तिकडील वर्तमान विचारून घेतलें व आपण सांगितलें.

दा०– आणि तुला काय मीं सांगितलें नसतें ?

स्त्री- तसें नव्हे ! या मंडळीनें जसें अगदीं विचारून विचारून घेतलें तसें मला कोठें विचारायाला आलें असतें?

दा०— बरें आतां फार रात्र होते, उद्यांचा बेत तुला समजला आहेना ? पहाटेस उठलें पाहिजे. पंढरपुरास तूं येणार कीं नाहीं? हें सर्व टाकून आतां तेथेंच राहाण्याचा मीं निश्चय केला आहे. तेव्हां तुझी कशी काय मर्जी ? मी तिकडे तसाच परस्पर जाणार होतों, पण जाणें कां झालें नाहीं तें मघाशीं सांगितलें तें तुला कळलेंच असेल.

स्त्री - माझी जशी इच्छा होती तसेंच झालें. तुझ्याजवळ आह्मी उभयतें बरोबर येऊं असें विठोबाला मीं पूर्वींच ह्मटलें होतें.

दा०— बरें मग तसेंच झालें तो तुझे मनोरथ पूर्ण केल्याशिवाय कसा राहील ?

स्त्री—आतां फार रात्र झाली नाहीं बरें ? घरांत चलावें.

दा०— चल तर ( जातात. )

---

### प्र० ४, स्थळ—पंढरपुर, विठ्ठलमंदिर.

( पुजारी व तुकारामबडवे येतात. )

पुजारी- कसें काय तुकारामबडवे, बरें आहेना ? ह्या सात आठ महिन्यांत दररोज दिवसकरी वगैरे नेमावयाचे त्याविषयीं सर्व गैरव्यवस्था झालेली आहे ! हा दुष्काळ जाऊन पूर्ववत् कधीं व्यवस्था चालेल असें आह्मांस झालें आहे.

तुकारामब०— आतांसे मुळीं उत्पन्नच नाहीं. मग उगाच

दिवसकरी तरी कशाला नेमा! दुष्काळाच्या अगोदर अगदीं कांहीं नाहीं ह्मटलें तरी साधारण दिवशींसुद्धां आठ नऊ रुपये होत असत. ह्या वेळेस देवळांत पहा, आपल्या शिवाय कोणी तरी आहे काय ? बरें, आतां मी येतों दोनप्रहर होत आले. आज आपणाला बोवा, फारच भूक लागली आहे. जातों.

पु०— भूक लागली असेल हें खरें पण घरीं ह्यावेळेस बायका तरी आंघोळ केल्या असतील काय ? मग ह्या वेळेस कशाला जातां ? जरा बसा हो. मला एकट्याला ह्याउभ्या दोनप्रहरीं येथें मोठी भीति वाटते.

तुका०— बरें, मी तुमच्याकरितां बसतों जरा, कांहीं नवल विशेष सांगत असाल तर.

पु०— नवल विशेष ह्मणायाला, काल रात्रीं मीं एक बातमी ऐकिली आहे, ती तुह्मींही पण ऐकिली असाल.

तु०— कसली बातमी ? आपण नाहीं बोवा कांहीं नवीन ऐकिलेली.

पु०— अहो दामाजीपंतांनीं ह्या पंढरपुरच्या लोकांसच नाहीं तर दुसऱ्या हजारों लोकांस धान्य देण्यासाठीं मंगळवेढ्यांतील बादशाहाचीं कोठारें लुटविलीं. त्यामुळें त्या अति दयाळु पुरुषाला सुमारें पंधरा एक दिवसांपूर्वीं बेदरास धरून नेत असतां, ते विठ्ठलाचें दर्शन घेऊन गेले. येथपर्यंत तुम्हास माहीत असेलच.

तु०— हो हो, तें माहीत आहे मला.. पुढें मग त्या सत्पुरुषाचें खरें काय झाले तें अद्याप समजलें नाहीं! तुम्हीं कांहीं त्या विषयीं ऐकिलें अहां काय ?

पु०— तेंच तुह्मांला सांगतोंना पुढें काय ऐकिलें तें. असें

ह्मणतात कीं, ह्या विठोबानें त्याच्याकरितां महाराचें रूप घेऊन पंत तेथें पोंचण्याचे अगोदरच सर्व रुपये भरले. तेव्हां पंत आतां सुटले असतील हें उघड आहे.

तु०— ( आश्चर्य पावून ) काय ह्मणतां? ह्या पंढरीनाथानें असें केलें ? अशा प्रकारचे चमत्कार घडल्याचे आम्हास पूर्वीं वडील सांगत असत. हा तर अनुभव धडधडीत आपल्या डोळ्यांसमोरच झाला ह्मणावयाचा. भक्तीशिवाय सर्व व्यर्थ आहे. नाहीं तर आह्मी सर्ववेळ येथें असतों! त्याची बाहेरून सेवा करितों! परंतु उपयोग काय ? आपण सांगतां असे जर आजपर्यंत चमत्कार झाले नसते तर ह्या देवतेचें इतकें माहात्म्यच वाढलें नसतें. एकूण ह्या पृथ्वीवर ज्याला इष्टफलप्राप्ति करून घेणें असेल त्याणें ह्या कल्पवृक्षाजवळ भक्तिमार्गानेंच आलें पाहिजे, अन्य मार्ग व्यर्थ आहेत.

पु०— तर मग तुकारामबोवा, अशा साधुपुरुषाचें आह्मांस दर्शन लौकर झालें पाहिजे.

तु०— पंत जर ह्यांतून सुटले असें ह्मणतां तर मग ते ह्या परब्रह्माच्या दर्शनास कसे हो अद्याप आले नाहींत ? इकडे अगोदर आल्याशिवाय मंगळवेढ्यास ते कदापि जाणार नाहींत असें मला वाटतें.

पु०— मलाही तसेंच वाटतें. तेव्हां पंत अद्याप बेदराहून आले नाहींत हेंच खचित.

तु०— मी जातों तर आतां. ( इतक्यांत मंडळीसह पंत येतात.)

पु०— नमस्कार पंत, येथें आपल्याविषयींच गोष्टी चालल्या होत्या. आपलें दर्शन कधीं होईल असें आम्हांस झालें होतें.

दा०— अहो, ज्याचें दर्शन घ्यावें अशी ही विठ्ठलमूर्ति तुह्मांपुढें सदा उभी आहे. तुह्मी पंढरीचे लोक मोठे पुण्यवान् आहां.

तु०— ( त्यांचे पायां पडून ) अहो, हा कल्पवृक्ष आमच्या दारीं असून उपयोग काय ? ह्याचीं मधुर फळें तोडण्याचें अथवा वेचण्याचें आह्मांस ज्ञान कोठें आहे ? महाराज, आपल्यास विठ्ठलानें संकटमुक्त केल्याचें मीं आतांच येथें ऐकिलें, तेंव्हांपासून तर मला आपल्या दर्शनाची इच्छा फारच झाली होती. ती आपण पूर्ण केली. आपणांस पूर्ण शंभर वर्षें आयुष्य आहे.

उ०— अशा पुरुषांनाच जर दीर्घकाळ आयुष्य असेल तरच जगत्कल्याण होणार आहे. नाहीं तर कावळे काय थोडे वांचतात !!

पु०— आपणा सर्वांस फार श्रम झालेले दिसत आहेत आज आपलें कोणीकडून येणें झालें ?

दा०— मंगळवेढ्याहून.

तु०— मग बेदराहून तिकडे आपलें कधीं जाणें झालें ?

दा०— काल रात्रीं. ( दामाजीपंत व सर्व मंडळी विठ्ठलमूर्तीजवळ दर्शनास जातात डोळ्यांत अश्रु आणून, व हात जोडून ) अगा परमेश्वरा, हे विठ्ठला, हे दीनदयाळा, भक्तवत्सला, मी तुझा सर्वस्वी अपराधी आहें. हे देवा, तूं बादशहाच्या कचेरींत, मजकरितां, अंत्यजाचे वेषानें जाऊन तेथें सर्व रुपये भरलेस ! हाय ! हाय ! काय हें देवा ! मी आतां काय करूं ! हें ऋण कसें फिटणार ? त्या धर्मशाळेंत त्याच वेषानें मला दर्शन दिलेंस, हें सर्व मला मंदमतीला जेव्हां बादशहापाशीं प्रथमत

कळलें, त्या क्षणापासून परमेश्वरा, माझी जी कांहीं स्थिति झाली आहे ती बोलतां सुद्धां येत नाहीं. त्या वेळेसच हे विठ्ठला, जे वेडे वांकडे उद्गार आले ते बोलून चुकलों. तुझें अलौकिक कृत्य, तुझें कारुण्य, तुझें दीनबंधुत्व इत्यादि अनंत गुणांचें वर्णन करणें ह्या जिव्हेला साध्य होणार नाहीं हें तर उघडच आहे. पण जेथून हें वर्णन निघणार तें मूलस्थान माझें अंतःकरण शोधून पाहिलेंस म्हणजे मला जें कांहीं बोलावयाचें तें तुला कळेल ! देवा, मजकरितां इतके श्रम कशाला उगाच घेतलेस ! मरण हें कधीं कोणाला चुकलें आहे काय ? मग तें आज आलें काय किंवा उद्यां आलें काय, एकच ! मग ह्या अशा क्षणभंगुर देहाची तूं कशाकरितां एवढी काळजी घेतलीस ! विठ्ठला, ह्या तुझ्या कृत्यानें, मला जिकडे तिकडे सर्व उदासीन वाटत आहे ! तुझ्या सान्निध्याशिवाय मला कोठेंही आतां आनंद वाटणार नाहीं. तुझ्या नामाशिवाय अन्य ठिकाणीं मला तिळमात्र सुद्धां शांति मिळणार नाहीं. तुझ्या ध्यानावांचून माझें कोणीकडेही लक्ष जाणार नाहीं. देवा, तुझ्या कथामृताशिवाय कशाचीही मला तहान लागणार नाहीं. फार काय सांगूं ? हे कृपासागरा, हें माझें मन, सर्व इंद्रियांसहवर्तमान तुला पर्जन्यकालच्या नदीपूराच्या प्रवाहाप्रमाणें जाऊन मिळालें आहे ! तें आतां परत कसें येईल ? म्हणूनच मी तिला घेऊन तुझ्या द्वारापुढें भिकाऱ्याप्रमाणें लीन होऊन आलों आहें, तर हे श्रीनिवासा, आम्हांस ह्या आपल्या विशाल मंदिरीं आश्रय द्यावा. ( चरणीं मस्तक ठेवितो. )

सा०– ( आपल्याशीं ) देवा, तू आम्हांवर जी अतोनात

कृपा केलीस ती ह्या एका तोंडानें मजसारख्या स्त्रीजाती-नें किती म्हणून बोलावी ? तशांत कांहीं बोललें असतें, पण माझे सर्वस्वी मन तुझ्याकडे लागलें आहे, तेंव्हां कांहीं बोलतांच येत नाहीं. तिकडे काय बोलणें होत आहे हेंच मी ऐकितें ह्मणजे झालें. पण तिकडे तरी काय ! प्रेमानें ओंठ अगदीं बुडबुडून गेलें आहेत. व कंठ दाटून गेल्यामुळें बोलणें सुद्धां नीटसें समजत नाहीं.

उ०– भो परमात्मन्, आपलें भक्तांविषयीं वात्सल्य काय सांगावें ! आपण विलक्षण व अतर्क्य युक्तीनें पंतांना महत्संकटांतून मुक्त केलेंत इतकेंच नाहीं तर या योगानें जगतीतलावर लोकांना, मनुष्यजन्मास आलें असतां काय काय करावें कसें वर्तावें ह्याचें दिग्दर्शन केलेंत. अस्तु; हे परमेश्वर, तुझ्या प्राप्तीला भक्ति हेंच एक साधन आहे. हें अगदीं निर्विवाद आहे; असें असून कित्येक मूढ अभिमानी व दुराग्रही लोक तुझी प्राप्ति होण्याला आपण स्वीकृत मत किंवा पंथ हाच काय तो सत्य व तद्व्यतिरिक्त मतें अथवा पंथ हे अगदीं असत्य, पापप्रद, व नरकांत नेणारे आहेत, अर्थात् ह्यायोगें तुझा कधींही लाभ होणार नाहीं ! असें प्रतिपादन करण्याकरितां, हे कुत्सितबुद्धिलोक अन्य मतांवर यथेच्छ निर्भर्त्सनास्त्र सोडतात ! तेंव्हां अशांना काय म्हणावें, अशा मूर्ख दांभिक व कपटप्रिय लोकांस ह्या साक्षात्कारानें तरी कांहीं वाटेल काय !

१०– अहो गुरुवर्य, खरोखर आपण म्हणतां तसाच हा भगवान् आहे; हे प्रभो

श्लोक.

भक्तीनें वश तूं असून, वदती स्वीया मतां जे खरें,
यत्पुष्ट्यर्थ उगाच निंदिति मदें अन्या मतां निर्भरें.
या योगें परहृत्सुकोमलसुमा श्रद्धालतेपासुन
दु:खाग्नींतचि टाकिती, शिव हरे ! हे मूर्खपंचानन !

उपाध्येबुवा, हा आणखी कसा आहे म्हणाल तर—

श्लोक.

सकलभुवनधारी, साधु ज्या गाति भावें,
नच समजुनि कोठें, तो कसा, केविं पावे !
बहुविध नटतो हा भक्तरक्षार्थ जेव्हां,
तनुमति अति आली जाणतों यास तेव्हां.

पुराणपुरुषा, तुझ्या कथा आम्हांस तर अशा वाटतात कीं,

श्लोक.

तुझी भक्ति व्हाया, तुझें रूप ध्याया,
तुझी कीर्ति गाया, तुझें नाम घ्याया,
दया शान्ति चित्तालयीं रे वसाया,
पुराणप्रसिद्धा कथाचि त्वदीया.

उ०— आपलें बोलणें सर्वथैव सत्य आहे.

मु०— ( साश्रु ) विठ्ठला, ह्या साधुपुरुषाचा द्वेष करण्यांतच मीं आपलें सर्व आयुष्य घालविलें. ह्यांच्याशीं एकही शब्द आज पर्यंत निष्कपटपणें बोललों नसेन. पंढरीनाथा, तुझीं हीं चरणकमलें प्रेमानें घडिभरसुद्धां धरून हें अंत:करण तुला आजपर्यंत कधींही वाहिलें नाहीं, तुझी अतिशय करूणा प्रत्ययास आल्यामुळें, मला माझ्या कृतपापाचें स्मरण होऊन फार हळहळ वाटते तर हे दयानिधे, मला सर्व अपराधाची क्षमा करावी, व ह्याउपरान्त तरी

सद्बुद्धि द्यावी. अधिक काय बोलूं ?

चिंतोपंतवगैरे – ( हात जोडून ) विठ्ठला, तुझे आह्मांवर अनंत उपकार आहेत. सत्पुरुषाचा समागम अलभ्य असून तो तुझ्या कृपेनें आह्मांस अगदीं सुलभ झालेला आहे. आह्मी मात्र त्यापासून कांहींच हित करून घेतलें नाहीं. तरी साह्मजिक साधुसंगतीनें होणाऱ्या लाभास आह्मी कसे मुकूं?

उ० – चिंतोपंत, आपलें सर्वांचें बोलणें यथार्थ आहे. राजेलोकांना लक्षावधि रुपये खर्चूनही अलभ्य जो मलयपर्वतावरील सौगंधिक वायु तो तेथील भिल्लांना पाहिजे तितका सहज मिळतो तसा हा आपला प्रकार आहे.

चि० – खरें आहे, ह्मणजे त्या भिल्लांना त्या सुगंधाची योग्यता जशी कळत नाहीं, त्या प्रमाणेंच ह्यांचे संगमाची योग्यता आह्मांस कळली नाहीं !

मु० – काय ह्या स्थानाचा गुण आहे तरी! ह्याच्या दर्शनानें मन कसें अगदीं कोमल होऊन गेलें आहे !

उ० – मला तर असें वाटतें कीं, कितीही दुष्ट नास्तिक मनुष्य असो, त्याचें पाऊल ह्या देवालयीं पडलें कीं, त्याला प्रेमरूपी घाम सुटून त्याचा अभिमानज्वर जाऊन बरळणें नाहींसें होऊन तो अगदीं शक्तिहीन होईल, व नंतर हळुहळू त्याला धर्माल रुचकर लागत जाईल !

चि० – असेंच केवळ आपण समजूं नका. पृथ्वीवर पाषाणांपेक्षांही कठिण हृदयांचे लोक आहेत.

ग० – आह्मांस पंतांचें आतां खरें ज्ञान झालें, पण तेच आतां सर्वसंगत्याग करून सकुटुंब येथें राहावयास आले. पंतांवांचून आह्मांस आतां कसें सुख वाटेल ? आह्मीं आपलें आयुष्य कसें घालवावें.

चि०— गणपतराव, गेल्या वीसपंचवीस दिवसांत त्यांचेविना जसा आपणास आनंद झाला होता तसा आतां कां होऊं नये !!

मु०— तें पुनः पुनः बोलून आमच्या हृदयास छिद्रें नका हो पाडूं! हा मी तुमच्या पायां पडतों. मी सर्वस्वी अपराधी आहें. क्षमा करा. क्षमा करा.

उ०— चिंतोपंत, आतां उगाच अशा बोलण्यांत काय अर्थ आहे?

मु०— ( पंतांस हात जोडून ) महाराज, मी महा पातकी आहें, मला पुनः पुनः आपल्या कृतकृत्यांची आठवण झाली ह्मणजे अंगावर कांटा उभा रहातो, व पश्चात्ताप होऊन हें हृदय अगदीं विदारून जातें; मी अज्ञानानें वैर केलें तरी मला फार भीति वाटत आहे. भगवद्भक्तांच्या अवमानसर्पावर माझा पाय पडला आहे त्या मुळें मी फारच चिंताग्रस्त झालें आहें.

दा०— मुजुमदार, माझ्या मनांत आपल्या विषयीं सांप्रत कांहींही नाहीं व पूर्वीं कधींही नव्हतें, आपल्या विषयीं माझें अंतःकरण गाढ डोहांतील उदका प्रमाणें स्वच्छ आहे. मला द्वेषबुद्धि कशाला बाबा पाहिजे! मला पुढें काय कर्तव्य आहे?

मु०— आपल्या मनांत तर कांहीं नसावयाचेंच परंतु मला वारंवार पश्चात्ताप होत असल्यामुळें असे उद्गार बाहेर निघतात

उ०—तो प्रकार आतां राहूं द्या. अहो मंडळी, पंतांसारख्या सत्पुरुषाजवळ आणि ह्या विठ्ठलमंदिरा सारख्या रम्य स्थळीं कितीही वेळ आपण बोललों तरी आपली तृप्ति व्हावयाची नाहीं. पंतांनीं, इंद्रियशत्रुगणाचा स्वामी जो मनोराजा त्यास विवेकद्रव्यानें अगदीं वश करून घेऊन त्या गणास जिंकून मुनिराजांसही असाध्य जो मोक्ष

विजय तो मिळविला. आतां, त्यांना जन्मास येऊन को-णतें राज्यपद मिळविणें राहिलें आहे? ( पंतांच्या स्त्रीस ) अहो, सावित्रीबाई, आपली योग्यता पंतांहून तिळमात्र-ही कमी नाहीं. आपले संग्रहीं पुण्य फार ह्मणूनच त्यांचे पदरीं आपण पडलां. आपला उभयतांचा कीर्तिप्रकाश अखिल जगतास सन्मार्गदर्शक होओ!

मु०— पंतांस जरी अतां ह्या पृथ्वीवर मिळविणें कांहींच राहिलें नाहीं, तरी आमच्यासारख्या पापिजनांच्या कल्याणार्थ त्यांनीं सर्वांस आशीर्वाद द्यावे.

चि०— खरें, पंतांनीं आह्मांवर कृपा केली पाहिजे.

दा०— अद्याप त्या जगन्मातेचें दर्शन घेणें आहे तर तिकडे आपण चलावें.

उ०— चलावें, परंतु तिकडे जाण्यापूर्वी ह्या परब्रह्मापुढें क-ल्याणप्रद असे सर्वांस आशीर्वाद द्यावे.

दा०— माझ्या आशीर्वचनानें काय होणार? विठ्ठला, त्वां असें करावें!

पंचचामर.

प्रजामनीं स्वधर्मराजभक्ति ही वसो सदा!
तुझ्यासमीप ह्या जशा सुदीपिका प्रकाशदा!
क्षमासुशीलधैर्यनीतिसत्यसख्यबीज हें
प्रजामनोवसुंधरीं रुजो, कृपापयोद हे!

मालिनी.

जनहितचि कराया भूप वाहो करांतें,
जनधन न हराया घेउनीयां करांतें.
द्विजसम नृप पाळो धेनुतुल्या प्रजांतें.
नृपति जनकमाता, अन्य वाटो न त्यांतें.

उ०— हे भगवन् मीही अशाच प्रकारचें मागतों.

शार्दूलविक्रीडित.

यावत्सागरमेखला धरणिभृन्मूर्ध्नि स्थिरा राजते
तावत्सर्वजनाः स्वधर्मरतयो विद्याकलापारगा
भूयासुः पृथिवीभुजोऽपि निरता धर्मप्रजापालने
स्वानंदश्च सतामुदेतु विलयं गच्छन्त्वसंतः सदा .

( सर्व चालल्यासारखें करतात. )

दा०— हे आदिशक्ति रुक्मिणीमाते, तुजपाशीं आणखी अधिक काय सांगावें ! सर्व तुला विदित आहेच. हे आई, माझे सर्व अपराध पोटीं घालून त्वां अपूर्व युक्तीनें माझें रक्षण केलें ह्यापेक्षां माझें दुसरें प्रिय करणें तें काय राहिलें आहे ? तरी सर्वकाळ सर्वांस हें द्यावें.

सर्व — ( हात जोडून, )

पद.

( ' शिव शिव शंभो गा, भवाब्धितारक० ' ह्या चालीवर. )

अयि विष्णुप्रमदे, कृपाकटाक्षें पाहि जगातें. ध्रु०
शांतिसुखाचें रम्यालय तूं, कविजनसंघ वदे
चरणकमलिं तव अलिसम आलां, भक्तिमधूतें दे १
जगदंगण हें धनधान्यांहीं, प्रफुल्ल कर वरदे
सत्वेतोरथ पूर्ण करावे, सुरवंदितसुपदे २

( पडदा पडतो. )

समाप्त.

## ह्या नाटकांतील उर्दू भाषण न समजणाऱ्या वाचकांच्या समजुतीकरितां मराठी.

(अंक ५. प्र० १. पृष्ठ ८८ व ८४.)

चोपदार— (जयजयकार शब्दांनीं ललकारतो.)

वजीर— सरकार, आज आपल्यास दरबारांत येण्याची तसदी दिली, त्याबद्दल माफी मागून सेवक हा अर्ज करितो कीं थोड्या दिवसांपूर्वीं असा एक अर्ज आला आहे कीं, मंगळवे ढ्याचा ठाणेदार दामाजीपंत ह्मणून कोणी एक ब्राह्मण आहे त्यानें आपल्या हिंदूलोकांकरितां, सरकारी धान्यांचीं सर्व कोठारें लुटविलीं. असें करण्याचें कारण तो ह्मणतो कीं, 'तिकडच्या मुलखांत पाऊस न पडल्यामुळें दुष्काळानें रयत अगदीं हैराण व भिकार झाली आहे.' व आणखी असें ह्मणतो कीं, 'ज्यापेक्षां मी येथला ठाणेदार आहें त्यापेक्षां रयतेचें रक्षण करणें मला जरूर आहे. ह्यांत, जर माझा गुन्हा असेल तर सजा भोगण्यास मी तयार आहें.' हा दामाजीच्या विरुद्ध अर्ज लिहून पाठविणारा त्याच्याच हाताखालीं नौकर आहे. हा सर्व मजकूर अगदीं बराबर असावा ह्यांत बिलकुल अंदेशा नाहीं. तेव्हां ह्या गुन्ह्याबद्दल सजेचा हुकुम काय तो व्हावा.

पातशाहा— (रागावून) अरे असा हरामखोर लोकांस त्रास देणारा कोण लुटारू मनुष्य हा! ह्या अर्जावरून असें शाबीत होतें कीं, ह्याप्रमाणें हजारों कोठारें ह्याणें आजपर्यंत लुटविलीं असून इकडे त्याची बातमी सुद्धां लागली नसेल! शेवटीं कांहिं

कारणानें त्याच्या हाताखालच्या मनुष्याकडून हा अर्ज आला असेल ! उगाच कांहीं तरी दुष्काळाचे निमित्तानें हा त्याणें बेवकूफपणा केला ! दुष्काळानें लोक नाडले आहेत असें मीं कधीं अजून ऐकिलें नाहीं ! दुष्काळ आहे कोठें ! ह्या गुन्ह्याबद्दल त्यास सजा देणें अगदीं जरूर आहे. कसें काय दिवाणसाहेब, जिकडे तिकडे आबादानी असून रयत सुखी आहेना ?

व० – खावंद, हें काय विचारतां ? आपल्या पायांच्या प्रतापानें सर्वत्र आबादानी आहे ! वेळेवर पाऊस पडल्यामुळें लोक खुष आहेत. आपल्या कारकीर्दींत सर्वप्रकारें लोक सुखी राहून ईश्वराजवळ आपल्याविषयीं दुवा मागत असतात. रयतेला ह्यासारखें दुसऱ्या कोणत्याही राज्यांत सुख नाहीं. दुष्काळ वगैरे कांहीं नाहीं.

पा०– काजीसाहेब, पाऊस वगैरे ह्या वर्षीं कसा काय लागला ? बरा लागला कीं नाहीं ?

का०–( मनांत ) पाऊस ह्या वर्षीं तर मुळींच लागला नाहीं ! जिकडे तिकडे दुष्काळ आहे असें ऐकतों, असें असून वजीरसाहेब ह्मणतात कीं, सर्वत्र आबादानी आहे ! तेव्हां मलाही तसें सांगणें भाग आहे ! ( उघड ) ह्या वर्षीं पाऊस जरी कमी लागला, तरी तो वेळेवर पडल्यामुळें दुष्काळ बिलकूल नाहीं असें मला वाटतें.

व०– खुदावंद, हे हिंदूलोक आपले राज्यांत मोठे नाखुष असतात. आपल्या व दुसऱ्या मुसलमानी राज्यांत पुष्कळ मोठमोठे जे हिंदू सरदार आहेत ते केव्हां आपल्यावर उलटून पडतील ह्याचा नेम नाहीं, ह्मणून ह्या देशांतून निदान आपल्या राज्यांतून तरी ह्य ना घालविलें पाहिजेत, असें कैक वेळ मी सरकारच्या कानांवर घातलें. परंतु अजून सरकारचें

तिकडे लक्ष नाहीं. हे लोक आमच्या तैनातींत राहून आमचाच नाश करण्यास प्रवृत्त होतात, काय आश्चर्य हें ! तेव्हां ह्याविषयीं आतां तजवीज झालीच पाहिजे ! ह्यांना फार त्रास देऊन ह्यांच्या धर्माचा उच्छेद केला पाहिजे; ह्यांचे सर्वप्रकारचे ग्रंथ जाळले पाहिजेत ! हजारों गाई ह्यांचे समोर चरचरा कापल्या पाहिजेत ! देवळांतील मुर्ति फोडुन टाकल्या पाहिजेत ह्मणजे हे लोक त्रासून आपोआप हें राज्य सोडून दुसरीकडे निघून जातील, किंवा मुसल्मान होतील ! मुसल्मान झाल्यावर मग चांगलेंच ? कारण, नंतर हे जरी नाहींत तरी ह्यांची संतति आपल्या मुसल्मानी धर्माची अभिमानी होईल अर्थात् आपल्या राज्यास कोणत्याही प्रकारें भीति रहाणार नाहीं.

का०— वाहवा ! वाहवा ! दिवाणसाहेबाची फारच दूर दृष्टि ! वजीरसाहेबाच्या मर्जीप्रमाणें झाल्यास मुसल्मानी राज्यास कधींही इतर ह्मणजे हिंदूलोकांपासून भय नाहीं, ह्मणून खावंदाकडून आतां असा बंदोबस्त जलदी झालाच पाहिजे काय हिंदूलोकांची बहादरी ही कीं, आमचें फुकट खाऊन आमच्यावरच उलटायाला पाहत आहेत !

पा०— हो हो ! आतां तसें केलेंच पाहिजे ! ( डोळे लाल करून ) सर्व हिंदूलोक आपली निंदा व द्वेष करीत असतीलच ! पण त्यांत ब्राह्मण ह्मणून जे लोक आहेत ते फारच हरामखोर बेइमानी, कपटी. त्याचप्रमाणें हे ज्यांचे तैनातींत राहतील त्याची खराबी करून आपलें हित करणार आहेत. वाहवा, मोठे अक्कलवान लोक ! त्यापैकींच हा मंगळवेढ्याचा ठाणेदार आहे. त्या हरामखोरानें आपल्या लोकांस मदतकरण्याकरितां हें बेमानपणाचें कृत्य केलें. ह्याप्रमाणें चालवूं दिल्यास हे लोक आपल्या राज्याचें केव्हांच

वाटोळें करतील ह्यांत संशय नाहीं. तेव्हां हे ब्राह्मण लोक ह्या राज्यांतून काढून लाविले पाहिजेत. सध्या माझ्या राज्यांत जे मोठमोठ्या हुद्यावर आहेत त्यांना हळु हळु कोणत्या तरी निमित्तानें दूर केले पाहिजेत, नवीन नेमणें तें ह्यांना मुळींच नेमूं नये. सारांश ह्या सर्व हिंदूलोकांचा नाश केल्याशिवाय दुसरा इलाज नाहीं.

**व०**— मालिक, आपलें बोलणें सर्व बराबर आहे. सध्या दामाजीनें केलेल्या गुन्ह्याबद्दल त्याला सजा द्यावयाची अथवा त्याला सोडून द्यावयाचें, ह्याविषयीं काय तो खावंदाकडून हुकुम व्हावा.

**पा०**— ह्याविषयीं काय तें काजीसाहेब सांगतीलच. परंतु त्यानें सरकारी नुकसानी किती केली, हें अगोदर समजलें पाहिजे.

**व०**— ह्या अर्जांत खबर लिहिणारा मुजुमदार लिहितो कीं, नुकसानी अमुकच झाली असें खास सांगवत नाहीं. तरी चार पांच लाख पर्यंत झाली असावी असा अदमास आहे कारण येथें सध्या दरही अतिशय चढला आहे.

**पा०**— फार चांगलें, तर मग तेथेंच त्यास ठार मारावें. ह्या शिवाय त्याला दुसरी काय सजा द्यावयाची ! ह्मणजे त्या लोकांस चांगली दहषत बसून मुसल्मानी राज्य कसें आहे तें समजेल !

**का०**— तें सर्व खरें, परंतु हा अर्ज लिहिणारा व दामाजीपंत हे एकिनें राहून सर्व पैसा दोघे खावयाच पण तसें न करतां मुजुमदारानेंच हा तमाम मजकूर हुजुरांत कसा कळविला ! आज पर्यंत दामाजी पंतानें सरकारचीं इमानानें मोठमोठीं बहुत कामें केलीं आहेत. तो मोठा इमानी व अन्नदार नौकर आहे. तेव्हां हें काम कदाचित् मुजमदारानें आपणच करून दामाजी-

ची नालस्ती कशावरून लिहून पाठविली नसेल ! तेव्हां खावंदानीं मुकरर केलेली सजा पाहिजे तर—

पा०— तर मग आपल्या मतें काय करावें ? आपण तर हीच सजा कायम केली.

का०— त्याला इकडे पकडून आणण्याविषयीं माझा सल्ला आहे. नंतर त्याचा बराबर इनसाफ करून गुन्हेगार ठरल्यास मग खावंदानीं योजलेली सजा अमलांत आणावी.

ब०— हें काजीसाहेबांचे ह्मणणें मलाही पसंत आहे. तेव्हां त्याला पकडण्याला भले मजबूत व हुषार असे मनुष्य पाठविले पाहिजेत, त्यांपैकीं एक तरी हरहमेषा तिकडे जाणारा त्याचे ओळखीचा व माहीतगार असा असावा.

पा०— माझा सर्व हेतु जाहीर केलाच आहे. तुह्मांला वाटेल त्याप्रमाणें पुढें आपण काय तें करावें. ( असें ह्मणून निघून जातो, चोपदार ललकारतो. )

ब०— सरकारच्या हुकुमाप्रमाणें आमची सर्व तयारी आहे. तिकडे पाठवायाला जसा मनुष्य पाहिजे तसा येथेंच हजर आहे. मीरसाहेबजान, उद्यां सकाळीं तुह्मीं व तुमच्या खात्रीचे असे पन्नास साठ मनुष्य बराबर घेऊन तावडतोब मंगळवेढ्यास निघावें, तेथें जाऊन तेथील ठाणेदारास बेड्या घालून कैद करून त्यास युक्तीनें आणावा. जाण्याचे वेळीं आमचे कचेरींत येऊन पकडण्याविषयींचा सरकारच्या मोहोरशिक्याचा हुकुम घेऊन जावा. व त्या प्रमाणें काम बजावावें. त्यास पकडून आणल्या नंतर सरकारांत आपली बढती होईल.

का०— वाहवा; दिवाणगिरीच्या कामाला योग्य आहां, व ह्मणूनच ह्या हुद्यावर आपण आहां.

मी०सा०— महाराज, ह्यावेळपर्यंत सरकारच्या हुकुमाची

गी वाटच पहात होतों, ह्या वेळीं तेथें जाऊन त्या हरामखोराला क़ैद करून केंव्हांच ओढून आणितों. ( सलाम करून जातो. )

व०— मुनषीसाहेब, येथें झालेला सर्व प्रकार आपण ऐकिलाच आहां. तर त्या दामाजीला पकडण्याविषयीं जलदी एक परवाना लिहा. कारण त्यावर सरकारचा मोहरशिक्का लौकर झाला पाहिजे. मीरसाहेबास सकाळीं गेलेच पाहिजे,

मु०— हुकुमा प्रमाणे हा लिहिलाच समजा. नंतर मर्जी असेल तर त्यावर ह्या वेळीं अथवा उद्यां सकाळीं सरकारचा मोहोरशिक्का करून तुह्मीं त्या मनुष्याला जलदी पाठवा.

व०— फार चांगलें, सध्या जरूरीचे दुसरे कांहीं मुकद्दमे नाहींत, तर कचेरी बरखास्त व्हावी.

( चोपदार " कचेरी बरखास्त " ह्मणून ओरडतो.)

( अंक ५, प्र० २. पृष्ठ ९५–९७. )

मी० सा०— ए गुलामहुसेन, आपण अगदीं मंगळवेढ्या जवळ आलों. तें येथून अर्ध कोशही नाहीं. हे पहा, किल्याचे बुरूज दिसताहेत. आपलें काम आतां मोठ्या हुषारीनें बजावलें पाहिजे. कारण कीं, पन्नाससाठ मनुष्य बरोबर घेऊन जाण्याविषयीं सरकारचा हुकुम होता, पण आपलें शौर्य दाखविण्याकरितां चौघे बस्स आहों, असें नंतर सरकारांत सांगितलें. आपण चौघे काय कमी आहों ! वेळ पडल्यास पर्वताचे सुद्धां तुकडे करूं! हें काम केल्यावर दरबारांत आपली बढती होईल.

गु०हु०— आपल्या हुकुमाप्रमाणें पाहिजे तें काम करण्यास आह्मी तयार आहों. त्या ब्राह्मणाला भ्यावयाचें ! त्याला एका क्षणांत पकडूं. पकडून नेल्यानंतर आपला हुद्दाही कांहीं चढेल ह्यांत संशय नाहीं. मिरजासाहेब, बेदराहून मंगलवेढें

साठ कोस तरी असेल नाहीं बरें ? आपणास आज निघून पांचवा दिवस, आपण तर फारच दमलों, त्यामुळें फार है-राणही झालों आहे. आतां दिवस फारच थोडा आहे, तर येथेंच मुक्काम करून अमलपाणी करून काय करणें असेल तें करावें.

हु०—सारा वेळ ह्याची हीच टकटक! आपण येथें अमलपाणी करण्याकरितां नाहीं आलों. अगोदर आपलें काम कसें तडीस जातें ह्याविषयीं विचार केला पाहिजे. असो; गुलामहुसेनच्या ह्मणण्याप्रमाणें मंगळवेढें साठसत्तर कोसच आहे। असें असून बरे आलों; मीरसाहेबजान, ह्या वेळेस आंत जाऊन दामाजीस पकडणें ठीक नाहीं. त्यास कोणत्या रीतीनें पकडावें ह्याविषयीं आज रात्रीं मसलत करूं. गावांत आपण आल्याची बातमी कळतां कामा नये. संध्याकाळ झाल्यामुळें आंत बहुतकरून इकडून आतां जाणारा कोणी नसेलच.

षे० र०— वाहवा फार चांगली मसलत. ज्यापेक्षां दामाजी पंतानें ही सरकारचा गुन्हा केला आहे त्यापेक्षां तो मोठ्या बंदोबस्तानें राहिला असेल ह्यांत संशय नाहीं. तर रात्रीस येथेंच कोठें तरी वस्तीस राहून मोठ्या पहाटेस तो निजून उठण्याचे अगोदर जाऊन त्याला पकडावें असें मला वाटतें.

मी सा०— शाबास फारच नामी मसलत ही! ह्या कामाची सर्वप्रकारें मजवर जबाबदारी आहे, कारण की मंगळवेढ्यास सरकारी कामाकारितां हरवख्त मीच येत असतों, व त्यामुळें त्याची माझी चांगली जानपछान आहे. त्याला चल, बाहेर निघ ह्मणतांच तो निघणारा आहे. त्याला असल्या संकटांत कोण मदद करणार ? कोणीही करणार नाहीं. दामाजीसारखा हुषार, शाहणा व विश्वासू नौकर आजपर्यंत माझ्या

पाहण्यांत कोणीही आला नव्हता, असें आंतून त्याणें हें भयंकर कृत्य कसें केलें कोण जाणे ! मनुष्याची बुद्धि केव्हां फिरेल याचा नेम नाहीं. अथवा दुस्मानीमुळें तर हें कृत्य कोणीं केलें नसेलना ? तर ह्यासाठींच अगोदर मुजुमदाराच्या घरीं जाऊन काय प्रकार आहे तो समजून घेतों, मुजुमदारानें हा गुन्हा करून दामाजीपंतांचें नांव कशावरून लिहून पाठविलें नसेल ? तसें असल्यास मग त्यालाच पकडून नेलें पाहिजे; नाहींतर विचारा दामाजीपंत फुकट मरणार !

गु० हु-- ठीक आहे, असेंच केलें पाहिजे. धरण्याकरितां आंत पहाटेस गेलेंच पाहिजे. एकानें सामानाच्या बंदोबस्ताकरितां येथें राहावें. चला तर ( जातात. )

( १ ) षेकराहिमान, हेंच दामाजीपंताचें घर. दरवाजे तर बंद आहेत, तेव्हां तो अजून निजून उठला नाहीं. ( २ ) अजून उठला नाहीं खरा. आपण तरी मोठ्या पहाटेस आलों. पहा, जिकडे तिकडे सामसूम आहे, त्यामुळें आपणास कोणी एक रस्त्यांत भेटलें नाहीं, हें बरें झालें. ( ३ ) मिरजासाहेब, जरा बोलूं नका. आंतून कांहीं गाण्याचा आवाज ऐकूं येत आहे. ( ४ ) ओहो, फारच गोड आवाज. आपणास जरी त्याचा अर्थ समजत नाहीं तरी गाणें फारच गोड लागतें. फारच मधुर वाणी. ( ५ ) हिंदूलोकांत मोठ्या पहाटेस अल्लाची प्रार्थना करण्याची चाल आहे, असें मला माहित आहे, तेव्हां ह्या कामीं आपण त्याला अडथळा आणूं नये हें बरें. एक घडीभर आपण बाहेरच बसूं ऐकत. ( ६ ) ऐका, बोलूं नका. ( ७ ) ह्याणें तर फार कमाल केली ! असें वाटतें कीं जसें काय ह्याणें अंतःकरणांत प्रेमशास्त्रच खोचलें. ( ८ ) संपलें वाटतें ! आणखी कांहीं गाईल तर फार चांगलें होईल.

( ९ ) कोण आहे रे घरांत ? खोल दरवाजा. ( १० ) अजून नाहीं उघडीत ? अरे केवढा वेळ आह्मी बाहेर उभे आहों. खोल जलदी. ( ११ ) काय, ह्यानें केलेला गुन्हा ह्याला आठवत नाहीं ! मोठें आश्चर्य आहे ! अथवा हा मुद्दाम तर करीत नसेलना ! (त्यास) कांहीं जरूरीच्या कामाकरितां बादशहाकडून आह्मी चार असामी तुजकडे आलों आहों. काल अगदीं संध्याकाळीं गांवाजवळ आलों, परंतु मग रात्र फार झाल्यामुळें आंत आलों नाहीं. ते हे आतां आलों, चौथा तेथेंच सामानाच्या बंदोबस्ताकरितां राहिला आहे. ( १२ ) मिरजासाहेब, हा काय बोलतो ? आपणाला तर कांहींच समजत नाहीं ! ( १३ ) तुह्मांला समजून काय करायाचें ? मला याची भाषा समजते ! मी सांगेन त्याप्रमाणे तुह्मी तयार असा म्हणजे झालें. पूर्वींची याची माझी जानपछान आहे, त्यावरून ह्याला पकडणें कठिण आहे, असें मला वाटत नाहीं. ( १४ ) ( मनांत ) काय गोडी गुलाबी लावतो हा ! पण अशा बोलण्याला विचारतो कोण ! ( उघड ) आपल्यासारखे मोठे इमानी नौकर बादशहाला सांपडले पाहिजेत ! बरें तें असो; अरे दामाजी, अलीकडे सरकारचें एखादें दगाबाजीचें काम करून नुकसान केल्याचें तुला आठवतें काय ? ( १५ ) काय ? नाहीं ह्मणतो हा ! ( १६ ) होय, तसें ह्मणतो खरा ! कांहीं चिंता नाहीं. तुह्मी मात्र आतां अगदीं ह्याच्या बाजूस रहा. ( पंतास ) काय तूं आपला गुन्हा कबूल करीत नाहींस ! अरे, तूं असा भयंकर गुन्हा केला आहेस कीं, त्याबद्दल बादशहा तुला काय सजा करील हें आमच्यानें सांगवत नाहीं ! तुझा गुन्हा जगजाहिर आहे. लपवून काय उपयोग ! बोल लौकर. ( १७ ) अरे हराम-

बोरा, असें खराब काम करून आणखी कबूल होत नाहींस ! अरे, तुझी ह्यातारपणीं अक्कल कोठें गेली ! महिना दीड महिन्यापूर्वीं सरकारी कोठारें फोडून धान्याची नासाडी तूं नाहीं केलीस ? असें करण्यास तुला सरकारी हुकुम होता काय ? असेल तर दाखीव ! ज्याचें आजपर्यंत अन्न खाल्लेंस त्याचे उपकार चांगले फेडलेस ! खचित तूं वेडा झाला आहेस ! ह्याच गुन्ह्याबद्दल आह्मी तुला पकडायाला आलों आहों. पकडारे ह्याला धरा. हा पहा, सरकारचा हुकुम. ( १८ ) अरे, लांब लां ब गोष्टी कशाला सांगतोस ? बादशहापुढें काय तें शहाणपण दाखीव, आह्मी हुकुमाचे धनी ! कर निघण्याची तयारी. बायकोला भेटावयाचें असेल तर भेट, तुझी तिची पुनः भेट होईल असें मला तर नाहीं वाटत! ( १९ ) लौकर ये , नाहीं तर पळशील एखादा ! जरा वेळ लागला कीं, तुझा धरम बिरम न समजतां आह्मी बेधडक घरांत शिरूं. पूर्वींची ओळख म्हणून आंत जाऊं देतों. नाहीं तर येथून तुला असेंच नेलें असतें. ( २० ) दामाजी आतां बाहेर येईल. त्यास धरणें अगदीं सोपें आहे. तो बिचारा आमच्या सांगण्याप्रमाणें वागणारा आहे. तक्रारी नाहीं. तर आतां निघण्याचे तयारींत असा. ( २१ ) त्याचे येण्याचा खोळंबा, आमची सर्व तयारी आहेच. ( २२ ) दामाजी, काय टकटक लावली आहेस ही ! गुलामहुसेन, बघता काय ? बांधा ह्याला. ( २३ ) ए बाई, हट मागें. ही वेडी तर नाहींना ! असें काय करते ही ! ( २४ ) बाई, तुझें बोलणें आह्मांला कांहींच समजत नाहीं. 'चुडेदान' ह्मणजे ? तुझ्या नवऱ्याला आह्मी बादशहाकडे नेणार. तूं बायकोची जात, आंत जा लौकर. ( २५ ) ए बाई, आतां रडून काय होतें ? हा भयंकर गुन्हा करण्याचे

अगोदर त्याला उपदेश करून त्याचा जीव वांचेल असें कां केलें नाहींस ! केलेल्या अपराधाबद्दल तुझ्या नवऱ्यास सजा झालीच पाहिजे. हो पलीकडे. त्याला जलदी घेऊन जाऊं दे. ( २६ ) काय ह्या बायकोनें खेळ मांडला आहे हा ! ( २७ ) दिवस पहा वर किती चढला तो ! आमचें येथून अजून निघणें होत नाहीं ! ह्यांनीं फारच चेष्टा लावल्या आहेत ! खबरदार ! जास्त कांहीं कराल तर ह्याला जनावराप्रमाणें ओढीत नेऊं ( २८ ) दामाजी, मघांशीच तुला बाहेरच्या बाहेर घेऊन जातों ह्मणजे ठीक झालें असतें. मला तुझी दया येऊन बायकोला भेटण्याची तुला परवानगी दिली, तों तिला बाहेर घेऊन येऊन हा गोंधळ घातलास काय ? तूंच मुळीं हरामखोर आहेस. सोड तिला. आणि चल आमच्या बरोबर. आम्ही अशा गुन्हेगाराला कधीं सोडणार नाहीं ! ( २९ ) काय आज येथून आमचें निघणें होत नाहीं ? धरा त्या दामाजीला आणि ओढा इकडे. [ ३० ] दोनप्रहर होत आले तरी ह्यांची गडबड बंद होत नाहीं ! ह्याला आतां लौकर नेलेंच पाहिजे. नाहीं तर गांवचे लोक जमतील ! मग जाण्याला फार मुष्कील पडेल, अगे बाई, कां उगाच आमचें डोकें फिरवितेस ! सोड तो गळ्यांतला हात. नाहीं तर आम्ही सोडून त्याला घेऊन जातों. तूं रडून कितीहि बोललीस तरी आम्ही त्याला सोडणार नाहीं. दामाजी तिला सोड आणि ये इकडे असा. नाहीं तर ही पाहिलीस तलवार कशी चमकत आहे ती ! [ ३१ ] अरे भाई, पुरे पुरे आतां ! आम्ही अगदी त्रासून गेलों. त्याचा हात धरून ओढ इकडच्या अंगास, मग हा मी दुसरा हात पकडतों. नाहीं तर हा खंजीर मध्यें घालतों, ह्याणें ही मगरमिठी तेव्हांच सुटेल. [ ३२ ] अबा,

आतां बस कर. नीघ जलदी. किती वेळ आम्हांस असा त्रास देत आहेस हा ! [ ३३ ] मग तुमचें काय म्हणणें ? गुलामहुसेन, मीं सांगितल्याप्रमाणें हे पाहिलेस लोक येत चालले ! काय करावें आतां ! तूं कोणरे आमच्यांत बोलणारा. चल चल, आपल्या कामाला जा. चालले आपले शखी मिरवायला. [ ३४ ] दामाजी, चल लौकर, सोड सोड आपल्या मनुष्यांना आतां ! किती बोलतोस हा ? सांग एकदां काय तें आम्हाला. येतोस कीं नाहीं !

( ३५ ) अरे ए, तूं आंत जातो आहेस तर, दामाजीपंतास सांग कीं दरवाज्यावर तुझी वाट पहात ते मनुष्य उभे आहेत, तुला जलदी बाहेर बोलावीत आहेत. नाहीं तर ते बेधडक आंत येतील. ( ३६ ) अरे दामाजी, बाहेर येतोस कीं नाहीं? आतां आह्मी येथें उभे राहणार नाहीं ! ( ३७ ) भाई दामाजी, आमची किती खोटी केलीस हो ! तुझ्या पाठीमागें लोकांची काय गर्दी हो! आपलें तर डोकें ह्याणें बाबा, अगदीं फिरून गेलें. ( ३८ ) दामाजी चल लौकर, नाहीं तर आतां धक्के खाशील. ( ३९ ) चल चल, पाय उचल. ( ४० ) अरेए हट मागें, बादशाहा वजीरवगैरे मंडळी कांहीं गुप्तकामाकरितां आंत जमली आहे. आंत कोणालाही जाण्याचा हुकुम नाहीं, मग तूं कसा जाणार ! आ आल्या रस्त्यानें, नाहीं तर फुकट धक्के खाशील ! ( ४१ ) तें कांहीं असो. हजार बोललास तरी कांहीं वळणार नाहीं. मुकाट्यानें जा कसा! नाहीं तर ही पाहिलीस तरवार कशी चमकते आहे ती. ( ४२ ) बरें बरें. आंत जाऊन वर्दी देतों; पण— ( ४३ ) आतां आंत जाऊन वर्दी देतों. [ ४४ ] वजीरसाहेब, कांहीं जरूरीच्या कामाकरितां आज दीड एक लाख रुपये पाहिजे

आहेत. तेंव्हां जलदी तजवीज झालीच पाहिजे. [ ४५ ] सरकार, खजिन्यांत तर म्हणण्यासारखी शिलक नाहीं तेंव्हां त्यांतून काढण्याची सोय नाहीं. असें बाहेर जर समजेल तर गादीला मोठा धक्का बसण्याची भीति खरी ! ( मनांत ) काय करावें पुष्कळ सरदार चौथाई देत नाहींत म्हणतात [ उघड ] सरकार काळजी करण्याची कांहीं गरज नाहीं. कोणत्याही तऱ्हेनें पाहिजे तेवढी रकम हजीर करतों. [ ४६ ] महाराज, मंगळवेढ्याहून कोणी मनुष्य आला आहे तो आंत येण्याची परवानगी विचारीत आहे. [ ४७ ] सरकार, थोड्या दिवसांपूर्वीं दामाजीपंतास पकडण्याकरितां जे मनुष्य पाठविले होते ते बहुधा आले असतील [४८] त्या बदमाष दामाजीची कत्तल करण्याकरितां पाठविलेले मनुष्य, आपलें काम बजावून आले असतील ! [ ४९ ] अरे ए भले मनुष्या, आंत येण्याला तुला सरकारची परवानगी आहे, तर चल लौकर आतां. [ ५० ] नाहीं सरकार, त्याला फक्त पकडण्याचाच हुकुम झाला होता. [५१] काय पकडण्याचा हुकुम केला होता ? बरें त्याला येऊं द्या आंत. ह्याक्षणीं त्या हरामखोराची गरदन ह्या खंजिरानें उतरतों. [ ५२ ) अरे हा कोण ? तो दामाजी व ते येथून पाठविलेले मनुष्य कोठें आहेत ? अरे ह्या वेड्याला आंत कशाला येऊं दिलेंस? [५३] सरकार, हाच मंगळवेढ्याहून आलेला मनुष्य, व ह्याच्याचसाठीं मीं सरकारांत वर्दी दिली होती. [ ५४ ] बरें बरें, ह्या वेड्याला दे बाहेर घालवून. पुन: अशा कोणाला आंत येऊं देशील तर खबरदार ! सजा केली जाईल. ( ५५ ) अरे हा कोण, दामाजीला इमानी म्हणून त्याची तारीफ करीत आहे ? [ ५६ ] हुजूर, मोठी आश्चर्याची गोष्ट आहे! ज्या रकमेची सरकारास गरज होती ती परमेश्वरानेंच ह्याक्षणीं

पाठविली ह्मणायाची. ह्यावरून सरकारावर परमेश्वराची पूर्ण कृपा आहे ह्यांत संशय नाहीं. [ ५७ ] अगोदर हें सांगा कीं एवढी रकम कोठून आली ? [ ५८ ] आपण धान्य लुटविलें म्हणून समजत होतों त्याचा पैसा दामाजीनें पाठविला आहे, असें ह्यावरून समजतें. [ ५९ ] काय हे सर्व दामाजीनें रुपये पाठविले ? शाबास ! बरें, हे सर्व रुपये किती आहेत? [ ६० ] ह्यांत एक लाख अडसष्ट हजार रुपये लिहिले आहेत. आणखी मोठ्या नम्रतेनें त्यानें असें लिहिलें आहे कीं, मोठी रकम एकदम पाठवावयाची होती ह्मणून इतका वेळ लागला, तरी ह्याबद्दल सरकारची ह्या सेवकावर इतराजी न व्हावी. सातशें खंडी धान्य खर्च झालें त्याचा सर्व हिशोब ह्यांत नमूद करून इतकी रकम पाठविली आहे. [ ६१ ] इतके धान्याची इतकी मोठी रकम पाठविली ? तर मग तो मोठा विश्वासू सरदार खरा ! [ ६२ ] दुष्काळामुळें मोठी महागाई होऊन लोकांचे फार हाल झाले. रुपयाला एक पायलीप्रमाणें सुद्धां धान्य घ्यावयास लोक तयार होते पण तें सुद्धां मिळणें मुष्कील होतें! असें पण ह्यांत जाहिर केलें आहे [ ६३ ] काय दामाजीपंत इतका हुषार व विश्वासू नोकर! मग हा अर्ज मंगळवेढ्याहून त्याचे दुष्मानाकडून आला असेल ! अरे हा खोटा अर्ज लिहिणारा कोण आहे ! [ ६४ ] महाराज, आपला मतलब साधून दामाजीची सर्व प्रकारें नुकसानी व्हावी, ह्मणून हा त्याणें अर्ज पाठविला असेल! [ ६५ ] खरें आहे, ह्यांत संशय नाहीं ! [ ६६ ] अरे विठू, ह्या थैलींत किती रुपये आहेत हें तुला माहीत आहे ? वा: ! ह्याची भाषाच आह्माला अगोदर समजणें कठीण [ ६७ ] काजीसाहेब, ह्या लोकांची थोड थोडी मतलबापुरती मात्र

आह्मांस भाषा समजते, पण एक शब्दसुद्धां बोलतां येत नाहीं! ह्या लोकांच्या व ब्राह्मण लोकांच्या भाषेंत पुष्कळ तफावत दिसते ! त्यांची भाषा आह्मांला चांगली समजते. अरे विठू, ह्या थैलींत किती रुपये आहेत हें तुला माहीत नाहीं काय ! [ ६८ ] अरे मंगळवेढें सोडून आज तुला किती दिवस झाले! व तुला ,येतेवेळीं कोणी सरकारी मनुष्य भेटले होते काय ? [ ६९ ] काजीसाहेबांनीं त्याला काय विचारिलें व त्याचा त्याणें काय जबाब दिला, ह्यांतील आपणाला तर कांहींच समजलें नाहीं ! असो; तें बोलणें राहो ! ह्याला आतां रसीद देणें आहे ! तेव्हां अगोदर रुपये मोजले पाहिजेत. अरे ए चोपदार, खजांजी साहेबांस इकडे लौकर येण्याची वर्दी दे. ( ७० ) फार चांगलें; त्यांला हा मी घेऊन आलोंच. ( ७१ ) काय हुकुम आहे सरकार ? ( ७२ ) खजान्जी हे रुपये लौकर मोजण्याविषयीं आपणांस तसदी देत आहें. ( ७३ ) ही थैली मोठी दिसत आहे ! तेव्हां हे मोजण्याला कृपा करून कोणी मदद द्याल तर एका क्षणांत सर्व मोजीन. ( ७४ ) फार चांगलें ! बसा इकडे आंत मोजीत. द्या कोणी दुसरी मदद. ( ७५ ) हा मनुष्य आल्यापासून माझें अंतःकरण फारच खुष झालें आहे. ह्याचें काय बरें कारणें असावें ? अरे, तूं असा समोर ये रे , तूं किती दिवस त्या दामाजी पंतापाशीं चाकरी करीत आहेस ? तुला तो काय तन्खा देतो ? तुझें नांव काय ? हें सर्व मला लौकर सांग पाहूं ? [ ७६ ] हा दामाजीचा मोठा भरौसेदार मनुष्य आहे ! ह्मणूनच त्याणें एवढी रुपयांची थैली ह्याच्याबरोबर पाठविली ! जर तो ह्याला चांगले रीतीनें पाळीत असेल तर ह्याला तन्खा तरी काय करावयाचा ! अरे विठू, तूं येथें चाकरीस राहा, राहशील तर प-

गार पण चांगला मिळेल. ( ७७ ) अगोदर ह्याला रसीद लिहून लौकर द्या. ह्या गरीबाचा खोळंबा करूं नका. मग रुपये मोजा ! दामाजीपंत मोठा विश्वासू आहे, कधीं दगाबाजी करणार नाहीं. तर द्या लौकर त्याला रसीद ह्मणजे तो जाईल. वजीर साहेब, त्या बदखोराच्या अर्जावर विश्वास ठेवून हे रुपये भरण्याचे अगोदर जर त्याला धरून आणते तर बिचारा दामाजीपंत फुकटच्या फुकट मध्येंच मेला असता ! त्या हरामखोरानें आपल्या मतें मोठी हुशारी केली होती, पण त्याचें कांहीं साधलें नाहीं! अशा दगाबाज मनुष्याला पकडून आणून त्याला ठार मारण्याची सजा दिली पाहिजे. [ ७८ ] दामाजीपंत व ते मनुष्य दोन तीन दिवसांत येतील, बहुत करून शहराजवळ आलेही असतील ! ते आल्या नंतर सर्व हकीकत त्याचे मुखानें समजेलच, मग दामाजीपंत सांगेल ती सजा त्या अर्जलिहिणारास द्यावी. ( ७९ ) सरकारच्या पायांजवळ काजीसाहेबांनीं, केलेला अर्ज बराबर आहे. त्या प्रमाणें करणें योग्य आहे. ( ८० ) ठीक आहे. ( ८१ ) ओहो ! विठू, अरे तू जातीचा धेड असूनही जें तूं बोलतोस तें मला फारच आवडतें. व तेणें करून चित्तास आरामही फार होत आहे. ह्याचें काय बरें कारण ? विठू, तू माझ्या दृष्टीसमोरून जाऊं नयेसें वाटतें. ( ८२ ) खजांजीसाहेब, रुपये अजून मोजले नाहीं? रसीद लौकर देण्याविषयीं वरचेवर सरकारचा हुकुम होत आहे. आणखी पाहिजे तर कोणी मदद घ्या. पण लौकर मोजा. ( ८३ ) सुमारें सवा-लाखपर्यंत मोजून झाले आहेत. रसीद लिहा इतक्यांत आपणांस कळवितों. ( ८४ ) सरकार रसीद लिहून तयार आहे. आणखी ह्यांत मजकूर लिहिणें आहे? काय ( ८५ )

त्यांत रुपये पोंचले इतकेंच लिहावें, जास्त कांहीं नाहीं. ( ८६ ) येथें दामाजीपंत आल्यावर त्याचे ह्या कामाबद्दल व त्याचे दुष्मानाबद्दल काय तें बोलणें होईलच. ( ८७ ) अरे विठू, तुझ्या धन्यानें जी रकम पाठविली ती बरोबर आह्मांस पोंचली असें सांगून त्याला ही रसीद दे. ( ८८ ) असो; झालें तें झालें. ह्यामुळें त्याची भेट तरी होईल. अरे विठू, तुझा धनी दामाजीपंत येथें आतां लौकर येईल; तुझी त्याची येथें गांठ पडेल ! मग जाण्याची घाई कां करतोस ? तू हरहमेषा मजजवळ असावें, ह्या तख्तावर बसावें, मधून मधून तर तुला कडकडून भेटावें असें वाटतें ! तुझ्याविषयीं जें मला कांहीं वाटत आहे तें बोललों असतां हे लोक हसतील, ह्मणून बोलत नाहीं. तू जवळ येरे, तुला एकदां नीट पाहूं दे. ( ८९ ) सरकार, असें एकाएकीं बेफाम होण्याचें काय कारण ? सावध व्हा, काजीसाहेब, काय हें ! हकीमसाहेबांस तरी लौकर आणवा. ( ९० ) हो, त्याला बोलावलेंच पाहिजे. सरकार, असें काय हें ? उठून बसावें. ( ९१ ) दामाजीपंतांकडून ज्यानें रुपयांची थैली आणली तो विठू कोठें गेला ? त्याला जवळ आणा, तो गेला काय ? हाय ! हाय ! फार वाईट झालें ! वजीरसाहेब, तो गेला असेल तर त्याला लौकर आणा, त्याला केव्हां पाहीनसें मला झालें आहे. तो लौकर न भेटेल तर माझी अवस्था कठिण आहे ! तो जेव्हां येथून निघाला तेव्हां जशी वीज चमकावी त्याप्रमाणें माझ्या डोळ्यांपुढें चक्र झालें, व त्यामुळेंच ह्या तख्तावरून खालीं पडलों. काजीसाहेब आतां खोटी कां ? तो लांब गेला असला तरी त्याला लौकर आणा. तो आल्यावर, असें त्याणें कां केलें हें त्यालाच विचारूं. ( ९२ ) सरकार, त्याणें कांहीं केलें नाहीं.

पेत्तानें डोळ्यांपुढें लख्ख झालें. आपल्यासाठीं त्याला पाहिजे तर बोलविण्यास पाठवितों. त्याला आणणें काय कठीण आहे ? (मनांत) हकीमास मात्र हिकडे घेऊन यानें. (जातो) (९३) वजी साहेब, पित्त पित्त ह्मणून उगाच भलतेंच काय सांगता ? मला त्या विठूधेडाचें अगदीं वेड लागलें आहे ! तो मला लौकर दाखवा. अहो, तो कोण आहे हें मीं कसें समजूं ? त्याला घट्ट मिठी कधीं मारीनसें झालें आहे ! (९४) काय बोलतां हें ! आपली योग्यता कोठें व त्याची कोठें ! आपल्यांत व त्याच्यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. हिंदू लोकांत ही धेडाची जात फारच हलकी आहे ! असें असून त्याच्याजवळ बोलणें, व त्याच्याजवळ बसणें सरकारास कसें आवडतें ! काय हें ! हें पाहून लोक तरी काय ह्मणतील ! विचार करा, असें करण्यांत काय बरें हाशील आहे ? (९५) दिवाणजी कचेरी बरखास्त होऊंद्या ह्मणजे हे सर्व लोक जातील. (वजीर तसें करतो.) (९६) वजीरसाहेब मला वाटतें कीं, तो कोणी तरी मोठा मनुष्य असून दामाजीपंताकरितां धेड होऊन येथें आला होता ! ओहो, त्याचें बोलणें तरी किती गोड ! खुबसुरत तरी काय पण ! तो मोठा मनुष्य नसेल तर माझें मन त्याच्यावर कसें तुटून पडेल ! उगाच बडबड कशाला ? तो माझ्या प्रेमाचा जिव्हाळा विठूवेड मजपुढें लौकर उभा करा. हाय ! हाय ! विठू, अरे भाई विठू, मला गरीबाला सोडून तूं एकटा कोणीकडे गेलास ! तुझ्या शिवाय मला मुळींच करमत.. नाहीं ..काय करूं ! तुझें मला एकदां मुखकमल दाखीव, जशी एखादी खुबसुरत तरुणी पुरुषाचें मन आपल्याकडे ओढून घेऊन त्याला जसें आपलें वेड लाविते, त्याप्रमाणें मला तुझें वेड लागलें आहे ? ह्मणुन

मला लौकर भेट दे; नाहीं तर मी ह्यांतून वांचेन असें वाटत नाहीं. वजीरसाहेब, तो विठूबेंड कोठें आहे ? लौकर जाऊन त्याचा तल्लास करा. पहा, मी त्याच्याशिवाय अगदीं परदेशी झालों आहें. त्याला पाहिल्यावांचून मला खाणें पिणें कांहींच रुचणें नाहीं ? त्याच्याशिवाय मला कोणत्याही प्रकारचे विलास सुचणार नाहींत. मग दरबारचें काम तरी कसें आवडेल! वजीरसाहेब, माझ्यासमोर उभे कशाला ? त्याला मजजवळ आणीत नाहीं काय ? ( ९७ ) ( मनांत ) अशी एकाएकीं ह्याची स्थिति होण्याचें काय कारण असावें, तें कांहींच समजत नाहीं ! काय करावें ! फारच विलक्षण झालें ! त्या मनुष्याला एकदां आणला तर पाहिजेच, त्याशिवाय ही स्वारी ऐकणार नाहीं ? ( उघड ) महाराज, चलावें मजबराबर; आतां त्याला भेटावितों. ( ९८ ) महाराज, हुजूर, खावंद, सरकार, असें ह्मणून कां उगाच ह्या त्रासलेल्या अन्तःकरणावर डाग देतां ? त्याला आणणें असेल तर ह्या ठिकाणीं व ह्या वेळेस मजपुढें उभा करा. जा, मी येथें त्याची अगदीं वाट पाहत उभा असतों. काय तुम्ही अद्याप गेलां नाहीं ! अरे मी तर अगदीं तल्लीन झालों, असें असून हे लोक मन मानेल तें बोलून मला वेडा बनवूं पहातात ! देवा, मज गरीबावर असा तुझा कां बरें कोप हा ! तुझी मर्जी, तूं पाहिजे तें करण्यास समर्थ आहेस. वजीर, तुम्ही सैतानासारखे माझ्यापुढें उभे कां ? निघा येथून करा तोंड काळें. ( ९९ ) हा मी जाऊन त्याला एका क्षणांत आणितों ( मनांत ) अरे, इतके लोक आपण ह्या वेळेस असून आम्हांला त्याविषयीं कांहींच वाटलें नाहीं. पुनः म्हणजे त्याला पहावें असें आमच्या मनांत सुद्धां येत नाहीं. आणि ह्याचीच कशी अशी

अवस्था झाली ही ? कांहींच सुचत नाहीं ! झटलें असतां त्याचें झाला वेड लागयाला कांहींच कारण नाहीं. ( उघड ) महाराज, त्याला आणण्याविषयीं आपली परवानगी मागतों. ( १०० ) अरे विठू, प्रेमाच्या फाशांत पकडून माझें मन आपल्याकडे ओढून घेणारा असा तूं कोण आहेस ? कोणी जादुगीर अथवा मंत्री आहेस झणावें तर दामाजीपंताच्या तैनातींत फार दिवस असून मोठ्या इमानानें व अब्रूनें नोकरी करीत आहेस. आणि ह्मणूनच दामाजी पंतानें तुझ्याबराबर एवढी रकम पाठविली. खचीत खचीत तूं मोठा चतुर मनुष्य आहेस ! अरे तुला जाते वेळीं सरकारांतून कांहीं बक्षीस तरी मिळालें काय ? नाहीं. हाय हाय ! फारच वाईट झालें. त्या वेळेस माझी मति अगदीं गुंग झाली ! त्या दामाजीपंताला सुद्धां त्याच्या ह्या विश्वासूपणाबद्दल कांहीं नजाणाराही पाठविला नाहीं ना ? अरे त्या विठूला अद्याप कोणीच मला भेटवीत नाहीं ! हें काय, त्याच्याशिवाय मला सर्व विषय केवळ विषासारखे वाटत आहेत. मला त्या उदकाची अतिशय तहान लागली आहे ! तें जर आतां लौकर न मिळेल तर केव्हांच मी मरून जाईन ! ( कान देऊन ) काय "सरकारस्वारी कोठें आहे" ह्मणून कोणी मला विचारीत आहे ? कोणी मला पाहावयास येत असाल तर त्या विठूधेडाला बराबर घेऊन या ! नाहीं तर उगाच येऊं नका ! काय करूं, मन वारंवार आवरतों पण कांहींच चालत नाहीं. त्याच्याशिवाय मला सर्व उदास वाटत आहे. मला जर पंख असते, तर त्या प्राणविसाव्याला कधींच धुंडून काढलें असतें ? माझी अशी आजपर्यंत कधींही अवस्था झाली नव्हती. मी वेडा झालों आहें ह्मणावें तर सर्व लोकाबराबर चांगल्या रीतीनें बोलत आहें. शुद्धींत आहे ह्म-

णावें तर विठूखेड तो काय व मला त्याचे दर्शनाची इच्छा होते काय? मला लोक तरी आतां काय ह्मणतील! अरे, या विठूला झडकर भेटण्याला कांहींच उपाय नाहीं? ( हकीम येतो. त्याला मिठी मारून ) हकीमसाहेब, तो माझा प्राण—विठूखेड कोठें आहे? बाहेर असेल तर त्याला आंत आणण्याला कांहीं हरकत नाहीं. ( मोठ्यानें ) विठू अरे विठू, तुला आंत येण्याविषयीं कोणी अटकाव करीत असेल तर थांब, तुला मिठी मारावयाला मीच बाहेर येतों. ( रागानें ) तुह्मी सर्व लोक बदमाष आहां, अजून त्याची मला भेट करवत नाहीं! तर मला एक घटिकेच्या आंत त्याला न दाखवाल तर मी काय करीन ह्याचा बिलकुल भरवसा नाहीं. हकीमसाहेब, ही पाहिली नामची तलवार विजेसारखी कशी चमकत आहे ती! विठू, तूं मला सोडून कोठें चाललास? मीच स्वत: तुझ्या भेटीला येतों ( जातो. ) ( १०१ ) सरकारास वेड लागलें ह्यांत बिलकुल संशय नाहीं. मला सरकाराबराबर गेलें पाहिजे; कारण की, त्यांचे हातांत नंगी तलवार आहे. न जाणों काय करतील ह्याचा नेम नाहीं. ( जातो ) ( १०२ ) दामाजी, ही धर्मशाळा आहे, तुला रोटिबिटी कांहीं बनविणें असेल तर येथें बनव. तुला कांहीं पाहिजे असेल तर गांवांत जाऊन बाजारांतून आणून देतों. तूं ह्या दिवसपर्यंत अन्नाचा एक घांस सुद्धां खाल्ला नाहीं! बादशाहाजवळ नेईपर्यंत आह्मांस कसे तरी तुझे प्राण वांचविले पाहिजेत. येथें थोडें पाणी पण दिसत आहे. तूं फार दिनवाणा आहेस, तेव्हां कांहीं खायला करशील तर फार चांगलें होईल. ( १०३ ) आजपर्यंत अशी पायांनीं चालण्याची ह्याला सवय नाहीं असें ह्याच्या तोंडावरूनच दिसत आहे; आतां येथून बेदर पण जवळ

आहे, फार तर वीस एक कोस असेल. ( १०४ ) फराळ ? ठीक आहे. तसें करतों. षेकराहिमान, तुह्मी दोघे गांवांत जाऊन भटियारखान्यांतून थोडी रोटी, भाजीवगैरे आणा. व येतेसमयीं दामाजीपंताकरितां पण कांहीं मेवामिठाई मिळाल्यास आणा, ह्मणजे तोही विचारा खाईल. ( १०५ ) अरे कोठें चाललास दामाजी ? पळतोस की काय ? ( १०६ ) कोठला विठू महार घेऊन बसलास ? मिरजासाहेब, कैद्यांवर कधीं विश्वास ठेऊं नये ! धरा ह्याला आणि चला घेऊन ! ( १०७ ) अरे फरीद, सरकारची स्वारी शुद्धीवर केव्हां येणार ? रात्रंदिवस ह्याला या विठूधेडाचा ध्यास लागला आहे. आह्मी वीस पंचवीस असामी आज दोन तीन दिवस सरकारावरोबर मारे फिरत आहों. जो भेटेल त्याला खावंद 'विठू कोठें आहे,' असें विचारतात. ह्याप्रमाणें ह्यांना त्याचें अगदीं वेड लागलें आहे. ( १०८ ) तूं ह्मणतोस तें सर्व खरें आहे. कालपासून तर तोंडानें विठू धेड लौकर दाखवा असें ह्मणत ऊन किंवा सावली याची कांहींच परवा न करतां सर्व शहरभर मारे भटकत होते. ( १०९ ) अरे, काल रात्रीं तर सरकाराला मुळींच झोप लागली नाहीं ! ह्यावेळेस आंत स्वारीला किंचित् झोंप लागली आहे असें वाटतें. तेव्हां जरा हळू बोल. जो विठूधेड दाखवील त्याला सर्व राज्य देईन असें खावंद ह्मणत होते! ( ११० ) त्याला शोधावयास जिकडे तिकडे लोक पाठविले असून अजून त्याचा पत्ता लागत नाहीं ? मोठी आश्चर्याची गोष्ट आहे ! ( १११ ) अरे, मंगळवेढ्याच्या ठाणेदाराचा तो नौकर आहे हें तुला माहीत नाहीं ? त्याला पकडणें मोठें कठिण आहे असें नाहीं. तो येथून मंगळवेढ्यास जावयाचा तो तिकडे न ज

तां कोठें दुसरी कडे आपल्या कामाला गेला असेल ! नाहीं तर तो केंव्हांच मिळाला असता ( पडद्यांत– " विठू धेड कधीं भेटणार ) " , ११२ ) सरकारची स्वारी निजेंतून उठली वाटतें ! चला तर आपण आंत जाऊं. [ ११३ ] विठू अजून आला नाहीं ? [ ११४ ] महाराज, नाहीं आला अजून. त्याला शोधायाला पुष्कळ लोक गेले आहेत. आतां तो लौकर येईल. ( ११५ ) दामाजीपंताला आणण्याकरितां येथून गेलेले मनुष्यही त्याला घेऊन अजून नाहीं आले ? भाई दामाजी, तूं तरी मला लौकर भेट दे, ह्मणजे तो तुझा विठू धेड मला लौकर भेटेल. [ ११६ ] अरे, माझ्या विठू धेडाचें कोण नांव घेत आहे हा ! तो आला काय ? ( ११७ ) खावंद, हुकुमाप्रमाणें दामाजीला पकडून आणिला आहे, व त्याणें गुन्हा केला असें तो स्वतः कबूलही करीत आहे! ( ११८ ) दामाजीपंत, तूं इकडे पाठविलेला तो धेड कोठें आहे ? अरे, तुझा मुळींच गुन्हा नव्हता, मी अगोदर कांहींच चौकशी न करितां तुला पकडण्या करितां मनुष्य पाठविले ! ही माझी सर्वस्वी चूक आहे. आतां बोलून का उपयोग ! तो विठूधेड कोठें पाहिलास काय ? सांग सांग लौकर ! [ ११९ ] होय, सरकार ह्यालाही रस्त्यांत कोणी विठू धेड वाटसरू भेटला होता. व त्याचें ह्याला फारच वेड लागलें आहे. ( १२० ) तर मग तो तुझा चाकर विठू कोठें आहे ? ( १२१ ) दामाजी, मला हें तुझें बोलणें कांहीं समजत नाहीं. ज्या मनुष्याबरोबर तूं रुपयाची थैली पाठविली, तो तुझा विश्वासू नौकर कोठें आहे? तें अगोदर सांग.' [ १२२ ] सरकारच्या ह्मणण्या- प्रमाणे दामाजीपंताकडून मनुष्य कोणीही आलेला नसावा. आह्मी ह्याच्या बराबर आज आठ दहा दिवस आहों.

[ १२३ ] काय भलतेंच बोलणें हें ! मी जागा तर आहेंना ! त्याणें रुपयांची थैली जमिनीवर ओतली यावेळेस मीं जवळ होतों. त्याचें नांव, तो तुमच्या जवळ किती वर्षें नौकरी करीत आहे वगैरे मी त्यास सर्व हकीकत विचारली, त्यानेंही हें सर्व ऐकून घेऊन सांगितलें कीं मीं दामाजीपंतांचा पिढीजादा नौकर आहें. माझें नांव विठू. ओहो ! त्याचें रूप व बोलणें तरी किती मधुर होतें ! शेवटीं तो गेला त्या वेळेस माझ्या डोळ्यां समोर जशी वीज चमकावी त्या प्रमाणें चक्र झालें ! त्यावेळेस मला घडीभर मूर्छा आली ! तो मला अशा स्थितींत ठेवून पावती घेऊन निघून गेला. अहो, फार कशाला ? तुह्मी आपलें अक्षर ओळखाल कीं नाहीं ? ( १२४ ) काय ह्मणतां, त्याच्यामुळें तुमची पण स्थिति अशीच झाली आहे ! मग त्याला घेतल्याशिवाय तुह्मी एकटे कसे आलां ? त्याजवरील प्रेमामुळें मी अगदीं वेडा झालों आहें. दामाजीपंत, त्याचा तल्लास करण्याकरितां हजारों लोक फिरत असून तो अद्याप कसा बरें सांपडत नाहीं ? कोण आहे रे ? मिरजासाहेब, वजीर साहेबाला ताबडतोब बोलावून आणा ( १२५ ) सरकार, आपल्या हुकुमाप्रमाणें त्यांना कळवितों ( १२६ ) काय खेळ आहे हा ! कांहींच समजत नाहीं ! खरोखर तीन एक दिवसांपूर्वीं तुह्मांकडून एक मनुष्य आल आणि त्याणें तुमचें नांव सांगून पैसा भरला, ती रकम अमु कच होती असें मला बरोबर आठवत नाहीं पंत, तुह्मांशि वाय त्याच्या बरोबर एवढी रकम कोण पाठवील ? असें अ सून तुह्मी कांहींच माहीत नाहीं असें ह्मणतां ? माझें मन पा हण्यासाठीं हें असें करीत आहां काय ? ही माझी गुन्हेगा आहे ह्मणून पूर्वींच तुह्मांस सांगितलें. दावेदारीमुळें मुज्रुपद

रानें अर्ज लिहिला, त्यांतील मजकूराच्या खरेपणाविषयीं बराबर चौकशी न करितां तुह्मांस पकडण्याकरितां मनुष्य पाठविले. ह्या मुळें तुह्मी मुद्दाम कांहींच कबूल करीत नाहीं? असा खोटा अर्ज लिहिणाऱ्या मनुष्यास तुह्मी सांगाल ती ह्या क्षणां सजा देतों. पण अगोदर तो तुमचा नोकर विठू कोठें आहे तो लौकर दाखवा. फार काय सांगूं! माझा .. तो प्राण मजजवळ आतां न येईल, तर मी लौकर मरेन ह्यांत संशय नाहीं. ( १२७ ) काय बोलावें आतां? मी जागा असून, मला झोंप लागली आहे, अशासारखें हें तुमचें ह्मणणें आहे. तुमचें अक्षर दाखविल्यावांचून ह्याचा निकाल होणें नाहीं. परंतु ज्याचें आजपर्यंत तुह्मी पालन पोषण केलेंत त्या विठूला येथें उभा करा. दुसरी गोष्ट सुद्धां बोलूं नका. बरें, मंगळवेढ्याहून येतांना विठू महार ह्मणून जो मनुष्य तुह्मांस भेटला तो कसा होता? त्याच्या सर्व खुणाखाणा सांगा पाहूं. ( १२८ ) मग तर मला असें वाटतें कीं हें कांहीं तरी चेटक आहे! जो कोणी मला त्या विठूला भेटवील त्याला त्याबद्दल हें सर्व राज्य सुद्धां देईन! त्याच्या दर्शना शिवाय हें सर्व मला कांच्याप्रमाणें जाचत आहे. त्याच्या शोधार्थ जिकडे तिकडे मनुष्य फिरत असून तो अजून मिळत नाहीं असा हा आहे तरी कोण? ( १२९ ) सरकार काय हुकुम आहे? [ ३० ] वजीरसाहेब, दोन तीन दिवसांपूर्वी दामाजीपंताकडून जो पैसा आला त्याबद्दल त्याच्या कडून आलेले कागद पत्र कोठें आहेत! [ १३१ ] होय सरकार, अर्ज आला होता पण तो दफ्तरदारापाशीं आहे. पाहिजे तर तो ह्यावेळेस आणवितों. मीरसाहेब, ह्यावेळेस दफ्तरदाराकडे जाऊन त्यांस सांग कीं सुमारें दोन तीन दिवसांत जे कांहीं सरकारी कागद

आले असतील ते सर्व जलदी घेऊन येण्याविषयीं सरकारचा हुकुम आहे. ( १३२ ) महाराज, आपल्या हुकुमाप्रमाणें त्यांला लौकर घेऊन येतों. ( १३३ ) वजीरसाहेब, त्य विठूधेडाचा मला फार शोष लागला आहे. तो मला कधं भेटणार ? हे दामाजीपंत तर असें ह्मणतात कीं, ' माझा असा कोणीहि विश्वासू नौकर नाहीं. व मी कोणाबराबर रुपयेहि पाठविले नाहींत! हीं सर्व भ्रांति आहे ! तो कोणी दुसरा मनुष्य असेल माझा कोणी नाहीं ! ' आतां काय करावें ! [ १३४ ] काय दामाजीपंताचें असें ह्मणणें आहे कीं एवढी रकम आपण नाहीं पाठविली ? मग हें मोठें आश्चर्य होय ! पंत, पोंचलेल्या रकमेची पावती आह्मी त्या विठूधेडाबराबर पाठविलेली तुह्मांस अजून मिळाली नाहीं ? जर तोच तुह्मांस अजून भेटला नाहीं असें ह्मणतां, तर पावती तरी कशी मिळणार ? ( १३५ ) हा रुपये पाठविणार होता, पण अगोदरच त्याला पकडण्याकरितां इकडून मनुष्य गेले ! त्यामुळें ह्याला वाईट वाटून तो ही रकम पाठविली नाहीं, असें ह्मणत असेल ! ( १३६ ) अहो दामाजीपंत, काय आमचें हे सर्व बोलणें थट्टेचें समजून हें सर्व नाकबूल करतां ? आतां ह्यांत खरें खोटें आह्मीं काय समजावें ! अगोदर कांहींच चौकशी नकरून त्या मुजुमदाराच्या अर्जावर विश्वास ठेवून तुह्मांस पकडून आणिलें ह्यांत माझी चूक आहे. तरी ह्याबद्दल माफ करून त्या विठूची भेट होईल असें तुह्मी करा. त्याच्याशिवाय मला मुळींच करमत नाहीं. ( १३७ ) ह्याणें रुपये पाठविले असून हा नाकबूल करतो ह्यांतलीची मतलब तरी काय असावा ! आतां दफ्तरदार येतीलच, ते ह्याचें अक्षर दाखवतील मग ह्याचें नाकबुल करणें कसें चालेल ? ( १३८ ) काय

हुकुम आहे सरव...ी ( १३९ ) सुमारें दोन तीन दिवसांपूर्वी मंगळवेढ्याहून जी एक लाख अडसष्ट हजार रुपयांची रकम आली त्या प्रकरणाबद्दल दामाजीपंतानें पाठविलेले जे कांहीं कागद किंवा चिठ्या असतील त्या सर्व काढा पाहूं. ( १४० ) खावंद, आतां घोडा मैदान जवळ आहे ! हा पहा सर्व त्याचा दस्तऐवज ( १४१ ) दामाजीपंत, हें पहा, कोणाचें अक्षर हे चांगलें ओळखा. तुमचेंच. हें अक्षर अशी खात्री झाल्यावर मग तुह्माला सर्व स्मरण होईल. [ १४२ ] तर मग हें काम कोणाचें ! [ १४३ ] सरकार, ही सर्व दुनिया ज्याणें उत्पन्न करून तिचें रक्षण करितो, असा हा परमेश्वर हलक्या मनुष्याचें रूप घेऊन असें कधीं तरी हें काम करील काय ? ! काय हें! ह्याणेंच रुपये पाठविले असून हा नाहीं ह्मणत आहे. यावरून असें उघड दिसतें कीं, ह्यांत कांहीं तरी ह्याचा निराळाच मतलब असेल ! [ १४४ ] वजीरसाहेब ह्या तुमच्या बोलण्यांत कांहींच अर्थ नाहीं ! तो विठू धेड मनुष्य होता असें तुह्मीं कशावरून ह्मणतां? सूर्यतेज पाहून जसें दिपून जावें त्याप्रमाणें त्याचें तेज पाहतांच माझे डोळे दिपून गेले ! हिऱ्याची चमक कोळशाच्या आंगीं कधीं तरी येईल काय ? ह्यांत खचीत त्याणें आपली कर्तबगारि दाखविली. तो जर मनुष्य ह्मणावा तर एक लाख अडसष्ट हजार रुपयांनीं भरलेली थैली एकटा कसा आणील ? व एवढ्याशा लहान थैलींत एवढी रकम कशी हो राहिली ? तो जर हलका मनुष्य होता तर मला त्याचें वेड कसें बरें लागलें ? तसेंच त्याणें तख्तावर बसावें, व मी त्याला कडकडून भेटावें असें मला कसें वाटतें ? तो येथून गेला न गेला इतक्यांतच तो गुप्त कसा झाला ? काय ही सर्व करणी मनुष्याची आहे ?

खरोखर हें कृत्य, ज्याणें हें जगत् उत्पन्न केलें त्याचेंच आहे तुह्माला ह्यांत कांहीं कळत नाहीं. बोलू नका. दामाजी, तुमच्याकरितां तो येथें आला, तो तुम्ही मला एकदां दाखवाल तर ह्या तुमचे उपकाराबद्दल जन्मपर्यंत तुमच्या जवळ गुलामाप्रमाणें मी राहीन! दाखवा हो ती वस्तु! मला लौकर दाखवा! काय तुमचें नशीब हें! तुमची भक्ति पाहून खुद्द परमेश्वर धावून आला. असा चमत्कार कधींही मीं पाहिला किंवा ऐकिला नव्हता. ओहो! माझे हजारों मनुष्य त्याच्या शोधार्थ फिरत आहेत, पण तो अशा मनुष्यांना का! सांपडेल! सांपडणार नाहीं तुमच्याशिवाय आतां त्याचें दर्शन हाणें नाहीं. ( १४५ ) त्या विठूधेडाला कडकडून भेटण्याची जी मला आशा होती, ती आपण नाहींशी केल्यामुळें माझी सर्वस्वी नाउमेद झाली आहे. एकूण माझ्या जिवाची तुह्मांस बिलकूल परवा नाहीं! कां खरें कां खोटें? तर मेहरबानी करून हे सांगा कीं, तो कोणत्या रीतीनें आतां मला भेटेल? त्याणें आपलें नांव विठू असें कां ठेविलें! आणि त्यानें हे काम तुमच्याकरितां कां केलें! ( १४६ ) दामाजीपंत, ज्यापेक्षां एवढी बडी रकम तुमच्यासाठीं त्यानें भरली, त्यापेक्षां तुह्मी परमेश्वराचे मोठे भक्त आहां. व निर्मळ अंतःकरणानें त्याची भक्ति करणारे असून फार शांत आहां, हें मींच ह्मटलें पाहिजे असें नाहीं, आपणच सांगितलें ह्मणावयाचें. तसेंच सत्पुरुषाच्या संगतीनें आमच्यासारख्या पापिलोकांना बिन मेहनत कसे लाभ होतात हेंही सांगितलें. महाराज, मरणा नंतर उत्तम गति कशी प्राप्त करून घ्यावी हें आपण साधु पुरुष जाणत आहां! केवढी आपली योग्यता ही! असें असून मी तुमची एकट्याचीच फार निंदा केली असें नाहीं तर स

हिंदूलोकांचीही केली ! त्यांत तुमच्या ब्राह्मणलोकांस तर फारच शिवीगाळ देऊन मन मानेल तें वाईट बोललों ! खरोखर आपले आश्रित किंवा आपल्या हाताखालीं नौकरी करणारे लोक हे चांगले अक्कलवान, दिलदार पाहिजेत ह्मणजे ते आपल्या धन्यास चांगल्या रीतीनें खुष ठेवितात. नाहीं तर हलकट, पाजी लोक पाहिजे तें आपल्या वरिष्ठांस सांगून त्याचें मन बिघडवितात. त्याप्रमाणें माझी गोष्ट झाली. व ह्मणूनच तुमच्या ब्राह्मणलोकांची मी, फार निंदा करून तुमचा नाश करण्याविषयीं अगदीं तयार झालों होतों ! आतां मला स्वतः तुमची पूर्ण योग्यता समजली. तेव्हां तुमच्या लोकांवर आजपासून माझी मेहरबानी आहे हें खचित समजा. ( १४७ ) ह्यावरून, तुह्मी परमेश्वराचे मोठे भक्त आहां असें उघड दिसतें. जरी आह्मांस तुमच्या धर्माची बिलकुल माहिती नाहीं, तरी तुमच्या लोकांत मोठे नीतिमान व परोपकारी असे साधु लोक होऊन गेले आहेत हें मला ठाऊक आहे. तसेंच परमेश्वरास जाणण्यास अज्ञ मनुष्यांपासून तों ज्ञानी मनुष्यांपर्यंत त्यांचे त्यांचे योग्यतेप्रमाणें तुमच्या धर्मांत उत्तम मार्ग सांगितले आहेत असें पण मीं ऐकिलें आहे. दुसऱ्या धर्माचा उच्छेद अथवा तिरस्कार करावा असें हिंदूधर्मांत मुळींच नाहीं; आणखी तुमच्यांत अशा पुष्कळ चांगल्या गोष्टी आहेत असें ह्मणतात. ह्यावरून हिंदुधर्म चांगला असा माझा ग्रह झाला आहे. ह्या धर्मानें ईश्वरप्राप्ति होते किंवा नाहीं ह्याविषयीं आतां विचारावयास नको. पंत, ह्मणून मला तुमच्या धर्मांत घ्यावें व त्या देवळांतील तरी देवाचें दर्शन होईल असें करावें. ( १४८ ) महाराज, आपलें बोलणें मला पसंत आहे. आतां त्या देवळांतील मूर्तीचें मला दर्शन होईल असें

आपण केल्यास मी जन्मभर आपले उपकार विसरणार न
र आपण सांगाल त्याप्रमाणें वागेन. (०१४९ ) काय ,
कोणतेंच बोलणें आपण कबूल करीत नाहीं ! विचार
पाहिलें असतां आपलें बोलणें सर्वथैव खरें आहे.
तरी शेवटचें माझें बोलणें आपण ऐकावें, ह्मणजे त्या
दर्शन झाल्यासारखें होईल. ( १५० ) आपल्या
स्थार व शाहाण्या पुरुषानें ह्या बेदरराजधानींत रहावें,
करून मला दररोज तुमची भेट होत जाईल. आपल्यास मी
मोठ्या अधिकारावर ठेवितों. अथवा आपण कांहीं
घेऊन येथें खुशाल रहावें. ज्यापेक्षां तुमची भक्ति
परमेश्वरानें आम्हांस प्रत्यक्ष दर्शन दिलें. त्यापेक्षां तुम
सहवासानें आमचें कल्याण होणें तें काय राहिलें आहे ? तें
मेहेरबानी करून आपण येथें रहावें, आपल्या सर्व मनुष्य
कडे आपणाविषयीं तातडतोब मनुष्य पाठवितों. १५
माझें बोलणें आपण कांहींच कबूल करीत नाहीं ! ह
अथवा कमन त्री म्हणावयाची ! आपल्यासारख्या साधु
कांवरावर फार तकार करणेंही योग्य नाहीं ! असो, शेवटीं
तुम्हांस हें सांगणें आहे कीं. दोन तीन दिवस तरी येथें
ल रहावें. आपल्या पूर्वींच्या जागेवर राहणें जर
आपल्यास आवडत नाहीं. तर तेथें दुसरा मनुष्य
नेमावा हें आपणच सांगावें. ( १५२ ) ज्या मनु
आपली नालस्ती केली, त्या मनुष्याची बंदोबस्ती करण्या
आपण तयार झालां ! मोठी आश्चर्याची गोष्ट आहे ! अ
फार दमलां असल्यामुळें आतां आपल्यास तस्दी देणें
नाहीं. आपल्याशीं कितीही बोललों तरी पुरेसें हो
त नाहीं . तर आतां मेहेरबानी करून येथें दोन तीन दि